# चाळीसगावडांगाणी

(खंड २)

# लोकबंधात्मक आकलन

(१९८० पर्यंत)

डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

सा विद्या या विमुक्तये

वीहा पब्लिकेशन

**चाळीसगावडांगाणी (खंड २) (लोकबंध–वैचारिक)**
**(Taught & Criticism on Folk Type)**
**लोकबंधात्मक आकलन (१९८० पर्यंत)**

**लेखक**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.in

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : वीहा पब्लिकेशन्स,
प्लॉट नं. २१, अजिंक्यनगर, बोरुडे मळा,
भुतकरवाडी, सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**प्रथम आवृत्ती** १ डिसेंबर २०१३
ISBN-13-978-81-927963-1-4
**द्वितीय आवृत्ती** २०२४

**प्रकाशन क्र.** : ३

**टाईपसेटींग :**
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : वीहा पब्लिकेशन्स, अहमदनगर

**सेवा मूल्य** ३००/–

(या पुस्तकातील मतांशी प्रकाशक सहमत असेलच असे नाही.)



**कै . पू. गुरुवर्य ह. वि. फडके आणि**
**कै. पू. गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे**
**यांच्या पवित्र स्मृतीनिमित्त**

**गोपालन सेवेस**

अनिल सहस्रबुद्धे

# चाळीसगाव डांगाणी
## खंड २
## लोकबंधात्मकआकलन
## (१९८० पर्यंत)

### अनुक्रमणिका


प्रकरण पहिले – चाळीसगाव डांगाण भौगोलिक

प्रकरण दुसरे – चाळीसगाव डांगाण परिसर ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे– चाळीसगाव डांगाण परिसर : लोकजीवन

प्रकरण चौथे – चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक अभ्यास : धर्म व कला

प्रकरण पाचवे –चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक अभ्यास : बदलते स्वरूप

प्रकरण सहावे – चाळीसगाव डांगाण परिसर लोकगीतांचे वाङ्मयीन समालोचन

प्रकरण सातवे – चाळीसगाव डांगाण परिसर लोककथांचे वाङ्मयीन समालोचन

प्रकरण आठवे– चाळीसगाव डांगाण परिसर भाषिक अभ्यास

नववे – संदर्भग्रंथ सूची

सूची क्रमांक १

सूची क्रमांक २




# मनोगत

'चाळीसगावडांगाणी' च्या 'लोकबंधात्मक आकलन' या दुसऱ्या खंडात 'चाळीसगाव डांगाण' प्रदेशातील 'लोक'चा लोकबंधात्मक विचार मांडलाआहे. लोकवाङ्मयातून 'लोक' चे समग्रदर्शन घडत असते. 'लोकवाङ्मय' म्हणजे केवळ शाब्द परंपरा नसते तर; त्या शाब्दपरंपरेबरोबरच मानवी जीवनाची वर्तनपरंपरा आणि साधनपरंपरा भावात्मकतेने आविष्कृत होत असते. या शाब्द, वर्तन आणि साधन परंपरांच्या प्रचलित आविष्कार पद्धतीतून ऐतिहासिक, वर्तमानकालीन समग्र मानवीजीवनाच्या स्थितीगतीचे दर्शन घडतेच त्याचबरोबर भविष्यकालीन परिवर्तनात्मकसंकेताचेही दर्शन घडते. 'लोक'चे त्रिकालात्मकआणि त्रिविधस्वरूपाचे आविष्करण, लोकबंधाच्या, अर्थात प्रकटीकरण करणाऱ्या; 'लोक' निर्मित आणि पारंपारिकतेसह नववैशिष्ट्ये स्वीकारून प्रचलित होणाऱ्या लोकसूत्रांच्या माध्यमातून होत असते. हे 'लोक'च्या सारणीचे वैयक्तिक तत्त्व विचारात घेऊन 'चाळीसगाव डांगाण : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रयत्न केला. 'चाळीसगावडांगाणी' खंड १'मध्ये या अभ्यासाच्या दृष्टीने क्षेत्रिय अभ्यासाच्या पद्धतीने संकलित केलेले लोकवाङ्मय शास्त्रीय पद्धतीने संपादित करून संग्रहित केले आहे. या खंड-२ मध्ये लोकवाङ्मयाच्या आधारे; 'चाळीसगाव डांगाण' प्रदेशातील 'लोक'चे भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, भौतिक, सांस्कृतिक समालोचन केले आहे. त्याचबरोबर लोकवाङ्मयाची लोकसाहित्यशास्त्रीय आणि साहित्यशास्त्रीय चर्चा केली आहे. ह्या दोन्ही लोकजीवनवैशिष्ट्यांची चर्चा करतानाच; भाषेमध्ये समग्र लोकजीवन आविष्कृत करण्याचे सामर्थ्य असते; हे लक्षात घेऊन लोकवाङ्मयाच्या सादरीकरण सामर्थ्याचा अनुभव घेऊन डांगाणी भाषेचा भाषिक अभ्यास केला आहे.

''चाळीसगांव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास'' या प्रबंधलेखनाच्या निमित्ताने घडलेल्या अनुभूतीतून भविष्यात 'डांगाणी' ही डांगाणी भाषेत लिहिलेली पहिली कादंबरी लिहिता आली. ज्या कादंबरीची

वाङ्मयेतिहासात आदिवासी साहित्य प्रवाहात नोंद झाली. त्याचबरोबर ‘अहिनकुल’ ही ऐतिहासिक कादंबरी, ‘वावटळ’ ही सामाजिक कादंबरी, ‘कातळी निखारे’ ही एकांकिका यातून डांगाणी जीवन आणि अस्मितेचे दर्शन घडविता आले. लोकसाहित्य क्षेत्रात ‘लोकसाहित्य विचार, ‘लोकबंध’, ‘लोकसाहित्य संशोधन पद्धती’, ‘लोकसाहित्याचा अन्वयार्थ’, ‘लोकसाहित्याच्या अभ्यासातील चकवे आणि उतारे’ या ग्रंथाचे लेखन झाले. हे सर्व लेखन जिज्ञासू अभ्यासकांनी मुळातून वाचावे असे आग्रहाने सांगावेसे वाटते

चाळीसगावडांगाणी (१९८० पर्यंत) असे लिहिण्याचे कारण आहे. लोकवाङ्मय हे नित्य वर्तमान असते. लोकबंधाचा प्रवास अनादिअनंत असतो. २०१०-१२ पर्यंत ‘डांगाण’ चा भौतिक चेहरा खूप बदलला आहे. बदलते संदर्भ, बदलती रूपे; मानववंशशास्त्र, लोकसाहित्य, भाषाविज्ञान, सामाजिक अभ्यास, सांस्कृतिक अभ्यास यांत विचारात घ्यावी लागतात. तपशीलाची ही लवचिकता अभ्यासकांच्या लक्षात यावी अशी अपेक्षा आहे.

‘हिंद सेवा मंडळ’ या शिक्षण संस्थेच्या ‘मॉडर्न हायस्कूल, अकोले’ या हायस्कूलमध्ये मी ‘ज्युनिअर कॉलेज ऑफसायन्स’मध्ये ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक म्हणून सेवारत होतो. त्यामुळेच सत्यनिकेतनच्या वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थ्यांची मदत मला सहज मिळाली. त्या वसतिगृहाचे तत्कालिन अधीक्षक श्री. मगनलालजी येलमामे आणि नंतर श्री. गोपीनाथजी साळवे यांचेही मौलिक सहाय्य घडले.

अकोले तालुक्यातील अतिदुर्गम भागातील महादेव कोळी, ठाकर, तलवार कानडे, हटकर कानडे आदि लोक, याचबरोबर तत्कालिन राजकीय नेते, संस्था यांचेही सहकार्य मोकळेपणाने मिळाले. यामुळेच हे संशोधन कार्य घडू शकले.

कै. गुरुवर्य ह. वि. फडकेसर आणि ‘हिंद सेवा मंडळ’ संस्थेचे सर्व घटक आणि अकोले तालुक्यातील ‘लोक’ विशेषतः कै. पुरुषोत्तम टाकळकर (मामा), कै. गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे, समस्त ‘डांगाणी’ आदिवासी व आदिवासीएतर बंधुभगिनी आणि मला सर्वतोपरी सहाय्य करणारे माझे विद्यार्थी मित्र यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.


पुढील अभ्यासकांना या क्षेत्रिय अभ्यासाचा उपयोग होवो ही सदिच्छा!


**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

*



**अकोले तालुका, अहमदनगर जिल्हा, महाराष्ट्र**





# प्रकरण पहिले

# चाळीसगाव डांगाण भौगोलिक

'चाळीसगाव डांगाण' परिसराची ओळख या प्रकरणात करून घ्यावयाची आहे. 'डांगाण' म्हटले की, गुजरातमधील 'डांग' भागाची आठवण होणे साहजिक आहे. तो 'डांग' भाग हा नाही. या भागाला 'डांगाण' म्हणून या भागातील लोक ओळखतात. तसा कागदोपत्री उल्लेख अलिकडे केलेला आढळतो.

**डांगाण हे नाव कसे?**

डांगाण या शब्दाचा अर्थ सह्याद्री घाटाच्या रांगेने असलेला जंगली, डोंगराळ व चढणीचा प्रदेश - असा दिला आहे.[१] या शिवाय टेकडीची चढण, उतरण, सुळाजवळची पर्वताची चढण, झाडीचा प्रदेश, शिखर, टोक, जंगल इत्यादी कितीतरी दिले आहेत. शिवाय, जंगली प्रदेश असाही अर्थ तेथेच आढळतो.[२] अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये 'डांग' असाच शब्द देऊन - टेकड्यांचा प्रदेश, या अर्थाने तो वापरलेला आहे.[३] प्रत्यक्ष या प्रदेशाची पाहणी केल्यास या सर्वच अर्थाने 'डांगाण' हे नाव सार्थ आहे. वास्तविक सर्वच डोंगरभागांना 'डांगाण' म्हणावयास हरकत नाही. सबंध कोकणास हा शब्द वापरता येईल. तसा तो शब्द वापरला मात्र जात नाही. या प्रदेशाचे वेगळेपण नजरेत भरण्याजोगे आहे. हा प्रदेश सह्याद्रीच्या उंच उंच शिखरांचा प्रदेश आहे. सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर 'कळसुबाई' याच भागात आहे. या सर्वात उंच शिखराच्या भोवतालचा, डोंगर उतरणीवरचा हा प्रदेश आहे. या सह्याद्रीच्या इतर भागापेक्षा असलेल्या वेगळेपणानेच या भागास 'डांगाण' हे नाव प्रचलित झाले असावे, हे म्हणणे योग्य होईल.

**'चाळीसगाव डांगाण' हे नाव कसे?**

'चाळीसगाव डांगाण' म्हटले की चाळीस गावे असलेला डांगाण भाग असा अर्थ अगदी सरळ स्पष्ट होतो आणि तसाच तो प्रचलित झाला असावा, असे म्हणण्यास पुरावा मिळतो. तो पुरावा दोन प्रकारचा आहे. (१) लोकांमध्ये प्रचलित किंवा रूढ असे नाव. (२) त्या अर्थाचे कागदपत्र.[४] यातील दुसरा पुरावा परिशिष्टात जोडलेला आहे. असे असले तरी आज 'चाळीसगाव डांगाण परिसर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात प्रत्यक्ष मात्र शंभर ते एकशेपंचवीस गावांचा समावेश लोक करतात. दुसरी एक मनोरंजक गोष्ट आढळते की 'डांगाण' कोणते? असा प्रश्न विचारता, सपाटीकडून उलट दिशेने जो जो शिखरांकडे जावे तो तो तेथील लोक 'डांगाण अजून वर आहे' असे सांगतात. हा प्रदेश सपाटी सोडली की एकदम डोंगराळ बनलेला आहे हे मात्र खरे. या 'चाळीसगाव डांगाण' भागात आदिवासींची वस्ती आहे. अलीकडे महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या यादीत अकोले तालुक्यातील एकशेत्रेपन्न गावांपैकी, एकशेपंचवीसच्या आसपास गावे 'ट्रायबल एरिया' म्हणून जाहीर केली आहेत. पूर्वी प्रचलित लोकरूढीप्रमाणे 'चाळीसगाव डांगाण' हे नाव 'राजूरतर्फ'[५] म्हणून जो भाग होता त्याला म्हणत असत. हा भाग म्हणजे, प्रवरा खोऱ्यातील जामगाव या गावापासून बारी या गावापर्यंतचा होय. बारी येथेच 'कळसुबाई' हे उंच शिखर आहे.

**चाळीसगाव डांगाणच्या चतुःसीमा**

'चाळीसगाव डांगाण' म्हणजे नेमका कोणता परिसर याचा विचार येथे करावयाचा आहे. प्रारंभी दिलेल्या नकाशावरून ती कल्पना येण्यास मदत होईलच. 'चाळीसगाव डांगाण'च्या चतुःसीमा म्हणजे 'अहमदनगर' जिल्ह्याच्या पश्चिमेकडील सीमाच होत. या सीमा सह्याद्रीच्या उंच, कापीव कड्यांमुळे अगदी स्पष्ट झाल्या आहेत. अहमदनगर जिल्ह्याचे पश्चिमेकडील टोक म्हणजेच अकोले तालुका. या तालुक्याच्या जवळजवळ दोनतृतीयांशपेक्षा जास्त भाग अर्थात पश्चिमेकडील, म्हणजेच 'चाळीसगाव डांगाण परिसर' होय. अर्थातच डांगाणाच्या पूर्व दिशेला अकोले तालुक्याचा उर्वरित भाग येतो. उत्तर, पश्चिम व दक्षिणेकडील सीमा पुढीलप्रमाणे देता येतील. या सीमा अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियरनुसारच येथे दिल्या आहेत.[६] प्रत्यक्ष सीमा कशा दिसतात याचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल. 'डांगाणच्या उत्तरेकडे आवंढा व पट्टा ही शिखरे असून त्यांच्या उतरणीचा भाग उत्तर-पूर्व भागात पसरला आहे. पश्चिमेच्या बाजूने मात्र पूर्ण कापीव असा उंच कडा आहे. हा कडा उत्तरेकडून पश्चिमेकडे बराच दूर असा पसरलेला आहे.



कड्याच्या खालूनच नासिक जिल्हा सुरू होतो. तो असा उत्तरेकडून थेट पश्चिमेकडे ठाणे जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत जाऊन पोहोचतो. पट्टा शिखरावरून कळसुबाईच्यापर्यंत हा पोहोचलेला दिसतो. 'कळसुबाई' शिखर हे डांगाणच्या पश्चिम भागात आहेत. नासिक जिल्ह्यातून बारी घाट चढून वर आले की आपण कळसुबाई शिखरापर्यंत येऊन पोहोचतो. या घाटाचा शेवट म्हणजेच डांगाणची सीमा होय. कळसुबाई शिखरावरून उत्तरेकडे समोर पश्चिमेकडे नासिक जिल्हा पसरलेला दिसतो. तर दक्षिणेकडे ठाणे जिल्हा पसरलेला दिसतो. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर हे तालुके पसरलेले दिसतात. 'कळसुबाई'कडून दक्षिणेकडे रतनगड, कुलंग, हरिश्चंद्रगड ही शिखरे उभी आहेत. या शिखरांनादेखील पश्चिमेकडून दक्षिणेकडे थेट जुन्नरपर्यंत उंच कापीव कडे आहेत. हे कडे ठाणे व पुणे जिल्ह्यांपासून नगर जिल्ह्याचे वेगळेपण सिद्ध करतात. हरिश्चंद्रगडावरील 'कोकणकडा' हे वेगळेपण जास्त चांगल्याप्रकारे सिद्ध करतो. हरिश्चंद्रगड हे शिखर म्हणजे पुणे व ठाणे जिल्ह्यांची सरहद्द. एकूण डांगाणच्या पश्चिमेकडे ठाणे व नासिक जिल्ह्यांचे भाग पसरले आहेत. तर उत्तरेकडे केवळ नासिक जिल्ह्याचा भाग पसरला आहे. दक्षिणेकडे ठाणे व पुणे जिल्ह्यांचे भाग पसरले आहेत. हा डांगाण भाग एकूण अर्धवर्तुळात पसरलेला आहे. त्यामुळे त्याच्या उत्तरेकडे – नासिक, वायव्येकडे – नासिक, पश्चिमेकडे – नासिक व ठाणे, नैऋत्येकडे – ठाणे, दक्षिणेकडे – ठाणे व पुणे, आग्नेय दिशेस – पुणे व नगर, पूर्वेकडे – नगर व ईशान्येकडे – नगर असे भाग पसरले आहेत. अक्षांश १९° वर १७.८ सेकंद ते १९° वर ५१'८५ सेकंद. उत्तरेकडे व रेखांश ७३° वर ४१'३२ ते ७४° वर २३'४ सेकंद पूर्वेकडे असे डांगाण भाग व अकोले तालुका यांचे काटेकोर स्थान दाखविता येईल. प्रारंभीच्या नकाशात ते दाखविले आहेच. वर लिहिलेल्या आग्नेयपूर्व व ईशान्य दिशेला असलेला अकोले तालुक्याचा प्रदेश हा डांगाणचा भाग नाही. डांगाण भागाच्या सीमा ह्या उत्तर, पश्चिम व दक्षिण दिशेस शिखरांनी स्पष्ट झालेल्या आहेत. तर पूर्वेकडे मैदानी प्रदेश जेथे सुरू होतो, तेथपर्यंत हा भाग आहे. या भागातील शिखरांमुळे सीमा निश्चित झालेल्या असल्यामुळे त्यांची ओळख करून घेणे ठीक होईल. संपूर्ण अकोले तालुक्याचे क्षेत्रफळ १४८८ चौ.कि.मी. आहे. त्यात या भागाचे क्षेत्रफळ ७२५ चौ.कि.मी. पेक्षा जास्त आहे.[७]

**डांगाण भागातील सह्याद्री शिखरांची ओळख**

या शिखरांची ओळख करून देताना मुख्यतः अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटीयरमधून माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.[८] अहमदनगर व ठाणे जिल्ह्याच्या

दरम्यान ६० कि.मी. लांबीचा सह्याद्रीपर्यंत पसरला असून त्या बाजूने पर्वतरांग उंच भिंतीसारखी वाटते. पुढे पर्वतरांगा आग्नेय-वायव्य दिशेने झुकलेल्या असून पश्चिमेकडील उतार उल्हासनदीच्या उपनद्यांनी तयार केला आहे. या डोंगरावर किल्ले असून ही शिखरे बरीच उंच आहेत. कुलंग, रतनगड, हरिश्चंद्रगड, आणि अजुबा डोंगराची शिखरे अतिशय उंच आहे. (हरिश्चंद्रगड १४२० मी., अजुबाचा डोंगर १२७५ मी. व कुलंग १४७० मी.) सह्याद्री पर्वतरांगांची सरासरी उंची १३०० मी. असून सह्याद्रीच्या प्रमुख पर्वतरांगेपासून पूर्वेकडे कळसूबाई, वाळेश्वर, व हरिश्चंद्रगड रांगा सरहद्दीजवळ पसरल्या आहेत. पूर्वेकडे त्यांचा विस्तार आहे.

**(१) कळसूबाई –** अहमदनगर आणि नासिक जिल्ह्याच्या दरम्यान कुलंगपासून ४० कि.मी. लांबीची कळसूबाईची डोंगररांग आहे. कळसूबाईचे शिखर शंकूच्या आकाराचे असून त्याची उंची १६४६ मी. आहे. हे शिखर महाराष्ट्रात सर्वात उंच आहे. कळसूबाई शिखराच्या पूर्वेला नैसर्गिक खोलगट भाग असून त्याला बारी घाट असे म्हणतात. या रांगेत पुढे पालवगड, बितनगड व महाकाली ही महत्त्वाची शिखरे आहेत. याच रांगा तशाच पुढे उत्तरेकडे पसरल्या असून त्यावर पट्टा व आवंढा नावाची शिखरे असून ते डोंगरी किल्ले आहेत. बितनगडची उंची १४२७ मी. अशी आहे. वर उल्लेखलेली शिखरे ही सरासरी उंचीपेक्षा कमी नाहीत. आग्नेय भागात डोंगर रांगांच्या दोन सोंडा असून बितनगड व पट्टा किल्ल्याच्या दरम्यान आढळा नदीच्या दरीचा भाग आहे. उत्तर भागात कळसूबाई रांग आग्नेयेकडे वळून या डोंगराच्या सोंडांना समांतर पसरली आहे. तेथून म्हाळुंगी नदीच्या दरीचा भाग तयार होतो. पुढे हीच रांग दक्षिण भागात सिन्नर तालुक्यातून व संगमनेर तालुक्यातून २५ कि.मी. पुढे जाऊन दुधेश्वर (८३७ मी.) डोंगरात जाऊन विलीन होते.

**(२) आढळा डोंगर –** कळसूबाईच्या मुख्य रांगेपासून पट्ट्याच्या शिखराजवळून दक्षिण भागातून ९०० मी. उंचीचा सपाट पठारी भाग आढळतो. या भागातील उंच कडे जंगलविरहित आहेत. ही रांग संगमनेरच्या उत्तरेला २ कि.मी. अंतरावर संपते. तसेच दुसरी डोंगराची सोंड कळसूबाईपासून निघून बितनगडाजवळून आढळा रांगेला पूर्वेला समांतर जाते. या रांगेच्या दक्षिणेला विस्तीर्ण सपाटमाथ्याचा भाग असून त्याची उंची २००० मी. आहे. या डोंगरांच्या दोन सोंडांमधूनच आढळा नदीच्या दरीचा विकास झाला आहे. ही रांग संगमनेरच्या पश्चिमेला एकदम संपते.

**(३) हरिश्चंद्रगड रांग –** ही रांग सह्याद्रीतील हरिश्चंद्रगडापासून निघून अहमदनगर जिल्ह्यात बरीच लांब पसरली आहे. ह्या रांगेमुळे गोदावरी व भीमा नदीच्या उपनद्या वेगळ्या झाल्या आहेत. सुरुवातीला २५ कि.मी. लांबीपर्यंत पूर्वेकडे या रांगेचा विस्तार असून बाळेश्वर व या रांगेच्या दरम्यान मुळा नदी वाहते. ही रांग पुणे व अहमदनगर जिल्ह्यांच्या सरहद्दीजवळ पसरली आहे. हरिश्चंद्रगडाच्या पूर्वेला बाळा किल्ला आहे. ब्राह्मणवाड्याजवळ या रांगेची उंची हळूहळू कमी होऊन आग्नेय दिशेने पारनेर तालुक्यात जाते.

या रांगेशिवाय इतर वेगळ्या टेकड्या व लांबट टेकड्या जलप्रवाहांच्या दरम्यान आढळतात. परंतु या टेकड्यांची उंची पठाराच्या सरासरी उंचीपेक्षा कमी आढळते.

याप्रमाणे सह्याद्रीच्या रांगांचे दोन फाटे असे दोन दिशांना पसरले असून या रांगेच्या आश्रयाने 'डांगाण' प्रदेश वसला आहे. त्याची शिखरे येथे स्वतंत्र तक्त्यात मांडून दाखविली आहेत.

**सह्याद्रीची उंच शिखरे**

| अनुक्रम | शिखराचे नाव | उंची मी. मध्ये |
|---|---|---|
| १. | कळसूबाई | १६४६ |
| २. | कुलंग व अळंग जोड | १४७० ते १५०० |
| ३. | हरिश्चंद्रगड | १४२४ |
| ४. | बितनगड | १४२७ |
| ५. | अजुबा डोंगर | १३२७ |
| ६. | रतनगड | १२९७ |
| ७. | पट्टागड पठार | ९०० ते १००० |

**डांगाणामधील जलपॅणाली –**

या भागात आपणास डांगाण प्रदेशात निर्माण झालेल्या जलप्रवाहांची माहिती करून घ्यावयाची आहे. अर्थातच मुख्य नद्यांचाच विचार आपण करणार आहोत. या नद्यांना अनंत लहान-लहान ओढे या डोंगराळ भागातून येऊन मिळाले आहेत. त्यांचा विचार आपण करावयाचा नाही.

**(१) प्रवरा नदी –** सह्याद्रीच्या पूर्व उतारावरील कुलंग आणि रतनगड शिखरांच्या दरम्यान ही नदी उगम पावते. रतनवाडी या गावातील लोक मात्र या नदीचा उगम रतनगडावरच आहे असे सांगून जागाही दाखवितात. शिवाय रतनवाडी गावाजवळ 'अमृतेश्वर' नावाचे एक देऊळ आहे. त्यात महादेवाची पिंड आहे. पिंडीतील साळुंकेखाली या नदीचा प्रवाह दाखवितात.[१] सुमारे २० कि.मी. चा

प्रवाह कळसूबाई रांगांमधून येऊन पूर्वेला रंधा या खेड्याजवळ ही नदी खडकाळ दरीतून वाहते. ही दरी ६० मी. खोल व १३ मी. रुंद आहे. पुढे पूर्वेकडे मध्य भागातील पठारी भागात राजूरजवळ दरीचा विस्तार झाला आहे. यानंतर पुढे ही नदी देशावरील अकोले तालुक्यात प्रवेश करते. अकोल्याच्या पुढे डाव्या बाजूने आढळा, म्हाळुंगी या उपनद्या येऊन मिळतात. पुढे संगमनेर, राहुरी या तालुक्यातून गेल्यावर नेवासे तालुक्यात ही नदी गोदावरी नदीस मिळते. प्रवरा नदीचा प्रवाह २०० कि.मी. लांबीचा आहे.

प्रवरेच्या वरच्या टप्प्यात कळसूबाई व बाळेश्वरच्या उतारावर भंडारदरा या गावाच्या सरहद्दीत व शेंडी गावाजवळ 'विल्सन धरण' बांधल्यामुळे प्रचंड ऑर्थर सरोवराची निर्मिती झाली आहे. येथील साठ्यात ११,००० द. ल. घनफूट पाणी साठत असून धरणाची उंची नदीच्या पाण्यापासून ९० मी. आहे. याच धरणास 'भंडारदरा डॅम' किंवा 'भंडारा तलाव' अशी नावे परिसरात प्रचलित आहेत. अहमदनगर जिल्ह्यात ३२,००० हेक्टर जमिनीस या पाण्याचा पुरवठा होतो. भंडारदरा हे स्थान निसर्गरम्य असल्याने सुट्टीत येथे फार गर्दी होते. हे थंड हवेचे ठिकाण केलेले (हिलस्टेशन) असल्याने विशेषतः मुंबईकडील लोक मोठ्या प्रम णावर येथे धावतात.

**(२) आढळा नदी :–** आढळा नदी[१०] पट्टा किल्ला व महाकाली शिखरांच्या उतारावरून अकोला तालुक्याच्या उत्तर भागातून उगम पावते. ही नदी समशेरपूर भागातून २५ कि.मी. पर्यंत अरुंद दरीतून वाहते. त्यानंतर ४५ मी. खोलीच्या खोल खडकाळ दरीतून वाहते. पुढे २ मैल खडकाळ टेकड्यांमधून वाहत जाऊन संगमनेरजवळील सपाट प्रदेशात येते व दक्षिणेकडे वळून संगमनेरच्या ५ कि.मी. पश्चिमेस प्रवरेच्या प्रवाहास जाऊन मिळते. या नदीची लांबी ४० कि.मी. असून पावसाळ्यात या नदीला फार पूर येतात. नदीच्या खालच्या प्रवाहात काठ जास्त उताराचे असून लहान लहान ओढ्यांमुळे अवघड झाले आहेत. समशेरपूरजवळील खडकाळ पाण्यात बाराही महिने पाणी असते. समशेरपूरच्या वरच्या व खालच्या भागात या नदीला अनेक छोटे बंधारे घातलेले आहेत. 'देवठाण' या गावी 'आढळा धरण' नावाचे मातीचे मोठे धरण नुकतेच बांधून पूर्ण झाले आहे.

**(३) म्हाळुंगी नदी**[११] – पट्टा व आवंढा शिखराच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील उतारावरून या नदीचा उगम होतो. सहा कि.मी. पुढे गेल्यावर नासिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यात आढळा नदीला समांतर वाहत जाते. आढळा रांगेमुळे या नद्यांचे खोरे वेगळे केले आहे. पुढे दक्षिणेकडे वळून पुन्हा नगर



जिल्ह्यात ती वाहू लागते व संगमनेर शहराजवळ प्रवरा नदीला मिळते. या नदीचे पात्र उथळ व रुंद आहे. पावसाळ्यात या नदीला फार मोठा पूर येतो. या नदीची लांबी जवळजवळ ४० कि.मी. आहे. या नदीवर मोजापूर, ता. सिन्नर, जि. नासिक या गावाजवळ धरण बांधून पूर्ण झाले आहे.

**(४) मुळा नदी**[१२] – सह्याद्री पर्वतातील रतनगड व हरिश्चंद्रगड यांच्या दरम्यान पूर्वेकडील उतारावर या नदीचा उगम झाला आहे. लोक मात्र या नदीचा उगम हरिश्चंद्रगडावरच दाखवितात. सुरुवातीला २५ कि.मी. पर्यंत प्रवरा नदीला समांतर अकोला तालुक्याच्या कोतूळ भागातून ही वाहते. या नदीने आपली दरी खूप खोल केली असून, मोठ्या प्रमाणात झीज केली आहे. मोठे ओहोळ पर्वतातून जोरात वाहत येऊन मुख्य प्रवाहाला मिळतात. पुढे कोतूळ या मोठ्या खेड्यापासून दक्षिणेकडे वळण घेऊन बाळेश्वर डोंगराच्या पायथ्याजवळील उतारावरून वाहते. नंतर संगमनेर तालुक्यातून नैऋत्य दिशेकडे वाहत जाऊन पुढे उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश व दक्षिण भागातील सपाट प्रदेशाच्या दरम्यान पूर्वेकडे वाहत जाते. नंतर एकदम ईशान्येकडे वळून सपाट प्रदेशातून ३० कि.मी. पर्यंत त्याच दिशेने वाहत जाते. पुढे संगम (पाचेगावजवळ) खेड्याजवळ ही नदी प्रवरेलाच जाऊन मिळते. या नदीची एकूण लांबी १४५ कि.मी. आहे. सपाट प्रदेशाशिवाय या नदीचे पात्र अतिशय खोल आहे. शेतीसाठी या नदीच्या पाण्याचा वापर फक्त माळाच्या मैदानी प्रदेशात करता येतो.

**पर्जन्यवृष्टी –**

सह्याद्रीच्या उंच शिखरांच्या भागात हा प्रदेश पसरलेला असल्यामुळे या भागात पर्जन्याचे प्रमाण जवळजवळ ६०० सें.मी. इतके आहे.[१३] तर हा भाग सोडून माळव्यात व देशावर आले की ते थेट ६० सें.मी. पर्यंत व त्या खालीही जाऊन पोहोचते. हा प्रदेश मात्र पर्जन्यछायेचा आहे. या पर्जन्यवृष्टीमुळे पर्वताच्या उतारावरील झीज मोठ्या प्रमाणावर होते व अरुंद दऱ्यांमध्ये पाणी साचते. या भागात पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरून येणारे वारे अडविले जातात आणि कोकणास हा प्रदेश सरहद्दीवर असून याच शिखरांना वारे अडून ठाणे जिल्ह्यात पाऊस पडत असल्याने 'कोकण कड्या'च्या मार्गाने हे वारे या उंच शिखरांना वेढा घालतात आणि विशेष म्हणजे तेथेच अडकून या भागात ६०० सें.मी. पर्यंत पाऊस पडतो. भंडारदरे परिसरात व घाटघर भागात काही वेळा हे प्रमाण ७०० ते ७५० सें.मी. पर्यंत जाते; परंतु हे पाणी डोंगराची अगदीच उतरण असल्याने चटकन सखल भागात निघून जाते व विशेष म्हणजे याच भागात काही वेळा उन्हाळ्यात पिण्याच्या

पाण्याची टंचाई भासते. जूनच्या मध्यावर पाऊस सुरू झाल्यावर जुलै महिना संपेपर्यंत जवळजवळ पाऊस थांबतच नाही. काही वेळा तर झडीचा पाऊस पडतो. अशावेळी दोन दोन, तीन तीन दिवस पावसाची संततधार चालू असते. पावसाचे हे पाणी अनेक वेळा डोंगर उतरणीवर पायऱ्यापायऱ्यांच्या आकाराची भातखाचरेदेखील आपल्याबरोबर वाहून नेते. येथील लोक अशा पावसात डोक्यावर इरली घेऊन कामे करतात. पडत्या पावसात येणारे पीकच केवळ त्यांचे. अशी स्थिती या भागाची आहे. अनेक वेळा ओला दुष्काळ जाहीर करावा लागतो. जून, जुलै व ऑगस्टमध्ये सर्वसाधारणपणे आभाळ दाट अभ्राच्छादित असते. नंतर देखील अधूनमधून आभाळ दाट अभ्राच्छादित होतेच. वळीवाचे पाऊस मात्र फार प्रमाणात येथे पडत नाहीत. नंतर जवळजवळ सात महिने या भागात पाऊस नसतोच.

**वनसंपत्ती –**

अहमदनगर जिल्ह्याच्या फक्त डांग भागातच विस्तृत दाट जंगल आढळते. परंतु या भागातील आदिवासी लोकांच्या स्थलांतरित शेती पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणात नाश होत आहे. ठाणे जिल्ह्याच्या कसारा भागातील जंगल अत्यंत दाट असून ते या भागास लगतचे आहे. त्याच्या तुलनेत या भागातील जंगल तेवढे दाट नाही. हरिश्चंद्रगड, रतनगड व कळसूबाई या दक्षिण–पश्चिम पट्ट्यात मात्र दाट जंगल आहे व शिखरांवर डोंगरी किल्ले आहेत. या अरण्यामुळेच फक्त या जमिनीचे संरक्षण होते.

**(१) झाडे –** या अरण्यात धावडा, आळिंद, मोयेन, साली, बाहवा, आपटा (सौद), आंबळ, टीक, हिरडा, चांदान (चांदा), बाभूळ, जांभूळ, करंजी (करंज), कावित, मोह, निंब, खैर महारूक, सौदड (सादडा), धामण, आंबा, अर्जुनसादडा, गुलमोहर, आळीव, भेंडी, वरस, उंबर, वड, पिंपळ, साग, साल, बोर, चिंच, भुसकुट, पिंपर, पायीर, पांगारा, भोकर, आंबाडा, चाफा, सोनचाफा, सायर, करप, अेहळा, तांबट, कवठ, कडूलिंब, शेवगा, बिबवा, सिंद, आसिंद, फणस (क्वचित), गोळी, रक्तरुहेडा, आवळकंठी, चिल्हार, अेहकल, अेहकोल, गेळ (गेहळा), खरमाट, भोगाडा, बोंडारा, जांभ, शेवरी, बेल, शिसव, तिवस, लोखंडी, पांढरी, धामटी, धावटी, कुंभ, सिताफळ, रामफळ, कुढूळ, निर्गुड, पळस, सुफली, रामेटा, तोरण, रिठा, वेळू, शिव, वावळा, मोदळ, कारवा, पोगारी, डिनो, कळलाओ, निमोणी, बोरघोट, हिवर, बोंडार, गुलचायो (पीसा), काळाकिळकिळा (कढीलिंब), सिंदीची झाडे आणखी काही झाडे या भागात सापडतात. परंतु अहमदनगरच्या गॅझेटिअरमध्ये फार थोड्या झाडांची नावे दिली आहेत.[१४] येथील जीवनाचा विचार करता त्यांच्या रोजच्या परिचयाची झाडे प्रत्यक्ष त्यांना विचारून येथे देण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न पूर्ण आहे असे मात्र म्हणता येणार नाही. हीच गोष्ट झुडपे व गवत यांच्या बाबतीत देखील झालेली आहे. त्यांची नावे देखील येथे जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे.

**(२) झुडपे –** येथे आढळणारी झुडपे म्हणजे तरवडा, लांडगा, टणटणी, पानसाबर, पारशाअेरंड, (मोगली अेरंड), किंवा रत्नजोती, आंबाय, डांगया, धोत्रा, गोंदण, नडंग, कन्हेरा, सदाफुली, गुलाब, साबर, निवडुंग, करवंद, चिकणी, आंभळ, सागरगोटा, रुई, कोरफड, घायपत, सुफली, खरमट, चिल्लर, हेनकळ, अरती, दवणा.

**(३) वेली, कंद, गवत –** याचप्रमाणे वेली, कंदमुळे, गवत इत्यादी प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील. तोंडली, रताळी, कारली, दोडका, घोसाळी, काकडी, डांगर, वाळूक, टरबुज, चाई, फवली, करटुली, घेवडा, तांबोळी, कडुकंद, हळींदा, हमींद, मेका, गोमेटी, कावळी, बाभूळी, भोवरा, कुसर इत्यादी वेल तर शेडा, गोनदळ (गुदमल), चिरका, माखल, पवज्या, कुळशीकंद, रोशा, कवदर, पंधा, दिव इ. कंदमुळे. गवताचे प्रकार तर आहेतच त्याशिवाय, कुसळी, कुंदा, हरळ इत्यादी आणखी गवताचे प्रकार असून काही पावसाळ्यातील रानगवत किंवा पालेभाज्या म्हणून ज्या वापरल्या जातात त्यांची नावेही येथे दिली आहेत. कवला, चायी, बरकी, कुरडु, नारेळी, कोंबडा, कातोरे, लोतो, बडदा, घोळू इ.

याशिवाय पानकणीस, निशिगंध यासारख्या काही वनस्पती पाणथळ जागी आढळतात. इतर खाजा, खाजरा यासारख्या काही विचित्र वनस्पती असंख्य आहेत. त्यांची नावे खुद्द या लोकांनादेखील माहीत नाहीत. त्यांना नावे विचारता 'या येयरीच (उगाच) आहेत' असे ते सांगतात. त्यांचा शोध वनस्पती शास्त्रज्ञांनीच घ्यावा हे बरे.

**प्राणी** –

या भागात पूर्वी जंगली हिंस्त्र श्वापदे बऱ्याच प्रमाणात होती, असे प्रचलित आख्यायिका, गोष्टी व निरनिराळ्या ठिकाणी जंगली जनावरांच्या दगडी मूर्ती करून बसविलेल्या आहेत त्यावरून म्हणता येते. उदाहरणार्थ– पट्टागड येथे म्हसोबाच्या डोंगरावर जाताना वाघांची आकृती आढळते. हरिश्चंद्र गडावर व

कळसूबाईवर जाताना अशा आकृती आढळतात. या जंगलाची आजची अवस्था प्राण्यांच्या बाबतीत मात्र फारशी चांगली नाही. अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियर-मध्ये याविषयी काही माहिती दिलेली आहे.[१५] त्याचप्रमाणे प्रत्यक्ष पाहणी व तेथील लोकांच्या सांगण्यावरून पुढीलप्रकारचे जंगली व इतर जनावरे या भागात सापडतात.

**(१) जनावरे –** काहीवेळा बिबट्या वाघ म्हणजे ठिपके असलेला वाघ या जंगलात आढळतो. परंतु पट्टेरी वाघ मात्र फारच क्वचित येतो. याशिवाय कोल्हे फार मोठ्या प्रमाणावर या जंगलात आहेत. शिवाय तरस, जंगली मांजर, लांडगा इत्यादी मांसाहारी प्राणी सापडतात. याशिवाय घोरपड, मुंगूस, खोकड, रानउंदीर हेही प्राणी आढळतात. ससा पांढरा व ससा तपकिरी, पांढरे उंदीर हे प्राणीदेखील इकडे विपुल प्रमाणात आहेत. खार हा प्राणी येथे आहे. काळ्या तोंडाची माकडे म्हणजे वानर मात्र भरपूर प्रमाणात या भागात आहेत. तसेच लाल तोंडाची छोटी माकडे या भागात आहेत.

**(२) पक्षी –** या भागात सर्वात मोठ्या प्रमाणात सापडणारे मोठे पक्षी म्हणजे मोर, घार, गिधाडे, बहिरी ससाणा हे होत. यात मोर या भागात सर्वदूर जंगलात आहेत. या मोरांनी या भागातील संस्कृतीवर बराच परिणाम केला आहे. याशिवाय वावसे, टिटव्या, लावऱ्या, साळुंकी, पोपट, चकवा, खंड्या, करकोचे, सुगरण, कावळा, चिमणी, माळढोक पक्षी आढळतो. त्यांचे वास्तव्य अनिश्चित आहे. कोयाळ्या, अगळे, वटवाघळे, कोकिळा, पारवे, व्होले इत्यादी पक्षीही आहेत.

**(३) पाळीव प्राणी –** याशिवाय पाळीव प्राण्यांपैकी गाय, म्हैस, शेळी, काही प्रमाणात मेंढ्या व कुत्रा हे प्राणी आहेत. कोंबड्या सरसहा पाळल्या जातात.

**(४) सर्प –** या प्राण्यांबरोबरच या भागात आढळणारे साप आपण बघू या. या भागात कोब्रा जातीचे नाग आढळतात. शिवाय काळ्या नाग, घोणस, फुरसा, हरनाग, हरनागाचा आणखी एक प्रकार (पांढरा) असे विषारी साप व त्याचप्रमाणे काही बिनविषारी साप, आंधळ्या, अजगर (महांडुळ), गांडूळ, विरूळा, कवड्या सर्प, मांजऱ्या साप, फुरशासारखा एक लहान सर्प, गवत्या, उंदऱ्यासाप, दिवाड, नानेटी, सर्पटोळी इत्यादी सर्प आढळतात. या भागात कीटकांपैकी मधमाशी, मोहरीमाशी, कुंभारीण, गांधीलमाशी, पिसवा, जळवा, क्वचित कोळी, कातीण, मिरकुटे, चाचणे, मुंग्या, डोंगळे इत्यादी असंख्य प्रकारचे



कीटक आढळतात. त्यांची देखील संपूर्ण नावे देता येत नाहीत कारण तेथील लोकांना तितकीशी माहिती नाहीत.

**शेती– जमीन –**

राजूर, कोतूळ, व समशेरपूर डांग असे या डांगाण भागाचे तीन प्रकार केले तर यातील डोंगरउतरणीवर अशीच या भागातील जमीन आहे. वास्तविक पाहता प्रवरा, मुळा व आढळा, म्हाळुंगी या नद्यांचा उगम या परिसरात असून हे उतार ही त्यांची खोरी; परंतु ही जमीन गाळाची व सुपीक नाही. कारण हे डोंगर उतार अगदीच सखल आहेत. या भागात पायऱ्यापायऱ्यांच्या आकाराची छोटीछोटी भातखाचरे केलेली आहेत. काही ठिकाणी पठारी भाग आहे. नाही असे नाही. तसेच इतर उतारावर शेती केली जाते. ही सर्व ठिकाणची जमीन तांबडी व मुरमाड अशी आहे. खडकावर साठलेली माती दरवर्षी धुपते परंतु वरून घुसून आलेली माती अडून शेती करण्यापुरती तयार होते. एक पावसाळी पीक या प्रदेशातील खरे पीक. नंतर थंडीत सखल प्रदेशातील जमिनीत जेथे ओल आढळेल तेथे काही प्रमाणात पीके घेण्याचा प्रयत्न हे लोक करतात. परंतु पावसाळा संपला की मग पाण्याची टंचाई फारच प्रमाणात भासते. आणि मग त्यांना पिण्यास पाणी लांबून आणावे लागते तर शेतीस कोठून मिळणार, अशी अवस्था आहे. डोंगराच्या मध्यभागापासून खाली हिरवीगार अरण्ये आहेत. आणि त्यामुळे शेती टिकून राहणे घडते. परंतु या भागातील स्थलांतरित शेतीपद्धतीमुळे शेतीखाली माती अडविणारी अरण्ये नष्ट होतील की काय असा प्रश्न निर्माण होतो. येथील शेती मुख्यतः डांगी बैल व रेडे यांच्या जीवावर केली जाते. परंतु वाहतुकीची साधने नसून जमिनी वस्तीपासून लांब असल्याने येथील लोकांना फार कष्ट करावे लागतात.

**पीके –**

या भागातील जमीन व एकंदर पावसाचे प्रमाण कोकणाप्रमाणेच असल्याने व जमीन देखील साधारणतः तशीच असल्याने या भागातील पिके साधारण त्याच प्रकारची पाहावयास मिळतील.

**(अ) धान्ये –**

**(१) भात :–** या भागातील मुख्य पीक म्हणजे भात. या भागातील भाताच्या जाती असंख्य आहेत. जिरवेल (जिरेसाळ), रायभोग, आंबेमोहोर, काळभात या जातीचे तांदुळ सुवासिक असून त्यांचे पीक चांगले येते. तसेच येरसाळ, ढवळीसाळ, कोळपी, कोळपीचे वेगवेगळे प्रकार, वरंगळ इत्यादी अनेक प्रकारचे भात येथे होतात. अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये या भागातील

मुख्य पीक बाजरी असे सांगितले आहे.[१६] ते तसे नसून भात हेच या भागातील मुख्य पीक होय. हे कोणासही प्रत्यक्ष पाहणी करताना दिसून येईल. या भागात भाताचेच प्रकार लोकांच्या खाण्यात आहेत. या भातावरच त्यांचे पूर्ण जीवन अवलंबून आहे, असे म्हटले तरी चालेल. जपानी पद्धतीने भातशेती काही प्रमाणात केली जाते. तसेच राप पद्धतही आढळते. लावभात आणि पेरभात असे भाताचे दोन प्रकार हे लोक करतात.

**(२) नागली –** भाताला दुय्यम असे पीक म्हणजे नागली. हे पीक डोंगराच्या उतरणीवर, माळावर, जेथे जागा मिळेल तेथे हे लोक नागलीचे पीक बाजरीच्या पिकाप्रमाणे करतात. नागलीचे पीक पुरवठा म्हणूनच केवळ त्यांच्या दृष्टीने उपयोगाचे ठरते. बरड देखील नागलीसारखे उपयोगात आणतात.

याशिवाय वरई (भगर), राजगिरा, सुरासणी, उडीद, चवळी, गोडे वाल, कडूवाल, वाटाणा इत्यादी पिके लोक घेतात. सावा हाही वरईसारखे एक धान्य आहे.

**(३) भुईमुग –** हे एक या लोकांचे थोडेसे पैसे मिळवून देणारे पीक आहे. या भूमीतला भुईमुग चवीला अतिशय गोड असतो. त्याचा दाणा तांबडा पिवळसर असा दिसतो. हा पावसाळ्यात व जेथे शक्य होईल तेथे दुसऱ्यांदा घेण्याची पद्धत आहे.

**(४) हुलगा– कुळीथ –** हे एक आणखी दुय्यम पीक म्हणून हे लोक करतात. याच्या भाकरी, पिठले केले जाते.

**(५) हरभरा –** हरभरा हे कुळथाइतकेच महत्त्वाचे पीक होय. जेथे ओलावा सापडेल तेथेच हे पीक येते. त्यामुळे डोंगरांच्या वरच्या भागावर हे पीक काढता येत नाही.

**(ब) भाज्या –**

ढोबळ्या मिरच्या, लवंगी मिरची, वांगी, रताळी, मेथी, करडई, तांदुळसा, माठ, घोसाळी, दोडकी, विशेषतः डांगर इत्यादी भाज्या या भागात केल्या जातात.

**शेतीपद्धती –**

ही पिके काढण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. भात राप व जपानी पद्धतीने केला जातो. डोंगर उतरणीवरील शेतीला डाहळी किंवा कुमरी प्रकारची शेती असे म्हणतात. जंगलातील पालापाचोळा, लाकडे तोडून वा गोळा करून ती शेतावर पसरली जातात व त्यांच्या साहाय्याने जमीन भाजून काढली जाते.



त्याला राप असे म्हणतात. जपानी पद्धतीने भात करताना भाताची रोपे काही ठराविक अंतरावर सरळ रेषेत लावण्याची पद्धती आहे. ही पद्धत केवळ पंधरा वीस वर्षांपूर्वीच या लोकांना दाखवून शिबिरातून शिकविण्यात आली. तेव्हापासून ती या भागात प्रचलित आहे. परंतु सर्वच शेती मात्र या पद्धतीने केली जात नाही. रापेची पद्धत मात्र हळूहळू सोडून दिली जाते आहे असे दिसून येते.

**या भागातील गावे व घरे –**

हा संपूर्ण प्रदेश खेड्यांचा आहे. ही खेडी अत्यंत लहान लहान असून डोंगरांच्या आश्रयाने, डोंगरांच्या पोटाशी वसलेली आहेत. त्यामुळे लवकर सापडत नाहीत. त्याशिवाय या खेड्यांना मोठ्या प्रमाणावर वाड्या व झापे आहेत. परंतु अशीदेखील काही खेडी आहेत की तेथे एखादा ओढा किंवा झरा एवढीच पाण्याची व्यवस्था आढळून येते व त्याच्या आधारे खेडे वसलेले आढळून येते. काही ठिकाणी झोपड्या, पागीर (दोन, चार झोपड्या एकत्र), वाडी, (दहा पाच घरे एकत्र) असे आढळून ही सारी पाऊलवाटांनी खेड्यांना जोडलेली असतात. या पाऊलवाटा दर पावसाळ्यात बदलतात. या भागातील घरे भाजलेल्या विटांची व कौलारू छताची कमी प्रमाणात व शक्यतो श्रीमंतांची असतात व गरीब लोकांची घरे दगड, बांबू, करव यांची बनविलेली, कुडाची व वरती गवताची छपरे असलेली आढळतात. काही वेळा ही घरे साग, पळस आदि झाडांच्या पानांनी साकारलेली किंवा शिवलेली आढळतात. अलीकडे मंगळूर टाईल्स मोठ्या प्रमाणावर हे लोक वापरीत आहेत. ही घरे अत्यंत बसकी व पूर्ण उतरत्या छपराची असतात. शेपन्नास ऊंबऱ्यांचा असा गाव झालेला असतो. अशा प्रत्येक गावात एक मारुतीचे मंदिर बांधलेले असते. चावडी, शाळा व सार्वजनिक गप्पांचे ठिकाण तेच असते. गावांच्या जवळ बांधलेली विहीर बहुधा आढळते. पावसाळ्यात या विहिरीदेखील पाण्याखाली असतात. गावातील व वाड्यावरील घरातूनच गुरांची राहण्याची सोय केलेली असते. अलीकडे गावांगावांतून काही प्रमाणात शाळा, ग्रामपंचायत, क्वचित सोसायटी यांच्या छोटेखानी कौलारू इमारती झालेल्या आढळतील. याच इमारती सुधारलेल्या आढळतात. गावाची लोकसंख्या सरासरी ७०० ते ११०० पर्यंत असते. गावांची नावे विचित्र आहेत. ती स्वतंत्रपणे पुढे नमूद केली आहेत. चाळीसगाव डांगाणातील गावे ही तीन विभागात विभागली गेली आहेत. याचे कारण ती सह्याद्रीच्या शंकूच्या आकाराच्या उतारावर वसली असून हा उतार तीन बाजूंनी आहे. त्या उतारांनाच राजूरडांग, कोतुळडांग व अकोला (समशेरपूर) डांग असे म्हटले जाते. त्यांचे विभाजन हे अर्थात स्थूल

आहे. कारण ते काटेकोर असे करताच येणार नाही. ते विभाजन पुढील तक्त्यात मांडले आहे.

**तक्ता क्र. १– गावे**

| **राजूरडांग** | **कोतुळ डांग** | **अकोले (समशेरपूर डांग)** |
|---|---|---|
| १ अंबेवंगण | १ अबिटखिंड | १ बिताका |
| २ अंबित | २ बोरी | २ एकदरे |
| ३ बाभुळवंडी | ३ चांद– सूरज | ३ केली (सुम्हणवाडी) |
| ४ बलठाण | ४ चिंचवणे | ४ खिरविरे |
| ५ बारी | ५ घोटी | ५ कोंभाळणे |
| ६ भंडारदरा | ६ कळंब | ६ महाळुंगी |
| ७ चिचोंडी | ७ केळी (कोतुळ) | ७ मुथळणे |
| ८ देवगाव | ८ केळी (ओतूर) | ८ पाडोशी |
| ९ धामणवन | ९ खेतेवाडी | ९ सांगवी |
| १० दिगंबर | १० कोहाणे | १० शेरणखेल |
| ११ येसरठाव | ११ लवाळी (कोतुळ) | ११ तीर्डे |
| १२ घाटघर | १२ लवाळी (ओतूर) | |
| १३ गोंदोशी | १३ मन्याळे | |
| १४ गुहीरे | १४ मोगरस | |
| १५ जामगाव | १५ नाचणठाव | |
| १६ कातळापूर | १६ पाडळणे | |
| १७ केळुंगण | १७ पैठण | |
| १८ खडकी | १८ फोपसंडी | |
| १९ कोदनी | १९ खातेवाडी | |
| २० कोहोंडी | २० शेलद | |
| २१ कोळटेंमे | २१ शिलवंडी | |
| २२ कोथळे | २२ शिंडे | |
| २३ कुमशेत | २३ सोमलवाडी | |
| २४ लाडगाव | २४ तळे | |
| २५ माळेगाव | २५ विहीर | |
| २६ मान्हेरे | | |



२७ माणिक ओझर
२८ मळेशी
२९ मुरशेत
३० मुतखेल
३१ पाभुळवंडी
३२ पाचनयी
३३ पांजरे
३४ पेंडशेत
३५ पिंपळगाव नाकविंदे
३६ पिंपरकणे
३७ पुरुषवाडी
३८ राजूर
३९ रंधा (बु.)
४० रंधा (खु.)
४१ रतनवाडी
४२ साकिरवाडी
४३ सामरद
४४ सांबरकुटे
४५ शेलविहीरे
४६ शेंडी
४७ शेणित
४८ शिंगणवाडी
४९ शिरपुंजे (बु.)
५० शिरपुंजे (खु.)
५१ शिसवद
५२ तेरूंगण
५३ टिटवी
५४ उडदावणे
५५ वागदरी
५६ वाकी
५७ वांजुळशेत

५८ वारनघुशी

**एकूण ५८ २५ ११**

येथे ९४ गावांची नावे दिली आहेत.[१७] परंतु आणखी काही गावचे लोक आपली गणना डांगाणात करतात व ही संख्या सुमारे एकशेदहा ते वीसपर्यंत जाते. आता तालुक्यातील १५३ गावांपैकी १२५ गावे ट्रायबल एरिया म्हणून जाहीर झाली आहेत. अकोले तालुक्यातील उर्वरित भाग मैदानी राहतो की जेथून संगमनेर तालुक्यानजिकचा भाग सुरू होतो. गावांना दिलेली नावे त्यांच्या संस्कृतीवर व परंपरेवर प्रकाश टाकणारी आहेत. त्याचा विचार आपण पुढे करणारच आहोत.

**लोकसंख्या –**

या चौऱ्याण्णव गावची लोकसंख्या तशी अकोले तालुक्याच्या दोनतृतीयांशपेक्षा जास्त आहे. त्यांची लोकसंख्या येथे अकोले तहसीलमधील दप्तरांनुसार देण्याचा प्रयत्न केला आहे.[१८] ती लोकसंख्या १९६१ ते १९७१ च्या खानेसुमारीप्रमाणे दिली आहे. ती पुढील तक्त्यात मांडून दाखवीत आहे –

| **गावाचे नाव** | **लोकसंख्या** | |
|---|---|---|
| | **१९६१** | **१९७१** |
| १. अंबेवंगण | ४२७ | ५५९ |
| २. अंबित | २८४ | ३६१ |
| ३. बाभूळवंडी | ५२५ | ६९८ |
| ४. बलठाण | ३२५ | ४१६ |
| ५. बारी | १०२१ | १२३० |
| ६. भंडारदरा | ५७५ | १४३५ |
| ७. चिचोंडी | ५८४ | ७४० |
| ८. देवगाव | ५४१ | ६४७ |
| ९. धामणवण | ६२५ | ७५७ |
| १०. दिगंबर | ५०८ | ६४४ |
| ११. येसरठाव | २२० | २५७ |
| १२. घाटघर | ४५५ | ४९१ |
| १३. गोंदोशी | ५०० | ६३५ |
| १४. गुहारे | ३७० | ४२८ |
| १५. जामगाव | २७४ | ३७९ |



| | | |
|---|---|---|
| १६. कातळापूर | ७३१ | ९२७ |
| १७. केळुंगण | ६३८ | ७३८ |
| १८. खडकी | ६०७ | ७५५ |
| १९. कोदनी | २९७ | २६९ |
| २०. कोहोंडी | ४६८ | ५३६ |
| २१. कोळटेंमे | २२६ | २५५ |
| २२. कोथळे | ४०२ | २९० |
| २३. कुमशेत | २९२ | ३६९ |
| २४. लाडगाव | ४१९ | ४६३ |
| २५. माळेगाव | ४७८ | ५५६ |
| २६. मान्हेरे | ८४१ | १०२६ |
| २७. माणिक ओझर | ४१९ | ४८८ |
| २८. मवेशी | १०१६ | १२९७ |
| २९. मुरशेत | ३९३ | ४३५ |
| ३०. मुनखेल | ५३१ | ६१५ |
| ३१. बाभुळवंडी | ३६० | ५०१ |
| ३२. पाचनई | ३३० | ४०१ |
| ३३. पांजरे | ६७५ | ७५५ |
| ३४. पेंडशेत | ३०९ | ३५५ |
| ३५. पिंपळगाव नाकविंदे | ८९१ | १०८२ |
| ३६. पिंपरकणे | ९७२ | १०५५ |
| ३७. पुरुषवाडी | २४९ | ३१६ |
| ३८. राजूर | ३७४४ | ४६३६ |
| ३९. रंधा (बु.) | ५०९ | ६१५ |
| ४०. रंधा (खु.) | ५६ | ६३ |
| ४१. रतनवाडी | ५०५ | ६०२ |
| ४२. साकिरवाडी | १२४६ | १५१६ |
| ४३. सामरद | २५२ | २९४ |
| ४४. सावरकुटे | ६३१ | ७०७ |
| ४५. शेलविहिरे | ५०९ | ६५४ |
| ४६. शेंडी | ३४५ | ९७१ |

| | | |
|---|---|---|
| ४७. शेबित | ११७८ | १४०१ |
| ४८. शिंगणवाडी | ३८८ | ४५१ |
| ४९. शिरपुंजे (बु.) | ६५५ | ७२४ |
| ५०. शिरपुंजे (खु.) | १४६ | १८४ |
| ५१. शिसवद | २८० | ३९८ |
| ५२. तेरूंगण | ६४८ | ८०३ |
| ५३. टिटवी | ५११ | ५६२ |
| ५४. उडदावणे | ६२० | ७२५ |
| ५५. वागदरी | ३०३ | ३९७ |
| ५६. वाकी | ३९५ | ४५२ |
| ५७. वांजुळशेत | ४८१ | ५१६ |
| ५८. वारनघुशी | १५६३ | १७८१ |
| ५९. अबिटखिंड | ४९६ | ५७३ |
| ६०. बोरी | ३१५ | ४६० |
| ६१. चांदसूरज | ८८ | ११२ |
| ६२. चिंचवणे | ३८५ | ९९२ |
| ६३. घोटी | ४३४ | ५७८ |
| ६४. कळंब | ५८५ | ७१२ |
| ६५. केळी (कोतुळ) | ९८२ | १२३५ |
| ६६. केळी (ओतूर) | १०३४ | १२४२ |
| ६७. खेतेवाडी | ३१९ | ४४० |
| ६८. कोहाणे | ३७२ | ४१८ |
| ६९. लवाळी (कोतूळ) | १९५ | १८३ |
| ७०. लवाळी (ओतूर) | ३१७ | ३२७ |
| ७१. मन्याळी | ४२६ | ५९२ |
| ७२. मोगरस | ४४५ | ६०५ |
| ७३. नाचणठाव | ३०० | ४०९ |
| ७४. पाडळणे | ८२६ | १०११ |
| ७५. पैठण | ५७३ | ६२६ |
| ७६. फोपसंडी | ३४४ | ४०७ |
| ७७. सातेवाडी | ११०३ | १३०२ |
| ७८. शेलद | ७४७ | ८९३ |
| ७९. शिलवंडी | ३९९ | ४५१ |
| ८०. शिंदे | ८५ | १०२ |
| ८१. सोमलवाडी | ३२५ | ४२४ |
| ८२. तळे | ४६९ | ३८५ |
| ८३. विहिर | २९५ | ३२९ |
| ८४. बिलाका | १५४ | २०३ |
| ८५. एकदरे | १५७७ | १८४१ |
| ८६. केळी (रुम्हणवाडी) | ६१९ | ७७३ |
| ८७. खिरविरे | १४९८ | १८४६ |
| ८८. कोंभाळणे | ८७९ | ११०२ |
| ८९. महाळुंगी | ४०६ | ५१४ |
| ९०. मुथळणे | ७९४ | ९४४ |
| ९१. पाडोशी | ७७१ | ९०९ |
| ९२. सांगवी | १०२७ | १२२८ |
| ९३. शेरणखेल | ५३५ | ६९१ |
| ९४. तीर्डे | २२८९ | २७०४ |
| | **५४१२१** | **६८१५४** |

अकोले तहसीलमध्ये उपलब्ध असलेल्या खानेसुमारीच्या आकडेवारीनुसार १९६१ सालची या भागातील लोकसंख्या ५४१२१ इतकी होती तर १९७१ सालात ही लोकसंख्या सुमारे ६८१५४ इतकी झाली. याच सुमारास भंडारदरा डॅमचे नव्याने काम चालू होते. म्हणून काही अन्य लोक यात मोजले गेले असण्याची शक्यता आहे, ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. लोकसंख्येच्या दृष्टीने या भागातील १००० पेक्षा जास्त वस्तीची गावे ही मोठी समजावयास हरकत नाही. त्याचप्रमाणे तीर्डे या गावासारखे एखादे गाव असे असते की त्याला वाड्याच अनेक असतात. या तीर्डे गावाला बारा वाड्या म्हणजे छोटी छोटी गावेच आहेत. यांची मिळून वर उल्लेखिलेली लोकसंख्या आहे. दर चौरस किलोमीटरला ८० इतकीच लोकसंख्या आहे. राजूर व कोतूळ हीच खरी व्यापाराच्या दृष्टीने मोठी खेडी. यांना जवळचे असे फक्त नासिक आणि तेदेखील सुमारे ६० ते ७० किलोमीटर लांब आहे.

**या भागातील रस्ते –**

मुंबई–आग्रा रोडला जोडला जाणारा 'कोल्हार–घोटी' हा मार्ग संगमनेर – अकोले – राजूर – भंडारदरे – बारी– घोटी असा या भागातून जाऊन नासिक जिल्ह्यातील घोटी या गावी तो मुंबई–आग्रा रस्त्याला मिळतो. याशिवाय अकोला–बोटा व अकोला–समशेरपूर आणि राजूर–कोतूळ हे रस्ते या भागातील प्रमुख होत. अकोले–बोटा हा रस्ता पुणे–नासिक या रस्त्याला जाऊन मिळतो. असे असले तरी प्रत्यक्ष डांगाणचा भाग मात्र या रस्त्यांपासून वंचित राहिला आहे. 'सर्वोदय योजने'खाली सुरूझालेल्या राजूर केंद्राने म्हणजे हल्लीच्या 'सत्यनिकेतन'या संस्थेमार्फत काही रस्ते या भागात बांधले गेले आहेत[१९] परंतु यातील बऱ्याच रस्त्यांची प्रचंड पावसाने प्रचंड प्रमाणात धूप झाली आहे. त्यामुळे हे रस्ते पुष्कळ अंशी असूननसून सारखेच आहेत. तसेच पावसाळ्यात जे प्रमुख रस्ते सांगितले त्यांचादेखील अनेक वेळी उपयोग होत नाही. कोल्हार–घोटी हा प्रमुख रस्ताच कळस, रंधा, भंडारदरा व दारणापूल येथे पाण्याखाली असतो. तसेच अकोला–बोटा मार्ग कोतूळ पुलाजवळ पाण्याखाली असतो तर अकोला–समशेरपूर या मार्गाचा हा मार्ग कच्चा असल्यामुळे उपयोग होत नाही. त्यामुळे या भागाचे अगदी एखाद्या बेटात रूपांतर होते. जवळजवळ या चार महिन्यात दळणवळण पूर्ण बिघडून जाते. हे रस्ते नकाशामध्ये पूर्ण दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून येथे तक्त्याची आयोजना केली नाही. हल्ली रस्त्यांची सुधारणा होत असली तरी ती पुरेशी नाही असे दिसते.

**या भागातील लोक –**

या भागात महादेव कोळी, ठाकूर, तलवारकानडे, व हटकरकानडे हे लोक आहेत त्यापैकी बहुतेक वस्ती महादेव कोळ्यांची आहे. त्याखालोखाल ठाकूर (ठाकर) व त्यांच्या बरोबरीने तलवारकानडे आहेत. हटकरकानडे फार कमी आहेत. याशिवाय काथोडी, गोची अगदी नसल्यात जमा आहेत. यातील महादेव कोळी, ठाकूर व तलवारकानडे मराठी भाषाच बोलतात. हटकरकानड्यांची भाषा पूर्ण भिन्न आहे. परंतु ती त्यांच्या घरापुरतीच मर्यादित आहे. बाहेर व्यवहारात ते देखील पूर्ण मराठीच बोलतात. यांचा सर्वांचाच मुख्य धंदा शेती असून सर्वच लोक दरिद्री आहेत. त्यांना दुय्यम धंदा दुधाचा आहे. पाच ते सहा महिने शेती व इतर वेळी मजुरी करण्याचा प्रयत्न ते करतात. परंतु मजुरी या भागात फारशी नाही. सर्वांची परिस्थिती सारखीच आहे. यांना उरलेल्या काळात कंदमुळे, झाडपाले गोळा करण्यासाठी जंगलात हिंडावे लागते. एकंदरीत येथील लोक कष्टाळू आहेत.



परंतु हा संपूर्ण डोंगराळ भागच दरिद्री आहे.

**समारोप –**

या प्रबंधाचा मुख्य उद्देश्य 'चाळीसगाव डांगाण'चा सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास करणे असा आहे. तरीदेखील भौगोलिक आढावा या ठिकाणी प्रथम घेण्यात आला. याचे कारण अगदी उघड आहे, की मानवी संस्कृतीवर, भाषेवर व वाङ्मयावर भौगोलिक वातावरणाचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर होत असतो. तसेच त्या परिसरातील वाङ्मयाचा व भाषिक अभ्यास करताना त्या भाषेतील शब्दघटना, पर्याय व शब्दकळा समजावून घेताना त्या भागाची भौगोलिक माहिती मिळवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

याठिकाणी घेतलेला भौगोलिक आढावा हा अत्यंत स्थूल स्वरूपाचा असून त्याचा उद्देश या प्रबंधाचा उद्देश सिद्ध होण्यास मदत व्हावी एवढाच आहे. शिवाय भूगोल विज्ञानाच्या दृष्टीने देखील या प्रकरणाकडे पाहून चालणार नाही. ही गोष्टदेखील येथेच सांगणे उचित होईल. आतापर्यंत घेतलेल्या भौगोलिकआढाव्यातून आपणास पुढीलप्रमाणे काही ठळक निष्कर्ष काढता येतील.

**काही ठळक निष्कर्ष**

(१) डोंगराळ व डोंगर उतरणीचा हा भाग असल्याने व जंगल असल्याने या भागास डांगाण म्हणतात. कदाचित गुजराथच्या 'डांग' या भागाच्या नावावरून ते आले असावे, असे या भागात सर्वोदयाचे काम पाहणारे श्री. पाटणकर यांचे मत आहे. (प्रत्यक्ष भेटीत व्यक्त केलेला विचार)

(२) 'चाळीसगाव डांगाण' असे परिसराचे नाव असले तरी कोतूळ व समशेरपूर परिसरातील लोकही आपली गणना त्यातच करतात.

(३) 'चाळीसगाव डांगाण' हा प्रदेश पुणे, नासिक व ठाणे या जिल्ह्यांच्या सरहद्दीवरील अहमदनगर जिल्ह्याचा भाग आहे व त्याचे क्षेत्रफळ ७२५ चौ. कि.मी. असून अकोले तालुक्याचे क्षेत्रफळाच्या ते सुमारे एकद्वितीयांश आहे.

(४) हा भाग सह्याद्री पर्वताच्या सर्वात उंच शिखरांचा आहे.

(५) या भागातून प्रवरा, मुळा, महाळुंगी आणि आढळा या चार नद्या उगम पावून वाहतात परंतु शेवटी प्रवरेतच त्यांचे रूपांतर होऊन प्रवरादेखील गोदावरीस मिळते.

(६) या भागातील पावसाचे प्रमाण ६०० सें.मी. ते ७०० सें.मी. पर्यंत आहे.

(७) जंगलसंपत्ती बरीच असून स्थलांतरीत शेतीपद्धतीने जंगल कमी होत

गेले आहे.

(८) जंगली हिंस्त्र श्वापदे आता फारशी नाहीत.

(९) जमीन तांबडी, मुरमाड असून डोंगर उतरणीवरील आहे.

(१०) भात हे मुख्य पीक असून नागली, वरई, भुईमूग इ. दुयम पिके आहेत.

(११) गावे अतिशय लहान आहेत व घरे कौलारू वा पाने गवत यांनी शेकारलेली, ठेंगणी आहेत.

(१२) सुमारे ९४ गावे या भागाची असून त्यांची लोकसंख्या सुमारे ६८००० एवढी आहे. प्रत्येक गावाची सरासरी लोकसंख्या सुमारे ६२० इतकीच आहे. (८० दर चौ.कि.मी)

(१३) महादेवकोळी, ठाकर, तलवारकानडे व हटकरकानडे असे आदिवासी लोक येथे रहातात. लोक अत्यंत दरिद्री आहेत. भाषा मराठी आहे.

(१४) रस्त्यांची सोय चांगली नाही. अनेक गावांना कोणतेही साधन जाऊ शकत नाही.

**संदर्भ –**

१. प्र. न. जोशी, 'आदर्श मराठी शब्दकोश', पहिली आवृत्ती, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, १३३४, शुक्रवार, पुणे २, १९७०.

२. तत्रैव

३. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

४. परिशिष्ट ३, चाळीसगाव डांगाणसंबंधी ऐतिहासिक पुरावा, पृ. २३४.

५. तत्रैव.

६. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

७. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

८. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

९. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१०. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

११. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१२. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१३. तत्रैव.

१४. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१५. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१६. Gasetteer of India, Maharashtra statem Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१७. The List obtainable in Akole Tahesil, Ahmednagar District.

१८. The List obtainable in Akole Tahesil, Ahmednagar District.

१९. 'राजूरच्या परिसरातील पंधरा वर्षाची साधना', सर्वोदय केंद्र राजूर– सर्वोदय केंद्र – सत्यनिकेतन, संस्था, राजूर येथे उपलब्ध.

* * *

# प्रकरण दुसरे

# चाळीसगाव डांगाण परिसर ऐतिहासिकपार्श्वभूमी

**प्रास्ताविक –**

या प्रकरणात 'चाळीसगाव डांगाण परिसर' या प्रदेशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या भागाचा इतिहास, संशोधनाचा एकस्वतंत्र विषय होऊशकेल. येथील भागाचा इतिहास हा अत्यंत अल्प पुराव्यावर आधारित आहे. तो इतिहासदेखील त्रोटकसापडेल. हा भाग याही दृष्टीने अगदीच उपेक्षित राहिला आहे. इतिहासाचा शोध घेताना प्रचलित झालेल्या आख्यायिकांमधून बोध घ्यावा लागतो. प्रसिद्ध स्थळांचे, देवदेवतांचे उल्लेख परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्यात आढळतात. या भागास डोंगरी किल्ले आहेत. हे ह्या परिसराचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. किल्ल्यांप्रमाणे जुन्या नगरांचे किंवा गावांचे अवशेष मात्र आढळत नाहीत. सुंदर सुंदर प्राचीन मंदिरे या भागात आहेत. त्यांच्या बांधकामावरून इतिहासविषयक अंदाज बांधता येतात. हरिश्चंद्रगड, पट्टागड, टाहाकारी मंदिर या ठिकाणी शिलालेख आहेत. त्यांचा अगदी काटेकोर अभ्यास होणे जरूर आहे. या भागाचा इतिहास समजावून घेण्यासाठी अहमदनगर जिल्ह्याचे गॅझेटियर प्रमाण मानावयास हरकत नाही. ते प्रमाण मानून तेथील लोकांतील प्रचलित आख्यायिका ऐकून या परिसराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

**प्राचीन चाळीसगाव डांगाण –**

चाळीसगाव डांगाण हा दंडकारण्याचा भाग आहे असे बोलले जाते.



सह्याद्रीच्या कुशीतील या जंगलात श्रीरामचंद्रांचे वास्तव्य होते. वनवासात असताना श्रीरामचंद्र पंचवटीत राहात असत. ती पंचवटी गोदातीरावरील नासिकचा एकभाग आहे. हा भाग डांगाण भागास अगदी जवळ आहे. रामचंद्र, सीतामाई, लवकुश यांचे भ्रमण व वास्तव्य या भागात झाले, असे येथील लोकप्रत्यक्ष जागांकडे बोट दाखवून सांगतात. श्रीरामचंद्रांविषयीच्या काही आख्यायिका अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये दिलेल्या आहेत.[१] त्यांच्यासह आणखी काही आख्यायिका येथील लोक सांगतात. त्यावरून श्रीरामचंद्रांचे या भागातील वास्तव्य सिद्ध झाले आहे. श्रीरामचंद्रांविषयीच्या आख्यायिका पुढीलप्रमाणे देता येतील.

**(१) रामचंद्रांविषयीच्या आख्यायिका –**

१) अगस्त्यऋषींनी रामांना पंचवटीत वास्तव्य करण्यास आज्ञा केली. अगस्त्य ऋषींचा मठ, अकोले येथे प्रवरेच्या तीरावर आहे. अरण्यातून फिरत फिरत रामचंद्र तेथे आले. येथे अगस्त्यांची व रामचंद्रांची भेट झाली. रामचंद्रांनी त्यांना वास्तव्य कोठे करावे, असे विचारले. तेव्हा अगस्त्यांनी त्यांना गोदावरी तीरावरील पंचवटी भागात वास्तव्य करावयास सांगितले. रामचंद्र फिरत फिरत या डांगाण भागातून पंचवटीकडे गेले. अकोले येथील अगस्त्यऋषींच्या मठात श्रीरामचंद्रांचे मंदिर आहे.

**२) आम्ही वाल्याचे कोळी –** रणद बु. व कोदनी या गावांच्या मधोमध उत्तरेला प्रवरातीरावर 'तातोबाचा मठ' म्हणून एकस्थान आहे. तातोबा म्हणजेच वाल्मिकीऋषी असे हे लोक सांगतात. याच मठात लवकुश यांचा वाल्मिकीने सांभाळ केला असे सांगितले जाते. वाल्याचा वाल्मिकी कसा झाला याविषयी एक कथागीत भारूड नावाच्या मनोरंजनात्मक कार्यक्रमातून रणद येथील मुले नाट्यकरण करून म्हणून दाखवितात.[२] आम्ही या वाल्याचे वंशज आहोत असे येथील महादेव कोळी सांगतात. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आपल्या 'दी महादेव कोळीज' या ग्रंथात कोळ्यांचा वंश सांगतांना ही आख्यायिका व आणखी एक इतर संदर्भातील रामचंद्रांविषयीची आख्यायिका दिली आहे.[३]

**३) रावण जटायू युद्ध –** रावणाने सीतेला पंचवटीतून पळविले व तो आकाशमार्गे लंकेस निघाला. सीतेला सोडविण्यासाठी जटायू नावाचा पक्षी धावून आला. रावणाचे व जटायूचे तुंबळ युद्ध पट्टागड (विश्रामगड) जवळ झाले. त्यात एकमेकांचे मरण विचारून युद्ध करताना रावणाने कपटाने जटायूचे पंख उपसून त्याचा पराभव केला. रावण लंकेस निघून गेला. श्रीरामचंद्र दुःखातिशयाने सीतेचा शोध घेत घेत तेथे आले. त्यांनी जटायूची अवस्था पाहिली. जटायूने अखेरचे

मागणे म्हणून सर्व तीर्थांचे दर्शन घडवावयास सांगितले. रामाने आपल्या धनुर्विद्येच्या सामर्थ्याने बाण मारून जटायूच्या चोचीजवळच सर्व तीर्थ उत्पन्न केले. काशीची गंगा त्यात आली. जटायूची समजूत पटविण्यासाठी 'रमनल' नावाची वनस्पती, जी गंगातीरी सापडते, ती तेथे उत्पन्न केली व श्रीरामचंद्र पुढील शोधाकरिता निघाले. पट्टागडाचा आकार पंख पसकून चोच लांबवून पडलेल्या पक्ष्यासारखा आहे. हाच जटायू त्याच्या चोचीच्या टोकाजवळ (डोंगराच्या लांबलेल्या शीरेजवळ) 'सर्वतीर्थ टाकेद' आहे. टाकेद हे इगतपुरी तालुक्यातील एक तीर्थक्षेत्र आहे. हा इगतपुरी तालुका नासिक जिल्ह्यात आहे. पट्टागडच्या शेजारीच परंतु तुटक असा, अंगठ्याच्या आकाराचा डोंगर आहे. त्यास रावणाचा अंगठा म्हणतात. हाच जटायूने तोडलेला रावणाचा अंगठा होय. ही आख्यायिका सांगून लोक या स्थानाकडे बोट दाखवितात. त्याव्यतिरिक्त आणखी आख्यायिका पुढीलप्रमाणे आहेत. परिशिष्टात त्यांचा सविस्तर उल्लेख आहे.[४]

**४) ती रडे– तीर्ढे** – तीर्ढे या गावाच्या नावची व्युत्पत्ती सांगताना लोक सांगतात की रावण सीतेला पळवून नेत होता. जटायू आणि रावण यांचे युद्ध चालू असताना ती रडत होती. तिचे रडणे ऐकून ती रडे– तीर्ढे असे नाव जटायूच्या या राजधानीस पडले.

**५) सर्वतीर्थ** – तेरूंगण – कातळापूर या गावाजवळ तेरूंगणाची वाडी आहे. रामांनी लक्ष्मणास सीतामाईला पुन्हा वनवासात सोडून यावयाला सांगितले. सीतामाई गरोदर होती. तेरूंगण तेथे आल्यावर ती थकून गेली. तिला मूर्च्छा आली. ती तेथील खडकावर झोपली. ती उठल्यावर तिला प्यावयास पाणी हवे असा विचार लक्ष्मणाने केला. ती जागी झाल्यावर समोरचेच पाणी प्राशन करील असे वाटून त्याने पाण्याची कुंडे तयार करण्याचे ठरविले. परंतु पुन्हा मनाचा गोंधळ होऊन त्याने आपल्या धनुर्विद्येच्या सामर्थ्याने उशाकडे एक व पायाकडे एक अशी दोन छोटी कुंडे निर्माण केली. त्यात सर्व तीर्थांचे पाणी आणले आहे असे सांगितले जाते. तो अद्याप सर्व तीर्थे म्हणून मनोभावे लोक ओळखतात.

**६) सीतापावले** – 'तातोबाच्या मठा'त सीतामाईचे वास्तव्य असताना तीला लव व कुश ही दोन मुले झाली. सीतामाई रोज कपडे धुण्यास व पाणी आणण्यास प्रवरातीरी येई. तेथे तिची पावले उमटली आहेत. या पावलांना सीतापावले म्हणतात. शेंदूर लावलेला एक खडकाचा भाग या नावाने ओळखला जातो.

**७) ऋष्यशृंगाचा मठ** – रंधा (रणद) गावाजवळ प्रवरेच्या तीरावर ऋष्यशृंग



ऋषींचा आश्रम म्हणून एक ठिकाण ओळखले जाते. हे वाल्मिकीचे बंधू असे लोक सांगतात. त्यांनी सीतेची परीक्षा पाहण्यासाठी तिला प्रवरानदीचे पात्र व प्रवाहाचा ओघ बदलून दाखविण्यास सांगितले. तिने ते बदलून दाखविले आणि आपले पातिव्रत्य सिद्ध केले. आजही ते पात्र व प्रवाह वळलेला दिसतो.

**८) आजोबा (अजुबा)** – अजुबा नावाचा एक डोंगर कळसुबाई व रतनगड यांच्या रांगेत आहे. खूप उंच आहे. तेथे लव आणि कुश यांचे अजुबा म्हणजे वाल्मिकी ऋषी तपश्चर्येकरिता बसत असत असे लोक सांगतात. तो डोंगर म्हणजेच अजुबा असेही काही लोक सांगतात.

**९) पांडवलेणी** – येथील डोंगरावर कोरलेल्या गुहा आहेत. नासिक येथील पांडवलेण्यांशी त्यांचे साम्य आहे. पांडवलेण्यांचे उल्लेख गाण्यातून आढळतात. त्यांच्याविषयीच्या आख्यायिका मात्र प्रचलित नाहीत.

**१०) हरिश्चंद्र** – हरिश्चंद्रगडावर डोंगरांची तीन टोके निरनिराळ्या ठिकाणी वर आलेली आहेत. त्यांचेकडे बोट दाखवून एक हरिश्चंद्र, दुसरे तारामती आणि तिसरे रोहिदास अशी नावे सांगितली जातात.

एकंदर वरील सर्व आख्यायिकांवरून हरिश्चंद्रगडापासून या भागाला परंपरा आहे किंवा रामचंद्रांचा इतिहास या भागात फारच प्रसिद्ध होता असे म्हणता येईल.

**(२) नेवासे येथील उत्खनन –**

डेक्कन कॉलेजच्यावतीने नेवासा येथे जे उत्खनन झाले, त्याच्या माहितीनुसार असे दिसते की, महाराष्ट्रातील पहिला माणूस गोदावरी व प्रवरा या नद्यांच्या तीरावर वसला असावा.[५] (ख्रिस्तपूर्व १,५०,०००) यात पश्चिमेकडे गोदावरी प्रवरेच्या विटे व अकोले या भागात व पूर्वेकडे नेवासा भागात अश्मयुगातील हा पुरावा असून त्या काळातील हत्यारे पुराणवस्तू संशोधन कार्यालय अहमदनगर येथे पाहावयास मिळतात. त्यांनी उल्लेखिल्याप्रमाणे मध्यअश्मयुग (ख्रिस्तपूर्व २५०००) या काळातही याच भागात संस्कृतीचे अवशेष सापडतात. या काळातही माणूस अगदी रानटी अवस्थेत होता.

नेवासे येथील उत्खननानुसार या भागाच्या परंपरा ख्रिस्तपूर्व काळात बऱ्याच मागे नेता येतील एवढेच म्हणता येईल.

**(३) सलग प्राचीन इतिहास –**

सलग असा वर्षानुवर्षाचा उल्लेख वा इतिहास या भागाचा सांगता येत नाही. या भागातील प्राचीन मंदिर जरी अभ्यासिली किंवा तेथे एकटेदुकटे असलेले

शिलालेख जरी अभ्यासिले तरी ऐतिहासिकदृष्ट्या फार पुरातन अशी शृंखला लावता येईलसे वाटत नाही. अर्थात हा प्रबंधाचा हेतू, उद्देश वा प्रांत नसल्याने त्याचा विस्तार येथे अल्प केला आहे.

**मध्ययुगीन व मोगलकालीन डांगाण –**

**१) अशोककाल –** अशोकाचे साम्राज्य कदाचित या भागापर्यंत देखील पोहोचले असावे. कारण सोपारा येथील (ठाणे जिल्ह्यातील पूर्वीचे सुरपर्का) गुहा ह्या अशोकाने तयार केलेल्या असून तशाच प्रकारच्या गुहा येथील डोंगरी किल्ल्यांवर आहेत. पट्टाकिल्ला येथे एका गुहेत तशा चिन्हांच्या मूर्ती आहेत.

**२) सातवाहन –** सातवाहनाचे साम्राज्यदेखील या भागापर्यंत पसरलेले होते. कारण याचे राज्य पुणे, नासिक, अहमदनगर व औरंगाबाद या जिल्ह्यांत होते व डांगाण हा भाग पुणे, नासिक व अहमदनगर यांच्या सीमारेषेवरचा आहे.

**३) यादव –** यादवांच्या काळातही अकोले तालुक्यातील डोंगराळ भागाचा उल्लेख आढळतो असे गॅझेटियरमध्ये नमूद केलेले आहे.[६] तिसऱ्या भिल्लमाच्या हातचे ताम्रपट अकोले तालुक्यातील कळस (बु.) या गावी सापडले. त्याचा संबंध सिंडीनगर (सिन्नर) या राजधानीशी आहे. सिन्नर या गावाशी डांगाण भागाचा विशेषतः अकोला-डांगाणचा पूर्वीपासूनचा संबंध आहे.

**४) बहामनी –** बहामनी काळात बहामनी राज्याकडून पोपरे नावाच्या कोळ्याने (१३४६) अहमदनगर जिल्ह्यातील या भागातील बराच डोंगराळ भाग त्याच्या अधिपत्याखाली मिळविला होता व जव्हार येथे राजधानी केलेली होती. जव्हारशी देखील या भागातील लोकांचा फार पूर्वीपासून संबंध आहे.[७] बहामनी राज्यात या कोळ्यांना जवळजवळ पूर्ण स्वातंत्र्य लाभले होते आणि हे स्वातंत्र्य ते स्वतःच्या नायकाच्या वर्चस्वासाठी उपभोगीत होते.

याच काळात पुणे आणि अहमदनगरचा सरहद्दीवरील हा भाग भवनमावळा म्हणून ओळखला जात होता. त्याचे बावन्न दऱ्यांचे भाग होते. अनुवंशिकत्वाने जे कोळी प्रमुख होते त्यांना नाईक, सरदार असे किताब दिले गेले होते.

अशा रीतीने मोगलकाळापर्यंत या भागाला थोड्याफार प्रमाणात महत्त्व होतेच.

**शिवकाल –** रणमस्तखानाशी तोंड देत रायगडाहून पट्टागड येथे जाताना शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या संगमनेरनजीक रणमस्तखानाच्या सैन्यांशी चकमकी झाल्या. त्यांच्यासमवेत शिधोजी निंबाळकर आणि संताजी घोरपडे होते. शिधोजी निंबाळकर मारला गेला. शिवाजी महाराजांनी ही कच खाण्याची वेळ नाही असे जाणून अविश्रांत प्रयत्न केले. मोगलांचा पाडाव केला आणि शिवाजी महाराजांनी पट्टागडाकडे च्याण केले. परंतु ते थोडे पुढे कूच करतात न करतात तोच पुन्हा मोगलांनी त्यांच्यावर चढाई केली. त्यावेळी मोगलांची मोठी फौज चालून आली. त्यांचा म्होरक्या किसनसिंग हा होता. त्यांनी शिवाजी महाराजांना त्यांच्या मोहिमेत अडथळा केला होता, परंतु शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या वाटाड्याने मोगलांना माहिती नसलेल्या अशा जवळच्या मार्गाने शिवाजी महाराजांना व त्यांच्या सैन्यास पट्टा किल्ल्यास पोहोचविले. शिवाजी महाराजांनी एवढ्या यातायातीनंतर पट्ट्यास पोहोचावयास मिळाले म्हणून पट्टा किल्ल्यास 'विश्रामगड' असे नाव दिले. त्यानंतर मोगल सैन्य परतून औरंगाबाद येथे निघून गेले. त्यामुळे पट्टा किल्ला परिसरातील सत्तावीस किल्ल्यांची नीट योजना केली. तेथे त्यांनी त्यांच्या व्यवस्थापन मंडळातील लोकांना (Body of Infantry) कोकणातून मोरोपंतांशी संधान बांधावयास सांगितले. त्यांचा उद्देश त्यांच्यापैकी शक्यतो लोक कमी व्हावे हा होता. या पट्ट्यावर मोठी टाकसाळ पेशव्यांच्या सोयीसाठी निर्माण केली. शिवाजी महाराज या ठिकाणी विजापूरच्या मासूदखान यांनी तातडीचा निरोप पाठवेपर्यंत राहिले. हा निरोप विजापूरच्या व्यवस्थेच्या संदर्भात होता.

**पेशवेकाल –** यानंतरचा दुसरा उल्लेख म्हणजे धोंडो गोपाल नासिक येथील पेशव्यांचे गव्हर्नर (राज्यपाल) होते. त्यांच्या सल्ल्याने जावजी यांनी आपली हार पत्करून तुकोजी होळकर यांना सर्व किल्ले देऊ केले. आणि तुकोजी होळकरांच्यावतीने जावजीने कोळी लोकांच्या जीवनमरणाचा सर्व भार असलेला साठ गावांचा राजूर सुभ्याचा १७८९ पर्यंत सन्मानपूर्वक कारभार पाहिला. हे कोळी लोक चोरीदेखील करीत असत. जावजी त्याच्या स्वतःच्या अनुयायांकडून जखमी होऊन मारला गेला. त्याच्या जागेवर त्याचा मुलगा हिरजी नाईक हा सुभेदार झाला. जावजीने उत्तर आयुष्यात कोकाटा आणि शिळकंदा या दोन कोळी पुढाऱ्यांनी केलेल्या बंडात भाग घेतला. सरकारने या बंडाचा लावलेला एक अर्थ असा की, त्यांना प्रत्येक गावचे प्रमुख बनवायाचे आहे. आणि त्यातून देशमुखीचा जन्म होऊन सर्वांनाच सुरक्षितता लाभली. जेव्हा जावजीला सबंध जिल्ह्याचा प्रमुख नेमण्यात आले तेव्हा हे सारे लोक शांत राहिले. तसे त्यांनी चार वर्षे घालविली. १७९८ मध्ये पुन्हा एकदा एक नवीन अडथळा निर्माण झाला. या बंडाचे अध्वर्यू तीन कोळी बंधू होते. त्यांची नावे गोविंदजी, मनाजी आणि वाळोजी अशी होती. हे अतिशय प्रसिद्ध होते. त्यांच्याभोवती अनुयायी देखील भरपूर होते. त्यांनी ते अनुयायी लवकरात लवकर गोळा केले. गोविंदजी लवकर

पकडला गेला. मनाजी पळाला आणि पुढे तो मरून गेला. पण वाळोजी मात्र फारच यशस्वी झाला. त्यांनी जवळजवळ हजार अनुयायांची एक टोळी तयार केली. आणि रणभेरी आणि ध्वज यांच्यासह दक्षिणेकडे आणि कोकणात स्वारी केली. प्रचंड दहशत निर्माण केली. परंतु नंतर हिरजीकडून तो पकडला गेला आणि त्याला शिक्षा झाली. वाळोजीनंतर त्याचा पुतण्या रामजी, की जो वाळोजीपेक्षादेखील धाडसी व शूर होता. लढण्याचे सर्व प्रयत्न करण्यास तो यशस्वी झाला. सरकारने त्याची कर्तबगारी पाहून त्यास महत्त्वाची पोलिस खात्यातील जागा दिली. ती जागा त्याने उत्तम् रतीने सांभाळली.

**ब्रिटीशकाल (इंग्रजी अंमल) –** पुणे जेव्हा ब्रिटीशांच्या स्वाधीन झाले तेव्हा बाजीराव जुन्नर भागात पळून गेला. तेथून ओतूर–ब्राह्मणवाडा या भागातून तो अगदी लिंगदेवपर्यंत आला होता. त्यामार्गे शिरूरपर्यंत जनरल स्मिथ येऊन पोहोचला होता. त्यांचा हा पाठलाग चालूच होता. असा पाठलाग करीत तो थेट भूगावपर्यंत येऊन पोहोचला. परंतु भूगावला स्मिथ आल्याची बातमी कळताच बाजीरावाने आपला मोर्चा कोतूळमार्गे राजूरकडे वळविला. अशा रीतीने डांगाण भागात बाजीराव ब्रिटिशांशी लपंडाव खेळत असताना त्याला असे वाटत होते की या दऱ्याखोऱ्यातून स्मिथ येऊ शकणार नाही. परंतु त्यांचा अंदाज चुकला आणि बाजीराव सापडला. अशा रीतीने पेशवाईचा अस्त (१८१८) या भागाने जवळून पाहिला. याच सुमारास होळकरांचादेखील या इंग्रज लोकांकडून पराभव झाला. यावेळी त्यांच्या अधिपत्याखाली असलेले हरिश्चंद्रगड इत्यादी किल्ले १८१८ मध्ये घेण्यात आले. हे किल्ले कॅप्टन सीक्स याजकडून घेतले गेले. त्या वेळच्या पेशव्यांच्या सैन्यातील त्यांच्या बरोबरीचे लोक याच भागात राहू लागले. आणि त्यांच्यावर आता या भागातील कोळ्यांची हुकूमत चालू लागली.

**१) कोळ्यांचा उठाव –** ब्रिटिश राजवट स्थिर होऊन साधारणतः वीस वर्षे झाली असतील नसतील तोच कोळ्यांचा म्हणजे या डांगाणातील कोळ्यांचा उठाव झाला. रामजी भांगरे नावाचा अत्यंत उपयुक्त असा पोलिस अधिकारी जो बंडखोर म्हणून प्रसिद्ध होता. त्यास जमादार केले होते. तो वर्षातून एकदा 'भेट' नावाचा प्रकार घडवून आणीत असे. आणि त्यावेळी तो आपल्या रयतेकडून तांदुळ, मेंढ्या अशा वस्तू भेट म्हणून स्वीकारीत असे. सर्व लोकसमूहाकडून तो अशी भेट वसूल करीत असे. परंतु त्याचे हे भेट प्रकरण सरकारच्या ध्यानात आले आणि सरकारने असा फतवा काढला की कोणत्याही सरकारी नोकराने अशा प्रकारच्या भेटी रयतेकडून घेता कामा नयेत. हा फतवा रामजी आणि त्याच्या



सारख्याच इतर लोकांना लागण्यासारखाच होता. त्याने सरकारात लिहून पाठविले की त्याच्याबाबतीत ही सवलत चालूच ठेवली जावी. परंतु त्याला काहीच उत्तर आले नाही. तसेच त्याचा राजीनामादेखील नामंजूर करण्यात आला आणि त्याला सहा महिन्यांची रजा देण्यात आली. परंतु या सहा महिन्याच्या कालावधीत विशेष असे काहीच घडले नाही. त्याचा पगार देखील वाढविला नाही. तेव्हा त्याने त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे बंडखोरी सुरू केली. त्याचा मुख्य साथीदार गोविंदराव खारी नावाचा कोळी होता. तो त्यावेळी रतनगडचा प्रमुख सेनाधिकारी होता. त्याला हे अधिकार पेशव्यांकडून मिळाले होते परंतु त्याच्या या अधिकारावर इंग्रज सरकारमुळे गदा आली होती. पेशव्यांचा पराभव झाला तरी तो पेशव्यांशी अगदी एकनिष्ठ होता. त्यामुळे अनायासेच त्यालाही चांगली संधी मिळाली. त्याने इंग्रजांनी देऊ केलेल्या नोकरीवर लाथ मारली. डोंगरी किल्ल्यांचे अधिकार काढून घेताच त्याच्या जातीच्या आणखी बारा अधिकाऱ्यांच्या अधिकारावर गदा आली. कारण ते देखील त्या रतनगड महालाच्याच भागात अधिकारी होते. या सर्वांनाच नोकरी देखील दिली नाही. त्याचप्रमाणे ज्या खेड्यांचा महसूल ते परंपरेने वसूल करीत होते ते अधिकारदेखील काढून घेतले. अशा रीतीने असंतोषी असे गोविंदराव आणि त्यांचे इतर जातभाई हे डोंगरात एकत्रित आले आणि त्यांनी डोंगरात दडून बंडखोरी सुरू केली. हे सारेच रामजी भांगरेला मिळाले. आणि कोकण भागात त्यांनी बंडखोरी चालू केली. जेव्हा बहुसंख्येने कोळी आणि त्यांचे हे दोन बंडखोर पुढारी यांनी कारवाया सुरू केल्याचे इंग्रज सरकारच्या लक्षात आले तेव्हा कॅ. माकिनटोश आपल्या पोलिसपथकासह त्यांचे हे बंड दडपण्यासाठी सह्याद्रीच्या या शिखराकडच्या रांगांकडे आला. परंतु त्याला खेड्याखेड्यातून काही शोध घेता येईना. त्याने प्रयत्न चालूच ठेवले. ब्राह्मण कुलकर्णी यांनी त्यांच्या या पथकांना कोळ्यांच्या मागे न जाण्याविषयी सल्ला दिला. फक्त त्यांचे हे बंड सौम्य करून टाकण्यासाठी काही व्यवस्था करावी एवढेच सुचविले. माकिनटोशला हा सल्ला तात्पुरता पटला आणि त्याने कोणत्याही प्रकारचा हुकूम या बंडाविषयी काढला नाही. परंतु त्याने असे टोळीस सुचविले की त्यांचे हे बंड थांबेपर्यंत कोणत्याही प्रकारची तडजोड वा हुकूम काढला जाणार नाही. त्याचवेळी त्याने कोळ्याच्या पायवाटेवरून आपल्या पथकास त्यांचा मागोवा घेण्याचा सपाटा चालूच ठेवला होता. त्याने बातम्या मिळविल्या आणि कोळ्यांच्या पुढाऱ्यांची (म्होरक्यांची) नावे त्याचप्रमाणे त्याने रयतेत सहानुभूती मिळविली व जे लोक त्यास मदत करतील अशा लोकांमध्ये सहकार्य मिळविण्याच्या दृष्टीनेदेखील हालचाल केली.

यात त्यास होणारा सर्व त्रास त्याने सहन केला. त्याचे हे कारस्थान चालू असताना रामजी भांगरे आणि गोविंदराव खारी व त्यांचे असंख्य साथीदार डोंगरात कोकणच्या दरीत दडून बसले होते. त्याचे माहिती मिळविण्याचे काम पूर्ण होताच त्याने भिवंडी, मालेगाव, अहमदनगर व पुणे येथून योग्य जागी पोलिसपथकांच्या छावण्या टाकण्यास अनुमती मिळवली आणि अथकपणे कोळ्यांचा शोध चालूच ठेवला. काही दिवसात त्याने या सर्वांना कोकण, पुणे, मावळ, अहमदनगर व भिवंडी भागातून पुढे पुढे सरकून पूर्ण कोंडीत पकडले. त्यांच्या ठराविक पाण्याच्या ठिकाणांवर, दारू पिण्याच्या जागांवर छापे घातले. लोकांनी अतिशय मदत केली. अधिकाऱ्यांनी अथक परिश्रम केले. साधारणतः दोन महिन्यात बंडखोरांचे म्होरके आणि त्यांचे ऐंशी अनुयायी पकडण्यात आले. त्यांना अहमदनगर येथे नेण्यात आले. म्होरके पकडले गेले तरी बंड पूर्णपणे थांबले नव्हते. रामा किरवा हा आणखी अतिशय बलाढ्य असा म्होरक्या होता. टोळी समाप्त होण्याच्या आतच तो दक्षिणेत पळून गेला. त्याने भिल्लांच्या टोळीशी संधान बांधले. त्याने इंग्रजी सत्तेला भरपूर छळले. शेवटी तो कॅ. ल्युकिन याचे हाती सापडला. त्याला आणि त्याच्या साथीदारांना अहमदनगर येथे नेऊन डांबण्यात आले. हा कोळ्यांचा उठावाचा इतिहास बऱ्याच विस्तृत प्रमाणात डॉ. गोविंद गारे यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील आदिवासी – महादेव कोळी' या पुस्तकात मोठा मनोरंजक करून लिहिला आहे.[८]

**(२) स्वातंत्र्यपूर्व काळ –** या भागामध्ये वर सांगितल्याप्रमाणेच भूमिगत चळवळींनादेखील नेहमीच यश आले. भूमिगत पुढाऱ्यांना यांनी जिवाभावाने सांभाळले परंतु प्रत्यक्ष चळवळीत फारच थोड्यांनी भाग घेतला असे दिसते. या भागात कम्युनिस्ट चळवळी जोरदार झाल्या. त्याचे वर्णनदेखील डॉ. गोविंद गारे यांनी केले आहे.[९]

स्वातंत्र्य चळवळीचे दृश्य स्वरूप म्हणून अकोले येथील मामलेदारास जाळणे, हे उदाहरण देता येईल. यात या डांगाणी लोकांनी बराच भाग घेतला होता. या व अशा चळवळी करणाऱ्या त्यावेळच्या लोकांना गुंड म्हणून ओळखले जाई.

**स्वातंत्र्योत्तर काळ –** स्वातंत्र्योत्तर काळात सर्व व्यवस्था बदलली. कम्युनिस्टांच्या चळवळी मोडून काढण्यासाठी सरकारने महात्मा गांधींनी देशापुढे ठेवलेल्या सर्वोदयाच्या विचारावर आधारलेल्या योजनेचा प्रयोग या भागात करण्याचे ठरविले व श्री. सीताराम गंगाधर ऊर्फ बापूसाहेब शेंडे यांचेवर जबाबदारी



सोपविली. त्यांनी विनावेतन, सेवाभावाने या भागात फिरून काम करावयास सुरुवात केली. या योजनेचे कार्य सुरू झाल्यामुळे या आदिवासी भागातील सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करण्याचा प्रयत्न झाला. श्री. रा. वि. पाटणकर यांनी नंतर ही जबाबदारी स्वीकारली. आता राजूर येथील हे केंद्र सत्यनिकेतन संस्था, पुणे ही संस्था चालवित आहे. शैक्षणिकदृष्ट्या तालुक्यात हे कार्य महत्त्वाचे आहे.

**समारोप –**

ज्या भागाचा सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास करावयाचा, त्या भागाची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. संस्कृतीबरोबर इतिहास घडतो व इतिहासातून संस्कृतीची वाटचाल असते. हे ध्यानात घेता इतिहासाचे या दृष्टीने महत्त्व वाटते.

इतिहासाचा मागोवा घेताना एक गोष्ट ध्यानात येते की या भागातील महादेव कोळी हेच या भागातील मूळचे रहिवासी असावेत. परंतु या गोष्टीविषयी मात्र मतभेद आहेत. डॉ. जी. एस. घुर्ये[१०] व अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये येथील महादेव कोळी हे लोक छोटा नागपूर भागातील महादेवाच्या डोंगरातून आले असावेत असे लिहिले आहे.[११] तत्पूर्वी येथे गवळी लोक राहात होते. आज गवळी जमात या भागात दिसत नाही. मात्र तलवारकानडे या लोकांचा गायी पाळणे हा धंदा आहे. कदाचित अतिप्राचीन काळी हे गवळी लोक कर्नाटकातून येथे वस्तीस आले असावेत. विश्वनाथ खैरे यांनी केलेली अकोले, आकोला या ग्रामनामंधी व्युत्पत्ती लक्षात घेता तसे म्हणता येईल. या भागात 'कोळटेंभे' असेही एक गाव आहे. त्यांनी 'आ' म्हणजे गाय व 'कोल' म्हणजे धरणे असा अर्थ दिला आहे.[१२] तलवारकानडे ही एक कानडी जात असावी. त्यांची भाषा मात्र मराठी आहे. ती इतरांपेक्षा सुधारलेली आहे. मध्यवर्ती मराठीशी तिचे साम्य आहे. हे लोक आदिवासी नाहीत.

या प्रबंधामध्ये सांस्कृतिक अभ्यास करावयाचा असल्याने इतिहासाचा आढावा घेणे आवश्यकच होते. एकूण इतिहास मात्र फारच त्रोटक प्रमाणात सापडतो व इतकी जुनी परंपरा देताना वस्तुस्थितीकडे लक्ष गेले की, हे आदिवासी व त्यांची अवस्था पाहून मन साशंक होते एवढे खरे.

**काही ठळक निष्कर्ष –**

(१) या भागास रामायण काळापासूनची परंपरा आहे.

(२) नेवासा येथील उत्खननानुसार दक्षिणेत प्रवरा व गोदा व नद्यांच्या

तीरावर आर्यांच्या वस्त्या वा सांस्कृतिक जोपासना होत होती असे सिद्ध होते. तरी या डोंगरदऱ्यात मात्र त्या संस्कृतीचा अभाव असावा.

(३) अशोककाल, यादवकाल यांच्या काही खुणा दिसतात असे गॅझेटियरच्या उल्लेखावरून दिसते.

(४) बहामनी कालात या भागाचा 'जव्हार स्टेट'शी संबंध असावा.

(५) मोगल व शिवकालात या भागाच्या उत्तरेकडील डोंगरी किल्ल्यांचा नासिक भागाशी व दक्षिणेकडील डोंगरी किल्ल्यांचा जुन्नर भागाशी संबंध असावा.

(६) पेशवेकालात या भागाला अहमदनगर जिल्ह्याशी पूर्ण संबंध असला तरी लोकांचा संबंध नासिक, सिन्नर, जुन्नर, भिवंडी, जव्हार या भागाशी असावा.

(७) ब्रिटिशांची सत्ता या भागातील कोळ्यांनी सहजासहजी मान्य केली नसावी.

(८) या भागात सदैव कोळ्यांचे वर्चस्व होते.

(९) संपूर्ण इतिहासात जसा कोळ्यांचा उल्लेख आहे, तसा या भागात राहणाऱ्या ठाकर (ठाकूर) व कानडे (तलवारकानडे व हटकरकानडे) यांचा कोठेच उल्लेख नाही.

**संदर्भ –**

१. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीत, क्र. १६.

३. G. S. Ghurye- 'The Mahadev Kolis' A Sheduled Tribe - Popular Book Depot, Pune.

४. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा' आख्यायिका.

५. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

६. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

७. Ibid

८. गोविंद गारे– 'महाराष्ट्रातील आदिवासी– महादेव कोळी', सप्तध्यासन प्रकाशन, मुंबई.



९. तत्रैव.

१०. G. S. Ghurye- 'The Mahadev Kolis' A Sheduled Tribe - Popular Book Depot, Pune.

११. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१२. विश्वनाथ खैरे – द्रविड महाराष्ट्र, पृ. १३, साधना प्रकाशन, पुणे ४११०३०.

* * *

## प्रकरण तिसरे

# चाळीसगाव डांगाण परिसर लोकजीवन

**अभ्यासाची दिशा –**

चाळीसगाव डांगाणची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिल्यावर आपणास चाळीसगाव डांगाण लोकसंस्कृतीचा अभ्यास करावयाचा आहे. चाळीसगाव डांगाण परिसरात राहणाऱ्या लोकांचा सांस्कृतिक परिचय करून देण्याचे काम आजपर्यंत खऱ्या अर्थाने झालेच नाही असे म्हणावेसे वाटते. मा. डॉ. घुर्ये यांचा 'महादेव कोळी'[१] हा ग्रंथ आणि डॉ. गोविंद गारे यांचा 'सह्याद्रीतील आदिवासी – महादेव कोळी'[२] हा ग्रंथ महादेव कोळ्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन आपल्यासमोर ठेवतात. परंतु ते महाराष्ट्रातील महादेव कोळीविषयी शिवाय अशा एका प्रकारचे ग्रंथ हे केवळ एका आदिवासी जमातीची माहिती करून देणारे असतात. 'महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न'[३] या पुस्तकात डॉ. सुधीर फडके यांनी बहुसंख्य आदिवासींच्या समस्या मांडावयाचा प्रयत्न केला आहे. परंतु अशा प्रयत्नांपेक्षा वेगळा प्रयत्न या प्रबंधात होत आहे. या परिसरात सुमारे ५०,००० पर्यंत लोकसंख्येने असलेले महादेव कोळी, त्यांच्या सान्निध्यात राहणारे सुमारे ६,००० ठाकर या दोन आदिवासी जमाती तर त्यांच्यासह या डांगाण भागाशी एकरूप झालेले पण आदिवासी नसलेले तलवार-कानडे व क्वचित हटकर कानडे या सर्वांच्या संमिश्र संस्कृतीचा विचार येथे होत आहे. ठाकरांचे वेगळेपण, कानड्यांचे वेगळेपण येथे नष्ट झाले आहे. तर ते नष्ट होतानाच त्यांचे काही ठसे महादेव कोळ्यांवर उमटले आहेत. तसेच येथील चर्चेचे वेगळेपण आहेत



दृष्टिकोनातील. लोकसाहित्याच्या आरशातून येथे लोकजीवन अभ्यासावयाचे आहे. हा दृष्टिकोन येथे स्वीकारलेला आहे.

**संस्कृती म्हणजे काय?**

सांस्कृतिक अभ्यास करावयाचे ठरविले की संस्कृती म्हणजे नेमके अभिप्रेत काय आहे हे स्पष्ट करणे ओघानेच आले. पुष्कळ वेळा सामान्य व्यवहारात संस्कृती हा शब्द अत्यंत ढोबळ अर्थाने वापरला जातो. संस्कृती या संदर्भात डॉ. शं. दा. पेंडसे म्हणतात. 'राष्ट्रातील ऋषींचे, पुरोगामी विद्वानांचे विचार, त्यांनी ठरविलेली ध्येये व त्यांचे मार्ग आणि त्यांना अनुसरून राष्ट्रात झालेला आचार यांनीच संस्कृती बनत असते.'[४] 'महाराष्ट्र-जीवन' या नावाने महाराष्ट्राचा समग्र सांस्कृतिक इतिहास मांडतांना संपादक समितीने संस्कृतीच्या सर्व अंगांचा म्हणजे इतिहास, प्रादेशिकता, धर्मसंस्था, राजकीय व सामाजिक समालोचन, अर्थकारण, शिक्षणपद्धती, संशोधनकार्य, लोकभाषा, लोकसाहित्य, वाङ्मय, कला, आरोग्यविचार या सर्वांचा अभ्यास महत्त्वाचा मानला आहे. या ग्रंथाचे संपादक गं. बा. सरदार हे आहेत.[५] इतिहास आणि भूगोल यातून जगणाऱ्या मानवांच्या रूपाने संस्कृतीचा जिवंत प्रवाह वाहात असतो. इतिहासातून ती वाहात येते. वर्तमानात ती परिणत होत असते आणि त्याचवेळी ती स्वतःला उज्ज्वल भविष्य राखून असते. काळानुसार कल्पनेच्या प्रगततेतून तिचा विकास होत असतो. धर्म आणि विज्ञान यांच्या आधाराने संस्कृतीची वेल वाढत असते. सांस्कृतिक आक्रमणांनी ती कधी खुरटल्यासारखी दिसते. परंतु त्याचवेळी संस्कृतीसंगमातून तिला नवजीवन प्राप्त होत असते. अनादीकालापासून चालत आलेल्या इतिहास, भूगोल आणि नैसर्गिक घटना घडत प्रवास करणाऱ्या प्रचलित जीवनातील विकासक्रमाने परिणत होत जाणाऱ्या, परिवर्तनशील परंपरांचा समु य म्हणजे संस्कृती असे म्हणता येईल. इतिहास, भौगोलिक परिसर, धर्म, विज्ञान, शिक्षण, साहित्य, संगीत, कला व लोकजीवन, राहणीमान, खाद्यपदार्थ, श्रमजीवन, आरोग्य इत्यादी गोष्टी संस्कृतीचे घटक होत. इरावती कर्वे यांनी संस्कृतीचा उहापोह याच अर्थाने उपरोक्त केला आहे.[६] या गोष्टींचा विचार करता प्रत्येक संबंधित मानवी जीवनाला संस्कृती ही असतेच असे म्हणावे लागेल.

**आदिवासींची स्वतंत्र संस्कृती आहे काय?**

वर्षानुवर्षे आदिवासी जीवनाला उपेक्षाच सहन करावी लागली हे खरे आहे. या आदिवासी वा आदिम लोकांचा उल्लेख कसा करावा याविषयी प्रश्न निर्माण झाले असले आणि महाराष्ट्र व भारतीय संस्कृती म्हणून जी मानली जाते

तिच्या तुलनेत आदिवासींचे जीवन हे अत्यंत मागासलेले आहे हे निर्विवाद असले तरी त्यांची म्हणून एक स्वतंत्र संस्कृती आहे. म्हणजेच त्यांच्या जीवननिष्ठा, परंपरा या आपले जीवन सिद्ध करणाऱ्या निश्चित आहेत. ''आदिवासी लोकांना आर्यांनी विष्णुपुराणात 'खुजे', 'चपट्या नाकाचे' व 'कोळशासारखे काळे' असा उल्लेख केला आहे. तर महाभारतात 'धरित्रीवरचे पापी प्राणी' असे म्हणून गिधाड, चांडाळ अशा शब्दांनी त्यांना संबोधिले आहे.'' ''वद्य पक्षातील पंधराही रात्रींचा एकवटलेला अंधार'' अशा उपहासात्मक शब्दांनीच बाणभट्टाने 'शबर' सैन्याच्या वर्णनाला सुरुवात केली आहे.''[७] असे सारे उल्लेख असले तरीदेखील हे त्यांच्या संस्कृतीशी संबंध न ठेवल्यानेच घडले होते. हिंदू समाज आदिवासींना अस्पृश्य मानत नव्हता व नाही ही विचारात घेण्याजोगी गोष्ट आहे. सामाजिकदृष्ट्या आदिवासींना हरिजनांपेक्षा खालच्या दर्जाचे स्थान होते.[८] सर्वच आदिवासी हे निसर्गाच्या सान्निध्यात राहात होते. मानवापेक्षा प्राणीच त्यांना अधिक जवळचे झाले होते. आर्यांच्या टोळ्या पुढे पुढे सरकू लागल्या तसेतसे ते आपले जीवन डोंगराच्या, अरण्यांच्या आश्रयाने घालवू लागले. म्हणून ते निसर्गाला आणि प्राण्यांना आपला परमेश्वर समजू लागले. ते निसर्गपूजक वा प्राणीपूजक झाले हे त्यांच्या वेगळ्या संस्कृतीचेच वैशिष्ट्य नव्हे काय? टोळ्यांटोळ्यांच्या जीवनात विवाहपद्धती, धार्मिक रूढी, देवदैवते, टोळ्यांची रचना, नाचगाणी यातून त्यांची संस्कृती फुलली. त्यांची संस्कृती निसर्गाच्या आश्रयानेच वाढल्यामुळे त्यांचा जीवनानंद कृत्रिम नाही ही गोष्ट विचारात घेता त्यांच्या संस्कृतीचे सौष्ठवदेखील जाणवते. एवंच त्यांना संस्कृती आहे ती कनिष्ठ वा श्रेष्ठ हे ठरविण्याचादेखील वस्तुतः अधिकार केवळ काळालाच द्यावयास हवा. विज्ञाननिष्ठ लोकांनी त्यांची संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न करावा हे उचित होय. त्याच दृष्टीने त्यांच्या सांस्कृतिक अभ्यासाचा प्रपंच करावयास हवा. त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करताना आदिवासी कोण याचा देखील विचार पहावयास पाहिजे.

**आदिवासी कोण?**

आदिवासी कोण या एका मुद्यावर मात्र आतापर्यंत त्यांचा अभ्यास केलेल्या विद्वानात एकमत दिसून येते. आदिवासी म्हणजे आर्य लोक भारतात येण्यापूर्वी जे लोक भारतात स्थायी होते ते लोक होत. त्या काळात देखील त्या वेळी आर्य लोक ज्या भूमीवर राहात होते तेथे हे राहात होते. ते खरे तर 'भूमिज'च होत. परंतु त्यांच्या परंपरा व रूढी यापेक्षा आर्यांची संस्कृती सर्वच दृष्टीने प्रगत होती. त्यामुळे त्यांच्या रेट्याने हे लोक अरण्यात राहू लागले. म्हणूनच हे 'अरण्यक'



होत. ही अरण्ये अर्थातच डोंगर दऱ्या यांच्या सान्निध्यात आहेत. त्यामुळे त्यांना अगदी गिरीकंदरात राहावे लागले. म्हणून ते गिरीजन होत. त्यांची जी माहिती आज उपलब्ध आहे त्यावरून असे स्पष्टच होते की यांची एकसंघ मोठ्या समाजाची अशी संस्कृती कधी अस्तित्वात आली नसावी तर त्यांच्या टोळ्याच असाव्यात. परंतु त्या टोळ्यांनादेखील स्वतःचे नीतिनियम, रूढी, परंपरा होत्या. अशा प्रकारे त्यांची प्रत्येक टोळीची थोडी भिन्न संस्कृती होती हेच खरे या देशाचे प्रथम रहिवासी. आता काही विचारवंतांच्या मते या टोळ्या देखील भारतात बाहेरूनच आल्या असाव्यात. ते तसे असले तरी तेच अगदी पूर्वी या देशाचे, म्हणून तेच देशज, असे म्हणावेसे वाटते. उपरोक्त तर्क हे इंग्रजांच्या आगमनानंतर मांडल्या गेलेल्या आर्य, अनार्य विषयक तर्कातून भेदमूलकतेने आले आहेत. पूर्वग्रह बाजूला ठेवून मूळातून मानववंशशास्त्र आणि दैवतकथाशास्त्राच्या आधारे आर्य आणि अनार्य असे द्वंद्व नव्हते हे लक्षात येत आहे. मात्र वैदिक म्हणविणाऱ्यातील चातुवर्ण्यव्यवस्था या लोकसमूहांत दिसत नाही.

**महाराष्ट्रातील आदिवासी –**

महाराष्ट्रात आणि सरहद्दीवर भिल्ल, वारली, गोंड, कोळी, कोकणा, ठाकर आणि कातकरी अशा आदिवासी जमाती आहेत. त्यांच्या पुन्हा बऱ्याच पोटजाती असून त्यांना वेगवेगळी नावे आहेत. वरील जमातींची नावे लोकसंख्येच्या क्रमाने दिली आहेत.[९] येथे आपणास विशेषतः कोळी जमातीचा विचार करावयाचा असून त्यांच्या संदर्भातच ठाकर जमातीचा विचार करावा लागणार आहे.

**चाळीसगाव डांगाणातील लोक –**

चाळीसगाव डांगाण या परिसराची भौगोलिक माहिती या पहिल्या प्रकरणात दिलेली आहेच. त्या संदर्भात या भागात राहणाऱ्या लोकांचा परिचय करून दिला आहेच. येथे सांस्कृतिक अभ्यास करताना पुन्हा सविस्तर त्यांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. चाळीसगाव डांगाणात महादेव कोळी, ठाकर, तलवार कानडे व हटकर कानडे या प्रमुख चार जमाती आहे. त्यात महादेव कोळी हे संख्येने सर्वात जास्त असून त्या मानाने ठाकर तलवार कानडे आणि हटकर कानडे हे लोक अगदीच दुय्यम असून, या सर्वांवर महादेव कोळ्यांचा इतिहास काळापासून पूर्ण पगडा आहे, हे मागे स्पष्ट केलेच आहे. त्यामुळे या भागातील संस्कृती ही महादेव कोळ्यांचीच संस्कृती म्हणावी लागेल. अर्थातच येथे एक गोष्ट लक्षात घेणे जरूर आहे की एकंदर महादेव कोळी संस्कृती आणि चाळीसगाव डांगाण–संस्कृती यात थोडा भेद दिसून येतो. हा प्रादेशिक जसा आहे तसाच तो या तीन जमातीच्या

संमीश्रतेमुळेदेखील झालेला आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार अकोले तालुक्यातील आदिवासींची संख्या ६६,१३३ असून त्यांचे लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ४४.७७ टक्के इतके आहे. यात १९६१ साली केवळ महादेव कोळी ४१४२६ होते.[१०] तर आज ते लोक सुमारे ५५००० पेक्षा जास्त झाले आहेत व उर्वरित लोकात ठाकर, इतर क्वचित आदिवासी आहेत. म्हणूनच वर म्हटल्याप्रमाणे चाळीसगाव डांगाण संस्कृतीचा अभ्यास म्हणजे महादेव कोळ्यांच्या संस्कृतीचा अभ्यास. तत्पूर्वी डांगाणात उल्लेखिलेल्या सर्व जमातीचा अल्प परिचय करून घेणे इष्ट आहे.

**(१) महादेव कोळी–** हे डोंगर कोळी या नावाने संबोधले जातात. यांच्या जमातीला महादेव कोळी हे नाव का पडले असावे याविषयी जुन्या दंतकथा मिळतात. यांचे प्रमाण चाळीसगाव डांगाणात सर्वाधिक आहे. या प्रकरणात पुढे त्यांच्या संस्कृतीचा पूर्ण परिचय करून घ्यावयाचा आहे.

**(२) ठाकूर –** (ठाकर) सह्याद्रीच्या कुशीत यांची वस्ती बरीच आहे. तरी चाळीसगाव डांगाण भागात अगदी कमी आहे. ती साधारणतः सहा ते सात हजार एवढी भरेल. काही गावांना असलेल्या पाचसहा घरांची वाडी, याप्रमाणे वाड्या, उडदावणे, पांजरे व घाटघर ही गावे, चिचोंडी, ठाकरवाडी अशा काही मोठ्या वाड्या एवढीच यांची वस्ती. एकटेदुकटे घर इकडे तिकडे असते. येथील ठाकरांची संस्कृती महादेव कोळ्यांशी मिळून गेली आहे; परंतु कलात्मकतेचा वारसा मात्र महादेवकोळ्यांनी या ठाकरांकडून घेतला आहे. ठाकरांच्या बाबतीत संस्कृती मिलाफाचा हा प्रकार सर्वदूर आढळतो. ''या जमातीची वस्ती बऱ्याच जिल्ह्यातून विखुरलेली असल्याने ज्या ज्या इतर वन्य जमातींशी त्यांचा संबंध आला त्यांच्या उपासनापद्धतीचा या जमातीच्या उपासनापद्धतीवर प्रभाव पडलेला आढळून येतो. ही जमात डोंगरदेव, वाघदेव, गावदेव, हनुमान, खंडोबा, मुंजा या देवतांची उपासना करते. त्यांच्यातील उपासना करणाऱ्या पुरोहिताला कामडी असे म्हणतात.''[११] इगतपुरीच्या एका ठाकराजवळ सापडलेल्या एका लेखावरून असे अनुमान काढण्यात आले आहे की सातव्या शतकात ही जमात नाशिक जिल्ह्यात वस्ती करून राहात होती. कपालेश्वराच्या पूजेसाठी 'गोपराष्ट्र' जिल्ह्यातील बालेगावच्या नालम्मा ठाकराला चालुक्य घराण्यातील एका राजाने काही वर्षासन दिल्याचा उल्लेखही या लेखात आहे.[१२] या जमातीच्या 'क' ठाकूर आणि 'म' ठाकूर अशा दोन जमाती आहेत. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार सहसा होत नाहीत. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताने ठाकूर हा शब्द तस्कर या शब्दापासून निघाला असावा. तस्कर–ठक्कर–ठाकूर अशी त्यांनी व्युत्पत्ती दिली आहे.[१३] रजपूत



प्रमुख स्वतःला सन्मानपूर्वक ठाकूर म्हणवून घेतात.[१४] चाळीसगाव डांगाण या भागात फक्त 'म' ठाकूर आहेत. ते आपण पूर्वी रजपूत होतो असे सांगतात. त्यांच्यात मयताला पुरम्याची चाल आहे. मेंगाळ, मधे, गांगड, पथवे, गीरे अशी त्यांची आडनावे आहेत.

**(३) तलवार कानडे –** तलवार कानडे या जमातीस हे नाव कसे पडले हे सांगता येत नाही. हे लोक आदिवासी नाहीत. कारण अनुसूचीमध्ये त्यांचा समावेश नाही. त्यांचा मुख्य धंदा गुरे पाळणे व दुग्ध व्यवसाय करणे हा असून त्याला पूर्वापार अशी परंपरा आहे. पूर्वी या भागात गवळी लोक राहात होते व त्यांचे पारिपत्य करून महादेव कोळ्यांनी या भागात आपले स्थान स्थिर केले असे कॅ. माकिनटोश यांनी म्हटले आहे.[१५] हा काळ कोणता असावा हे सांगता येणार नाही. परंतु अतिप्राचीन काळापासूनच्या आख्यायिका आणि उल्लेख यावरून महादेव कोळीच येथे राहात असावेत असे दिसते. तलवारकानडे हे व्यापार करताना आढळतात, तसेच शेती हाही त्यांचा व्यवसाय दिसतो. आपण आदिवासी नाही हे या भागातील लोक आवर्जून सांगतात. यांची संस्कृती या भागात तरी अगदी येथील महादेवकोळ्यात मिसळून गेली आहे. तरी हे लोक महाराष्ट्रातील बहुजन मराठ्यांसारखेच वागताना दिसतात. हे पूर्वी गवळी म्हणून उल्लेखिले जात असावेत असे अनुमान काढता येण्याजोगे आहे. गवळी देवाची आख्यायिका 'चेमदेव' किंवा 'चोमदेव' या देवस्थानला आहे. काही गावची पाटीलकी यांच्याकडे होती.[१६] यांची वस्ती डांगाणात फारशी नसली तरी अलीकडे व्यापारीवृत्तीमुळे त्यांचे वर्चस्व जाणवते. यांची भाषा पुष्कळच सुधारलेली म्हणजे मध्यवर्ती मराठीशी मिळतीजुळती आहे. विश्वनाथ खैरे यांनी 'अकोल' या शब्दाची दिलेली व्युत्पत्ती आणि अकोले परिसरातील ही जमात यांची सुसंगती वाटते.[१७]

**(४) हटकर कानडे –** उडदावणे, पांजरे, घाटघर या भागात हटकरकानडे यांची काही वस्ती आहे. ही जमात अगदीच अल्प असून यांची भाषा मराठी नाही. त्यांची भाषा कानडीसारखीच आहे. त्या भाषेत आता काही मराठी शब्द वापरले जातात एवढेच. या प्रबंधाच्या दृष्टीने ही जमात नगण्य आहे आणि त्यांचा विचार करण्याचे देखील तदर्थाने कारण नाही. त्यांचा प्रमुख धंदा या भागात तरी मजुरी आणि शेती असा झालेला आहे. क्वचित एखादा व्यापार करतानाही आढळतो. खरेतर पूर्वी हे लोक व्यापारी असावे. बाजारहाट करणारे – हाटकरी व कन्नड भाषा बोलणारे ते हाटकर कानडे असे नाव संयुक्तिक वाटते. त्या दृष्टीने त्यांची निश्चित अशी व्युत्पत्ती ते लोक सांगत नाहीत. त्यांच्या भाषेत आढळणारे

मराठी शब्द भाषिक अभ्यासाच्या प्रकरणात त्यांच्या वाक्यातून आढळतील. आदिवासींविषयींची ही चर्चा अनुसूचीत आदिवासी ट्राइब्ज म्हणून अनुसूचन असल्यामुळे केली आहे. ब्रिटीश शासनाच्या प्रभावाने शासकीय उल्लेखानुसार अशी चर्चा अपरिहार्यपणे आली आहे. यात भारतीय परंपरेने संशोधन होऊ शकते.

**लोकसाहित्य आणि संस्कृती –**

चाळीसगाव डांगाणच्या संस्कृतीचा अभ्यास करताना लोकसाहित्याच्या आरशातून येथील लोकजीवन पाहावयाचे आहे हे लक्षात घेता लोकसाहित्य आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध कसे असतात यांची चर्चा करणे आवश्यक ठरते. 'भाषा, तिचा नाद, तिने व्यक्त केलेले विचार, तिची रचना हे सर्व जुन्या पिढीपासून नवी पिढी घेते तेव्हा संस्कृतीच्या कित्येकअंगांचा स्वीकार अभावितपणेच भाषेच्या संकेताबरोबरच होतो.'[१८] लोकगीतांचे स्वरूप व वैशिष्ट्ये सांगताना प्रभाकर मांडे म्हणतात, ''लोकसंस्कृतीचे आणि प्रकृतीचे सरळ आणि भावगर्भ स्वरूपदर्शन लोकवाङ्मयातून घडते. समाजजीवनाची वैशिष्ट्ये त्यातून कळू शकतात. लोकवाङ्मयातून जीवन व्यक्त होतेय त्याचप्रमाणे जीवनाला आकार देण्याचे कार्यही याद्वारा घडते. सामूहिक कल्याणाची दृष्टी त्यात असते.''[१९] लोकसाहित्य आणि लोककलांचा गौरवपूर्ण उल्लेख करून मॅक्झिमगॉर्फी उद्गारतो, ''जनतेच्या सृजनात्मक शक्तीचे लोकसाहित्य हे सुंदर प्रतीक आहे. हीच जनता सृष्टीची प्रथमदार्शनिक आणि आदिकवीही आहेत. कोणत्याही राष्ट्रातील जनतेचे जीवन तपासून घ्यायचे असेल तर त्या राष्ट्रातील लोकवाङ्मय प्रथम तपासले पाहिजे.'' महात्मा गांधी लोकसाहित्याचा विशेष उल्लेख करून उद्गारतात, "Folklore is literature of the People" विश्वकवी रविंद्रनाथ टागोर लोकसाहित्य, लोककला व भारतीय संस्कृतीसंबंधी आपला अभिमान व्यक्त करून सांगतात. ''अत्यंत प्राचीन काळी भारत भूमीच्या आदिसंतानांनी लोकसाहित्य व लोककला निर्माण करून देशाची संस्कृती सिद्ध केली आहे. जे वैभव त्यांनी निर्माण केले त्याचे जतन, संशोधन व संवर्धन केले पाहिजे. लोकगीतात जिव्हाळा, प्रेम, ऋजुता, उत्कटता, निष्ठा, प्रामाणिकपणा, परोपकार, उदात्त सात्विकभाव इत्यादी सद्गुणांची जशी रेलचेल दिसेल तसेच खेडुतांचे जीवन, संस्कृती, रितीरिवाज, व्यवहार, सेवाभाव यांचे विविध प्रवाहही प्रकर्षाने आढळतील.''[२०] उपरोक्त विचार लक्षात घेता हेच स्पष्ट होते की लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा आरसा आहे. एवढेच नव्हे तर ते प्रगत होऊ पाहणाऱ्या लोकसंस्कृतीची प्रेरणा आहे तर सामूहिक



जीवनाचा तो आरसा आहे.

**चाळीसगाव डांगाणचे लोकसाहित्य –**

लोकसाहित्याविषयी चर्चा आणि वाङ्मयीन समालोचन स्वतंत्रपणे मांडलेले आहे. येथे फक्त या परिसरातील वाङ्मय कोणत्या स्वरूपात आहे एवढे पाहू. येथे सणउत्सवांची गाणी बडबडगीताच्या स्वरूपात आहेत. स्त्रियांची गाणी ही बहुतांशी ओवीबद्ध असून त्यातून संतसंदर्भ आढळतो. लग्नसमारंभाची स्वतंत्र गाणी आढळतात. विविध प्रकारच्या प्राणीकथा व अद्‌भुतकथा ऐकावयास मिळतात. त्यांचे स्वरूप बोधकथा, नीतिकथा व परिकथा यांसारखे असते. शिकारकथा गप्पांमधून सांगितल्या जातात. स्थळांविषयीच्या प्रादेशिक आख्यायिका ऐकविल्या जातात. उखाणे, आहणे, भारूडे, भजने, लावण्या, वग हेही प्रकार सापडतात. या सर्वातून हे वाङ्मयसंस्कृतीची ओळख करून देण्यास समर्थ आहे. त्यांच्या संस्कृतीचे उपासक या नात्याने त्यांच्या संस्कृतीला चालना देण्यासाठीच जणू वासुदेव गोंधळी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी, पोतराज, जोगती, जोगतीण, नंदीबैलवाले असे कितीतरी लोक उदेकार, येळकोट करीत येतात. त्यांच्या गीतांमधून देखील त्यांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते.

**चाळीसगाव डांगाण संस्कृती आणि**
**तिचे लोकवाङ्मयातील साद पडसाद –**

**(१) लोकजीवन–** गावे, वस्ती आणि घरे : सह्याद्रीच्या उंचउंच कापीव कड्यांच्या कुशीत डांगणी गावे वसली आहेत. गावे कसली ती; वस्त्याच छोट्या. महादेव कोळ्यांची सलग गावे आणि त्या गावांच्या सोबतीला छोट्या छोट्या ठाकरांच्या वाड्या. चारपाचशे वस्तीच्या गावाला जोडून पाचपन्नास वस्तीची ठाकरवाडी. सुतार, लोहार, चांभार, न्हावी यांचा तर कित्येक गावात पत्ताच नाही. बाराबलुत्यांची आपली गरज ही डांगाणी गावे चारपाच मिळून एकत्र मागवून घेतात. गावे चारचार सहासहा मैलाच्या अंतरावर आणि जिवंतपणाला झापे, वाड्या वस्त्या. त्यामुळे सारे डांगाण मुळी एकसंघ होते. गावातून घरांची संख्या साधारणतः शेपन्नासच असायची. त्यांना घरे म्हणण्यापेक्षा झोपड्या म्हणणेच योग्य. गरीबाची लहान झोपडी. श्रीमंताची मोठी झोपडी. गावात दोनचार घरे कौलारू असायची. त्यात नळीची कौले अधिक. काही घरांना मंगलोरी कौले. झोपडी ते घर यांची लांबीरुंदी सरासरी रुंदी ९ फुटांवरून २० फुटांपर्यंत आणि लांबी देखील साधारणतः तेवढीच. उंची मध्यभागी जास्तीत जास्त पंधरा फूट. घराला जोते हवेच असे नाही. पण अंगण मात्र अगदी हवेच. घराचे दोन भाग.

रीतसर एक आपल्या गुरांना आणि दुसरा आपल्या पोराबाळांना. हे भाग मातीच्या कोथळ्यांनी (धान्य ठेवण्यास केलेले रांजणाच्या आकाराचे परंतु मोठे) किंवा लाकडांनी केलेले असतात. प्रत्येक घराला किंवा झोपडीला एकच दार असते. तेदेखील पाच साडेपाच फूट उंचीचे. त्यावरच घराची पाखाडी ठेवलेली असते. मोठ्या घरांना दोन दारे असतात. एक गुरांना आणि दुसरे माणसांना. कधीमधी गुरांसाठी घराला एका भिंतीला छप्पर असते. तेदेखील सगळीकडून बंद. त्याला जाण्यायेण्यास झोपाटा (दार-काडक्यांचे) लावलेला असतो. घराला खिडक्या नसतातच. चुलीवर धूर जाण्यास एक ढोरा (छोटी खिडकी) असते. घराच्या भिंती मातीच्याच विटांच्या क्वचित व परिस्थिती जरा बरी असेल तरच नाहीतर कारवीचे कूडच केलेले असते. घरात एका कोपऱ्यात चूल असते. तेच त्यांचे स्वयंपाकघर. त्यावर बांबूच्या किंवा कारवीच्या कामट्यांची एक चौकट टांगलेली असते. त्यास 'उतीव' असे म्हणतात. घराला 'माळा' असतो. पावसाळ्यात गाडगीमडकी, विळाकोयता, लाकूडफाटा, कुऱ्हाडी, विरली इ. गोष्टी ठेवण्यास उपयोग होतो. असे त्याचे घर बहुधा तो स्वतःच बांधतो. आणि दरवर्षी घराचे छप्पर स्वतःच नवे गवत किंवा भाताच्या पेंढ्या घालून 'शेकारतो' किंवा आत सागाची पाने घालून 'शिवतो'. घर अंगण तो स्वतःच कष्ट करून 'घालतो' (जमीन घालणे).

घरातील संपत्ती म्हणजे रांजणमडक्याच्या उतरंडी, पाण्याची घागर, हंडा, पातेले, तौली, डाव, चाटू, घरात पितळी, बेली, बाडगी कलथा, काठवट, शिंकाळी, ताटली, पिठाची रांजणी, पाण्याची भांडी ठेवण्यासाठी दोन लाकडांवर एक फळी ठेवलेली असते किंवा मातीची छोटी भिंत असते. तिला 'पाणेरी' म्हणतात. या सगळ्यास डोळ्यात भरणारी मालमत्ता म्हणजे गायी, बैल, म्हशी गोऱ्हे, रेडे, शेळ्या, कोंबड्या ही जनावरे. शेळ्या, कोंबड्या ही मुलांची व स्त्रियांची मालमत्ता.

प्रत्येकाच्या घरापुढे अंगण आणि घरात पेटती चूल तसेच ओसरीत जाते ही असायलाच हवी हा जणू संकेतच. काही घरांना छपरांच्या उतरणीखाली दगडमातीची ओटी बांधलेली असते.

गाव तेथे मारुतीचे देऊळ हा जणू संकेतच. त्याचा मोठा मान. तीच शाळा. तीच चावडी. तीच गुरांची जागा, तेच सामुदायिक शयनगृह. ती भजन, भारूडे, तमाशे करण्याची जागा. तेथे धुनी कायम पेटती असते. त्यांची जणू सारी संस्कृती त्या मारुतीच्या साक्षीनेच फुलते.

त्यांच्या या गावांगावांमधून एकप्रकारचे नाते जोडलेले असते. त्यांच्यावर



त्यांचे मोठे प्रेम. जवळजवळच्या गावातील सोयरसंबंधामुळे ती गावे देखील जिवंत होतात. आणि त्या गावांची नामावली मोठ्या ठेक्यात मुले तमासगीर गातात-[२१]

**वारी वारनघुशी दोन्ही जावा** ...२
**शेंडी मंदी मटान घ्येवा** ...२
**वाकी मंदी शिजून खावा** ...२
**मान्हेरीची चावडी पाव्हा** ...२
**अंबेवंगणला अवघी फुटा** ...२
**लाडगावाला पापी मोठा** ...२
**शेणीताला मकाची ताटा** ...२
**देवगावाना फुगावल्या पोटा** ...२
**बाभूळवंडीला पाण्याचा तोटा** ...२

इत्यादी अशा साऱ्या डांगाणातून ते लगेच फेरफटका मारून येतात. पहाटे पहिला कोंबडा आरवतो आणि सारी घरे जिवंत होतात. धूर बाहेर येतो. ओव्या सारा गाव पवित्र करतात. तर 'बाप्पे पोराली' गुर सोडाया सांगत्यात.

सकाळी जात्यावर बसले की ओव्या आठवतात

**पयली माझी ओवी गं- तुळशीच्या पाना**[२२]
**सेवा करी कृष्ण काना- तू ये रे बा विठ्ठला ।।**
**दुसरी माझी ओवी गं- तुळशीचा नेम**
**तुळशीखाली झोपं राम - तू ये रे बा विठ्ठला ।।**

तुळशीचे गुणगान आटोपले की तोपर्यंत झुंजूमुंजू होते आणि घरातील पाण्याची भांडी वाजू लागतात आणि घराघरातील लेकी, सुना 'विहिरीवं, पाटावं, झुवरीवं, नदीवं, व्हाळावं, पाण्याला निंगत्यात' आणि पार्श्वसंगीत ऐकू येते.

**दुडीवरी दुडी गवळणी आल्या लई**[२३]
**सोड किसणा वाट दुधाची झाली कोई ।।**
**दुडीवर दुडी गवळणी आल्या बारा**
**सोड किसणा वाट दुधारा झाल्या तारा ।।**
**दुडीवर दुडी गवळणी आल्या थोड्या**
**कळंबच्या खोडी काना मारितोसी खड्या ।।... इत्यादी**

**सीताला सासुरवास केला केसकेशी**[२४]
**वाटून बाई दिला सगळा देशोदेशी ।।**
**सीताला सासुरवास केलाई बहू बहू**
**वाटून काय दिला सगळा गहू गहू ।।...इत्यादी**

**पहिला माझा दंडवत बाई पहिला माझा दंडवत**[२५]
**वीसयापासून**
**सावळ्या पांडुरंगा बाई सावळा पांडुरंगा**
**यावे रथात बसून बाई रथात बसून ।।**
**दुसरा माझा दंडवत बाई दुसरा माझा दंडवत**
**चंद्रभागेच्या अलकड**
**सावळ्या पांडुरंगा बाई सावळ्या पांडुरंगा ।।... इत्यादी**

**पंढरपुरी चोरी झाली विठ्ठलाची पताका नेली**[२६]
**आळ आला जनीवरी जनी गेली सुळापाशी ।**
**सोळाचा गं झाला पाणी जनी पळी आड रानी**
**पताका पड आड रानी जनी पळ आड रानी ।।...इत्यादी**

**जनाबाई साळी सडी नामदेव मुसाळ धरी ।**[२७]
**नामदेवा, मुसाळ सोड**
**हाता येतील तुझ्या फ्वाड**
**फ्वाड आले तर येऊद्या**
**साळी कांडून घेऊया ।।...इत्यादी**

अशा रीतीने एकीकडे काम चालू असते. जात्यातून पीठ पडत असते. स्त्रियांच्या अंतःकरणातील भाव उचंबळून कारंज्यासारखे उडत असतात. दऱ्यादऱ्यातून निनादत असतात. त्यात आनंद असतो. विषाद असतो. खेद असतो. समाधान असते. जीवनाचे मुख्य क्रीडन असते.

त्यावेळी बाप्याची हाक ऐकू येते.

**गायख्या गायख्या झोपाटा उघड ... ...२**[२८]
**गायी जाऊंदे वरल्या माळी ...२**



**''वरल्या माळीचा कुंदा माता'' ...२**
**गायी जाऊंदे नदीच्या कडा ...२**

त्याबरोबर गायख्याबाळ्याचे कुरकुरणे देखील ऐकू येते. पावसाळा, उन्हाळा, हिवाळा ऋतू कोणताही असो कोंबड्याच्या केकाटण्याने, बकऱ्याच्या मेमाटण्याने, गायी, म्हशी, बैल, गोऱ्हे यांच्या हंबरण्याने जात्यातून निघणाऱ्या ओव्यांनी आणि 'चऱ्यातून' येणाऱ्या दुधाच्या धारांच्या चुरू चुरू आवाजाने सारे डांगाण जागे होते आणि याच आवाजांनी संध्याकाळी अंधाराच्या कुशीत ते आश्रयाला जाते.

**(२) आहार आणि खाणे–पिणे –** भात हे सर्वांचेच प्रमुख अन्न. त्या जोडीला नाचणी (मागली) आणि वरी यांची भाकरी सरसहा खातात. त्याबरोबर चवळी, हुलगे, वाल, उडीद, हरभरा यांचे 'घुगरा', 'आमटी', 'बेसन' असे पदार्थ असतात. वांगी, बटाटे, रताळी, भोपळे हेही जेवणात असतात. मिरची, आंब्याचे लोणचे हेही त्यांचे आवडते पदार्थ; पावसाळ्यात धान्य नेमके संपलेले असते. त्यांचे येणारे धान्य जेमतेम आठ महिने पुरते. रब्बीच्या हंगामात होणारा 'शेळू' गहू, हरभरा सर्वांनाच होतो असे नाही. त्यामुळे पावसाळ्यात सत्तर ते ऐंशी टक्के लोक पावसात उगवलेल्या रानभाज्या उदाहरणार्थ, कवली, कुरडु, बरकी, रानआळू, कवदर या सारख्यावर गुजराण करतात. त्यांची सविस्तर माहिती भौगोलिक प्रकरणात आलेली आहेच. उन्हाळ्यात करवंदे, आंबे, मोहट्या, आवळं यांची खैरात असते. दिवसभर रानात गुरांना चारताना भरपूर खायचे हा यांचा छंदच. उन्हाळ्यात मधाची पोळी भलीभली मिळतात.

पाहुणचार आणि सण या गोष्टी मोठ्या आनंदाने उत्साहाने खाण्यापिण्याच्या बाबतीत वाटेल ते करून साजरा करण्याकडे त्यांचे लक्ष असते. पाहुणचाराला किंवा सणावाराला किंवा लग्नात पुरणपोळ्या, दूध, दही, डाळ, भात, चपात्या असे केले जाते. भाताचे उंडे, आंबील, तांदळाची आंबोळी (धिरडी), गुळवणी, पुरणाचे कडबू इत्यादी पदार्थ करतात. पुरणपोळी आणि कडवू किंवा उंडे हे त्यांचे ठराविक पदार्थ होत. पाहुणचाराला खवासाखर देण्याची पद्धत आढळते. तुपापोळ्यांचा उल्फा म्हणजे मोठे जेवण समजण्यास हरकत नाही.

मांसाहार सरसहा करण्याची पद्धत होती. खेकड, मासळी, बोंबील, सुकट, कोंबडी व क्वचित बोकड हा त्यांचा मांसाहार. अंडी, मासळी इ. रोजचे खाणे तर जत्रा प्रसंगी किंवा पाहुणचारात कोंबडी, बोकड पाडला किंवा दिला जातो.

या सगळ्यांसकट दारू ही अत्यंत महत्त्वाची बाब दिसते. लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वच दारू पितात. त्यात चांगली गोष्ट म्हणजे निदान स्त्रिया दारू

पीत नाहीत. या खाण्यापिण्याचेचे उल्लेख मात्र त्यांच्या लोकवाङ्मयात फारसे येत नाहीत असे दिसते.

हे लोक दिवसातून दोन-तीन वेळा जेवतात. विशेष म्हणजे दोन घास खाऊन घे, असे म्हटले की हे लोक सरळ बसतात. अर्थातच धमनीवनामुळे त्यांना ही सवय झाली हे उघड आहे. आहार देखील चांगले असतात. धान्य संपते तेव्हा यांचे हाल अतिशय होतात.

आपल्या घराचे मोठेपण सांगतांना घरातील लोकांना लागणाऱ्या दळणाचा उल्लेख मोठ्या अभिमानाने केला जातो.

**मोठं माझं घर दळण लागतं मणाचं[२९]**
**बंधुराया माझा नकं आयकु जनाचं ।।**
**मोठं माझं घर दळण पायली**
**बंधुराया लेक देव ती पहेली ।। ... इत्यादी**

सोयरीक जोडताना मोठेपणाने आपण कोणते जेवण देऊ याचा उल्लेख होतो.

**ये ये बंधुराया तुझी इहिण होईल[३०]**
**तुपा पोळ्याचा उल्फा तुझ्या गावाला देईल...इत्यादी**

**जेवण वाढीते दूध भात[३१]**
**याही जेवतो रघुनाथ... इत्यादी**

कधी कधी घुगऱ्या खाताना तातोबा मांडू लागतो-

**तातोबा चिंता चवळ्याचा घोंगता[३२]**
**चवाळ्याच्या घातल्या घुगऱ्या घुगऱ्या**
**तातोबा म्हन्तो मला थोड्या दिल्या... इत्यादी**

**पंढऱ्या गाईचा दूध जेवन झालय शुद्ध**
**पंढऱ्या गाईचा दही जेवान झालय लई**
**पंढऱ्या गाईचा खवा पोट भरून ढेकर देवा... इत्यादी**

**वधली सीता नार आणला यीचा धड[३३]**
**केगयी केसाने जेवली दूध पेढं ।।**



**वधली सीता नार आणला यीचा हात**
**केगयी कसाने जेवली दूध भात ।।...इत्यादी**

**चाणी म्हणे मी क्याची राणी[३४]**
**अना सवय गंगाचं पाणी**
**मला सवय साळीचा भात**
**घाला सखया बंधुला जेवण...**

केव्हा केव्हा तर चिमणीसुद्धा खीर करते आणि खीर करता करता खिरीत चिमणा पडतो-

मग ती ओरडते, 'खीर खिरवटा खिरीत पडला चिमणा'[३५]

जावईबुवांना पाहुणचार करताना 'मंग दिली मिरचीन् भाकर खाया.'त म्हन 'तीत तीखाट गडे' मंग दिली पोळी, त म्हन, 'गुळच्याट गडे'[३६] अशा रीतीने जावईबुवा पोळीवर मोठे खूष होतात.

कधी कधी क्वचित शिरापुरीचा स्वयंपाक होतो.[३६] तर कधी कोंड्यारोड्याची भाकर घेऊन गुरांमागे जावे लागते.

असे त्यांच्या अन्नपदार्थाविषयी अनेक उल्लेख त्यांच्या लोकवाङ्मयातून सापडतात.

चार महिने जेव्हा अन्न संपते तेव्हा उन्हाळा व पावसाळा ते कसे काढतात हे वाखाणण्याजोगे आहे. पण कष्टांची वर्णने त्यांच्या लोकवाङ्मयातून फारशी येत नाहीत. दुःखापेक्षा सुखाचा आविष्कार अधिक प्रमाणात असणे हे आनंदीपणाचे लक्षण म्हणावे लागेल.

यांच्यातील गायखे पोरे, बापे जेव्हा सस्यांच्या शिकारीला तासन्तास रात्री चंद्राच्या अंधुक प्रकाशात श्वास दाबून दाबून राहतात तेव्हा त्यांच्या पोटातील भूक त्यांना काय करावयास लावते हे लक्षात येते. याशिवाय 'लाव्हरी', 'होले' हे पक्षी देखील यांची मेजवानी ठरते. विशेषतः सस्यांच्या शिकारीला टोळ्यांनी जातात. ठाकर वगैरे लोक मोरदेखील खातात. त्यांची शिकार हीदेखील मनोरंजक. या शिकारी करताना किंवा कमरेपर्यंत खोल खणून कंदमुळे मिळवताना दुःखापेक्षा आनंदच जास्त मिळतो ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे. बहुतेक कोळी मांसाहारी होते परंतु अलीकडे बरेच लोक माळकरी झाल्यामुळे दारू आणि मांसाहार यांना शिवतदेखील नाहीत. तेव्हा त्यांचे कौतुक वाटते. या दोन्ही गोष्टी सोडणे म्हणजे स्वतःची अजाणता उपासमार करून घेणेच होय.

डांगाणात चहाचा पाहुणचार होतो; पण त्याची पद्धत त्यांना आवडत नाहीसे दिसते. त्यापेक्षा पाहुण्याने दोन खास खावेत असेच त्यांचे मत असते. त्यांचा चहा म्हणजे गवती चहा (पाती चहा) आणि गुळ एकत्र उकळलेले पाणी. त्यात ते दूध घालतात, कधी नाही. पाव्हणा आला की सारेच जवळ गोळा होतात. त्या सर्वांना हा चहा पुरवायचा म्हणजे मग त्याला प्रमाण असत नाही. त्याच्याकडे खायला असो वा नसो त्यांच्या 'मुलका'चं एक वैशिष्ट्य जरूर सर्वांनीच लक्षात ठेवण्याजोगे आहे–

**आमुच्या गावामंदी पाहुणा यायाचा पायी रं**
**पर उपाशी जायाचा नाही रं**

पावसाळ्यात भाताची पेज, हुलग्याचं कढण, वालाच्या घुगऱ्या आणि कांदा यावर भागविणारे लोक गुडघा गुडघा चिखलात पडत्या मुसळधार पाण्यात डोकीवर इरले घेऊन आनंदाने कष्ट करीत असतात. त्यांचे जगणे खाण्याकरिता नाहीच; जगण्यातला आनंद मिळविता यावा म्हणून ते खातात, पितात.

त्यांच्या असलेल्या गुरांकडे पाहिले की हे लोक दुधदुभते भरपूर खात असतीलसे वाटते. पण ती जनावरेदेखील सहाच महिने दूध देणारी असतात. ती पुन्हा लागतात किंवा लवकर आटतात. अशा रीतीने परमेश्वर त्यांना रोज अर्धपोटी ठेवण्याऐवजी अर्ध वर्ष उपाशीपोटी ठेवतो असेच दिसते. त्यातून पालापाचोळा, कंदमुळे, पाखरे, प्राणी काहीतरी मिळवून जगम्याची धडपड.

**(३) पोषाख, दागिने आणि शृंगार –** डांगाणी लोकांचा पोशाख फारच तोकडा असतो. पुरुषांना मुंडासा, पागोटा, बंडी, लंगोटी किंवा धोतर असले की बस, पायात वाहाण भक्कम असाव्यात पण नसल्या तर त्याची खंत नाही. कानात बाळ्या आणि चुकून माकून हातात कडे असते. डोक्याला टोपी, बंडी, धोतर, रूमाल या बाबी अगदी अलीकडच्या आहेत. नाहीतर डांगाणी माणूस म्हटले की उपरोक्त पोशाख पुरेसा असे. कोठे बाहेर किंवा परगावी कामाला जायचे म्हटले तर खांद्यावर घोंगडी आणि हातात काठी असली की मग पायांची गाडी जोरात सुरू होते. सणावासराला, लग्नसमारंभात हेच कपडे जुन्याचे नवे होतात एवढेच. घरात झोपायला गोधड्या पुरेशा असतात. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचा देखील पोशाखाचे बाबतीत फारसा बडेजाव नाही. गुडघ्यापासून चापूनचोपून नेसलेले 'उभरवट्याचे' नेसणे, वर चोळी आणि डोके झाकायला डोक्याला ग बांधून कम रेला खोचलेली 'फडकी' (स्वतंत्र पदरासारखे उपयोगात आणले जाणारे वस्त्र), पायात वहाणा असोत नसोत. शक्यतो नाकात नथ असावी अन् कानाला देखील



शोभा असावीच. अत्यंत दारिद्र्यामुळे एका लुगड्याची दोन लुगडी करून नेसण्याची पद्धत सरसहा आढळते. स्त्रियांना दागिने घालून नटण्याची फार हौस. इतर आदिवासी स्त्रियांप्रमाणे डांगाणी स्त्रियांमध्येही ही हौस दिसून येते. मुली सात आठ वर्षाच्या होईपर्यंत आईचे जुनेराचे तुकडे गुंडाळतात किंवा अलीकडे झगा घालतात. आठदहा वर्षांपासून आईची जुनी पातळे नेसून दिमाखाने मिरवायला सुरुवात होते. आईच्या पावलावर पाऊल ठेवून कामाला सुरुवात. डांगाणी पोरे तशीच कमरेला लंगोटी किंवा अलीकडे चड्डी वर बंडी. डोक्याला धोतराचा धडपा किंवा टोपी असली त असली. ही पोरे देखील सात आठ वर्षाची अशी मोठी झाली की 'गुराकं' जायला योग्य होतात. बापांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांचे श्रम सुरू होतात.

या डांगाणी लोकात तलवारकानडी, जरा फेटा, धोतर, बंडी असा व्यवस्थित राहाण्याचा प्रयत्न करून आपले सुधारलेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. पण स्त्रियांच्या वेशभूषेमध्ये मराठमोळेपण सहज दिसून येते. फडकीऐवजी लुगड्याचा पदर घेणे अधिक पसंत असते.

डांगाणी स्त्रिया कपाळी कुंकू ठळकपणे लावतात. पण कामाच्या रगाड्यात त्याची त्यांना शुद्ध नसते. मुली सातआठ वर्षाच्या होताच एखाद्या जत्रेत गोंदणाऱ्या कोमटीणी आल्या की त्यांच्याकडून त्या कपाळी, गालाला, हनुवटीला, दंडावर, हातावर भरपूर गोंदवून घेतात. त्याचेच त्यांना भूषण असते. ते सौभाग्याचे लक्षण आहे. विशेषतः ठाकर स्त्रिया गोंदण्यात निरनिराळे आकार काढून घेताना दिसतात.

स्त्रिया लग्न झाले की गळ्यात काळी पोत व मध्यभागी सोन्याचा किंवा चांदीचा मणी असलेला हार घालतात. त्याला ते 'गाठी' असे म्हणतात. याशिवाय कानात बाळ्या, बुगड्या, कुड्या, कानफुले, नाकात मोरणी, नथ, हातात पाटल्या, तोळबंध, गोठ, वेळा, गळ्यात चांदीची साखळी, हसली, बोटात अंगठी, पायाच्या बोटात मासळी, किंवा नागाच्या आकाराची जोडवी इ. दागिने घालतात. दिवाळी, होळी, नागपंचमी आणि विशेष म्हणजे लग्न याप्रसंगी हा सारा साज अंगावर दिसतो. यातील पुष्कळ दागिने चांदीचेच किंवा रूप्याचेदेखील असतात. सोन्याचे दागिने अगदीच क्वचित पाहावयास मिळतात. दागिने तांबे, पितळ, रूपे, कथिल या धातूंचे देखील पाहावयास मिळतात. नाकात आणि कानात मात्र अव्वल सोनेच वापरले जाते. नथ मात्र चांदीची व सोन्याचे पाणी दिलेली असते, असे दिसून येते. नथीचा साज खरा फार क्वचित सापडतो. त्यांचे

दारिद्र्य आणि अज्ञान या गोष्टी याला कारणीभूत आहेत हे निर्विवाद आहे.

सर्व गोष्टींचे उल्लेख त्यांच्या अलिखित वाङ्मयात फार मोठ्या प्रमाणावर आढळतात.

लग्नाचा देज (दहेज) मागताना विहिण काय काय दागिने खुशीने मागून घेते हे पाहाम्यासारखे आहे.

**राजा हौसानं केला येही[३७]**
**मी तं मांगत नही काही**
**मी तं मांगते थोडा थोडा**
**नवरदेवाला कंठी कडा**
**कंठी कड्याचा झाला भार**
**मी तं मांगते चंद्रहार**
**चंद्रहार चाईला गळ्या**
**इला घडवा बोंडबाळ्या ।।**
**बोंडबाळ्याचं दांड रूंद**
**इला हिराई शेलू दंड ।।... इत्यादी**

**माझ्या बापानी मला दिल मला दिलं गं ।[३८]**
**मला कळीत नही केलं नाही केलं गं**
**बाप कशाला लोभी झाला लोभी झाला गं**
**बाप पैशाला लोभी झाला लोभी झाला गं**
**माझ्या आईना मला दिलं...२**
**मला कळीत नाही केलं...२**
**आई कशाला लोभी झाली...२**
**आई लुगड्याला लोभी झाली...२**

यापमाणे भाऊ अंगठीला तर बहीण चोळीला लोभी होते. विशिष्ट प्रकारचा साजशिणगार असल्याशिवाय लग्नाला शोभा येणार नाही व आपली शोभा होतील असे भाऊ बहिणीला समजावतो. त्यावर बहिणीचे उत्तरही मोठे मजेदार आहे–

**''कळस तांब्या मी घेते; दादा मी लग्नाला येते ।।[३९]**
**तुला नथ बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।।**
**नथ भाड्याची घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला पोलकाबी नाही; लग्नाला येऊनको बाई ।।**
**पोलका भाड्याचा घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला वेळा बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।**
**वेळा भाड्याच्या घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला साकळ्या बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।**
**साकळ्या भाड्याच्या घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला जोड्या बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।**
**जोड्या भाड्याच्या घेते; दादा मी लग्नाला येते ।**
**तुला गोठ बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।**
**गोठ भाड्याचं घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला गजरा बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।**
**गजरा भाड्याच्या घेते; दादा मी लग्नाला येते ।।**
**तुला लुगडा बी नाही; लग्नाला येऊनको बाई ।।**

अशी नटलेली करवली दादाला हवी आहे आणि स्थिती तर 'कशात काय आणि फाटक्यात पाय' अशी आहे. अशा वेळी याचे त्याचे दागिने मागून आणून, घालून वेळ साजरी करण्याची तयारी देखील या गाण्यातून दिसून येते.

दागिने कसे असावेत तर ते देवाच्या दागिन्यांसारखे असावेत असा संकेत किंवा अपेक्षा पुढील गाण्यात व्यक्त झाली आहे. ती पाहण्याजोगी आहे. आपल्या मुलांच्या अंगावर असे दागिने असावेत अशी इच्छा.

**माझ्या अंगणी बाई रंगणी । खेळं चकपाणी[४०]**
**आम्ही देवाच्या बाई देवाच्या । किसणाच्या गवळणी**
**बाळी घडावी बाई घडावा । किसणाच्या कानाची**
**लहू लाखाची बाई लाखाची । बत्तीस तोळ्यांची**
**कडा घडावा बाई घडावा । किसणाच्या हाताचा**
**पेटी घडावा बाई घडावा । किसणाच्या गळ्याची**
**लवू लाखाची बाई लाखाची । बत्तीस तोळ्याची**
**साकळी घडावा बाई घडावा । किसणाच्या कमरची**
**लवू लाखाची बाई लाखाची । बत्तीस तोळ्यांची**

बोळवण करताना कोण कोण काय काय बोळवण करतो हे देखील पाहण्यासारखे आहे.

एक सासुरवाशीण दुसरीस विचारते-

**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई[४१]**
**तुझ्या बापानं तुला माहेरी नेलां**
**काय काय बोळवण केली ग सई ।।**
**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई**
**मह्या बापानं मला माहेरी नेला**
**नथीची बोळवण केली ग सखी ।।**
**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई**
**तुझ्या आईना तुला माहेरी नेला**
**काय काय बोळवण केली ग सई ।।**
**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई**
**माह्या आईना मला माहेरी नेला**
**चोळीलुगड्याची बोळवण केली ग सई ।।**
**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई**
**तुझ्या भावाना तुला माहेरी नेला**
**काय काय बोळवण केली ग सई**
**फुलली जाई वेल मांडवी गेला ग सई**
**माझ्या भावाना मला माहेरी नेला**
**फडकीची बोळवण केली ग सई ।।**

हौशी भाऊ बहिणीली सारे दागिने घडवितो आणि ती देखील मोठ्या अभिमानाने सांगते-

**भाऊमाझा हावशी- बंधु माझा हावशी[४२]**
**शिंप्याची चोळी शिवितो, नथ मला घडितो ।।**
**भाऊमाझा हावशी, बंधु माझा हावशी**
**शिंप्याची चोळी शिवितो, बाळ्या मला घडितो ।।**
**भाऊमाझा हावशी, बंधु माझा हावशी**
**शिंप्याची चोळी शिवितो, पुतळ्या मला घडितो ।।**
**भाऊमाझा हावशी, बंधु माझा हावशी**



**शिंप्याची चोळी शिवितो, काचळा मला घडितो ।।**
**भाऊमाझा हावशी, बंधु माझा हावशी**
**शिंप्याची चोळी शिवितो, का जोडी मला घडितो ।।**

शिंप्याची चोळी हा सुद्धा तिला दागिना वाटतो कारण कपडे स्वतःच बेतून शिवण्याची पद्धत या भागात होती. ती आता लोप पावली आहे.

या विहिणीचा दागिन्यांचा तोरा पाहण्यासारखा आहे.

**राज हौसेन येही केला का जाई मी मवाला[४३]**
**नथीच्या ऊझणी मी लोळे**
**बाळ्याच्या ऊझणी मी लोळे**
**पुतळ्याच्या ऊझणी मी ल्याले**
**यळाच्या ऊझणी मी ल्याले**
**जोड्याच्या ऊझणी मी ल्याले का जाई मी मवाला**
**नही नच येही मी केला का जाई मी मवाला ।**

मी मवाला- रूक्मिणीसारखा या अर्थाने- रूक्मिणीच्या दागिन्यांशी या बरोबरी करतात.

वनवासात सीतेलासुद्धा आपल्या फडकीने रामाचा घाम पुसावयास भाग पाडले आहे.

**रामाला आला घाम- सीता पुशी फडकीना[४४]**
**रामजीचा रथ कसा पुढची हालना ।।**

अशा रीतीने स्त्रियांच्या गाण्यांमधून स्त्रियांचा साजशिणगार असा धावत असतो. पण पुरुषांच्या पोशाखांचे उल्लेख कोठे गोष्टीतून चुकूनच यावयाचे. डांगानी पुरुषांना आपल्या कपड्यांचा बडेजाव नाही. कपडे, दागिने यांची हौस असूनही ती भागवणे कठीण असल्याने त्यांचे उल्लेखही तो करीत नाही. सारेच कसे मुकाट सोसतो.

तशी शृंगारिक वर्णने असलेली गाणी किंवा कथा तमाशातील गाण्यांशिवाय आढळत नाहीत. प्रत्यक्ष शृंगार म्हणून आजकाल आपण ज्या गोष्टी पाहतो तसा तथाकथित शृंगाराच्या बाबतीत विवाहित स्त्रिया खरे म्हटले तर उदासीनच असतात आणि लग्ने लवकर झाल्याने खेळगड्यांशी केलेला शृंगार हा क्वचित आढळतो, हे सांगणे नकोच. तमाशातील पदांमध्ये मात्र याची कमीअधिक झलक दिसते. प्रत्येक गावाला तमाशा व भजनी मंडळ व भारूड असतेच असा जणू संकेतच.

त्यात तमाशाचे प्राचीनत्व अधिक. त्यामुळे डांगाणी पुरुष आणि त्यात विशेषतः ठाकर जमात ही तमाशा म्हटले की आसुसलेली दिसते आणि त्यांतील प्रत्येक घरात तमाशाचा कलाकार आढळतोच. त्यामुळे त्या लावम्या म्हणजे त्यांच्या शृंगारजीवनाचा एक भागच झालेला आहे. येथे अर्थात स्त्रीपुरुष संबंधातील शृंगाराविषयीच चर्चा करीत असल्याने गोष्टी सांगणे जरूर दिसते. काही आदिवासींमध्ये जशी स्त्री-पुरुषांची एकत्र नृत्ये व गाणी ऐकावयास मिळतात. तशी येथे मिळत नाहीत. आणि अर्थातच त्यामुळे हा भाग त्यामानाने कमीच. वानगीदाखल काही उदाहरणे घेऊन ही चर्चा संपवू या.

**गुजरांतुन आला वाणी कळेना बोली**[४५]
**माणीक चौकात दुकान मांडी**
**नार गेली दुकानावरी बसना खाली**
**नाकी सरजेची नथ झुरक मारी**
**दंडी कुसुबी मला वर वर सारी**
**जरीचा रूमाल वारा घाली**
**वाण्याला मुरसड आली पडला खाली व जीऽ जीऽ**

तिचे लावण्य पाहून वाण्याला चक्कर आली.

प्रियाराधनेचा हा प्रकारदेखील मोठा मजेशीर आहे. पहा-

**किती विनवू येनु तुला**[४६]
**चाल मह्या घरला ।।धृ।।**
**मह्या घरी नथवाचे जोड**
**नथ लियाला देतो तुला**
**चाल मह्या घरला ।।१।।**
**मह्या घरी येत्याचे जोड**
**येला लियाला देतो तुला**
**चाल मह्या घरला ।।२।।**
**मह्या घरी बाळ्याचे जोड**
**बाळ्या लियाला देतो तुला**
**चाल मह्या घरला ।।३।।**
**मह्या घरी तोडे वाडे**
**तोडे लियाला देतो तुला**



**चाल मह्या घरला ।।४।।**
**मह्या घरी हिरायु शेलू**
**शेलू लियाला देतो तुला**
**चाल मह्या घरला ।।५।।**

त्यावर तिचे उत्तर मोठे मार्मिक आहे-

**मोठ घराचं मुवान दावता**
**अंगी बंडी धोतार फाटका**
**मी नही येयाची घरला**
**जावा मुकाच आपल्या घरला ।।६।।**

ही लावणीदेखील अशीच मजेदार आहे.

**नई नैती आली ग तुझी**[४७]
**थटून चालली ग थटून चालली**
**कोनाची मैना ग जी ग जी ।।**
**कुठले दैवाशी आले करूया पाई**
**सोडून घर ग जी ग जी ।।**
**आम्ही नासिकचे राहणार**
**व्यापार करणार सेठ सावकार**
**दे वचन हातावर जी ग जी ।।**

अशा सावकारांना काय पण कोणालाच ही डांगाणी नार कधी फसायची नाही.

**काय सांगु यड्या मुलीलाण**
**लाज नाही याला सांगु कुठवर**
**गाढव कर कुढ्यावानी गुर गुर जी ग जी ।।**

अशा रीतीने तो गाढवात जमा नाही झाला तरच नवल!

एकंदर पाहता उपाशीपोटी काम करणाऱ्या या लोकांचा पेहराव अब्रू झाकण्यापुरेसा असतो पण स्त्रियांची दागिन्यांची हौस या ना त्या प्रकारे पुरवायला मागे न पाहण्याइतका तो रसिक जरूर आहे. परंतु स्त्रीदेखील असेल त्या परिस्थितीत समाधानी राहणारी आहे हे ध्यानात घ्यावे लागते. तशीच ती स्वाभिमानी आहे.

**विवाह आणि कुटुंबसंस्था व अन्य विधी –**

डांगाणमध्ये 'विवाह' ही गोष्ट जीवनातील सर्वात आनंदाची व उत्साहाची आहे व असे. कुटुंबसंस्थेतील या गोष्टींचे महत्त्व असामान्य आहे. सामूहिक जीवनाचेदेखील ते एक महत्त्वाचे अंग आहे. या गोष्टीवरच या भागातील कुटुंबसंस्था उभी आहे. लहान मुलांना समाजामध्ये फारे स्थान नसते, परंतु त्यांचे लग्न झाले रे झाले की त्याला लगेच विशिष्ट दर्जा प्राप्त होतो. डांगाणात लग्नाला असलेले हे सामाजिक महत्त्व सर्वच जमातीत आहे, ही विशेषकरून ध्यानात घेण्याजोगी गोष्ट आहे. या भागातील लग्नसमारंभ हिंदूप्रमाणेच आहेत. याचा अर्थ या जमातीचे हिंदूसंस्कृतीप्रमाणे कार्य होते. ही पद्धत अर्थातच आर्यांशी आलेल्या संबंधातून त्यांच्यात गेली असावी. मराठमोळ्या पद्धतीतील पद्धती या जमातींमध्ये आढळतात. ठाकर, तलवारकानडे हे लोक ब्राह्मणाला लग्नाला बोलावतात. महादेव कोळी लोकदेखील ब्राह्मणाला बोलावित असत. परंतु त्यांच्यातील ही पद्धत बंद झाली आणि त्यांच्याच समाजातील रावळ गोसावी हे त्यांचे पुरोहित झाले. त्यांचा हा संस्कार मोठ्या प्रमाणावर ठाकर आणि कानडे यांच्यावरदेखील झाला. या भागात आता ब्राह्मणाचा सल्ला क्वचितप्रसंगीच घेतला जातो. ही चाल बंद होण्यास सत्यशोधक समाजाची चळवळ कारणीभूत झाली, असे प्रतिपादन या भागातील महादेव कोळ्यांमध्ये सत्यशोधक समाजाची झालेली चळवळ व त्यात मांडलेल्या ठरावाचा हवाला देऊन डॉ. गोविंद गारे यांनी केले आहे.[४८]

**विवाह पद्धत –** विवाहाची सुरुवात मुलगी पाहाणे किंवा सोयरिक पाहाणे या कार्यक्रमापासून होते. मुलाकडून मुलीला मागणी घातली जाते. मुलीचे पारडे जड असते. मुलगी दोन घरची सीमा असल्याने तिला निदान लग्न ठरविताना तरी अधिक किंमत आहे, हे एकापरीने चांगले असले तरी मुलगी आणि मुलगा यांच्या पसंतीपेक्षा त्यांच्या आईवडील आणि भाऊबंद यांच्या मान्यतेला अधिक प्राधान्य आहे. ही गोष्ट बालविवाहपद्धती असल्याने जरी समर्थनीय असली तरी तितकीशी योग्य वाटत नाही. मुलीला 'मागणी' येते याचा आईला फारच अभिमान वाटतो आणि ती मोठ्या तोऱ्यात सांगू लागते–

**माझ्या बाईला मांगना आम्हा कोनावाची देई[४९]**
**तिच्या आजोळा जावून पूस मामाची धेही ।।**
**बाईला मांगना आल दडत लपत**
**गवळण माझी उभी चंदन सोफ्यात ।।**



**आईला मांगना मुंगी पैठणीचा राजा**
**अन् शिंगी स्वार झाला माझ्या बाई तुझा आजा ।।**
**आईला मांगना गल्यागल्यानी झालं थवं**
**गवळण माझी ढगामंदी इज लव ।।**
**माझ्या बाईला मांगना जव्हारीचा राजा**
**बाप म्हन लेकी अवल सोना माझा ।।**
**बाईला मांगना आलं राजुरावरूनी**
**गवळण माझी लेक मोठीशी म्हणूनी ।।**
**आईला मांगना सैन बसली उन्हात**
**बंधवाच्या माझ्या अजून येईना ध्यानात ।।... इत्यादी**

'मांगना' आला की बैठका सुरू होतात. त्यात देण्याघेण्याची बोलणी सुरू होतात. त्यानंतर 'पेन' किंवा साखरपुड्याचा दिवस नक्की ठरवून हा कार्यक्रम होतो. त्यातील पैशाच्या व धान्याच्या देवाणघेवाणीला 'देज किंवा दहेज' म्हणतात. साखरपुड्याला 'कुंकू मागणे' असेही म्हटले जाते. कुंकू लावतेवेळी गावचा पाटील, कारभारी मंडळी, आलुते, बलुते व भाऊबंद यांना बोलाविले पाहिजे असा सर्वसामान्य दंडक असतो. गाव पंचाच्या समोर लग्नाचे ठराव करावे लागतात. अलीकडे केवळ मुलीचा व मुलाचा बाप किंवा मामा ठरावांचे निवेदन करतात. जमातीत असे पुरेसे स्वातंत्र्य लाभलेले दिसते. या कुंकवाच्या किंवा साखरपुड्याच्या प्रसंगी बायका गाणी म्हणतात आणि त्यातून त्यांच्या भावना व्यक्त होतात. त्यात ज्या गावचे 'मांगना' असेल त्या गावचा आस्थापूर्वक उल्लेख केला जातो. केलेल्या बोल्या गाण्यात मुद्दाम नमूद केल्या जातात. ही गाणी मोठी मनोरंजक व सूचक असतात. त्यातील वानगीदाखल खाली काही दिली आहेत.

**मोठ माझ घर दळण लागन पायली[५०]**
**बंधुराया लेक देव ती पहेली ।।**
**भाऊ केला येही म्या केला उमतीचा**
**बंधुराया माझे कौळे कॉम शेवंतीचा ।।**
**भाऊ केला येही केला म्या चालीचा**
**बंधुराया माझा हिरवा डोंगर पालीचा ।।**

अशा रीतीने व्याह्याला बंधुराया समजून चढवून दिले जाते. पण माणे काही कमी होत नाही. ओव्या होतच असतात.

**मैनाला मांगना शेळूच्या मुलकाचं**[५१]
**चुलत्यानी बोली केली वाळतोडकुलपाचं ।।**
**मैनाला मांगना घाटाखालली साकळी ।।**
**मैनाला मांगना गावू चाटुरी चांडुरी**
**चुलत्याने बोली केली चहरी बस्ता पितांबरी ।।**

गाण्यातील खुबी वाखाणण्यासारखी आहे.

**राजा हौसानं केला मेही**[५२]
**मी त मांगत नही काही**
**मी त मांगते थोडा थोडा**
**नवरदेवाला कंठी कडा**
**कंठी कड्या सोना फिका**
**माझ्या कंगणा जोगरुपा**
**कंठी कड्याचा झाला भार**
**मी त मांगते चंद्रहार**

असे करीत करीत मागणीचे शेपूट लांबतच जाते. त्यात मग 'गाई, म्हशी, हत्ती, घोडं' याही मागण्या मागितल्या जातात. निदान गाण्यातून का होईना लग्नाच्या निमित्ताने आपल्या सगळ्या हौशीमौजी पुरवून घेतल्या जातात. प्रत्यक्ष 'देज' मात्र सव्वादोन मण धान्य आणि १०१ रु. एवढाच मिळतो. आईला लुगडं, बापाला पैसा, भावाला अंगठी आणि बहिणीला चोळी या गोष्टी ठरतात आणि मग साखरपुडा होतो.

**साकाराच पुड गंगापलिड जव्हारी**[५३]
**साकाराच पुड तिच्या मामाच्या देव्हारी**
**हौस मला मोठी (गावाचे नाव) मेह्याची**
**केला मनाचा विचार लेकनंदाला देयाची ।।**
**मैनाला मांगना दोह्यादारी झाली दाटी**
**कंबरी कोऱ्हा शेली चुलता इचा पानं वाटी ।।**
**लहान नवरी गाहीवरी उभी आहे**
**गवळण माझी वाट मामावाची पाहे ।।**

अशा रीतीने साग्रसंगीत साखरपुडा होतो.



लग्नाच्या तिथीच्या आदल्या दिवशी हळदीची तिथी असते. त्या दिवशी 'हळदीचा कार्यक्रम' होतो. नवरा-नवरीच्या सर्व अंगाला हळद चोळली जाते. हळदीच्या कार्यक्रमाला येणाऱ्या सर्वांना तांदळाच्या मोदकांची मेजवानी मिळते. त्याला उंडे म्हणण्याची पद्धत आहे. परंतु ही चाल अलीकडे बरीच मोडलेली दिसते. हळदीचा कार्यक्रम अर्थातच ज्याच्या त्याच्या घरीच केला जातो. हळदीच्या कार्यक्रमाला हळद दळण्यापासून सुरुवात होते. पाच सवाष्णी बायका एकत्र जमतात आणि मग जात्याला हळकुंड बांधून हळद दळणाचा कार्यक्रम सुरू होतो. आणि ओव्यांची चढाओढ सुरू होते.

**पाची दळवी हळद हळद जात्यात माह्ये ना**[५४]
**लगीन मैनाच निंगाल मह्या भावाचा मांगना ।।**
**भाऊ केला येही बाप म्हण नको बाई**
**आताच्या भावजया मान राखायाच्या नही ।।**
**भाऊ वो आपला भाऊजयी परायाची**
**बंधुराया माझा इहिण करायाची ।।**
**मोठ माझं घर दळण लागत मणाचं**
**बंधुराया माझा नको आयकू जनाचं ।।**
**भाऊ केला येही म्या केला उमतीचा**
**बंधुराया माझा कौळा कोंम शेवंतीचा ।।**
**भाऊ केले येही केला म्या चालीचा**
**बंधुराया माझा हिरवा डोंगर पालीचा ।।**

हळद दळली जाते आणि मग मोठ्या लगबगीने शकुनाचे पाच हळदीचे हात नव्या नवरीवरून फिरू लागतात. प्रश्न विचारले जातात-

**हळद लाविती कोन, कोन**[५५]
**नवऱ्या बाळाची बहीन ।।**
**हळद लाविली कोमा कोमा**
**नवऱ्या बाळच्या चुलतीना ।।**
**हळद लाविली कोनी कोनी**
**नवऱ्या बाळाच्या आत्येनी**
**हळद लाविली कोनी कोनी**
**गावच्या पाटील बाईनी ।।**

**हळद लाविली कोना कोना**
**नवऱ्या बाळाच्या आईना ।।**
**हाळद यव्हड्या आंगी फुलं**
**कस सोन्या जो ग खुलं ।।**

अशा रीतीने नवरा मुलगा किंवा नवरी आई कशी सोन्यासारखी खुलते आणि मग हाळदीचा तोडा घेऊन वऱ्हाडाला मुरळी किंवा मूळ जातो. नवऱ्या मुलीच्या घरातील बायका म्हणू लागतात –

**निळ्या मांडवाच्या दारी**[५६]
**झाड काशीयाच लव**
**निळ्या मांडवाच्या दारी झाड हाळदीचं लव ।।**
**हाळदीचा पहिला तोडा**
**वरमाईला मूळ धाडा ।।**
**आमची वरमाय सरस**
**भिंती लाईलं अरसं ।।**

हळदीचा कार्यक्रम झाला की मग दुसरे दिवशी 'मांडव डहाळाचा' कार्यक्रम होतो. आणि संध्याकाळी नवऱ्याला घेऊन नवऱ्या मुलाकडील मंडळी लग्नासाठी नवरीच्या गावी जातात. वऱ्हाड बहुधा बैलगाडीतून दुसऱ्या गावी म्हणजे मुलीच्या गावी जाते. काही वेळा या भागात हा गाडीरस्ताही असत नाही. त्यावेळी आळीपाळीने नवरदेवाला खांद्यावर उचलून घेतले जाते. त्यात मामाने उचलून घेणे फार महत्त्वाचे असते. नवरा मुलगा नवरीचे गावी पोहचल्यानंतर प्रथम मारुतीच्या देवळात त्याला बसविले जाते आणि मग सोयीच्या ठिकाणी नेतात. खरी प्रथम गाव–होळीच्या ठिकाणी बसविण्याची पद्धत आहे. परंतु ही गावहोळी बहुधा मारुतीच्या मंदिराच्या अंगणातच असते. त्यामुळे मारुती मंदिराचा संकेत आता रुढ झाला आहे. नवऱ्याकडचे वऱ्हाड बसल्यावर मुलीकडील लोक गंधवाटी घेऊन येतात आणि सर्वांना टिळा लावतात. याच वेळी दोन्हीकडील बायका गायला सुरुवात करतात. त्यात एकमेकांना टोमणे मारम्याची पद्धत असते. परंतु यातून रुसवाफुगवा मात्र होत नाही. हा कार्यक्रम अत्यंत खेळीमेळीने पार पडतो. अलीकडे गाण्याची पद्धत हळूहळू बंद होऊ पाहात आहे. ही दुदैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. या लग्नाच्या अगोदर होणाऱ्या गाण्यांना 'धवलेरी' म्हणतात. हे पाहाता महदंबेच्या धवळ्यांची आठवण होते व महदंबेने रचलेले धवळे हे तिचे स्वतःचे आहेत की परंपरेने चालत आलेली ती लोकगीते आहेत अशी शंका निर्माण होते.



ही गाणी मोठी मजेशीर आणि उपरोधिक असतात. नवऱ्याकडील बायका गाणी म्हणतात ती उपरोधाची कमाल करणारी असतात. कारण 'दहेज' किंवा 'देज' नवऱ्यामुलाकडच्या लोकांना द्यावा लागतो.

**राजा हौसान केला येही**[५७]
**मी त मांगत नहा काही ।।**
**मी त मांगते थोडा थोडा**
**नवरदेवाला कंठी कडा ।।**
**कंठी कड्या सोना फिका**
**माझ्या कंदण्याजोगं रुपा ।।**
**कंठी कड्याचा झाला भार**
**मी त मांगते चंद्रहार ।।**
**चंद्रहार चाईला कळ्या**
**इला घडवा बोंडबाळ्या ।।**
**बोंडबाळ्याच दांड रुंद**
**इला हिरायी शेलू दंड ।।**
**हिरामा शेलूची काळी दशी**
**मी त मांगते गायीम्हशी ।।**
**गायम्हशीचा दुध खर**
**मी त मांगते हातीघोडं ।।**
**हाती घोड्यावं नवरी बस**
**साऱ्या नगरी मंदी फिरं ।।**
**येरे येरे माझ्या दादा**
**दादा चलरे मपल्या घरा ।।**
**मपल्या घराची पाह्य रीत**
**जेवण वाढीते दुधभात ।**
**जेवण वाढीते दुध भात**
**याही जेवतो रघुनाथ ।।**

तसेच हे दुसरे गीत पाहा –

**''माझ्या बापानी मला दिले मला दिले ग**[५८]
**मला कळीत नाही केले नाही केले ग''**
**''बाप कशाला लोभी झाला लोभी झाला ग?**

**बाप पैसेली लोभी झाला लोभी झाला ग'' ।।**
**''माझ्या आईना मला दिले मला दिले ग**
**मला कळित नाही केले नाही केले ग'' ।।**
**''आई कशाला लोभी झाली लोभी झाली ग?**
**आई लुगड्याला लोभी झाली लोभी झाली ग'' ।।**
**''माझ्या भावानी मला दिले मला दिले ग**
**मला कळित नाही केले नाही ग'' ।।**
**''भाऊकशाला लोभी झाला लोभी झाला ग?**
**भाऊआंगठीला लोभी झाला लोभी झाला गं'' ।।**
**''माझ्या बहिनीनी मला दिले मला दिले ग**
**मला कळित नाही केले नाही केले ग'' ।।**
**''बहीन कशाला लोभी झाली लोभी झाली ग?**
**बहीन चोळीला लोभी झाली लोभी झाली ग'' ।।**

मुलीकडील स्त्रियादेखील न रागावता त्यांना सावध करीत असतात –

**अहो अहो विहीण बाई**[५९]
**आमचा म्हणना लई नाही ।।**
**आमचा म्हणना हाये थोडा ।**
**आमच्या मुलीला पायी तोडा ।।**
**पायी तोड्याची कडी मोठी ।**
**आमच्या मुलीली चिंचपेटी ।।**
**चिंचपेटीची कडी रुंद ।**
**आमच्या मुलीला बाजी बंद ।।**
**बाजी बंदाचा खडा लाल ।**
**आमच्या मुलीला हिरवी शाल ।।**
**हिरव्या शालीच्या निळ्या झळ्या ।**
**आमच्या मुलीला बोंड बाळ्या ।।**
**बोंडबाळ्याचा खडा मोठा ।**
**आमच्या मुलीला हत्ती मोठा ।।**
**हत्तीवरची अंबराई ।**
**नवरी जाती तीच्या घरी ।।**



ही गाणी चालू असताना काळात अनुसरून व्यवस्थित फरक केले जातात. त्यांचे फार छान उदाहरण पुढे आहे –

**किसन देवाचं लगीन निंगाल**[६०]
**पत्रिका छापील्या दिल्लीत, आन**
**वाटून दिल्या त्या नगरीत**
**बस्ता बांधला दिल्लीत की देवा**
**आणून सोडला येवल्यात की देवा**
**मानिकमोती त्या बस्त्यात की देवा**
**चमकभरावा भांगेत की देवा**
**नवरदेव कलवरी विमानात**
**नवरी कलवरीच्या सीत की देवा**
**वरड आलय लारीत की देवा**
**वरमाय बसली गाडीत की देवा**
**बंगती बसल्या ठाण्यात**
**हात धुवाया गंगेत की देवा**

अशा रीतीने 'धवलरी'ची जुगलबंदी संपत नाही पण मध्येच बोहल्याची आठवण करून देणारी एखादी खवचट म्हातारी असते आणि म्हणते –

**लहान नवरी इची कुंकाची पावूलां**[६१]
**गवळणीच्या माझ्या मामा घालती बहुलां ।।**
**बहुल्याची माती बनवती बेलदार**
**गवळणीचा माझ्या मामा इचा शिलेदार ।।**
**बुहल्याची माती बनवती हातोपाती**
**गवळणीच्या माझ्या नवरीचे मामा किती ।।**
**ये ये बंधुराया तुझी विहीण होईल**
**तुपापोळ्याचा उल्फा तुझ्या गावाला देईल ।।**

असा हा गाण्यांचा कार्यक्रम झाला की बरोबर वेळ संभाळून नवरीचे वडिलांनी तयार केलेल्या लग्नमंडपात नवरा प्रवेश करतो. वधुवरात अंतरपाट धरला जातो. मंगलस्तोत्र म्हणण्याला सुरुवात होते. पाच किंवा सात 'मंगल' म्हणून झाली की मग टाळ्यांचा, थाळ्यांचा बहुगलबलाट होतो व लग्न लागते. स्त्रियांची गाणी वरीलप्रमाणे चालूच असतात. त्यात या ना त्या परीने सर्व नातेवाईकांची वर्णी लागतेच. लग्न लागल्यानंतर 'बोहल्याचा व लज्जाहोमाचा' कार्यक्रम होतो. हे सारे

झाले की पंगती उठतात. पंगतीचे वैशिष्ट्य असे असते की स्वयंपाक अंदाजेच केलेला असतो. कधी अन्न उरते तर कधी कमी पडते. कारण लग्नाला सर्वांनाच बोलावले जाते. किती लोकांनी यायचे आणि किती लोकांनी नाही याला काहीच धरबंध नसतो. असे अन्न संपले की यजमान मांडवाच्या लाकडाला हात लावून उभा राहातो आणि अन्न संपल्याची ही खूण समजून सारे लोक अगदी शांतपणे जेवणाचा आग्रह न धरता तिथून निघून जातात. वस्तुतः इकडच्या आदिवासींमध्ये अंतरपाट, लज्जाहोम वगैरे साऱ्या हिंदूलग्नपद्धती कशा व केव्हापासून आल्या हे सांगणे कठीण आहे. परंतु गाणी हे त्यांचे वैशिष्ट्य सोडता बाकी गोष्टी साऱ्या हिंदूंप्रमाणेच आहेत. अर्थात हिंदू महादेव कोळी किंवा हिंदू ठाकर असेच ते स्वतःच स्वतःला संबोधून घेतात. अर्थात त्यांचे हिंदूकरण झाल्यापासून या पद्धती सुरू झाल्या आहेत एवढे म्हणणे ठीक वाटते.

नंतर पुढच्या दिवशी नवरानवरीला घेऊन निघतो हा प्रसंग अत्यंत भारावून सोडणारा असतो. सर्वांची अंतःकरणे भरून येतात. याही प्रसंगी गाणी चालूच असतात. त्यांची काही उदाहरणे मुद्दाम दिली आहेत –

**गाडी आली ग मांडला मधी**[६२]
**वेणु रडु नको मना मधी ।।**
**सासरा तुझा बापावानी**
**तुला वागविल लेकीवानी ।।**
**सासू तुझी आईवानी**
**तुला वागवील लेकीवानी ।।**
**माया तुझा ग भावावानी**
**तुला वागविल बहिनीवाणी ।।**

आपली मुलगी सासरी जाताना पाहवत नसतानाही पाहावसं वाटतं –

**हत्ती वरची अंबारी**[६३]
**नवरी जाते आपुल्या घरी ।।**
**आई बघते दारातुनी**
**बाप बघतो खिडकीतुनी ।।**
**बहीण बघते दारातुनी**
**बाप बघतो खिडकीतुनी ।।**
**ज्याची व्हती त्यानं नेली**
**आमचा माया व्यर्थ गेली ।।**



हाच अनुभव पदरी घेऊन 'बोळवण' केली जाते. आपले वऱ्हाड घेऊन नवरा आपल्या गावी आल्यावर 'वरात' निघते. यात 'घडेगा' नाच करण्याची प्रथा असते. ती नाचणारे लोकदेखील वेगळेच असतात. हा नाच म्हणजे विशिष्ट प्रकारचे हात करून नाच केला जातो. हल्ली इकडे कोणी फारसा नाच करीत नाहीत. लेझमीचा ताफा मात्र जोरात असतो आणि बोहाड्यातील घोड्याचे सोंगावर बसून येणारा देखील यात भाग घेतो. लेझमीचे वैशिष्ट्य म्हणजे क्षणभरही त्यांचे पाय जमिनीला लागत नाहीत व सतत गिरक्या घेऊन ते खेळत असतात. रात्री 'कांबडावणा' मांडला जातो. हा विशेषतः ठाकरांचा नाचाचा एक प्रकार. त्यावेळी विशिष्ट प्रकारची गाणी म्हटली जातात. ती स्वतंत्रपणे देत असल्याने येथे फक्त एकच गाणे वानगीदाखल दिले आहे –

**रंगाण रंगाण ऽऽ**[६४]
**मातीच रंगाण ऽऽ हे**
**येई रंगणात**
**आजुच पायी दिलं ऽ हे**
**आजुच नाच केलं ऽ हे**
**धुळवुडा उडशीला ऽ हे**
**गंगणाला गेला ऽ हे**
**चंद्रसूर्य झाकोळला ऽऽ हे**

अशा गाण्यांना नाच सुरू होतो आणि रात्र रात्र निघून जाते. गाणी आणि नाच दोन्ही संपत नाही. दुसरे म्हणजे तमाशा उभारला जातो. हा तमाशादेखील रात्रभर चालू असतो. असा वरातीचा दिवस साजरा केल्यानंतर मग चवथे दिवशी 'कांकण बाशिंग' उतरविले जाते. सर्वांना जेवणाचा कार्यक्रम होतो. अलीकडे सत्यनारायण पूजा घालण्याची पद्धत रूढ होत आहे. आणि त्याच दिवशी मुरळीबरोबर नवरी आईवडिलांकडे पुन्हा जाते. लग्नाच्या पुढच्या महिन्यात नवऱ्यामुलाकडील लोक 'पाटी' घेऊन येतात. (स्त्रिया काही खाद्यपदार्थ घेऊन नवरीच्या घरी जातात.) अलीकडे महिनाभर वाट पाहिली जात नाही. आठ-दहा दिवसांनीच पाटी नेली जाते व परत येताना नवरीला बरोबर आणले जाते. अशी रीतीने एकंदर लग्नाचा सोहळा संपतो. लग्नात 'देवकाचा मान' वडिलधाऱ्यांना मिळतो. 'वरमाई पाटीचा' मान नवऱ्या मुलाच्या आणि नवरी मुलीच्या आईला किंवा चुलतीला मिळतो. 'आजीला आजेचीर', 'कानपिळ्याला कानपिळ्याची दक्षिणा', वधांव्याचा मान', 'मामाचे कन्यादान' इत्यादी मानपान हक्काचे समजले जातात.

लग्नात ब्राह्मणाला स्थान होते व देवदेवक बसविण्याची पद्धत व गौरीहाराची पद्धत देखील या समाजात चांगलीच रुजलेली दिसते. परंतु महादेव कोळी गेल्या काही वर्षापासून ब्राह्मणाला लग्न लावण्यास बोलावित नाहीत. तर रावळ गोसाव्यास बोलावतात. ठाकर व कानडे मात्र ब्राह्मणाला बोलाविताना दिसतात, परंतु तेदेखील कमीच.

एकूण लग्नामध्ये जी गाणी आहेत तीच खरे त्यांचे मंत्र, होम वगैरे सारे काही. त्या गाण्यांना मंत्रसमर्थता आहे. अलीकडे मात्र गाण्याचे हे प्रमाण कमी होऊ लागले असूनत्याची जागा लाऊडस्पीकरने घेतली आहे. संस्कृतीचे हे खास वैशिष्ट्य संपुष्टात येते की काय असा प्रश्न आज उत्पन्न होतो. नवीन तरुणी या गाण्यांच्या फंदात पडत नाहीत. म्हाताऱ्याकोताऱ्या मात्र अजून वेळ साजरी करतात. हा सांस्कृतिक वारसा आता अशा प्रकारच्या पुस्तकातून फक्त शिल्लक राहातो की काय अशी दाट शंका येऊन मन खंतावल्याशिवाय राहात नाही.

येथपर्यंत लग्नाविषयी बरीच चर्चा केली गेली. लग्न हाच त्यांचा सर्वात महत्त्वाचा असा सांस्कृतिक संस्कार समजला जातो. अठरा विश्वे दारिद्र्यात खिचपत पडलेले हे लोकअन्य सणांच्या वेळीदेखील सोहळा फार मोठ्या प्रमाणावर करू शकत नाहीत आणि म्हणूनच लग्नाच्या निमित्ताने त्यांचा सारा उत्साह ओसंडून वाहतो. जीवनातील परिवर्तनाच्या या क्षणी सारा गावच मोहून जातो. सारा गाव त्यात भाग घेतो. लगीन साऱ्या गावचेच होते. हे वाखाणण्याजोगे आहे. एवढेच नव्हे तर लग्नाच्या पंक्तीपंक्तीतून 'सभा सांगितल्या' जातात. महत्त्वाच्या विषयासंबंधीचे निर्णय आणि चर्चा जेवताना अन्नास साक्ष ठेवून केली जाते ही गोष्टदेखील लक्षात घेण्याजोगी आहे.

**जन्म मृत्यू –**

जन्म मृत्यू या दोन्ही बाबी जीवनातील सर्वात महत्त्वाच्या आहेत, असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्यापैकी जन्माचा प्रथमतः विचार करू. प्रत्येक मुलाचा जन्म किंवा मुलीचा जन्म म्हणजे गावातील साऱ्या बायकांचा एकउत्सवच असतो. जन्मापूर्वी गरोदर स्त्रीची डोहाळेजेवण ही पद्धती मात्र आढळत नाही. मूल जन्मल्यावर दाराशी 'बारा बळी' शेणाचे उभे केले जातात. हे बळी बाळाचे संरक्षण करतात अशी अंध समजूत आहे. 'पांचवीचा पाटा' पुजण्याचा कार्यक्रम हा मात्र मोठ उत्सव. त्या दिवशी सटवी अक्षर मारते अशी समजूत आहे. तिची पूजा केली जाते. तसेच 'मावलयां'ची (वनदेवता) देखील काही ठिकाणी पूजा करण्याची प्रथा आहे. या पाचव्या दिवशी छोटेसे गावजेवण होते. जेवणानंतर आयाबाया एकत्र बसून गाण्याचा कार्यक्रम करतात. ही गाणी मुलाच्या वा मुलीच्या नाव ठेवण्याच्या कार्यक्रमादिवशीदेखील म्हटली जातात. पाळण्यात घालण्याचा कार्यक्रम पाचव्या, बारात्रया वा नाव ठेवण्याच्या दिवशी करण्यात येतो. नाव ठेवण्याचा कार्यक्रमदेखील फारसा मोठ्या प्रमाणावर साजरा होत नाही. एखादा शुभ दिवस पाहून आयाबायांना बोलावून नाव सांगितले जाते. गावाला साखर वाटली जाते. एकूण जन्मोत्सव म्हणजे पाचवीची पूजा असाच अर्थ आहे. त्यामुळे जन्मोत्सवाचे सारे सोहळे त्याच दिवशी होतात. गाण्यामध्ये पाळणे व कृष्णजन्माच्या ओव्या म्हणण्याची चढाओढ लागलेली असते. लहान मूल हा जणू कृष्णाचा अवतार आहे. लहान मुले देवाशी, सटवाईशी, आणि अन्य देवतांशी बोलतात, असा संकेत या भागातील लोकांमध्ये देखील रूढ आहे. पाचवीला रात्री भजनाचा, कीर्तनाचा किंवा गावचे भारूड व क्वचित प्रसंगी तमाशा घडवून आणून त्यातून पैराणिक आख्यान अगर वग लावण्याची प्रथा या भागात जोरात प्रचलित होत आहे. जन्मोत्सवाच्या दृष्टीने स्त्रियांची गाणी तर पुरुषांचे अंगणातील भजन यांची जणू चढाओढ लागलेली असते. स्त्रियांच्या या लोकवाङ्मयातून त्यांच्या नवजात बालकाविषयीच्या भावना व्यक्त होतात. त्यांची काही वानगीदाखल उदाहरणे पाहू –

**कृष्णजन्मकथा –** [६५]

**देवयबाई बाळवंतीन वल्याईच्या कुशी**
**जन्मला किसन देवू गोकुळ अष्टमीच्या दिशी ।।**
**देवयबाई बाळवंतीन पिवळ्या इच्या टाचा**
**अिच्या माताना पाहील्या न्हनीव जाताना ।।**
**देवयबाई बाळवंतीन रक्ता भरली पायरी**
**नऊलाख सोना अिना देवाला वाहीली ।।**
**देवयबाई बाळवंतीन इला बारावा लोटला**
**अिच्या न्हानीवरी बाई इला पान्हा दाटला ।।**
**देवयबाई बाळवंतीन गोकुळा लावा बत्ती**
**जलमीला किसन देवू मामा भावजयांच्या हाती ।।**
**देवयबाई बाळवंतीन गोकुळी लावा दिवा**
**जलमीला किसन देवू मामा मावशीला दावा।।**
**जलमला किसन देवू दोह्या मांडीव महेना**
**कोणी इसायती पाणी कोणी न्हानी किसनाला ।।**

**जलमी किसन देवू आडवा घेतो याचा बाप**
**सरकारी शाळाची कुलपा उघडी अपाआप ।।**
**जलमीला किसन देवू आडवा घेती येची आई**
**सरकारी शाळाची कुलपा उघडी घाई घाई ।।**
**जलमीला किसन देवू आडवा घेतू येचा भाऊ**
**सरकारी शाळाची कुलपा उघडी किसन देवू ।।**

अशा प्रकारे ओव्या गायिल्या जातात. त्यात वास्तविकपाहता ‘देवयबाईच्या’ बाळंतपणापेक्षा सर्वसामान्य स्त्रीच्या बाळंतपणाचेच वर्णन हे सहज लक्षात येते. बाळंतीण घरात असली की साऱ्यांनाच कामाला जुंपून घ्यावे लागते. जन्मलेल्या मुलाला किसन देवासारखे सजविण्याचे या स्त्रियांचे लक्ष असते. अठराविश्वे दारिद्र्य असले तरी गाण्यातून का होईना त्या ती हौस पुरवून घेतल्याशिवाय राहात नाहीत.

**माझ्या अंगणी बाई अंगणी**[६६]
**खेळं चक्रपाणी**
**आम्ही देवाच्या बाई देवाच्या**
**किसनाच्या गवळणी**
**बाळी घडावा बाई घडावा**
**किसनाच्या कानाची**
**लहू लाखाची बाई लाखाची**
**बत्तीस तोळ्याची**
**माझ्या अंगणी बाई अंगणी**
**खेळं चक्रपाणी**
**कडा घडावा बाई घडावा**
**किसनाच्या हाताचा**
**लवू लाखाचा बाई लाखाचा**
**बत्तीस तोळ्याचा**
**माझ्या अंगणी बाई अंगणी**
**खेळं चक्रपाणी**
**आम्ही देवाच्या बाई देवाच्या**
**किसनाच्या गवळणी**
**पेटी घडावा बाई घडावा**



**किसनाच्या गळ्याची**
**लवू लाखाची बाई लाखाची**
**बत्तीस तोळ्याची**

असे सारे दागिने घातलेले आपले साजरे गोजरे बाळ अंगणात कधी एकदा दूडूदूडू धावेल याची उत्सुकता या गाण्यात कशी ओतप्रोत भरलेली आहे. अशा गाण्यांप्रमाणेच काही पाळणेदेखील म्हटले जातात. त्यातील पुढे दिले आहेत. –

**किसनबाळ पाळण्यात त्याला रेशमाची दोर**[६७]
**या किसनदेवाला झोका देती पोरी सोरी ।।**
**किसनदेवाला मोठा झोका कोण देतो**
**हाती दोरीला धरून झोका याचा मामा देतो ।**
**जु जुं ऽ ऽ जुंई ।।**
**पाळण्यात किसनबाळ कसं साजिर गोजीरं**
**पाळण्याला याच्या बांधिले मोतीहार**
**मोतीहाराचा पाळणा हालवितो याचा बाप**
**झोका कृष्णनाथ जु जुं ऽ ऽ जुई ।।**
**या या रामाचा पाळणा हलवितो दशरथ**
**कशी कौसल्या हासत जु जुं ऽ ऽ जुई ।।**
**रामबाळाचा पाळणा याला रेशमाची दोरी**
**हालविती साऱ्या नारी पाळण्याला जु जुं ऽ ऽ जुई ।।**
**या गं रानात जलमिला मलारी**
**अवल सोन्याची कुडी साजेरी गोजिरी**
**मलारीचा पाळणा त्याला दोरी येलांची**
**पाळण्या टांगिली मोठी फांदी बेलाची जु जुं ऽ ऽ जुई ।।**
**या पाळण्यात सई घातला गणराय**
**पाळण्याला झोका देती पारवती माय**
**पाळण्याची दोरी धरितो महादेव**
**झोपना कसा बाई पाळण्यात गणराय जु जुं ऽ ऽ जुई ।।**

अशा प्रकारची पाळण्यांची चढाओढ ऐकली की मन कसं भरून येतं. याच प्रकारच्या पाळण्यांबरोबर अन्य पाळणे म्हटले जातात ते पाळणे आहेत की गौळणी आहेत यातील फरक स्पष्ट होणे हेदेखील कठीण जाते.

मूल जन्मल्यानंतर बारात्र्या दिवशी केलेले 'बारा बळी' मोडून टाकले जातात. कारण त्यानंतर मुलाला कोणताही धोका नसतो, अशी कल्पना आहे. तसेच मूल दोन-तीन महिन्याचे झाले की 'पाच पावली' होते. कुलदैवतांना, ग्रामदैवतांना नैवेद्य आणि खोबरे वाटले जाते. प्रसंगी बकरे, कोंबडे दिले जाते. तेव्हापासून मूल घराबाहेर नेण्यास हरकत नसते. वर्षसहा महिन्याचे मूल झाले की मुलाची 'पांजी' होते व मग 'जावळ' होतात. मुलाचे जावळ मामाच्या हातानेच कापावे अशी प्रथा आता या भागात देखील दिसू लागली आहे. काही वेळा हे जावळ लग्नाअगोदर देखील करण्यात येते. जावळ करण्याचा प्रकार देवस्थान उदाहरणार्थ, टाहाकारी किंवा घोरपड्याआई या ठिकाणी येऊन देखील करण्याची प्रथा आहे.

जन्माप्रमाणेच मृत्यूचे स्थान जसे नैसर्गिक तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. काही आदिवासींमध्ये मर्तिकांची गाणी म्हणण्याची चाल गेली अनेक वर्षे तरी दिसत नाही. मृतास पुरण्याची चाल आहे. परंतु गेल्या पाचपन्नास वर्षापासून पुरण्यापेक्षा हिंदूंप्रमाणेच दहन करण्याची प्रथा जवळजवळ रूढ झाली आहे. परंतु काही लोक परंपरेला चिकटून असतात. पुराण्याचा चालीने ग्रामदैवतांची व भुताखेतांची संख्या फारच वाढलेली दिसते. शेताशेतातून, बांधाबांधाला, थडग्गयावरचा किंवा समाधीवरचा दगड उभा असलेला दिसतो. त्यावर कधी बिरोबा, खंडोबा, मारुती यांच्या मूर्ती असतात तर कधी मृत माणसाच्या मूर्तीच कोरलेल्या दिसतात. मनुष्य मेल्यानंतर जाळण्यापेक्षा मेलेल्या माणसास अधिक त्रास होऊ न देण्याच्या दृष्टीने पुरणे बरे अशी समजूत होती. माणसाच्या आशा अतृप्त राहिल्यास भूत होते ही कल्पनाच या भागातही रूढ आहे. कानड्याचे भूत फार लोचट असते, अशी समजूत या भागात प्रचलित आहे. तर ठाकूर जमातीतील भूत अत्यंत क्रूर असतात असाही समज असतो. भूतांचे प्रकार निरनिराळे पाहावयास मिळतात. त्यांचा उहापोह नंतर केला जाईल. दहाव्या दिवशी मृत म णसाचा दिवस होतो. त्या कार्यक्रमास सर्व समाज बहुसंख्येने निमंत्रणाशिवाय देखील हजर असतो. अलीकडे निमंत्रणे पाठवून बोलाविणे करण्याची प्रथा पडली आहे. भाऊबंद सुतक पाळतात परंतु सुतकाचे नियम जवळ जवळ नसतातच. केवळ दुखवटा म्हणून केसाचे 'मुंडन' केले जाते. हे मुंडन सर्व भाऊबंदांनी करावे असा संकेत होता. तथापि आता नजिकचे भाऊबंदच फक्त करतात. दिवसाच्या कार्यक्रमाला सोयरेधायरे 'दुखवटा' आणतात. दुखवट्याचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे आहे. १) ओला दुखवटा- पागोटे देणे. हा दुखवटा सोयरेधायरे आणतात. आणि



२) सुका दुखवटा- रोख रक्कम देणे. हा जातबांधवांकडून आणला जातो.

दिवसाचे निमित्ताने सारा समाज एकत्र जमतो. त्यामुळे यावेळी देखील त्यांच्या त्यांच्या समाजांतर्गत वा गावगाड्याच्या संदर्भात न्यायनिवाडे होतात. समाजशासन दंड ठराव नक्की केले जातात. या सर्व गोष्टीत गोतराने, प्रमुख मंडळी, विशेषतः शिक्षक व गावपुढारी भाग घेतात. जर एखाद्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा करायची असेल तर गावोगावची मंडळी मुद्दाम निमंत्रणपूर्वक बोलाविली जाते. अर्थात ही पद्धतीदेखील आता हळूहळू कमी होऊ लागली आहे. कारण 'दिवसा'च्या खर्चाचा बोजा सहन करण्याची क्षमता कमी होत चालली आहे आणि सरकारी नियंत्रणे योजना व कायदे यामुळे तशी फारशी गरज देखील वाटत नाही. विशेषतः ही पद्धत ठाकर जमातीत आजदेखील पाहावयास मिळते. कारण त्यांचा समाज या भागात फार थोडा आहे. मात्र हटकरकानड्यांच्या बाबतीत ही गोष्ट जवळजवळ पाहावयास मिळतच नाही. एकूण मृत्यूचे संदर्भात देखील अलीकडे केवळ विधी शिल्लक राहिला असून त्याचे सामाजिक महत्त्व कमी कमी होत आहे असे दिसून येते.

मृत्यूसमयी मोठ्यामोठ्याने रडताना मृताचे संबंध आयुष्यभरातील प्रसंग, त्याचे गुणदोष उजळण्याचा प्रयत्न या भागातही पाहावयास मिळतो. निरनिराळ्या नात्यांच्या स्त्रिया अशा प्रकारे आक्रोश करून आपले मृतावरील प्रेम व्यक्त करतात. तसेच त्याच्या बाबतीत आपले घडलेले अपराध देखील प्रांजलपणे कबूल करण्याची प्रथा आढळते. मृत्यूनंतर वर्षभर घरातील व जवळच्या नात्यातील मंडळी दुखवटा म्हणून गोडधोड वा सणोत्सव साजरे करीत नाहीत. पक्ष किंवा पितर घालण्याची प्रथा या भागात फार मोठ्या प्रमाणावर आहे. 'पितर खायला' सर्व नातेवाईकांना व गावातील संबंधितांना बोलाविले जाते. तांदळाची खीर हे यावेळचे महत्त्वाचे पक्वान्न असते.

अशा प्रकारे मर्तिकाचे सर्व सोहळे पूर्ण होतात.

**कुटुंबसंस्था –**

सामान्यपणे कुटुंबात स्त्री-पुरुष व त्यांची मुले असतात. परंतु एकत्र कुटुंब पद्धती बरेच दिवस या भागात अस्तित्वात होती. अशा वेळी एकेका घरात भरपूर म्हणजे चाळीस-चाळीस माणसं असत.

**मोठ माझं घर दळण लागतं पायली**[६८]
**मोठं माझं घर दळण लागतं मनाचं**

अशी परिस्थिती होती. परंतु सासुरवास या प्रकारामुळे आणि संख्येमुळे ही

कुटुंबसंस्था आज एका गावाच्या किंवा वाडीच्या किंवा झापांच्या स्वरूपात दिसू लागली आहे. 'सासुरवाशीण' या शब्दाचा विशिष्ट अर्थ स्पष्ट करताना डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''सासुरवाशीण म्हणजे सासरच्या सर्व माणसांचा छळ सहन करणारी सून. या छळात नवऱ्यापासून सासू-सासऱ्यांपर्यंत सारेजण सामील असतात. स्त्रियांना मारहाण करणे, जेवण न देणे हे प्रकार कुटुंबात सर्रास चालतात.''[६१] आज विभक्त कुटुंबपद्धती असली तरीसुद्धा वडिलधाऱ्या माणसांच्या शब्दांना बरीच किंमत आहे. कुटुंबात विधूर किंवा विधवा यांना सांभाळून घेण्याची प्रवृत्ती आढळते. पण विधूर किंवा विधवा फार काळ समाजात राहात नाहीत. कारण सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने ते योग्य नसते. गावातच सारे राहात असल्याने विभक्त असले तरी शेतीच्या कामात एकमेकांना मदत करणे, बाळंतपणात, आजारपणात एकमेकास मदत करणे या गोष्टी मात्र आवर्जून चालू असतात. संतती नसेल तर किंवा कामाला माणूसबळ कमी पडत असेल तर पुरुषाला अनेक स्त्रिया करण्याचा पूर्ण अधिकार आहे. साधारणतः दोन बायका केलेल्या आढळतात. तीन बायका देखील क्वचित ठिकाणी आढळतात. स्त्रीमात्र एकापेक्षा अधिक नवरे करू शकत नाही. परंतु आपल्या मनाजोगा नवरा नसेल तर प्रेम करून दुसऱ्याच्या घरात राजरोसपणे राहणाऱ्या स्त्रिया आढळतात. त्यांना 'घरघुशी' असे संबोधले जाते. तिला होणाऱ्या संततीला सामाजिकप्रतिष्ठा सर्व प्रकारची मिळते. आईवर सामाजिक प्रतिष्ठा अवलंबून नाही असे दिसून येते. लग्न झाले की मुलांना समाजात मताधिकार व स्वतंत्र वागण्याचा अधिकार मिळतो. लग्न ही या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. महादेव कोळी स्त्रियांइतक्या ठाकूर स्त्रिया काटेकोरपणे पातिव्रत्यधर्माचे पालन करताना दिसत नाहीत. तलवार कानड्यांमध्ये मात्र पातिव्रत्याकडे लक्ष दिले जात असले तरी लग्नपूर्व लफडी बरीच आढळतात. कामाच्या दृष्टीने मुलांना घरात फार महत्वाचे स्थान आहे. सर्वच जमातीतील मुले आठ वर्षाची झाली की कामाला लागतात. गुरे वळणे, आईवडील यांना शेतीकामात मदत करणे या गोष्टी मुले सांभाळतात.

कुटुंबसंस्थेत पाहुणचाराला फार स्थान आहे. 'आमुच्या गावामंदिर पावणा येयाचा पायी रं । पर उपाशी जायाचा नाई रं-' असे ठाकूर लोक आवर्जून सांगतात ही वस्तुस्थिती सर्व जमातीची आहे. मनोभावे व आग्रहपूर्वक पावण्याला आंघुळीचा आणि जेवणाचा आग्रह केला जातो. त्याला डाळभात, पुरणपोळ्या, धिरडे-गुळवणी, उंडे, कानवले किंवा मांसाहारी जेवण दिले जाते. पाहुण्याला महादेव समजण्याची चाल आहे.



**चाळीसगाव डांगाणातील शिक्षण परंपरा –**

आपल्या देशातील शिक्षणपरंपरा जरी फार प्राचीन असली तरी निरनिराळ्या बंधनांनी ते शिक्षण ग्रामाग्रामामधूनही सार्वत्रिक होऊ शकले नाही तर आदिवासी गिरीजन यांचेपर्यंत ते कसे जाईल? चाळीसगाव डांगाण हा तर बोलूनचालून डांगाणभाग. जंगली. त्यामुळे या भागात इंग्रजपूर्व काळापर्यंत शिक्षणपरंपरा शून्यच दिसते. निसर्गाचे मोठे पुस्तक अनुभवातून शिकणे हेच यांचे शिक्षण. ही परंपरा म ात्र येथे चांगलीच टिकून आहे. राजाच्या पदरी प्रधान असतो आणि पंडित असतो. राजापेक्षा हेच शिकलेले अन् शहाणे असतात. राजा मनचा राजाच असतो. त्याचे चातुर्य अनुभवातील. रामायण, महाभारतातील गुरू शिष्यपरंपरेमुळे शिक्षणपरंपरा या लोकांना ठाऊक झाली. 'तातोबाचा मठ' म्हणजे वाल्मिकीचा मठ आणि वाल्मिकीची साधना जरी त्यांची उज्ज्वल परंपरा सिद्ध करीत असली तरी इंग्रजपूर्वकालापर्यंत सारेच अंगठेबहादूर होते. वडीलधाऱ्या माणसांकडून आणि प्रत्यक्ष अनुभवातून मिळवलेले ज्ञान यांना पुरेसे वाटे. अनेक गोष्टी केवळ तोंडी पाठांतरानेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित झाल्या. रात्र झाली की चावडीजवळ धुनी पेटायची आणि तीच त्यांची अनादिकाळापासून चालत आलेली शाळा, असे म्हणता येईल. शेकता शेकता गप्पा सुरू होत आणि गप्पागोष्टीतून लोकवाङ्मयाचा जिवंत झरा मनसोक्त उर्जस्वल होत असे. मुले कान टवकारत ऐकत. बापे पुस्ती किंवा दुरुस्ती जोडत. कधी अद्‌भुतात, कधी रानच्या मोकळ्या वातावरणात तर कधी पंडिताच्या चातुर्यात, कधी राजांच्या लहरीपणात तर कधी नायकांच्या धाडसांच्या रोमांचकारी प्रसंगात सारेच रंगून जात. महाभारताची प्रतिमा तेथे अनुभवाचे भांडार खुले करी. आणि मग ज्ञानाला काय तोटा? पण ज्ञानाबरोबर यातून अंधश्रद्धा, भयगोष्टी, रूढीसंकेत जोपासले जात असत. त्यामुळे प्रगत जीवनाची दारे बंद होवून जात. अजूनही कळसूबाईच्या शिखरावरून, पट्ट्याच्या टोकावरून, रतनगडच्या डोंगराला असलेल्या नाकातून गायखेपोरे जेव्हा दूरवर नासिक, ठाणे भागात दिसणाऱ्या यंत्रयुगाकडे आत्यंतिक कुतूहलाने पाहतात तेव्हा त्यांच्या अप्रगततेची स्पष्ट जाणीव होते. या भागातील कोणी पूर्वी कोठे निदान नासिकला शिक्षणासाठी गेल्याचा उल्लेख आढळत नाही. ठाकर समाजातील काही विशिष्ट लोकांना अक्षर ओळख असे व ते त्याचा 'आड' वाचण्यासाठी उपयोग करीत असत. परंतु हे अगदी क्वचित कारण सारे काही तोंडी

**(१) इंग्रजी राजवट –** या राजवटीमध्ये मात्र नंतरच्या काळात का होईना सगळीकडे निदान व्हालेंटरी स्कूल सुरू झाल्या. पण त्या या भागात मात्र विसाव्या शतकाची विशी ओलांडल्यानंतर देखील फारच थोड्या प्रमाणात पोहोचल्या. आणि या शाळा देखील पूर्ण कुचकामी ठरल्या. हा प्रकार इंग्रजी अंमल संपेपर्यंत तसाच चालू होता. त्यातील अगदी एकटीदुकटी व्यक्ती तालुक्याच्या ठिकाणी येऊन शिक्षण घेतलेली आढळते. इंग्रजी राजवट संपुष्टात येत असताना स्वातंत्र्य चळवळीच्या ऐन उमेदीत लोकशिक्षणाची मोहीम सुरू झाली. तीत देशभक्तीने व लोक सज्ञान करण्याच्या भावनेने भारावून गेलेल्या लोकांनी १९३८ ते १९४५ या सात वर्षात या भागापासून जवळच्या भागात 'डांग सेवा मंडळ', 'आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ', 'आदिवासी सेवा समिती, नासिक' असे जे प्रयत्न दादासाहेब बीडकर, डॉ. ए. के. मोरे, भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली झाले, त्यांचे थोडेबहुत परिणाम या भागापर्यंत पोहोचले.[७०] त्यापूर्वी राजूर येथे 'सह्याद्री सेवा मंडळा'तर्फे मुलांसाठी बोर्डिंग १९२१ साली सुरू केले. त्याद्वारे काही मुलांना मोफत जेवण दिले जात असे. जवळजवळ ३० वर्षे हे बोर्डिंग सुरू होते. दुसरी १९४५ च्या आसपास सुरू झालेली संस्था म्हणजे 'आदिवासी सेवा मंडळ, राजूर' ही होय. अशा संस्थांच्या शैक्षणिक, कार्याची धुरा उचलण्यात आली असली तरी ती अतिशय मर्यादित होती हे सांगावयास नकोच.

**(२) इंग्रजी राजवटीनंतरचा काळ –** इंग्रजी राजवटीनंतर १९५३ साली सर्वोदय मंडळाने सह्याद्री सेवा मंडळातर्फे चालविले जाणारे बोर्डिंग चालवावयास घेतले.[७१] श्री. सी. गं. उर्फ बापूसाहेब शेंडे यांच्यावर मुंबई सरकारतर्फे सर्वोदय योजना, राजूर याची धुरा सोपविण्यात आली. मुळा आणि प्रवरा खोऱ्यातील साठ गावे दत्तक घेऊन या योजनेमार्फत शैक्षणिक व सामाजिक कार्य सुरू झाले.[७२] सर्वो दय योजनेमार्फत व नंतर सत्यनिकेतन मार्फत शिक्षणाचे जे प्रयत्न झाले ते खरोखरीच महनीय म्हणावे लागतील. त्यामुळे गावागावातून अनेक मुले साक्षर झाली. कितीतरी मुले सातवी, नववी, अकरावी इयत्तांपर्यंत वर चढली. अनेक मुले आज त्याच भागातून शिक्षकाची नोकरी जिल्हा परिषदेत करीत आहेत. १९५० साली तालुक्यात 'हिंद सेवा मंडळ, नगर'ने सुरू केलेल्या 'मॉडर्न हायस्कूल, अकोले' हे या भागातील एकमेव हायस्कूल सुरू केले. आणि सुशिक्षित करण्यात बरेच यश या प्रयत्नांती मिळविले. असे असले तरी शैक्षणिक प्रगती म्हणावी तशी झाली नाही. उलट काही भागातून तर पालकांची शिक्षणविषयक उलटीच प्रतिक्रिया व्यक्त झाली. आणि हे होणे अपरिहार्य होते असेच म्हणावे लागते. त्याची कारणे



पुढीलप्रमाणे होती.

**(३) शिक्षणातील मुख्य अडचणी –**

१) मनसोक्त गुरांमागे हिंडून रानच्या हवेत फिरणाऱ्या मुलाला शाळांमध्ये कोंडून अभ्यास करणे मानसिकदृष्ट्या परवडत नसे.

२) शाळा दूर असल्याने पायी परगावी जाण्याची तयारी नसे

३) बोर्डिंगवर राहून या मुलांना सोयीस्कर वाटत नसे.

४) पालकांची आर्थिक बोजा सहन करण्याची ताकद व तयारी नसे.

५) मुलांचे घरकाम, शेतीकाम व गुरे सांभाळणे या कामी मोठ्या प्रमाणावर साहाय्य होत असे आणि त्यामुळे पालक मुलांना शाळेत पाठविण्याच्या विरुद्ध असत. त्यांना पिढ्यान्‌पिढ्या न शिकता त्यांच्या समाजातील लोक सुखरूप मार्ग क्रमताना दिसत. (त्यांच्या दृष्टीने) त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व वाटत नसे.

६) पुस्तके आणि भाषा ही मध्यवर्ती मराठीतील असत. त्याचा अर्थ आणि उच्चार दोन्ही बाबी त्यांना अशक्य असत. त्यामुळे शिक्षणात रस निर्माण होणे शक्य नव्हते.

७) घरगुती अडचणींमुळे मुले मुळातच मोठी असत आणि दोनतीन इयत्ता झाल्या की ते शिक्षणापासून दूर जात.

८) बालविवाह पद्धतीचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होत असे.

९) शेतीकामामुळे अनुपस्थित राहण्याचे प्रमाण वाढून त्यांचे शिक्षण पूर्ण होण्याची संधी त्यांना मिळत नसे.

१०) आत्यंतिक दारिद्र्यामुळे भुकेलेल्या पोटी शिक्षण घेणे शक्य नव्हते.

वरील कारण लक्षात घेता परंपरा तर शिक्षणाची नव्हतीच पण त्याचबरोबर केलेले प्रयत्न अशा अडचणींमुळे फुकट जात होते. तरीसुद्धा शिक्षणाचे प्रयत्न जोरात चालू ठेवले गेले. सरकारचे लक्ष या गोष्टींकडे वेधले गेले. मोफत शिक्षणाची सोय झाली. आदिवासींना अनेक सवलती जाहीर करून देण्यात आल्या. गावोगाव शाळा, आश्रमशाळा, पूर्ण सहकारी सहाय्याने उघडल्या गेल्या. त्यामुळे शिक्षणाची प्रगती दिवसेंदिवस दिसत आहे.

**(४) शेतीविषयक शिक्षण –** शेतकऱ्यांना शेतीविषयक शिक्षण देण्यासाठी तादृश्य गरज भासत नाही. वडिलांच्या हाताखाली काम करीत करीतच ते आपोआप शिक्षण घेतात ही गोष्ट खरी असली, तरी जपानी भातशेतीसारखे उद्योग या भागात सर्वोदय योजनेमार्फत शिकविले गेले. खत तयार करणे, कलमे तयार करणे इत्यादी मार्गदर्शन शेतीविषयक झाल्याने बराच फायदा या भागातील

शेतकऱ्याला झाला. ही गोष्ट त्या दृष्टीने लक्षणीय आहे.

**आरोग्य व वैद्यकीय उपलब्धी –**

गिरीकंदरात राहणाऱ्या या लोकांना वर्षानुवर्षे सतत ओला व सुका दुष्काळ यांना तोंड द्यावे लागले आहे. डोंगरउतरणीची नापीक जमीन त्यांच्या वाट्याला आल्यामुळे वाहाळातील जमिनी सोडल्या तर सर्व जमिनीत वर्षातून एकदाच पीक निघते. त्यामुळे जवळजवळ चार ते पाच महिने उपासमारीची पाळी येते. रानची कंदमुळे, झाडपाला खाऊनच दिवस काढावे लागतात. दारिद्र्यामुळे पुरेसे अन्न त्यांना मिळत नसे. दोनशे तीनशे इंच पाऊस पावसाळ्यात पडत असला तरी उन्हाळ्यात अक्षरशः डबक्यातील पाणी प्यावे लागे. पावसाळ्यात छोट्या छोट्या ओढ्यानाल्यांना पूर येतात. त्यामुळे गावची बेटासारखी स्थिती होऊन जात असे. सदैव चिखलात उभे राहूनच काम करावे लागते व लागत असे. या सर्व अवस्थेमुळे खायचे, प्यायचे, ल्यायचेच हाल. तसेच आसरा घरांचा, तोही गळका. यामुळे त्यांचे आरोग्य न बिघडेल तरच नवल. त्यात सर्पदंश, अपघात आणि भुतेखेते यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असे. थंडीताप, कॉलरा व देवी यांसारखे साथीचे रोग प्रचंड प्रमाणात उद्भवत असत. तसेच अर्धे घर गुरांचे त्यांच्या संसर्गापासून देखील या लोकांचे आरोग्य बिघडते. एकूण पुढील गोष्टी या आरोग्य बिघडण्यास कारणीभूत आहेत–

१) समतोल व पुरेसा आहार नाही.

२) शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा याची सोय नाही

३) स्वच्छता अजिबात पाळली जात नाही.

४) आरोग्यविषयक व औषधोपचारासंबंधीच्या सोयी आणि साधने नाहीत.

५) रोगराईचा मुकाबला केला जात नाही.

६) अज्ञान व रोगराईविषयी विचित्र व अंध समजुती

वैद्यकीय उपलब्धीचा विचार करता असे दिसून येते की, वर्षानुवर्षे या भागात वैद्यकीय सोय शहरी वस्तीसारखी तर नव्हतीच परंतु प्राथमिक स्वरूपात देखील नव्हती. याबाबतीत ठाकूर (ठाकर) समाजाने ही बाजू आतापर्यंत फार चांगली सांभाळली असेच म्हणावे लागेल. कंदमुळे व झाडपाले यांची आयुर्वेदिक औषधे देण्याचे काम या लोकांनी दीर्घकाळ चालविले व बारीकसारीक रोगांपासून ते मोठ्या रोगापर्यंत देखील यश मिळविण्याचे सामर्थ्य त्यांनी दाखविले. इतर काही लोक प्रयत्न करीत असत. परंतु यात ठाकूर लोकांचा सिंहाचा वाटा आहे, हे नाकारून चालत नाही. दोनचार गावांना लागून असलेल्या गावात एखादा तरी



ठाकूर वैद्य असे. तो सर्वांना विनामूल्य – पुण्याचे काम म्हणून – औषध देत असे. स्वखुशीने कोणी काही दिल्यास ते मात्र स्वीकारण्याची त्यांची तयारी असते. या ठाकरांचे वैशिष्ट्य असे की त्यांचे औषधाचे बाड त्यांना अवगत असते. त्या सर्व औषधी त्यांचे वडील किंवा गुरू यांकडून गुप्त रितीने घेऊन गुप्तच ठेवावे लागे. गुरू च्या हाताखाली ते त्या औषधीचा अनुभव प्राप्त करीत असत. त्या औषधी ते कोणालाही सांगत नसत व त्यांच्या जागा सांगणे तर फार पलीकडचेच. मरण्यापूर्वी आपला एक चेला ते तयार करून ठेवत. अशा रितीने ते पिढ्यान्‌पिढ्या हा वैद्यकाचा व्यवसाय चालवीत आलेले हे ठाकर आहेत.

यापैकी काही वैद्य भगत देखील असतात. कोणत्यातरी देवतेचे ते उपासक असतात. काही चेटूक करणारे असतात. गंडे दोरे व औषधी यांचा एकच मारा रोग्यांवर करण्यास ते मागेपुढे पाहात नसत. औषधी व दैवी उपचार यांना कठोर पथ्य असे. तसेच ते उपचार देखील काही वेळा फारच अघोरी असत. उपचार करून घेणाराची पाचावर धारण बसे. शिवाय ‘भगत’ प्रकरणाच्या ताब्यात एखादा अडकला की त्याच्यामागे काही ना काहीतरी लचांड लागण्याची शक्यता असे.

अशा प्रकारे आरोग्याची हेळसांड निसर्गतः होत असेच. परंतु त्यावर उपचार करणारेदेखील काही वेळा पीडा देत असत. अलीकडे ‘डॉक्टर’ आणि ‘सुई’ यांचा प्रचार जोरात सुरू झाला. त्यामुळे अंधश्रद्धा नाहीशा होऊ लागल्या आणि भगत व ठाकर यांच्यावरील विश्वास हळूहळू नष्ट होत चालला आहे.

**व्यापारउदीम –**

चाळीसगाव डांगाणच्या परिसराला राजूर, कोतूळ, समशेरपूर, अकोले, घोटी हे पाच मोठे बाजार आहेत. त्यापैकी राजूर आणि घोटी हीच या लोकांची खरी बाजारपेठ. या भागात व्यापार चालतो तो मुख्यत्वेकरून तांदळाचा आणि जोडीला इतर धान्ये, डिंक, मध यांचा. डांगाणातील लोक आपल्या गरजेनुसार भाताची गाठुडी, बोचकी किंवा पोती घेऊन येतात आणि ती व्यापाऱ्यास विकून आपल्या गरजेनुसार आवश्यक त्या गोष्टी विकत घेतात. हा संपूर्ण भागच दरिद्री असल्याने येथे व्यापार ज्याला संबोधले जाते तसा व्यापार येथे चालतच नाही. राजूर भागात वंजारी जमातीचे लोक आणि गुजराथी लोक विशेष प्रमाणात व्यापार करताना दिसतात. तलवारकानडे विशेषतः दुग्धव्यवसायात दिसतात. अलीकडे दुग्धव्यवसायाकडे सर्वांचेच लक्ष जाते आहे. हे लक्षणीय आहे. मोठ्या प्रमाणावर अमुक एक प्रकारचा व्यापार करावा अशी सध्या तरी परिस्थिती येथे आढळत नाही.

**गावगाडा –**

चाळीसगाव डांगाणमध्ये गावांची व्यवस्था व्यवस्थित होती. ही व्यवस्था बरीच जुनी होती. पाटील, कुलकर्णी, जागल्या, येसकर हे हुद्दे होते. पाटीलकीच्या बाबतीत विशेष असे की एक एक गावाची ततीम पाडून जमातीनुसार पाटीलकीची वतने बहाल केली होती. ही बहुधा बहामनी कालात झाली असावीत असे वाटते.[७२] कुलकर्णी वतन मात्र तर्फास एक असे असावे. येसकर व जागल्या यांची वतने मात्र प्रत्येक गावात होती. त्यांना पोटापुरती स्वतंत्र जमीन दिलेली असे. आज या जमिनी 'हाडका हाडुळा' म्हणून ओळखल्या जातात. हे लोक बहुधा महार किंवा मातंग जमातीपैकी असत. गावात पंचमंडळी असत. ही पंचमंडळी म्हणजे गावातील चार समजूतदार म्हातारे असत. ते गावकीचा न्यायनिवाडा करीत असत. हा न्यायनिवाडा चावडीत चालत असे. या व्यवस्थमध्ये डांगाणापुरते वैशिष्ट्य असे जाणवते की जमातीनुसार पाटील आणि एक गाव हे जणू एकाच कुटुंबाचा विस्तार असल्याने भांडणे होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसे. सारे तंटे या मारुतीच्या देवळात मिटत. यात अन्याय होतच नसे असे नाही. बारा बलुत्यांची कल्पना प्रचलित होती. परंतु सुतार, न्हावी, चांभार, कुंभार, नावाडी, बुरुड या लोकांचे जीवन गावे लहान असल्याने एका गावावर भागत नसे. त्यामुळे पाच-पाच, सहा-सहा गावांना एक या प्रमाणात हे लोक असत. ब्राह्मण ही संस्था जवळजवळ आढळत नाही. पूर्वी लग्न समारंभांना, भविष्य पाहाण्यास राजूर, कोतूळ, समशेरपूर अशा प्रमुख ठिकाणी असलेल्या ब्राह्मणांचा सल्ला घेतला जाई, परंतु पुढे ही जागा रावळ गोसाव्याने घेतलेली दिसते.

गावातील एका घरचे कार्य जणू सर्वांच्याच घरचे कार्य असे. गावातील पाण्याचा प्रश्न, सार्वजनिक कामे ही गावकीत ठरत. त्याचे प्रत्यंतर अजून येते. 'मत कोणाला' हेदेखील गावकीत ठरविताना दिसतात.

गावाला गायरान असे. गावदेव असे. हा देखील गावाच्या व्यवस्थेतीलच एक भाग असे. दुष्काळ येवो, सुकाळ येवो या सर्व वेळी हे लोक एकजुटीने, एकविचाराने व एकमेकाला सांभाळून घेत घेत जीवन जगत असत. राज्य कोणाचे, कोण राजा आला आणि कोण आला आणि कोण गेला याकडे त्यांचे लक्ष नसे. स्वतंत्र, स्वायत्त असे हे विश्व असे. मात्र यात शिक्षणाचा प्रश्न सुटत नसे. त्याचप्रमाणे गावात असलेले पाटील, देवलसी, वैद्य हे लोक कधीकधी लोकांना छळत असले तरी साधारणतः जीवन मुक्त असे.

हे गावगाड्याचे स्वरूप आता जवळजवळ नव्हे तर पूर्णच नष्ट झाले आहे.



असे म्हणण्यात अतिशयोक्ति होणार नाही. इंग्रजी राजवटीपासूनच त्यात बदल होऊ लागला.

**समारोप –**

लोकजीवन पाहताना विशेषतः चाळीसगाव डांगाणात असलेल्या मिश्रसंस्कृतीच्या बाह्य अंगाचा विचार केला. महादेव कोळी, ठाकर, तलवारकानडे व हटकरकानडे अशा चार जमातीचे लोक येथे राहात असून त्यांची संमिश्र अशी ही संस्कृती असली, तरी त्या संस्कृतीवर महादेवकोळी संस्कृतीची प्रचंड छाप पडली असून ही संस्कृती महादेव कोळ्यांचीच संस्कृती समजण्यास हरकत नाही. लोकसाहित्यातून त्यांचे लोकजीवन कसे प्रतिबिंबित झाले आहे हे या भागात मुख्यत्वेकरून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. गावे, घरे, पेहराव, खाणेपिणे, विवाहादी पद्धती किंवा चालीरिती इत्यादी गोष्टींचे भरपूर उल्लेख लोकसाहित्यातून आढळतात. लोकसंस्कृतीचे जिवंत चित्र लोकसाहित्यातून पाहावयास मिळते असे म्हणावेसे वाटते. शिक्षणाविषयी पूर्ण उदासीनता आढळते परंतु लोकसाहित्याचे पाठ मात्र मुखामुखातून जुळले जातात. वनस्पती, डोंगर, शेती याविषयी पशुपक्ष्यांविषयी बारिकसारिक माहिती या लोकांना झालेली असते व परंपरेने हे शिक्षण घेतले जाते. असे पाहिले की त्यांना आवश्यक त्या शिक्षणाच्या बाबतीत ते उदासीन नाहीत असे दिसते. तसेच ग्रामव्यवस्थादेखील चोख होती. गावातील एकोपा, सहानुभूतीपूर्ण जीवन पाहिले की हे लोक सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेले नाहीत असे म्हणावेसे वाटते. पुढील ठळक निष्कर्षावरून आपणास हेच कळेल.

**काही ठळक निष्कर्ष –**

(१) चाळीसगाव डांगाण परिसरातील संस्कृती महादेव कोळी, ठाकूर या दोन आदिवासी जमाती व तलवारकानडे व हटकरकानडे या सर्वांची मिळून संमिश्र बनली आहे. त्यात महादेव कोळी हेच लोक या भागात ऐंशी टक्क्यांहून अधिक असल्यामुळे त्यांचीच छाप या संस्कृतीवर प्रचंड प्रमाणात आहे. ही त्यांचीच संस्कृती म्हणावी लागेल.

(२) ही संस्कृती सह्याद्रीच्या उंच शिखराच्या कुशीत डोंगर उतरणीवर श्रमातून वाढलेली आहे.

(३) शहरी संस्कृतीशी या संस्कृतीची तितकीशी ओळख नाही.

(४) गावे अतिशय लहान असून त्यांची लोकसंख्या प्रत्येकी सरासरी चारशे ते पाचशे इतकी भरते. सर्व लहान गावांचा विचार करता.

(५) गावे सलग असून प्रत्येक गावात मारुतीचे एक देऊळ असतेच.

(६) घरे लहान, दगडमातीची, उतरत्या छपराची व कौले किंवा गवताच्या छपरांची असतात. घरांचे स्वरूप पाहाता त्यांच्या दरिद्री जीवनाची कल्पना येते.

(७) प्रमुख धंदा भातशेती, मजुरी आणि गुरे पाळणे हाच असल्याने सबंध दिवस गुरेढोरे, वैरणकाडी, शेतीभाती यातच जातो.

(८) आहारात तांदुळ, नागली ही दोन धान्ये फार महत्त्वाची असून ती धान्ये वर्षभर पुरेल इतकी होत नाहीत. एकच पीक व जोडधंदा नाही; यामुळे दोनतीन महिने अर्धपोटी किंवा कंदमुळे खाऊन दिवस काढावे लागतात.

(९) पुरुषांचा पोशाख अतिशय तोकडा असतो. काहीवेळा लंगोटीवर काम भागते. तर स्त्रियांचाही पोषाख तोकडाच असतो. एका लुगड्याची दोन लुगडी करूनदेखील नेसावी लागतात.

(१०) रोजच्या व्यवहारात स्त्रियांना शृंगाराची फारशी काळजी नसते. सणवार, लग्नसमारंभ या प्रसंगी मात्र स्त्रिया भरपूर दागिने अंगावर घालतात. त्यात चांदीचे दागिनेच अधिक असतात. ‘गाठी’ हा त्यांचा सौभाग्य अलंकार असून बाळ्या, बुगड्या, तोलबंध, गोठ, वेळा, साखळी, अंगठी इत्यादी बऱ्याच दागिन्यांचे उल्लेख त्यांच्या लोकवाङ्मयात सापडतात.

(११) लग्नविधी मराठमोळ्यया पद्धतीनेच होतात. त्यातील त्यांची अशी खास वैशिष्ट्ये म्हणजे ते ब्राह्मण बोलावीत नाहीत; नवऱ्यामुलाकडील लोकांना ‘देज’ द्यावा लागतो. लग्नसमारंभानिमित्त स्त्रियांची ‘धवलेरी’ गाणी म्हणण्याची पद्धती ‘घेड्या’ नाच रात्री ठाकरांचा कांवडवणा किंवा तमाशा आणि दारू पिणे हे होते.

(१२) जन्ममृत्यूचे बाबतीत त्यांच्या अंध समजुती लक्षणीय आहेत. उदाहरणार्थ, जन्म झाल्यानंतर ‘बारा बळी’, ‘भावल्या’ व ‘सटवी’ यांच्या कल्पना. मृतांना पुरण्याची चाल होती. दिवसविधीच्या निमित्ताने समाजाच्या दृष्टीने निरनिराळ्या विधायक गोष्टी करण्याविषयी विचार विनिमय करणे.

(१३) एकत्र कुटुंब पद्धती होती. पाहुणचाराला मोठे स्थान आहे. विवाहित स्त्रियांना मानाचे स्थान आहे. अविवाहितांना सामाजिक वा कौटुंबिक मानाचे स्थान नाही.



(१४) शिक्षणाच्या बाबतीत कायम उपेक्षित राहिलेला असा हा प्रदेश आहे. शिक्षणाच्या दृष्टीने सामाजिक व आर्थिक अडचणी महत्त्वाच्या आहेत.

(१५) आरोग्य आणि वैद्यकीय उपलब्धीच्या बाबतीतल्या भागाची उपेक्षाच झालेली आहे. ठाकुरांची झाडपाल्याची औषधे व ‘भगत’ लोकांचे अंगारेधुपारे यांचेच च्योग अद्याप मोठ्या प्रमाणावर दिसतात.

(१६) पूर्वी ‘गावगाडा’ सुरळीत चालत असे.

एकंदर लोकजीवन मागासलेले परंतु माणुसकीवर आधारलेले आहे.

**संदर्भ –**

१) G. S. Ghurye- 'The Mahadev Kolis' A Sheduled Tribe - Popular Book Depot, Pune.

२) गोविंद गारे, ‘सह्याद्रीतील आदिवासी – महादेव कोळी’, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई.

३) सुधीर फडके, ‘महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न’, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे.

४) शं. दा. पेंडसे, ‘महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास’, सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, आवृत्ती ४, पृ. ३.

५) महाराष्ट्र जीवन – परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड १, २, संपादक गं. बा. सरदार, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९६०.

६) इरावती कर्वे, ‘मराठी लोकांची संस्कृती’, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे, पृ. ११,२०, २२, २७.

७) सुधीर फडके, ‘महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न’, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, पृ. ३.

८) गोविंद गारे, ‘सह्याद्रीतील आदिवासी – महादेव कोळी’, प्रथमावृत्ती, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, पृ. ६.

९) सुधीर फडके, ‘महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न’, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, पृ. १० ते ३१.

१०) गोविंद गारे, ‘सह्याद्रीतील आदिवासी – महादेव कोळी’, प्रथमावृत्ती, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, पृ. १५ व १६,

११) सुधीर फडके, ‘महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न’, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, पृ. ४०.

१२) तत्रैव- पृ. २६, २७.

१३) तत्रैव.

१४) सुधीर फडके, 'महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न', जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे.

१५) Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

१६) 'परिसरातील लोककथा, दैवतकथा' क्र. १.

१७) विश्वनाथ खैरे, 'द्रविड महाराष्ट्र', साधना प्रकाशन, पुणे, पृ. १३.

१८) इरावती कर्वे, 'मराठी लोकांची संस्कृती', देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे, पृ. १९.

१९) प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ३९, ४०.

२०) 'लोकसाहित्य साजशिणगार - लोकसाहित्य : रंग, रूप, रस आणि गंध', लेखक ना. रा. शेंडे, संपादन डॉ. सरोजिनी बाबर, प्रथमावृत्ती मार्च १९६५, पृ. ७५ ते ८८.

२१) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीत क्र. १.

२२) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' पांडुरंगाची भक्ती, संत संदर्भ गीत क्र. १.

२३) तत्रैव- जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. २.

२४) तत्रैव- भलरी गीते, गीत क्र. ४.

२५) परिशिष्ट १, जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. ३.

२६) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' पांडुरंगाची भक्ती, संत संदर्भ गीत क्र. १.

२७) तत्रैव- भलरी गीते, गीत क्र. ८.

२८) तत्रैव- सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. १४.

२९) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

३०) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ६.

३१) तत्रैव- गीत क्र. ७.

३२) तत्रैव- सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ६.



३३) तत्रैव- जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. १२.

३४) तत्रैव- नवरात्रातील गाणी, गीत क्र. ७.

३५) परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा', हास्यकथा, कथा क्र. ५.

३६) तत्रैव- नवरात्रातील गाणी, गीत क्र. ७.

३७) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १०.

३८) तत्रैव- गीत क्र. ८.

३९) तत्रैव- गीत क्र. ९.

४०) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २७.

४१) परिशिष्ट १, नवरात्रातील गाणी, गीत क्र. ३.

४२) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीत क्र. ३२.

४३) तत्रैव- लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १०.

४४) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' भलरी गीते, गीत क्र. ५.

४५) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीते, गीत क्र. ३३.

४६) तत्रैव- गीत क्र. २१.

४७) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीते, गीत क्र. २३.

४८) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी - महादेव कोळी', सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, पृ. ९१, ९२.

४९) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २.

५०) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

५१) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ४.

५२) तत्रैव- गीत क्र. १०.

५३) तत्रैव- गीत क्र. ५.

५४) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

५५) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १५.

५६) तत्रैव- गीत क्र. १६.

५७) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १०.

५८) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ८.

५९) तत्रैव- गीत क्र. १४.

६०) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १४.

६१) तत्रैव- गीत क्र. ६.

६२) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २१.

६३) तत्रैव- गीत क्र. १४.

६४) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' नवरात्रातील गाणी, गीत क्र. ९.

६५) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २६.

६६) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २७.

६७) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ३१.

६८) परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

६९) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी - महादेव कोळी', सहाध्ययन प्रकाशन, मुंबई.

७०) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी - महादेव कोळी', सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, पृ. १९.

७१) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी - महादेव कोळी', सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, पृ. ९४.



७२) 'राजूरच्या परिसरातील १५ वर्षाची साधना', संयोजक- रा. वि. पाटणकर, सत्यनिकेतन संस्था, राजूर.

७३) परिशिष्ट १, 'चाळीसगाव डांगाणसंबंधी ऐतिहासिक पुरावा'.

* * *

## प्रकरण चौथे

# चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक अभ्यास : धर्म व कला

**प्रास्ताविक –**

मागच्या प्रकरणात चाळीसगाव डांगाणच्या लोकजीवनाचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास मुख्यत्वेकरून लोकजीवनाच्या बाह्यांगाचा होता. या भागात आपल्याला चाळीसगाव डांगाणच्या धर्मसंस्कृती व कला याचा अभ्यास करावयाचा आहे. या भागात त्यांची दैवते, यात्रा–जत्रा, त्यांच्या श्रद्धा, सणोत्सव, जीवनानंदाचे स्वरूप, कला, त्याचबरोबर त्यांची संस्कृती जतन करणारे भटके लोक इत्यादी गोष्टींचा विचार करावयाचा आहे. हा अभ्यास करतानादेखील येथील लोकवाङ्मयातून त्यांचे सांस्कृतिक जीवन कसे व्यक्त झाले हे पाहावयाचे आहे.

**धर्मसंस्कृती –**

या लोकांची धर्मसंस्कृती म्हणजे अभ्यासकाला कोडेच आहे. या भागात महादेव कोळी आणि ठाकर या दोन आदिम जमाती आहेत व तलवारकानडे हे मात्र आदिम नाहीत. हे सारेच लोक धर्मसंस्कृतीच्यादृष्टीने मात्र सारखेच दिसतात. हे सर्वच प्राणीपूजक होते. कॅप्टन माकिनटोश, डॉ. गारे, बापूसाहेब शेंडे किंवा अहमदनगर जिल्हा गॅझेट या सर्वांनीच या लोकांना प्रमुखतः प्राणीपूजक म्हणून संबोधिलेले आहे. परंतु आज मात्र या भागात भागवत धर्माचा प्रसार अधिक प्रमाणात पसरलेला आहे हे प्रत्यक्ष पाहणीवरून दिसून येते. शिवाय महादेव कोळी



हे जातीनाम लक्षात घेतादेखील त्यांना दिलेली प्राणीपूजक ही संज्ञा योग्य की अयोग्य ही गोष्ट मनात साशंकता निर्माण करते. महादेवकोळी आणि ठाकर या मुख्यत्वेकरून प्राणीपूजक जमाती होत्या. परंतु त्यांचा आर्यांशी आलेल्या संबंधामुळे त्या प्रतिमापूजक झाल्या असाव्यात असे दिसते. महाराष्ट्रातील सुधारलेल्या किंवा पुढारलेल्या समाजाचे जसे 'खंडेराय' हे दैवत आहे तसेच ते यांचेदेखील आहे. ज्योतिर्लिंगे हिंदूंना जितकी प्रिय तशीच ती यांची कुलदैवते. श्रीरामांच्या आख्यायिका या लोकात सर्वदूर प्रचलित आहेत. या सर्व गोष्टी पाहाता तसेच हिंदूंचे सर्व सण ते आपले मानतात. एवढेच नव्हे तर नवनाथ व दत्तात्रय या देवतांची देखील मोठ्या प्रमाणावर चाललेली पूजा लक्षात घेता हे फार तर रामपूर्व काळात प्राणीपूजक असावेत. नंतर त्यांचे पूर्ण हिंदूकरण झाले असावे असेच म्हणणे योग्य वाटते. आज कागदोपत्रीदेखील हे लोक 'आदिवासी हिंदू महादेव कोळी' व 'आदिवासी हिंदू ठाकर' असे स्वतःला म्हणवितात. तर तलवारकानडे लोकांनी आम्हाला आदिवासी समजू नये असे स्वतःच सुचविलेले व त्यासाठी भांडले असेही आपणास दिसून येतात. ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. एकूण हे लोक हिंदूधर्मारूढींशी पूर्ण एकरूप झालेले आहेत हेच खरे.

**प्राणीदैवते व त्यांचे उत्सव –**

**(१) वाघदेव किंवा वाघ्या –** सह्याद्रीच्या दक्याखोऱ्यात वाघांची वस्ती खूपच होती. त्यामुळे वाघाच्या अमर्याद सामर्थ्याने त्यास वाघदेव बनविले होते. अलीकडे वाघ जवळजवळ नाहीतच. तरी पट्टागड, कळसूबाई, रतनगड व हरिश्चंद्रगड या डोंगरांच्या सान्निध्यात काही वाघ आहेत. हे वाघ नेहमीच गुरे पळवितात. वाघ हरिश्चंद्रगडावरील शंकराची पिंड तसेच अमृतेश्वराची पिंड, कळसूबाई पट्टेआई. घोरपडेआई यांची पूजा करतात; ते रात्री बारा वाजता पाया पडावयास येतात अशी समजूत आहे. वास्तविक ते त्या स्थळी पाणी पिण्यास येतात. या भागात बिबटे वाघ आहेत. अशा वाघांची मनोभावे पूजा केली जाते. या दैवताचा उत्सव पौष महिन्यात शुद्ध द्वादशी या दिवशी असतो. यालाच 'वाघबारस' असे नाव आहे. हे वाघदेव डोंगराच्या पहिल्या टप्प्यावर बसलेले दिसतात. तेथे दगडाची किंवा लाकडावर कोरलेली वाघदेवाची मूर्ती असते. क्वचित प्रसंगी मोठ्या झाडाच्या खोडावरसुद्धा हा वाघ्या कोरलेला असतो. पूर्वी वाघबारस हा सण दिवाळीसारखा मोठा साजरा केला जात असे. त्याच्या जत्रेनेच वर्षातील जत्रा सुरू होते. वाघदेवाच्या जत्रेला सारा गाव एकत्र जमून जाई आणि वाघदेवाची प्रार्थना करी रात्री मोठी शेकोटी पेटवून वाघदेवाचे सोंग काढण्याचा

प्रघात होता व निरनिराळ्या जनावरांची सोंगे घेऊन ती जनावरे वाघोबाजवळ जाऊन आपणास न खाण्याची आश्वासने घेत असत. अशा प्रकारच्या उत्सवाने वाघदेव आपल्या जनावरांना खाणार तर नाहीच पण त्यांचे रक्षण करील अशा आख्यायिका ऐकायला मिळतात. चेमदेवाच्या गोष्टीतदेखील वाघ जनावरांचे रक्षण करतो असा उल्लेख आहे.[१] काही गायख्यांच्या स्वप्नात वाघदेव येऊन माझी मूर्ती अमुक ठिकाणी बसवा असे सांगतो. वाघदेव नवसाला पावतो. त्याच्या पाया पडल्याखेरीज डोंगर चढता येत नाही. वाघबारसेच्या दिवशी तो व इतर रानटी जनावरे लोकांना शिवेत न येण्याचे आश्वासनदेखील देतात.

**देव वाघराज नवसाला पावत**[२]
**शंभर शेरडा त्याच्या नवसाला लागत ।।**
**देव वाघराज पयली पायरी नेमाची**
**येंगून देईना डोंगर गर्विया मनाली ।।**
**देव वाघराजा आमच्या येशीत नको येऊ**
**आमची गुरांढोराम नको वायाला जाऊदेऊ।।**
**देव वाघराज्या तुला मानाची आरती**
**गावाच्या येशीला तुही चंदनी आरती ।।**
**देव वाघराजा तुही बारस घालितो**
**तुला देतो टिळा उभा गाव जेवतो ।।**
**देव वाघराजा तुही राव दे सावली**
**चांदण्याराती तुझी सवारी पायली ।।**
**देव वाघराजा उभ्या रानाचा राखन**
**तुह्या विना देवा आमची बसई राखन ।।**
**एवढी गुरांढोरा तुह आह्यात लेकरं ।।**
**तुह्या कुरपेना अवघ्या रानी कशी मोकाट ती चरं ।।**

अशा गाण्यात हे लोक वाघदेवाचा जयघोष करतात. वाघ्याचा येळकोट करतात.

**तुहा केला टिळा नको शिवेला येऊ**
**तुह्या मणाला आवर नको गुरां खाऊ।।**
**लांडग्या खोंडग्या तुला वाघाची आण**
**जर खाली माझी गायू तुला वाघाची शपथ ।।...इत्यादी**

मनाने जुळवून साऱ्याच प्राण्यांना वाघाची शपथ घालून ते निश्चिंत होतात,



कधीकधी गोंधळ्यांना अशी गाणी म्हणण्यास सांगितली जातात.

अशी बारस साजरी करून रात्री तमाशा, कांबडवणा नाच किंवा लेझीम असे नेहमीचे करमणुकीचे कार्यक्रमदेखील केले जातात. परंतु अलीकडे ही वाघबारस नारळ फोडण्यापर्यंतच मर्यादित झाली आहे. हा सारा उत्साह आता दिवाळीतच दिसतो.

**(२) नागपंचमी –** हा साऱ्यांच हिंदूंचा सण. हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. नागपंचमीला या भागात जोरात पाऊस पडत असतो आणि शेतातील कामे फार मोठ्या प्रमाणावर चालू असतात. त्यामुळे मुलेच हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करतात. जी भावना वाघदेवाच्या बाबतीत, तीच या नागदेवाच्या बाबतीत. नागाची मूर्ती करणे, खेळ खेळणे, झोका खेळणे हेच स्वरूप याही सणाचे असते. दिवाळीतील व शिमग्यातील खेळांची गाणी या प्रसंगी म्हटली जातात. वारुळाला जाऊन पूजा केली जाते.

**पाच झोकं खेळावा खेळावा**[३]
**नागदेव भेटावा भेटावा ।।**
**नागदेव भेटला भेटला**
**नवसाला मह्या पावला पावला ।।**
**महा नवस नवऱ्याचा नवऱ्याचा**
**साईत्रीच्या बापाचा बापाचा ।।**
**नागदेवाला दूध गं दूध गं**
**नवऱ्याला आली सूध सूध ।।**
**नागदेव कोणाचा कोणाचा**
**पारबतीच्या देवाचा देवाचा ।।**
**देवाना देव आकाळला आकाळला**
**कपिलाचा दूध उपाळला उपाळला**

अशा प्रकारे नागदेवाविषयीच्या भावना व्यक्त केल्या जात असतानाच फुगड्यांचा दणका उठतो.

**फुगडीचा दणका उठतो उठतो**
**नागदेव डोलतो डोलतो**

नागाची पूजा करताना फेर धरून स्त्रिया नाचत. हा प्रकार मात्र अलीकडे संपुष्टात आल्याचे आढळते. सर्पदंश आणि सर्प अंगात येणे हा प्रकार या भागातदेखील आढळतो. सर्प चावल्यावर तो उतरविण्यासाठी त्याला भगताकडे नेले जाते. हा

प्रकार मारुतीच्या देवळात साधारणपणे होतो. तेथे या भगतासमोर म्हणजे मांत्रिकासमोर सर्व अंगात येऊन आपण चावलो, झाडाला नेणार की नाही, आपल्या झाडाकडून म्हणजे अंगात आलेल्या माणसाकडून काय अपेक्षा आहेत हे सांगतो. मांत्रिक त्या अपेक्षा पूर्ण करावयास सांगून आपल्या मंत्रसामर्थ्याने सर्व विष उतरवितो. सर्प डूक धरतात ही गोष्ट या भागात मान्यता पावलेली असून मृतात्मे सर्पाच्या वेषात शेतातून हिंडतात तर निरनिराळे देव देखील नागरूप धारण करून दर्शन देतात असा समज या भागात रूढ आहे.

**(३) घोरपड्याआईची जत्रा–** प्रवरा नदीच्या रंधा येथे असलेल्या धबधब्याजवळ शेंदूर फासलेला एक खडक आहे. तेथेच जवळ एक मंदिर आहे. ही घोरपडेआई. यास घोरपडेआई हे नाव शिवकालात पडले असे म्हटले जाते. या घोरपडेआईविषयी दंतकथा प्रचलित आहे. परंतु तिला घोरपडेआई का म्हणतात हे कळत नाही. आख्यायिका एका गायीविषयी आहे.[४] घोरपडीविषयी नाही. दर मंगळवारी या देवीच्या पाया पडायला लोक येतात. 'जावळ' विधी करण्यासाठी डांगाणी लोक या ठिकाणी येतात. वैशाख व फाल्गुन महिन्यातील मंगळवारी या ठिकाणी हा जावळविधी बहुधा चालू असतो. मुलाच्या जावळाला बोकड व मुलीच्या जावळाला कोंबडी किंवा शेळी कापण्याची प्रथा आहे. या देवीला 'प३साद' (कौल) लावला जातो. त्याप्रमाणे निर्णय घेतले जातात.

**(४) बैलपोळा –** डांगाणात बैलपोळादेखील मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. सर्वसामान्यतः सबंध महाराष्ट्रात ज्या पद्धतीने बैलपोळा साजरा केला जातो त्याचपद्धतीने या भागात देखील साजरा केला जातो. या भागात श्रावणी पोळा किंवा भादवी पोळा साजरा केला जातो. तेव्हा त्याविषयी जास्त विशेष माहिती लिहावयाचे कारण नाही. यावेळी 'अंबाडी'चा गोंडा बैलाला घातला जातो व वेलांचे आसूड करून वाजवितात. पुरणपोळीचा नैवेद्य बैलांना व रेड्यांना दिला जातो. येथे बैलांप्रमाणेच रेड्यांचा उपयोग शेतीसाठी केला जात असल्याने त्यांना बैलाप्रमाणेच मानले जाते. परंतु बाशिंगाचा मान मात्र बैलांनाच असतो.

**(५) गायगोऱ्ह्याची पूजा – वसुबारस –** हा देखील वास्तविक प्राण्यांचा सण. त्या दिवशी गायगोऱ्ह्याची पूजा करण्याची प्रथा आहे. त्यादिवशी गायगोऱ्ह्याची गाणी म्हटली जातात व दिव्यास तेल मागितले जाते.

**दिन दिन दिवाळी – गायी म्हशी ओवाळी**[५]
**गायी कुनाच्या – लक्षेमनाच्या**
**लक्षेमन कुनाचा – आईबापाचा**



**दे ग माई पळीभर त्याल**
**त्याल नही चावडीत जाय**
**चावडीत व्हती निळी घोडी**
**लाता मारी फडाफडी**
**त्याल घेऊ घडाघडी**
**हांडुरले हांडुरले हांडुरले**

तशाच गायीच्या ओव्यादेखील लक्षणीय आहेत.

**वन्या गायी तुझी शिंगा महादेवा तुझी लिंगा**[६]
**तुका बोले ।।**
**वन्यागायी तुझं डोळं जसं लोणीयाचं गोळं**
**तुका बोले ।।**
**वन्यागायी तुझं नाक जसं पंढरीचं माप**
**तुका बोले ।।**
**वन्यागायी तुझा तोंड जसा अमृताचा कुंड**
**तुका बोले ।।...इत्यादी**

**(६) कुत्रे –** कुत्र्याला खंडेरायाचा अवतार मानण्याचा प्रघात या भागातदेखील पाहावयास मिळतो. परंतु त्याचा स्वतंत्र उत्सव नाही. वाघबारस आणि पोळा याच दिवशी कुत्र्याचा देखील सन्मान केला जातो. काही शेतांवर राखणकर्ता कुत्रा याची मूर्ती करून बसविलेल्या आढळतात. परंतु त्याला देखील वाघ्या असेच संबोधिले जाते.

**डांगाणातील सणोत्सव –**

**(१) दिवाळी –** दिवाळी हा सण सर्वात मोठा व अत्यंत आनंदाचा समजला जातो. डांगाणात हा सण फटाके उडवून साजरा होत नाही तर गाणी गाऊन आणि खेळ खेळून साजरा केला जातो. घरोघर तेल मागून लक्षदिवे उजळले जातात. मुलांच्या टोळ्या गवताच्या 'दिवाळ्या' तयार करून घरोघर तेल मागत हिंडतात. या दिवाळ्यांचा आकार आठव्यासारखा असतो. त्यावर नाग तयार केलेला असतो. आत पणती ठेवायची सोय असते. अशी ही 'दिवाळी' वाळलेल्या गवतकाड्याची विणून तयार केलेली असते. हे दिवाळीचं सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य. चार दिवस हे तेल मागण्याचा कार्यक्रम चालतो. प्रत्येक घरातील स्त्रीने तेल वाढलेच पाहिजे असा संकेत असतो. फराळाचे वेगळे वेगळे पदार्थ करून खाण्याची इकडे प्रथा नाही. नरकचतुर्दशीला स्नानाची पद्धत आहे. लक्ष्मीपूजनाला

मोठी दिवाळी म्हणतात. पाडव्याच्या दिवशीची 'ववाळी' मागते. या सर्वात गाणे हेच महत्त्वाचे. ही गाणी विनोदी, खोचक व बडबडगीतांसारखी असतात. संध्याकाळच्या वेळी सडा रांगोळी केली जाते. तुळशीवृंदावन व घराच्या दरवाजांना शेणाने लिंपून त्यावर झेंडूची फुले रोवून सुंदर सुंदर चित्रे वेलबुटी काढली जाते. मोठ्या दिवाळीला व पाडव्या भाऊबीजेला घरातील पुरुष माणसांना ओवाळले जाते. पुरुष आपापल्या परीने ओवाळणी घालतात. बारा बलुतेदेखील दिवाळीच्या निमित्ताने धान्यरूप ओवाळणी घेतात. बहिणीला चोळीबांगडी करणे व भावाला करगोटा व नारळ देणे या प्रथा पाळल्या जातात. दिवाळीच्या सणानिमित्ताने पुरणाचे कडबू, पुरणाच्या पोळ्या, उंडे इत्यादी प्रकार केले जातात. अलीकडे फराळाचे पदार्थ करण्यांकडे लोकांचे लक्ष जात आहे. परंतु ते फार दिसत नाही. दिवाळीत मारुतीचे सार्वजनिक देऊळ हे दिवाळी सार्वजनिक करण्याचे ठिकाण. हीच चावडी. दिवाळीत दुधाची विक्री न करता दूध घरातच खाल्ले जाते. जो किंवा जी तेल देणार नाही त्याची हुर्ये केली जाते. दिवाळीची गाणी गाताना अलीकडे दारू उडविण्याची प्रथा मूळ धरू पाहात आहे. निरनिराळ्या प्रकारच्या काड्या जाळण्याची प्रथा या भागात अधिक होती. विशेषतः डवम्याच्या काड्या जाळल्या जात. टेंभेदेखील पेटविले जात. अलीकडे रात्री भारूड, तमाशा, भजने असेच कार्यक्रम केले जातात. मुलींच्या खेळांना अंगणाअंगणातून उधाण येते. ठाकूर (ठाकर) लोक आपला आवडता 'कांबडवणा' नाच रात्ररात्र करतात. दिवाळीचे वैशिष्ट्य म्हणून जी गाणी गायली जातात, त्यातूंन त्यांच्या साऱ्या जीवनाचे चित्र उभे करण्याचे सामर्थ्य असते. ती बडबडगीते खरी, पण त्यात देखील काही अर्थ आहे असे वाटू लागते. काही गाणी वानगीदाखल पुढे दिलेली आहेत.

**दिन दिन दिवटी**[७]
**सोनेची कवटी**
**पाच गायी पाच म्हशी**
**यव्हढा दुभता कोण खायी**
**नरसे येऊन घेऊन जाई**
**''दे ग माई पळीभर त्याल''**
**''त्याल नाही'' ''चावडत जाय''**
**चावडीत व्हती निळी घोडी**
**लाथा मारी फडाफडी**



**त्याल घेव घडोघडी**
**हांडुरले हांडुरले हांडुरले**

याचप्रमाणे काही गमतीदार व ग्राम्य गाणी आढळतात

**दिन दिन दिवाळी**
**गायी म्हशी ववाळी**
**गायी कुनाच्या लक्षेमनाच्या**
**चोळून मोळून केली हारका**
**हारका हारका दळले गहू**
**आमचे गावचे पंडित पवू**
**पंडिताचे उभे टिळे**
**न्हायाच्या बोच्यात ठोकळे खिळे**
**खिळे वाजे करा करा**
**न्हायी पादे परा परा**
**पराच्या हाती पळसकांदा**
**नराच्या हाती नरस**
**दे गं माई पळीभर त्याल**
**त्याल नाही चावडीत जाय**
**चावडीत व्हती निळी घोडी**
**लाथा मारी फडाफडी**
**हांडुरले हांडुरले हांडुरले**

काही कूट रचना या बडबडगीतात आढळतात

**जानी गाय विली गणेबा जानी गाय वीली**[१]
**जानीला झालाय गोरा गणेबा** ...२
**गोरेच्या गळ्यात गेढा गणेबा** ...२
**कंठाला मोडलाय काटा गणेबा** ...२
**काट्याकुट्याचा वेणू गणेबा** ...२
**वेणू फुटतो फांद्या गणेबा** ...२
**बैल डरतो मांद्या गणेबा** ...२
**मांद्या बैलाची वेसण गणेबा** ...२
**निळ्या घोडीव बसून गणेबा** ...२
**गायी पांगल्या करडा गणेबा** ...२

**करडा व्हता लवू गणेबा ...२**
**त्यांनी शिळाकले पवू गणेबा ...२**
**पयापयाची किकळी गणेबा ...२**
**जानी बोलावली पुतळी गणेबा ...२**
**हाणा बुकी फोडा कांदा ...२**
**उघड गायीची कवाडा ...२**
**घरी आहे डुबा मान्हा त्याला देव पहिला पान्हा**
**हांडुरले हांडुरले हांडुरले**

पंढरी गायीचे रूपक तर मोठे ऐकण्याजोगे आहे.

**पंढरी गाय बरी व बरी**[१०]
**ह्या भीमाच्या तीरी**
**दूध भरून देते चरी**
**पंढऱ्या गायीचा प्वाट जसी कापसाची म्वाट ।।**
**पंढऱ्या गायीच्या मांड्या जस्या पालकीच्या दांड्या ।।**
**पंढऱ्या गायीचं कान जसा नागेलीचं पान ।।**
**पंढऱ्या गायीचं डोळं जसं लोणीयाचं गोळं ।।**
**पंढऱ्या गायीचं शिंगा महादेवाची लिंगा ।।**
**पंढऱ्या गायीचा दूध जसं जेवण झालय सुद्ध ।।**

अशा प्रकारची असंख्य गाणी या दिवाळीच्या चारपाच दिवसात म्हटली जातात. त्यात मनस्वीपणा असल्याने ती किती व कोणत्या प्रकार बदलतील याचा नेमच नाही.

**(२) होळी –** होळी हा आणखी एक मोठा व स्त्री-पुरुषांचा आवडता सण. या सणात विशेष म्हणजे चांदणे असते आणि या चांदण्यात गाण्यांची गर्दी उडते. मारुतीच्या देवळासमोरचे अंगण पुरुषमंडळींनी तर घराघरापुढची अंगणे स्त्रियांनी फुलून जातात. गाण्यांची जणू चढाओढच लागते. ही सारीच गाणी बडबडगीतात, ओव्यात जमा होण्यासारखी असतात. पुरुष होळीभोवती जमा होऊन गाणी बडबडतात तर स्त्रिया अंगणात खेळ खेळतात. अगदी लहानथोर सारेच आपले वय विसरून, लाज विसरून मनसोक्तपणे चांदण्याचा आनंद लुटतात. होळीला पुरणाची पोळी केली जाते. होळीवर तापविलेल्या पाण्याच्या आंघोळी लहान मुलांना घातल्या जातात. धुळवड खेळली जाते. चांदण्यात सोंगे काढली जातात. नानाविध खेळ खेळले जातात. स्त्रियांचे 'पृ' घुमतात. असा 'शिमगा' साजरा



होतो. गौऱ्या, लाकडे, ओंडके जळत असतात. गाण्यांचे ताल जुळत असतात. ठाकर लोकांचा 'कांबडवणा' रंगात आलेला असतो. या होळीची गाणी आणि दिवाळीची गाणी यात फारसा फरक नसतो. कधी कधी ती एकच असतात. त्यात मनाने काही जुळवून ते वाढविले जाते. हे त्या गाण्यांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. शिमगा म्हणजे 'लई मज्जा! मुक्त आनंद. रंगपंचमीच्या दिवशी रंग खेळला जातो; असे म्हणण्याऐवजी शेणमातीच खेळली जाते. काही वेळा स्त्रीपुरुष भेददेखील संपुष्टात येतो. पण या गोष्टीतदेखील शृंगाराचा तसा अभावच असतो म्हटले तरी चालेल. स्त्रीपुरुषांचा एकत्र नाच या भागात आढळत नाही. विशुद्ध वासनांपासून मुक्त असाच हा आनंद असतो. असेच म्हणणे संयुक्तिक ठरेल. होळीच्या गाण्यांची मजा काही औरच आहे. पुढे वानगीदाखल काही गाणी दिली आहेत. त्यातून आपोआपच होळीचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.

**महिन्यामंधी ग महीना शिमगा उगविला**[११]
**सारंग पती ग पती माझा कोन्या वनी गेला**
**मारुतीच्या ग हावदावर देव आंघुळीला**
**सारंग पती ग पती माझा कोन्या वनी गेला**
**महीन्यामंधी ग महीना शिमगा उगविला ।।**

हातात हात धरून हे गाणे संपले की फुगडीला सुरुवात होते-

**चांदोमा चांदोमा गटोळा गटोळा।**
**तुझी बायको वाटोली**
**दे ग माई सुपारी सुपारी**
**सुपारी पडली दह्यात दह्यात**
**एव्हढा गही नाशला नाशला**
**फुटक्या ढेऱ्यात ओतला ओतला**
**फुटका डेरा द्योवाड द्योवाड**
**हाताला आले फ्वाड फावाड**
**हातात फ्वाड फुटतानी फुटतानी**
**दारच पावन उठतानी उठतानी**
**फूफूफू**

मग म्हातारीदेखील फुगडी खेळण्याची लहर येते आणि तरुणी टिंगल करतात. तरीही तिच्या फुगडीचा दणका उठल्याशिवाय राहात नाही

**म्हा पायाव तांब्या तांब्या**[१३]

**भावाना घेतिला बैल नांद्या नांद्या**

**म्हा पायाव माशी माशी**

**तिचा नाव काशी काशी**

**काशीचा कुकू लाल ग लाल**

**म्हतारे पृ घाल ग घाल गं**

आणि मग म्हातारीदेखील उखाणे घालते. या प्रसंगी नवरात्र, दिवाळी, पंचमी, या साऱ्याच सणांची गाणी उजळवितात.

**सादीकोंदीना पडल्यात गहू गहू**[१४]

**त्याच्या चपात्या केल्यात नऊ नऊ**

**एक चपाती काय ग केली? ...२**

**माझ्या भावाला नेऊन दिली ...२**

**तुझ्या भावाला काय ग दिला? ...२**

**माझ्या भावाना भिंगरी दिली ...२**

**भिंगरीच तार तुटं**

**माझ्या फुगडीचा दणका उठं**

अशाप्रकारे घरासमोरची अंगणे एकेका गाण्याने जिंवत होतात तर पुरुषदेखील आट्यापाट्यासारखे खेळ खेळत असतात. पण त्याचवेळी गाण्यांची चढाओढ चाललेली असतेच. येथे एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. ती म्हणजे मुलामुलींची गाणी काहीवेळा एकत्र असतात

**वुलिसिक वाटी चमचम चाटी**[१५]

**नवट्या घोडा बागुल तोडा**

**बागुल तोडेचे उलीउली पाय**

**तेच्यावं बसली इंदीआई**

**इंदीआईची कंबर सुरी**

**ती सुरी वैदापुरी**

**एक थीर मारला**

**लाडा उंदीर ताकात पडला**

**हांडुरले हांडुरले हांडुरले**

दुसरे गाणे पहा होळीच्या ज्वालांनाच पाहून म्हटले असावे.

**वनवा डोंगर मेघीला**[१६]



**चला रं जाऊ वनवा पाह्या**

**वनवा विस्तुन पेटीला**

**चला रं जाऊ विस्तु पाह्या**

**विस्तु पाणी विझीतो**

**चला रं जाऊ पाणी पाह्या**

**पाण्यात मासा खेळतो**

**चला रं जाऊ मासा पाह्या...**

अशी साखळी गीते गायली जातात. अशी कोडी टाकली जातात.

**माझ्या मळ्यातून जाई गोपाळा**[१७]

**तुझ्या मळ्यातून जाई**

**जाई गुन गाई ती रंगून जाई उत्तर दे मंग जाई**

**गोपाळा 'एवढ्यात लहान कायी?' गोपाळा**

**माझ्या मळ्याची शिंगी गोपाळा तुझ्या मळ्याची शिंगी**

**एवढ्यात लहान मुंगी गोपाळा एवढ्यात लहान मुंगी रंऽऽ**

कोड्यांची उत्तरे देताना चढाओढ लागते. काही कूट रचना ऐकायला मिळतात. त्यात ग्राम्यता असली तरी काही अर्थ असावा असे वाटते.

**आंधळी पुसती पांगळीला**[१८]

**हगाया चलती का खंगळीला? ॥**

**आवडी पुसती सवडीला**

**पाण्याला चलती का बावडीला? ॥**

**येस्त्री पुसती केस्त्रीला**

**पोचारा देऊ काय ओसरीला? ॥**

शिमग्याच्या निमित्ताने कोणत्या प्रकारची गीते म्हणावीत याला धरबंध नाही. अशी कितीतरी गीते चालतात. आणि रात्रीच्या रात्री निघून जातात. अलीकडे मात्र मोठी माणसे या गाण्यामध्ये किंवा खेळामध्ये भाग घेण्याऐवजी भजन मांडतांना दिसतात. परंतु होळीवर मात्र होळीवर न येणाऱ्यांच्या नावाने किंवा होळीला गवऱ्या न देणाऱ्याच्या नावाने 'हांडुरले' केला जातो. दिवाळीत जसे तेल मागितले जाते तसे होळीला गवऱ्या, लाकडे मागण्याची पद्धत आहे. वास्तविक पाहाता गावात कायमचीच होळी पेटलेली असते. परंतु यावेळी मुद्दाम लाकडे मागितली जातात आणि ती आनंदाने देतातही. शिमगा हा वर्षातला शेवटचाच सण म्हणावा लागेल. त्यानिमित्ताने मुले सर्व सणांची उजळणी पुढीलप्रकारे करताना दिसतात.

नेटकूच लागलाय डोळा गेंदबा[१९] ...२
आला श्रावणी पोळा गेंदबा ...२
पोळ्याची काढल्यात चित्रा गेंदबा ...२
आईवडिलांची पित्रा गेंदबा ...२
पित्राची झालेया डाळ गेंदबा ...२
आली घराची माळ गेंदबा ...२
गणेबा घराची गाठी गेंदबा ...२
दिवाळीला केलीया दाटी गेंदबा ...२
दिवाळीचा दिवा गेंदबा ...२
नामदेव घेतोय पवा गेंदबा ...२
नामदेवाची बाजरी गेंदबा ...२
संक्रातीची ओंबी गेंदबा ...२
शिमगा येतोय झोंबी गेंदबा ...२
शिमग्याची कशी गेंदबा ...२
पाडवा येतोय अशी गेंदबा ...२

अशा प्रकारे दुसऱ्या वर्षाची सणाची चाहूलच यात दिसून येते. परिशिष्टामध्ये दिवाळी व होळीची गाणी पुष्कळ दिलेली असल्याने त्यांचा फारसाप्रपंच येथे केलेला नाही.

**(३) नवरात्र आणि दसरा (विजयादशमी) –** दिवाळी आणि शिमगा या खालोखाल महत्त्वाचे दिवस म्हणजे नवरात्राचे होत. कळसूबाई, पट्टाआई, घोरपडेआई, आणि उसुबा, म्हसुबा, बिरोबा, या सर्वच ठिकाणी घट बसविले जातात. माळांना सुरुवात केली जाते. पाचव्या माळेला या भागात फारच महत्त्व आहे. कळसूबाईची पाचवयि माळेला जत्रा असते. कळसूबाईसारख्या शिखरावर व पट्टाआईसारख्या उंच ठिकाणी या दिवशी आवर्जून जाण्याची प्रथा आहे. जणू पावसाळ्यानंतर डोंगरावर जाण्याची ही सुरुवात चवथ्या माळेला ठाकर वर्षभरातील पहिला 'कांबडवणा' नव्याने सुरु करतात. असे सांगितले जाते.

**रंगाण रंगाण ऽ हे[२०]**
**मातीचं रंगाण ऽ हे**
**येई रंगणात आजच पायी दिला ऽऽ हे**
**आजच नाचु केला ऽऽ हे ।।**

असे म्हणून जे नाचाला सुरुवात करतात ते सर्व रात्र जागवितात. यावेळी



स्त्रियादेखील नाचतात. ठाकरांना गावोगाव हे नाच करण्यासाठी बोलाविले जाते. माळांच्या मिरवणुका निघून लेझीमच्या आवाजात माळा देवीला अर्पण करण्यात येतात. नवरात्राचे नऊ दिवस अनेक लोक कडक व्रत पाळतात. या दिवसात 'भगत' मंडळींची फारच चलती असते. दसऱ्याच्या दिवशी नवरात्र संपते आणि मग सीमोल्लंघन साजरे केले जाते. या भागातदेखील आपट्याची पाने सोने म्हणून लुटण्याची पद्धत आहे. घरोघरी जाऊन भाऊबंदांना सोने देण्याचा प्रघात आहे. मोठी माणसे मुलांना सोने देतात अशी चाल या भागात आढळते. भाऊबंदांची उरभेट होते. चहापाणी होते. या दिवसाचे मुख्य पक्वान्नदेखील पुरणपोळी समजावे. नवमीचे दिवशी गोंधळी लोकांना बोलावून गोंधळ घालण्याची प्रथा याही गावातून प्रचलित दिसते. अष्टमीचा होम मात्र या भागात कोठेच दिसत नाही. अष्टमीला खोबऱ्यांच्या वाट्यांची माळ देवीला वाहाण्याची प्रथा काही ठिकाणी आढळते. नवरात्रात सारी भुते मुक्त असतात, ही समजूत या भागातदेखील रूढ आहे. शमीच्या झाडाचे महत्त्व त्या भागात तितकेसे दिसत नाही. पुरुष सीमोल्लंघन करून आल्यावर त्यांना ओवाळण्याची चाल सर्वच ठिकाणी प्रचलित दिसत नाही. देवीच्या स्थानाला लोक मुद्दाम दर्शनाला येताना दिसतात. अष्टमी-नवमीला बळी देण्याची प्रथा काही ठिकाणी प्रचलित दिसते. अशा प्रकारे दसरा सण साजरा केला जातो.

दसऱ्याच्या निमित्ताने घरांना तोरण आणि झेंडूच्या फुलांच्या माळा लावल्या जातात. तुळस ही देखील शोभिवंत केली जाते.

**(४) संक्रांत –** संक्रांतीचा उत्सव या भागात पुष्कळच प्रचलित झालेला दिसतो. 'तीळ घ्या गूळ घ्या, ग्वाड बोला' हे वाक्य प्रत्येकाच्या तोंडी त्या दिवशी ऐकू येते. लहानथोरांना तीळगूळ देतात. हलवा करण्याची पद्धत नाही एवढेच नव्हे तर तीळगूळ तयार न करता तीळ आणि गूळ वाटण्याची प्रथा आढळते. तीळगुळाने स्नेहपूर्ण संबंध जोडले जातात ही भावना या भागात देखील प्रचलित आहे. बायकांची वाण देण्याची प्रथा या भागातदेखील कानड्यांमध्ये विशेष प्रचलित आहे. कोळी आणि ठाकरदेखील त्याचा अवलंब करतात. बोरे, हरभऱ्याचे घाटे आणि गव्हाच्या ओंब्या 'सुगडा'त घालून त्याचे वाण दिले जाते. देवापुढेदेखील ठेवले जाते. तीळ लावून केलेल्या भाकरी, वांग्याची भाजी, गुळाच्या पोळ्या, पुरणपोळ्या, धीरडेगुळवणी असे पदार्थ या सणाला केले जातात. कुरडया, पापड्या, भजी असे तळणदेखील असते. तांदळाची खिचडी मात्र फारशी प्रचलित दिसत नाही. संक्रांतीला नवी पातळे नेसण्याची व एकमेकींना हळदीकुंकू देण्याची

प्रथा या भागात देखील आढळते. गव्हाच्या ओंब्याचे तोरणदेखील काही भागात आढळते. यादिवशी गाणी वगैरे म्हणण्याची प्रथा नाही. रात्री भजन किंवा भारूड असते. भोपे किंवा देवीचे भगत संक्रांत कशावर आहे ते सांगतात. रावळ गोसावी घरोघर जाऊन शिधा घेतात.

**(५) आखिती (अक्षय्य तृतीया)** – हा देखील एक महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी सर्व शुभ कार्याचा प्रारंभ केला जातो. जमीन खरेदी, घरबांधणीचा मुहुर्त या गोष्टी यादिवशी केल्या जातात. सामाजिक हिताची काही सामुदायिक कामेदेखील या दिवशी केली जातात. या दिवशी पुरणपोळी या पदार्थाचे विशेष महत्त्व मानले जाते.

**(६) वर्षप्रतिपदा** – हा सणदेखील अक्षय्य तृतीयेसारखाच मानला आहे. गुढी उभारण्याची प्रथा या भागात दिसते. या गुढीला कडा, गाठी घातली जाते. या दिवसापासून लग्नांच्या ठरवाठरवीला प्रारंभ होतो. म्हणून या सणाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी बऱ्याच ठिकाणी गोड भात. साखरभात करण्याची प्रथा दिसून येते. गुढीची पूजा केली जाते. येथून पुढे सप्त्यांची सुरुवात होते. यात्रांची सुरुवात होते. त्यादृष्टीनेदेखील या सणाला विशेष महत्त्व दिले जाते.

वर्षातील सर्व प्रमुख सणांची थोडक्यात माहिती मिळविण्याचा येथपर्यंत प्रयत्न केला. आता स्थानिकदैवते व त्यांचे उत्सव यांची थोडक्यात माहिती घेवू.

**स्थानिकदैवते व त्यांचे उत्सव आणि कुलदैवते –**

या भागातील लोकांना स्थानिकदैवतांचे महत्त्व अधिक असले तरी खंडेराज व तुळजापूरची भवानीमाता आणि शिवशंकर ही त्यांची कुलदैवते आहेत. या दैवतांची ठाणी त्यांनी अगदी आपल्या गावाजवळ आणून त्यांच्यावर स्थानिकदेवता निर्माण केल्याचे दिसते. या भागातील प्रमुख स्थानिकदैवते म्हणजे कळसुबाई, घोरपडाबाई, म्हसोबा किंवा मसराज, बिरोबा, खंडोबा, काळोबा ही होत. यांचीच ठाणी निरनिराळी आहेत. पट्टाआई, निळवंढे येथील मिल देवी व टहाकारीची देवी व म्हाळादेवी ही देखील काही लोकांची कुलदैवते आहेत. या प्रत्येक दैवतांच्या मागे दैवतकथा आहेत. ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. या दैवतकथा म्हणजे त्या दैवतांचे जयग्रंथच म्हणावे लागतील. या दैवतांचा उल्लेख निरनिराळ्या गाण्यातून केला जातो. गाण्यांची ठेवण मात्र सारखीच असते. भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, हरिश्चंद्र, अमृतेश्वर, टाकेद ही या लोकांची तीर्थस्थाने आहेत. या तीर्थस्थानांविषयी अपरंपार भक्तिभाव त्यांच्या अंतःकरणात दिसून येतो. या तीर्थस्थानाशी निगडित



अशा महाभारत, रामायण व पुराणे यातील सबद्ध कथा अंतःकरणपूर्वक सांगितल्या जातात. त्यांच्या गाण्यातून त्यांची प्रचिती येते. 'तातोबाचा मठ' हे स्थान असेच आहे.

**जत्रा व यात्रांचे स्वरूप –**

वर उल्लेखिलेल्या दैवतांच्या जत्रा व यात्रा भरतात. यात यात्रा बहुधा पौर्णिमा किंवा अमावस्या या दिवशी भरतात व श्री शंकराची यात्रा मात्र 'शिवरात्र' या दिवशीच असते.

जत्रा म्हणजे सबंध वर्षाचा बाजार असेव स्वरूप पूर्वी असे. पावसाळ्यात लागणारे सर्व मीठ, मिरची इत्यादी पदार्थ या जत्रेतून खरेदी करून ठेवण्याची प्रथा होती. ही जत्रा साधारणतः तीन दिवसांची असे. जत्रा म्हटली की तमाशे आलेच. टेंभ्यांवरील नाचे पोरांच्या तमाशांची प्रथा या भागात फार जोरात आहे. प्रत्येक गावाला तमाशा मंडळी असतेच असा जणू संकेत. त्यामुळे एकेका जत्रेला सात–सात, आठ–आठ तमाशेदेखील एकावेळी उभे राहिलेले पाहावयास मिळतता. जत्रेत डिंक, मध यांची मोठ्या प्रमाणावर व्यापाऱ्यांकडून खरेदी होते. आदिवासी लोक डिंक किंवा मध वगैरे देऊन तसेच तांदुळ देऊन आपल्याला आवश्यक त्या गोष्टी खरेदी करताना दिसतात. जत्रा म्हटली की बळी आलेच. बोकड, कोंबडे हे त्यातले बळी असतात. अगदी पूर्वी क्वचित नरबळी देण्याची प्रथा या भागात प्रचलित होती किंवा काय अशी शंका 'काळोबाचा बळी' या आख्यायिकेवरून येते. अलीकडे मात्र 'नारळावर' सारे भागविले जाते. जत्रेमधून गुळाचादेखील प्रचंड प्रमाणावर व्यापार होताना आढळतो. वेळूच्या काठ्या हेही जत्रांचे वैशिष्ट्य असते. आंघोळ करून गंध लावून घेणे ही मोठी हौसेची बाब आहे. मुलांना गाडे, बैल वगैरे लाकडी खेळणी घेऊन देण्याची तसेच कपडे, पाट्या, रांजण खरीदण्याची देखील एकच घाई उडालेली दिसते. या जत्रांना लोक आपापल्या गाड्या जुंपून सहकुटुंब येताना दिसतात. परंतु या भागात अनेक ठिकाणी गाड्या जात नाहीत. त्यामुळे पायीदेखील जातात. अशा वेळी खांद्यावर व बोटाशी पोरांचे लोढणे असते. देवाला केलेले नवस यावेळी पुरे करण्यासाठी एकच धांदल उडते. हे नवस कधीकधी रीण काढून सण साजरा करण्याच्या प्रकारासारखेदेखील फेडले जातात. लोटांगण वा दंडवत घालीत देवापर्यंत जाणे, हातावर चालत जाणे, नाक घाशीत जाणे, लोळण धेत देवापर्यंत जाणे असे कितीतरी प्रकार या नसात असतात. याप्रसंगी भगत मंडळींना फारच किंमत आलेली असते. खरे देव जणू तेच असतात. जत्रांचे स्वरूप या बळींमुळे आणि नवस फेडण्याच्या पद्धतीमुळे व

भगतांच्या घुमण्यामुळे थोडे भीतीदाकच वाटते. जत्रेचा हिंसा हा आत्मा असतो.

यात्रांचे स्वरूप बाजारच्याबाबतीत जरी जत्रांसारखेच असले तरीसुद्धा देवदर्शनाच्या बाबतीत अत्यंत प्रसन्न व शांत असते. इकडील यात्रा म्हणजे शिवरात्र. या दिवशी सर्वांना एकादशीसारखा उपवास असतो. त्यामुळे हा उपवास जास्तीत जास्त काटेकोरपणे करणे, तीर्थात पहाटेच स्नान करणे याकडेच लोकांचे अधिक लक्ष असते. त्यामुळे यात्रांना धार्मिकदृष्ट्या जत्रांइतकेच स्थान आहे. या यात्रांमधून काही ठिकाणी तमाशे न नेण्याची प्रथा आहे हेदेखील लक्षात घेण्यासारखे आहे.

बहिरोबा, काळोबा, खंडोबा, म्हसोबा ही दैवते एकाच प्रकारची असल्याने या सर्वांच्याच ठिकाणी तळी भरून सदानंदाचा येळकोट केला जातो व या सर्वच ठिकाणी तमाशाची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने तमाशाला असलेले सांस्कृतिक स्थान फार महत्त्वाचे आहे.

**आणखी काही दैवते –**

प्रत्येक घराण्याचा मुळपुरुष किंवा घराण्यात झालेला कर्तबगार पुरुष हा त्या घराण्यात देव होतो. हा देव अर्थातच शेतावर किंवा गावाच्या मारुती मंदिराजवळ किंवा शिवेवर असतो. विशेषतः आदिवासी लोकांमध्ये बरेच दिवस मृतास पुरण्याची चाल प्रचलित होती. त्यामुळे या देवता बऱ्याच निर्माण झालेल्या दिसतात. या दैवतांचीदेखील विशिष्ट पौर्णिमेला किंवा अमावस्येला जत्रा करावी लागते नाहीतर त्याचा कोप होतो. घराण्यातील एखादा माणूस या दैवतांचा उपासक भगत असतो. तो सारे घेऊन घरातील समस्या सोडविताना दिसून येतो.

**लोकांच्या अंधविश्वास –**

डांगाणी लोक अंधश्रद्धाळू आहेत. त्यांचा या दैवतांवर अंधविश्वास असतो. रोगराईपासून हीच दैवते रक्षण करतील अशी त्यांची समजूत असते. गावांचे, घरांचे, गुरांचे ही दैवते रक्षण करतात अशी त्यांची समजूत आहे. एवढेच नव्हे तर पाऊसपाणीदेखील त्यांच्या कृपेने होतो किंवा दुष्काळ याच दैवतांच्या अवकृपेने होतो, असा यांचा समज आहे. त्यामुळे या दैवतांचे वरील प्रकारचे उत्सव करणे हे अपरिहार्य असे कर्तव्य होऊन बसते.

गेलेल्या माणसांची मुले होतात अशी या लोकांची ठाम समजूत आहे. खैस, हडळ, मुंजा, समंध, चेडा, भुताळी इत्यादी भुतांचे प्रकारदेखील सांगितले जातात. हे निरनिराळे प्रकार का यांचेसुद्धा विश्लेषण केले जाते. उदाहरणार्थ, पुरुषाची वासना अपूर्ण राहिली तर खैस होतो. बाळंतीण मेली तर हडळ होते.



मुंजा हा कामवासनेने पिडलेला तरुण अविवाहित मेल्यास त्यापासून होतो. अशा समजुती आहेत. त्यामुळे अर्थातच या भुतांपासून त्रास होऊ नये म्हणून मांत्रिकांचे समाजातील स्थान एखाद्या कुलपुरुषासारखे महत्त्वाचे असते. ही मुले तर उन्हाच्या सुमारास व काळोच्या रात्री तसेच पौर्णिमेला उठतात व त्यांच्या फेऱ्यात सापडल्यास ती झपाटतात. त्यांचे वारे संचारते. वगैरे गोष्टींविषयी त्यांची ठाम समजूत आहे. या सर्व भुतांविषयी पुरावे ते देत असतात. त्यांच्या जागा ते दाखवित असतात.

चेटूक या गोष्टीवरदेखील त्यांचा पूर्ण विश्वास आहे. चेटूक ही एक दैवी जादू आहे आणि याचा उपरोग शत्रूचा नाश करण्यासाठी होऊ शकतो. ही चेटूक व भानामतीची विद्या मांत्रिकांना ज्ञात असते. ही कोकणी विद्या असून जव्हार हे जणू त्याचे विद्यापीठ आहे. वांझ स्त्रिया, विधवा, मांत्रिक असे लोक या विद्या शिकून घेताना दिसतात. माणसांचे प्राण्यात रुपांतर करून ठेवता येते असे हे लोक या चेटूकविद्येचे महत्त्व सांगतात.

एकूण या भागातील लोकांची अंधश्रद्धा ही पराकोटीला पोहोचलेली आहे हे निर्विवाद. अंध असली तरी श्रद्धेतूनच दैवते हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग असते आणि म्हणूनच त्यांचा उल्लेख निरनिराळ्या गाण्यातून आढळतो. अशी गाणी खाली वानगीदाखल देण्याचा प्रयत्न केला आहे.

**देवूमसराज सत्याचा सागर**[२१]
**येऊन देईना गर्बी या नारीला डोंगर ।।**
**गाव पाचपट्टा तुझ्या येत्रीत बागुल**
**पहिल्या खेपाची मसराजाला आंघुळ ।।**
**देवूमसराज पयरी पायरी नेमाची**
**येंगुन देईना जोडी पहेलवानाची ।।**
**नवस बोलिले मी मनीच्या मनात**
**देवूमसराजा मला पावला जनात ।।**
**देवूमसराजा तुझी करीतो मी सेवा**
**मनी उमजावा गादीला धनी ठेवा ।।**
**नवस बोलीला मी याच्या द देवळी**
**देवाचे देऊळ मी झाडीन केसानी ।।**
**नवस बोलले चत्राशिंगीच्या लाडीला**
**सर्पाचे कासरे वाघ जुतले गाडीला ।।**

पाचपट्टा येथील म्हसोबाच्या स्थानाविषयी वरील गाणे पाहिल्यावर आता टाकेद

येथील रामकुंडावरील यात्रच्या निमित्त आंघोळीची जी गर्दी उडते त्याविषयी गाणे पाहू.

**रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा[२२]**
**हिरवा मंडप जाईचा ।।**
**आंघुळीला आला ग आई मेळा कोणा बाबांचा ।।**
**रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा**
**आंघुळीला आले मेळा कोळणी बायांचा ।।**
**रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा**
**आंघुळीला आला मेळा ठाकरणी बायांचा ।।**
**रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा**
**आंघुळीला आला मेळा गुजरणी बायांचा ।।**
**रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा**
**आंघुळीला आला मेळा कानड्या बायांचा ।। इत्यादी.**

असे किती तरी मेळे आंघुळीला येतात.

**प्रवराच्या कडाला – कडाला बाई तातोबाचा मठ[२३]**
**बाई तातोबाचा मठ ।।धृ।।**
**त्याही मठात, बाई मठात झाडाचेना खांब**
**बाई झाडाचेना खांब ।।**
**त्याही खांबाला बाई खांबाला पाळणा टांगीला**
**बाई पाळणा टांगीला ।।**
**त्याही पाळण्यात बाई पाळण्यात सीताचा फडकी**
**बाई सीताची फडकी ।।**
**त्याही फडकीत बाई फडकीत निजे लवकुश**
**बाई निजे लवकुश ।।**
**त्याही हलवाया बाई हलवाया वाल्मिकऋषी**
**बाई वाल्मिकऋषी ।।**
**त्याही बाळण्याला बाई रेशमाची दोरी**
**बाई रेशमाची गोरी ।।**
**त्याही दोरीला बाई दोरीला चापीची घुंगरा**
**बाई चापीची घुंगरा ।।**
**घुघराच्या नादाना बाई नादाना निजे लवकुश**



तातोबाच्या मठाशी निगडित लवकुशांची कथा पाहिली. आता सर्व देवतांना दंडवत घालणाही हा भाविक स्त्री जात्यावर ओव्या म्हणता –

**पहिला माझा दंडवत बाई पहिला माझा दंडवत[२३]**
**पहिल्या विराणी ।।**
**लागले भजनी कळसाईच्या ।।**
**कळसाईचा डोंगर कड्याने येंगना**
**निश्चय ढळना दर्शन घियाचा ।।**
**दुसरा माझा दंडवत बाई दुसरा माझा दंडवत**
**हरिचंद्राच्या महादेवा ।।**
**लागले भजनी महादेवाच्या**
**महादेवाचा उपास करीता करवनी**
**निश्चय ढळनी उपासाचा, उपासाचा ।।**
**तिसरा माझा दंडवत बाई तिसरा माझा दंडवत**
**रणदाच्या खाली ।।**
**लागे चरणी घोरपडाईच्या ।**
**घोरपडाईचा नवस फेडता फेडवनी**
**सोन्याचे जावाळ काढीले जाऊनी ।।**
**चवथा माझा दंडवत बाई चवथा माझा दंडवत ।**
**कोदनीच्या जवळी ।।**
**तातोबाची सावूली माला मिळावी**
**तातोबाची सावूली मिळता मिळानी**
**सीतापाई माऊली पाह्यली तेथ ।।**
**पाचा माझा दंडवत बाई पाचा माझा दंडवत**
**हात जोडून अमृतेश्वराला ।।**
**अमृतेश्वराचा तीरथ घेतला**
**संसार सांडिला आवडीने ।।**
**साहा माझा दंडवत बाई साहा माझा दंडवत**
**टाकारीच्या आईला ।।**
**भवानीमातेला पाहिला तेथ**
**भवानी माताचा देऊपाह्येला**
**अन–भाव फिटला जलमीचा ।।**

**साता माझा दंडवत बाई साता माझा दंडवत**
**टाकेदा खालती ।।**
**तीरथात नाले काशीच्या त्या**
**काशीचे तीरथ रामाना आणिलं**
**जटायुच मरान चुकला जटायुचा ।।**
**आठा माझा दंडवत बाई आठा माझा दंडवत**
**नासकाच्या खालती ।।**
**पाही डोळ्यांनी तिरबंकाला**
**देवाचा प्रसाद माहेना घरात**
**म्हादेव दारात येती माझ्या**
**नवा माझा दंडवत बाई नवा माझा दंडवत**
**मनाच्या मनात ।।**
**लागले चरणी आत्मारामा**
**जलमाचा फेरा चुकावा येऊन**
**आले मी शरण आत्माराम ।।**

दळताना लागलेली दैवतांची ही ओढ असली की जाते हलके जाते आणि जीवन सुलभ होते हेच खरे.

अशी कितीतरी गाणी ऐकावयास मिळतात की त्यातून या डांगाणी लोकांची सबद्ध मन डोकावित असते. गावागणित यात फरक होतो. देवागणित दंडवत पडतो.

**पितृपंधरवडा आणि वीराचा पाडवा –**

वरील सर्व सण उत्सव दैवते व त्यांचे उत्सव यांपेक्षा हे प्रकरण अगदीच वेगळे आहे. पितृपंधरवडा यास पीतरपाठ म्हटले जाते. या पंधरा दिवसातील विशिष्ट तिथींना पित्र घातले जातात. सोयऱ्याधायऱ्यांना, गावकऱ्यांना 'पीत्रां' खायला बोलावले जाते. तांदळाची खीर, पोळी, डाळ भात शिजतो, पितरांचे गंध लागते आणि कचवळ्यांना घास दिले जातात. मुले त्याला खिजवतात–

**काळ्या कचवळ्या रे का – का – का करिसी**[२४]
**का – का – का करीसी**
**खिळे तुकडे मोडून खासी रे मोडून खासी**



**खिळ्या तुकड्याची रं भरली धडाडी भरली धडाडी**
**तुझी माझी रे होऊंदे लढाई होऊंदे लढाई**
**पित्राच्या येळला आजे पंजेचा मान राखीसी,**
**मान राखीसी**
**पोरांच्या हातातल्या रे भाकऱ्या भाकऱ्या चोरीसी**

भाऊबंद जेवून तृप्त होतात आणि पित्र संपतात. वीराच्या पाडव्याला वीर निघतात. वीर म्हणजे घराण्यात होऊन गेलेले कर्तृत्ववान पुरुष किंवा वीरपुरुष. त्यांची सोंगे घेऊन किंवा वाघासारखे अंगावर चट्टपट्टे काढून हे वीर निघतात. त्यांची मिरवणूक गावातून निघते व त्या वीरांची पूजा केली जाते. कधीकधी हे वीर वारे घेतात. मग त्यांना घरातील समस्यांविषयी विचारले जाते व ही कोंडी हे वीर सोडवितात. अलीकडे मात्र ही वीरांची पद्धती संपुष्टात येऊ पाहात आहे. या उत्सवाला त्यामुळे आता फारसे महत्त्व राहिलेले नाही.

एकंदरीत डांगाणी लोकांची धर्मसंस्कृती ही संमिश्र प्रकारची आहे. त्यात प्राणीपूजा आहे तशीच हिंदूंचे सर्व सण साजरे करून हिंदूदैवते पूजनदेखील होते. त्यात त्यांच्या श्रद्धा गुंतलेल्या आहेत.

गेल्या सातआठशे वर्षापासून पंढरीचा पांडुरंग हा या संस्कृतीचेदेखील अविभाज्य अंग बनले आहे. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम या संतमंडळींचा कसा कोण जाणे भलताच प्रभाव या मंडळींवर पडला आहे. अनेक महादेव कोळी माळकरी झालेले दिसतात तर स्त्रियांच्या ओव्यांमधूनही संतवाणी बाहेर पडते. या ओव्या अर्थातच अगोदरच्या असाव्यात. संतांनी या ओवीला भक्तिभाव अर्पण केला आणि या अंधश्रद्धा भाबड्या लोकांना या ओवीतील अमोल ठेवा अधिकगवसला. 'जात्यावर असले की ओवी आठवते' या म्हणीप्रमाणेच खरोखर जात्यातून पीठ पडत असतानाच 'अंतरीचु शुद्ध स्वभावे बाहेरी' मुखातून ओव्या बाहेर पडतात. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट जाणवते ती म्हणजे माणसाची सुसंस्कृत होण्याची इच्छा. आपण पुढारलेले आहोत, आपण श्रेष्ठ मानव आहोत असे त्याला म्हणावेसे व असावेसे वाटते. कोणी याला ब्राह्मणीकरण होणे म्हणतात. परंतु प्राणी पूजनाकडून श्रेष्ठ मानवी मूल्यांकडे मानवाचा प्रवास हा स्वेच्छेने व मनस्वी चाललेला असतो. हीच गोष्ट या संतसंदर्भाच्या बाबतीत व विठ्ठलनामस्मरणात आहे. वस्तुतः ज्या ओव्या येथील स्त्रिया गातात त्या संतांच्याच असतात असे नाही. परंतु संतांच्या आश्रयाने त्या मुखातून येतात.

एवढे मात्र निश्चितच ध्यानी घ्यावे लागेल. वारकरी संप्रदायाचे जे तत्त्व –

**विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेदभ्रम अमंगळ ।**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**

हे या लोकांना आवडणारे, परमेश्वराजवळ नेणारे, आत्मविश्वास वाढविणारे निश्चित आहे. शांती, तृप्ती, प्रीती या गोष्टींचा वारसा संत संगतीतून, भगवत्भक्तीतून लाभतो हे लक्षात घेता संतांचा जो संदर्भ सामान्य जीवनातील रोमारोमात भिनलेला दिसतो तो विस्मयकारक वाटत नाही तर अगदी नैसर्गिक वाटतो.

हरिनामाचा अखंड गजर स्त्रिया आपल्या जात्यावरील ओव्यातून करीत असतात आणि त्याला साथ करीत असते जनाबाई. तर पुरुषदेखील मुखाने हरिनामाचा, विठ्ठलाचा गजर करीत असतात. गाव तेथे भजनी मंडळ अशी जी आजची व्यवस्था दिसते ती यातूनच निर्माण झाली असावी. दिवसभराच्या श्रमानंतर हरिभजनात रंगून जीवनाला विरंगुळा मिळविणे ही गोष्ट सर्वांनाच हवीहवीशी वाटते. मनोरंजन, ईश्वरचिंतन आणि ज्ञान या साऱ्या गोष्टी यातून साध्य होतात.

डांगाणातील स्त्रियांच्या तोंडी असलेल्या ओव्यांतून जे संतसंदर्भ असतात ते ते बहुशः मनःपूत असतात. अशिक्षितांचे ते सुजाण बोल असतात. संतांच्या ओव्या त्या गात नाहीत तर त्यांचे मन ओवी गाते आणि संतांची आठवण करून देते. जणू गुरुविणा ज्ञान नाही याच विचाराने असे होत असावे.

ज्यांनी गळ्यात माळ घातली आहे ते लोक वारकरी संप्रदायाचे सर्व संकेत व परंपरा पाळतात. टिळे, माळा व वारी पताका या गोष्टी ते करतात. गावागावातून हरिनामसप्ता साजरा होतो. पहारे दिला जातात. कीर्तन, भजन, भारूड यांच्या गजराने आसमंत भरून जातो. आषाढी-कार्तिकी एकादशी अत्यंत काटेकोरपणाने पालन केल्या जातात. जणू वाल्मिकीने वाल्याचा द्वाडपणा सोडला तसे हे लोकदेखील अनेक वर्ष जगलेले हिंसात्मक जीवन सोडून ब्रह्मत्वाकडे वाटचील करीत असावेत. या संतसंदर्भाचे काही वानगीदाखल नमुने पुढे दिले आहेत.

**पहिली माझी ववी ग तुळशीच्या पाना**[२५]
**सेवा करी कृष्ण काना तू ये रे बा विठ्ठला ।।**
**दुसरी माझी ववी ग तुळशीचा नेम**
**तुळशीखाली झोपे राम तू ये रे बा विठ्ठला ।।**
**तीसरी माझी ववी ग तुळशीचा भार**
**वैष्णवाच्या गळ्यात हात तू ये ते बा विठ्ठला ।।**



**चवथी माझी ववी ग तुळशीचे चरण**
**तेहेतीसकोटी देव शरण तू ये रे बा विठ्ठला ।।**
**पाची माझी ववी ग तुळशी पतिव्रता**
**ब्रह्मविष्णूवरीसता ये रे बा विठ्ठला ।।**

**सकाळी उठूनी जाऊया पंढरी**[२६]
**पंढरी जाऊन उभे राहू विटेवरी ।।**
**जाईल पंढरी उभी राहील घोंड्यावरी**
**नदर माझी गेली रुक्मीनीच्या गोंड्यावरी ।।**
**जाईल पंढरी उभी राहील चिचावरी**
**नदर माझी विठ्ठलाच्या तुऱ्यावरी ।।**
**माझ्या दर्शनाची चिंता पडली हरीला**
**पंढरी जाऊन काही वेड्याला पाहिला ।।**
**आईबापाघरी पंढरी प्यालं याड**
**तीरीत काही केल? पायच दिल भाड ।।**
**पंढरी करावा आईबापाच्या पून्यांनं**
**अंघूळ करावा चंद्रभागेच्या पान्यानं ।।**
**पंढरी करावी आईबापाच्या पासूनी**
**अंघूळ करावा चंद्रभागेत बसूनी ।।**
**चंग्रभागे नदी निसरती माझे पाय**
**मला ना हात दे विठ्ठलाची जन्याबाय ।।**
**चंद्रभागे मदी निसरती माझी बोटं**
**मलाना हात देया विठ्ठलाच्या जने उठ ।।**
**जाईल पंढरी पाहील पायरी नामाची**
**विठ्ठलाच्या आंधी भेट गरुडखांबाची ।।**

यानंतर तुकाराम आणि जीजा हा संवाद पाहा –

**तुकाराम बोल, ''जीजा, कुकू लाव उभा ।।**[२७]
**आले विमाईन बसून जाऊ दोघा ।।''**
**तुकाराम बोले, ''कुकू लाव तू टिकला ।।**
**आले विमाईन, कसा जाऊ मी एकला?'' ।।**

**तुकाराम बोले, ''आली विमान नियाला'' ।।**
**विमानला पानी जीजा बसली नहायाला ।।**
**जीजाला फणी आणा हातीच्या दातांची**
**तुकाराम बोले, ''जीजा कुरळ्या केसांची'' ।।**
**तुकाराम बोले, ''जीजाला नाही कोणी**
**घेतली फणी घातली जीजाची येणी ।।''**
**तुकाराम बोले, ''जीजा तू माझी बायकू**
**विमानात बाया नको जगाचं आयकू'' ।।**
**तुकाराम बोले, ''जीजा तू विमानात चाल**
**माग राहिल्याना होतील तुझे हाल'' ।।**

हा संवाद वाचताना स्पष्ट जाणीव होते ती ही की, संतांचे या लोकांच्या जीवनातील स्थान अविभाज्य होऊन बसले. संतांवर सामान्य जनांच्या भावना लादण्याची धिटाई ही पूर्ण प्रेमाशिवाय होत नाही.

विठ्ठलाच्या स्वरूपाविषयीच्या कल्पना पुढील ओव्यात फार मार्मिक आणि भावपूर्ण रीतीने स्पष्ट झाल्या आहेत.

**पंढरीचा विठू ग किती आहे काळा**[२८]
**अवघ्याना सृष्टीच्या उभ्या उभ्या पड गळा ।।**
**पंढरीचा विठू किती आहे ग घट्ट**
**अवघ्याना सृष्टीला उभ्याना देतो भेट ।।**
**विठ्ठलाशेजारी राही रुक्मीण बसान**
**अमीरबुक्याची तिला गरदी सोसान ।।**
**पंढरपुरात बुका विकतो शेरानं**
**विठ्ठलाशेजारी रुक्मीन बसली भारानं ।।**
**पंढरपुरात पैशाच्या माळा नऊ**
**पुरना माझा हात विठ्ठला खाली लवू ।।**
**पंढरपुरात पैशाच्या माळा वीस**
**पुरान माझा हात विठ्ठला खाली बस ।।**
**पंढरपुरात घरोघरी एकादशी**
**रताळाच्या पाट्या पाट्या गरुड खांबाशी ।।**



**पंढरपुरात एकवाटा वाणीयाचा**
**जाईल पंढरी वाळवंटात राहील**
**वाळवंटात राहील चंद्रभागेत माईल ।।**

पुढचे गाणे वाचले तर सारे जीवनच कसं संत-मय व विठ्ठल-मय झाले आहे ते दिसून येईल.

**जनी जाते ओ शेनाला**[२९]
**उभा पाठीमागे काना**
**''जने, येऊदे ग मला**
**शाण वेचु लागने तुला''**
**घालून पितांबराची काच**
**शाण येचू चहू बाज**
**शाण येचून बांधली म्वाट**
**काना देतोय मोटला पाठ**

**जन्याबाई साळी सडी**[३०]
**नामदेव मुसाळ धरी**
**''नामदेवा कुसुमाळ सोड**
**हाता येतील तुझ्या फ्वाड''**
**''फ्वाड आले तर येऊंद्या**
**साळी कांडून घेऊंद्या''**
**पंढरपुरी चोरी झाली**
**विठ्ठलाची पताका नेली**
**आळ आला या जनीवरी**
**जनी नेली सूळापाशी**
**सूळाचा ग झाला पाणी**
**जनी पळ आडरानी**

**पताका पड धरनीवरी**
**जन पळ आड रानी ।।**

अशी कितीतरी गाणी देती येतील. ही सारीच गाणी मनस्वी आहेत. डांगाणातील लोकजीवन पूर्णतः डोळ्यासमोर भावपूर्णतेने उभी करण्यास समर्थ आहेत. अशा तऱ्हेच्या उत्कट भावनेतून निर्माण झालेले हे काव्य पूर्ण मुक्त आहे, म्हणूनच ते अपौरुषेय आहे असेच म्हणावे लागते.

**कला –**

एकूण सारा डांगाण परिसर दारिद्र्याने पिडलेला असल्याने कलांची जोपासना येथे नाही. त्यांना काबाडकष्ट अहोरात्र करावे लागल्याने तेवढा वेळदेखील मिळू शकत नाही. नाव घेण्यासारखी एकही कला दिसत नाही. कला या सदरात मोडेल असा महत्त्वाचा एक प्रकार येथे आढळतो; तो म्हणजे नृत्य.

**(१) नृत्य** : नृत्याचा ठाकरांचा या भागातील प्रसिद्ध प्रकार म्हणजे 'कांबडवणा' (कोंबड नाच). ढोलावरील थाप ऐकताच ठाकर पुरुषमंजळीत एक चैतन्य निर्माण होते आणि ढोलियाभोवती ते विजेच्या चापल्याने रात्र रात्र नाचतात. खाली वाकून फेरात नाचणे, कोंबड्याची बैठक घेऊन नाचणे, पाठीवर हात ठेवून नाचणे, गिरकीचा नाच, हात व पाय उडवून नाचणे असे कितीतरी अंगविक्षेप गात केले जातात. या साऱ्यात वैशिष्ट्य असते ते म्हणजे सणाचाही थकवा भासत नाही आणि क्षणभरही जमिनीला पाय लागत नाही. जेव्हा हे उलटसुलट पळू लागतात तेव्हा तर बहार येते. या साऱ्या नाचाला एक विशिष्ट ताल आहे. एक विशिष्ट लय आहे. या ठेक्यावरच एकेबाजूला गाणे म्हणणारे ओरडून ओरडून विशिष्ट प्रकारचे हेल काढून गाणी म्हणत असतात. त्या नाचात ते सर्व देवांना प्रणाम करतात आणि सर्वांना आवाहन करतात. एरवी ओबडधोबड वाटणारे हे लोक आणि त्यांची गाणी त्यावेळी मशालीच्या प्रकाशात आणि ढोलियांच्या थापेच्या नादात मात्र स्वर्गीय आनंद निर्माण करून देतात. कधी रानातल्या वादळाप्रमाणे त्यांची हेलकावे घेऊन पळण्याची घाई असते तर कधी विजेच्या चपळाईने ते गिरकी घेतात. पावसाच्या भराभर येणाऱ्या सरींसारखे त्यांचे एका पाठोपाठ अंगविक्षेप नव्या नव्या आकृतीतून व्यक्त होत असतात. आणि त्याचबरोबर भावनावेगाने गाणारा गात असतो. त्याच्या गाण्यामुळे ढोलियाला ठेका आला की ढोलियाच्या ठेक्याने गान स्फुरले की नाचातून या सर्वांचा जन्म झाला की त्या तालबद्धतेने नाच स्फुरला काही समजत नाही. डोळ्यासमोर दिसतात फक्त नाचणारे खेळगडी. गाणारी गाण्याची तान घेतो आणि धरतीमातेला आपल्या आईला वंदन करून हे नाचावयास सुरुवात करतात –



**रंगाणऽ रंगाणऽऽऽ हे[३१]**
**मातीच रंगाणऽऽऽ हे**
**येईऽ रऽ रंगणात**
**आजुच पायी दिलंऽऽ हे**
**आजुच नाच केलंऽऽ हे**
**धुळवूडा उडईलाऽऽ हे**
**गंगणाला केलाऽऽ हे**
**चंद्रसूर्या झाकोळलाऽऽ हे**

**(२)**
**धरते तू मात[३२]ऽऽ**
**रुसवा ना धरी जोऽऽ**
**रुसवा ना धरी जोऽऽ**
**तुझ्या पाया मी पडतोऽऽ**

**(३)**
**डोंगराची कळसाई[३३]ऽऽ**
**बया कळसाईऽ ग**
**दुधाना ना नालीऽऽ**
**नाली बया या नालीऽऽ ग**
**पीतांबरी नटलीऽऽ**
**बया पीतांबरी नटलीऽऽ**
**दागाना फुललीऽऽ बया**
**बया दागाना फुललीऽऽ ग**

सर्व देवांना आवाहन करून झाल्यावर मग कधीकधी शृंगारालादेखील उधाण येते आणि गाणाऱ्याने आठवण करून देताच एकच गिरकी मारली जाते.

**डांगरीच्या आळ्यावऽऽ**
**पाय भी कसा घावऽऽ**
**शकेमाझ्या मेव्हणीचऽऽ**
**नाव मी कस घ्यावऽऽ**

अशा एकापाठोपाठ अथकपणे गाण्याच्या लकेरींनी सारा आसमंत प्रसन्न होत होत रात्र संपते आणि हा नाच पाहाण्यास दिनमणी उदयाचली येतो.

**बोहाडा–** कांबडवण्याप्रमाणे बोहाडा हा देखील एक नृत्याचाच प्रकार म्हटले पाहिजे. यालाच 'आखाडी' किंवा 'सोंग' असे म्हणण्याचीदेखील प्रथा आढळते. विशेषतः देवीच्या उत्सवानिमित्त हा नाच केला जातो. दैत्य, राम, परशुराम, रावण, गणपती, सरस्वती यासारख्या दैत्य आणि देव यांचे लाकडाचे किंवा लगद्याचे मुखवटे तयार केलेले असतात. ते मुखवटे धारण करून एकेक देवता देवीच्या वा विशिष्ट उत्सवासाठी तयार केलेल्या मांडवामधून नाचत नाचत जाते. हातात तलवार किंवा योग्य असे शस्त्र घेऊन हा नाच मोठ्या ठेक्यावर व पावित्र्यात केला जातो. निरनिराळी सोंगे आपली निरनिराळे वैशिष्ट्य राखून असते. यात शेटजी, भटजीची, अस्वलवाला, माकडवाला यांची सोंगेदेखील काढली जातात. हा आखाडा संपूर्ण रात्रभर सोंगे नाचवित असतो. सोंगावरून लिंबे ओवाळून टाकणे, नारळ फोडणे इत्यादी प्रकारदेखील भावनेनुसार केले जातात. शेवटी महिषासुराचे सोंग निघते किंवा रावणाचे सोंग निघते आणि ही सोंगे संपली की ज्या देवीची जत्रा किंवा उत्सव असेल तिची मिरवणूक काढतात. कधीकधी हे मुखवटे घातले की अंगात येणे असादेखील समज आहे. तसे काही प्रकार घडतातदेखील. कदाचित पूर्वापार असलेल्या श्रद्धोनेदेखील तसे घडते. टहाकारी, पट्टेवाडी या ठिकाणी हे बोहाडे फार गाजतात. सुरुवातीला नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे गणपती व पाठोपाठ सरस्वतीचे सोंग निघते. मग क्रमाक्रमाने एक एक सोंग निघते.

**लेझीम –** लेझीमनाच हे एक डांगाणी लोकांचा खास वैशिष्ट्य आहे. लग्न, यात्रा, जत्रा, उत्सव याप्रसंगी निघणाऱ्या मिरवणुकांत लेझीम रंगते. वरातीच्या वेळी किंवा दिवाळीत तर कधी कधी पहाटपर्यंत हे लेझमाचे डाव चालतात. दम कसा लागत नाही हाच मोठा प्रश्न पडतो. लेझीम खेळतानाची हालचाल ही साधारणतः कांबडावणासारखीच असते.

**टिपरीनृत्य –** टिपरीनृत्याचा प्रकार काही भागात आढळतो. परंतु लेझीम आणि टिपरी यांच्या खेळात अतीव साम्य असते. गुजराती लोकांच्या टिपरीनृत्याशी हे नृत्य बरोबर करू शकणार नाही.

**(२) विणकाम –** ही एक दुसरी कला या भागात मोडते. अर्थातच हे विणकाम कापडाचे नाही; तर वाघुराचे किंवा जाळ्यांचे. ससे, कोल्हे धरण्यासाठी जे जाळे असते त्यास वाघुर असे म्हणतात. ते हे लोक स्वतःच विणतात. बारीक



पण चिवट धाग्याचे पीळ मारून शंकरपाळ्यांच्या वीणेसारखी वीण घालून हे जाळे तयार केले जाते. मासे पकडण्यासाठी असे पण वर्तुळाकृती जाळे केले जाते. पाखरे धरण्यासाठीदेखील अशी जाळी तयार केली जातात. दिवाळीच्या वेळी गवताच्या 'दिवाळी' हे लोक विणून तयार करतात. तसेच काड्यांचे धडपे, घराची छपरे पूर्ण विणून काढली जातात. इरणे तयार करणे हीदेखील एक कलाच म्हटले पाहिजे.

**(३) कलाकुसर –**

**सुतारकाम –** घरांना फारशी कलाकुसर काढलेली दिसत नाही. वेलबुट्टी आणि मोर ही त्यांची आवडती आणि लाडकी सौंदर्याकृती दिसते. त्याचे उल्लेख देखील वाङ्मयात आढळतात. देवळालादेखील मोर काढलेले असतात. पाने, फुले आणि प्रत्यक्ष ते पाहातात त्यांच्याच आकृती आढळतात. प्रसंगी बैल, नाग या आकृतीदेखील आढळतात. कधी कधी चंद्रसूर्य आढळतात.

**पाटलाचा वाडा कसा गावात उठते**[३५]
**साऱ्याना गावाचं साया आपली ठेवतो**
**वाड्याच्या दाराला वेलबुट्टीची किनार**
**त्याच्या मंदी सोवे बाई सोग्याचे मोठे मोर**
**त्या मोराच्या डोईबाई सोबतो तुरा**
**विठू पाटलाचा बाई उभ्या गावाला दरारा**

भिंतीवर कधी कधी बेलाचे झाड आणि त्यावरील मोर काढले जातात. हे सारे गेरू (काव)ने काढले जाते. गाडीचे, वेगवेगळे भाग, नांगर, औत, पाभर यावरदेखील अशाच आकृती दिसतात.

**बांधकाम –** या भागातली लोक आपली घरे आपणच तयार करताना आढळतात. घरामध्ये कणग्या व मातीचे कोथळे यांचीच भिंत करून घराचे भाग केलेले असतात. या कोथळ्यांचा आकार दंडगोलाकृती किंवा चौकोनी असतो. ओटा घालणे, खळे तयार करणे या गोष्टीदेखील हे लोक मोठ्या रेखीवपणे तयार करतात.

तसे हे लोक कलावंत नाहीत. कलेचे काहीसे अंग ठाकरांना आहे. त्यावरून ठाकूरसंस्कृती थोडी पुढारलेली असावी असे म्हणावयास हरकत नाही. गाणी आणि गोष्टी यात मात्र प्रत्येकजण आपला वाटा उचलताना दिसतो.

**(४) तमाशा –** कलेचे हे एक स्वतंत्र दालन. त्याकडे हे सारेच लोक फार आकर्षित झालेले आढळतात. प्रत्येक मुलगा तमाशात काम केलेला असतो.

येथील तमाशे हे अशिक्षित लोकांनी केलेले खुले मुक्त नाट्य असते. अभिनयकला आपल्याला आत्मसात व्हावी असे प्रत्येकास वाटते. राजापासून रंकापर्यंतची सारीच पात्रे आपल्या जीवनाच्या साच्यात बसविण्याकडे या लोकांचा कल दिसून येतो. तमाशा हे कलेचे तर दालन खरेच. तसेच ते वाङ्मयाचे आणि लोकवाङ्मयाचे महत्त्वाचे दालन आहे. नाट्य, नृत्य आणि संगीत जीवनदर्शन यांचा सुवर्णसंगम त्यातून झालेला दिसून येतो. या भागातील तमाशा हा मनस्वी असतो. तो प्रक्षकांना स्वतःत सामावून घेणारा असतो. लोकांची हौसमौज पुरविणारा असतो. करमणुकीबरोबरच ज्ञानदानाचे कार्यदेखील त्यातून चालू असते. एक गाव, एक यात्रा, एक उत्सव या तमाशाशिवाय होत नाही. तमाशात नाचे पोरे नाचविण्याची प्रथा आहे. नाच्या व ढोलक्या सालाने ठेवण्याची प्रथा गावोगाव आढळते.

**(५) भारूड –** अलीकडे तमाशाची जागा भारूड मिळविताना दिसत आहे. तमाशाप्रमाणेच अभिनयाची हौस त्यात पुरते. गाण्याची पुरते अन् नाचण्याची पुरते. शिवाय नाचेपोराचा प्रश्न नाही. परमार्थदेखील साधला जातो. यादृष्टीने या गोष्टीला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारूडात निरनिराळ्या गाण्यांच्याबरोबर निरनिराळी देवदैवतांची सोंगे येतात. कूटरचना गाऊन चकित केले जाते आणि एखादे चांगले आख्यानदेखील तमाशाच्या वगाप्रमाणे लोकांना ऐकावयास मिळते.

**कला आणि जीवनानंद –**

गिरीकंदरात राहाणाऱ्या या आदिवासी लोकांना शहरी जीवनातील आनंद लुटण्याची संधी नसतेच. वर निर्दिष्ट केलेल्या कला याच त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करतात. बारा महिने सतत काबाडकष्ट करणारा हा आदिवासी डांगाणी माणूस जेव्हा दिवाळी, होळी, यात्रा, जत्रा असल्या की देहभान हरपून गाणी म्हणतो, नाचतो आणि आपली रसिकता व्यक्त करतो. आपल्या संस्कृतीचे प्रदर्शन करतो. गाताना गाणीदेखील मुक्त , तरल, स्वच्छंद असतात आणि त्यातून त्याला मिळणारा आनंद निर्भेळ, निकोप व निर्भरशील जीवन तयार करतो. म्हणूनच या कलांना काळाचे बंधन नाही. प्रेक्षक, श्रोता, कलाकार असे बंदन नाही. असा फरक नाही. सारे एकमेकात मिसळून जातात. कलांमधून होणारा भावनाविष्कार असाच मुक्त स्वरूपात असतो. या कला सादर करावयास थिएटराची आवश्यकता नाही की नेपथ्याची गरज नाही. अंगणाअंगणातून या कला आविष्कारतात, फुलतात. बाया, बाप्ये, पोरे त्यात हरखून जातात. त्यांचे निसर्गनिर्मित मुक्त जीवन अधिक विकसित होते. गाणे, ढोलकी किंवा मृदुंग सुरू झाले की सारे लोक दिवसाभराचे श्रम विसरून जातात आणि रात्र रात्र केव्हा सरून जाते ते कळत



नाही. म्हणूनच वर निर्दिष्ट केलेल्या नृत्य, तमाशा व भारूड यापासून डांगाणी कला आणि जीवनानंद मिळवित असतो.

**डांगाणी लोकांच्या संस्कृतीत आणि जीवनानंदात भर घालणारे लोक –**

डांगाणात पावसाळ्यात कोणाही बाहेरच्या माणसाची यावयाची छातीच नसते. मुसळधार पाऊस सतत पडत असतो. परंतु जेव्हा पाऊस थांबतो आणि दाणे तयार होतात; दसरा, दिवाळी तोंडाशी येतात; डांगाणी लोकांची सुगी पिकू लागते तेव्हा मात्र त्यांच्या अंधश्रद्धांचे, त्यांच्या दातृत्वाचे, त्यांच्या दैवतांचे प्रेमी – वासुदेव, गोंधळी, भराडी, पोतराज, भुत्या, नंदीबैलवाला, बहुरूपी आणि जोगती–जोगतीण असे कितीतरी लोकयेतात आणि डांगाणी लोकांच्या अंधश्रद्धोला आणि भक्तिभावाला आवाहनात्मक साद घालून झोळ्या भरभरून साळी घेऊन जातात.

**(१) वासुदेव –** या सर्वात अगोदर फेरी सुरू होते ती वासुदेवाची.

| | |
|---|---|
| **दान पावलं** | **दान पावलं**[३६] |
| **पंढरपुरात** | **इटोबा रायाला** |
| **जेजुरी मंदी** | **खंडाबा देवाला** |
| **नासकामंदी** | **शिरीरामाला** |
| **त्र्यमकेसरी** | **म्हादेवाला** |
| **दान पावलं** | **दान पावलं** |

डांगाणात मोराला तोटा नाही. हा मोरपासाची टोपी घालून हातात चिपळ्या घालून किसनदेवाची गाणी म्हणत, कळसुबाईला वंदन करीत, 'देव मसराजा नवसाला पावला' म्हणत, गुरांना घेऊन सकाळीच रानात जाणाऱ्या गायल्येपोरांना हाकारत येतो आणि आयाबाया पीठ, दाण घेऊन वासुदेवाला देतात.

**भोप –** हा देवीचा भगत तुळजापूर, वणी, कळसुबाई, घोरपडाई यांची नावे घेत गोंधळ घालायला येतो. देवीचे गोंधळी या लोकांना अधिकप्रिय आहेत. खंडोबाचे गोंधळी या भागात येत नाहीत असे नाही. परंतु क्वचितच येतात. मग गोंधळाचा कार्यक्रम या भोपावर सोपवून डांगाणी लोक आपल्या डोक्यावरचा भार कमी करतात.

| | |
|---|---|
| **तेलकट बंडी अंगाला** | .. २ |
| **हिऱ्याची अंगठी बोटाला** | .. २ |
| **कवड्याची माळ गळ्याला** | .. २ |
| **कवड्याची टोपी डोक्याला** | .. २ |

**हातामधी काकडा पेटविला .. २**
**उद्ये (उधे) शब्द बोलीला .. २**
**जाऊन भिडला कोळवाडेला .. २**
**विठ्याकोळी बोले भोप्याला ..२**
**लेका कोणरं गोंधळी आला**
**आला बाबा नवसाला**
**फेड दर वर्षाला जी र ऽ जी**

अशी गाणी म्हणून स्वतःच्या आगमनाचे महत्त्व तो स्वतःच आपल्या साथीदाराचे जोडीने कोळवाड्याला देतो. हा भोप भविष्य सांगण्याचे कामदेखील करतो.

**गोंधळी –** भोपासारखेच खंडोबाचे गोंधळी या भागात येतात आणि गावोगाव फिरून आपली पोटे भरण्यासाठी लोकांच्या कानावर देवाची, खंडोबाची पारंपरिक गाणी घालतात.

**आज गण नमविला सोमवार**[३८]
**आली सोन्याची देवाची स्वारी**
**रे रामा देवा रे रामा देवा जी रं जी**
**आज गण नमवीला मंगळवार**
**आली कळसूबाईची स्वारी**
**रे रामा देवा रे रामा देवा जी रं जी**

असे प्रत्येक दिवशी कोणता देव येतो. कोणती स्वारी येते हे सांगून शेवटी रविवारी बहिरोबाची किंवा खंडेरायाची स्वारी आणतात आणि त्याच्या नावाने भंडार लागून आपल्या थैल्या पुढे सरसावितात.

हे गोंधळी कधी कधी आख्यानेदेखील लावतात. त्यात विशेष करून 'श्रियाळ चांगुणा आणि चिलिया यांची कथा' लोकांना फार प्रिय आहे. त्याचप्रमाणे किसनदेवाचा जन्मदेखील त्यांना प्रिय आहे. 'तुकाराम महाराजांचे सदेह वैकुंठाला जाणे' ही कथा त्यांच्या अंगावर रोमांच उभे करते. अशा कितीतरी कथा हे गोंधळी त्यांना ऐकवून शहाणे करतात.

**सिरीयाळ राजेच्या घरी महादेव**
**सिरीयाळ राजेच्या घरी महादेव**
**होऊन गेले गोसावी**
**हाती चिपळया पायी खडावा 'भिक्षा वाढा माई'**
**सुवर्नाचे सूप भरूनी ठिवले गुरू च्या पायी**



**तीन दिवसाचा आहे उपाशी भिक्षा लागत नाही**
**साळी–डाळीचा केला भोज उठा गुरू जेवाया**
**उठा गुरू जेवाया**
**रांधशील तुझा चिलया बाळ तरच जेवीन बाई**

अशी सारी कथा तो ऐकवतो. सारे लोक गहिवरून जातात. गोंधळ्याच्या पाया पडतात. आया सूप सूप भरून दाणं वाढतात.

**नंदीबैलवाले व बहुरूपी –** हे लोकदेखील या रानावनातून, गावागावातून भटकतात आणि अंधश्रद्धोचा फायदा घेऊन लोकरंजनातून स्वतःची पोटे भरतात. लोक आवडीना बहुरुप्यास आपल्या आवडीचे सोंग घ्यावयास लावतात. नंदीबैलवाल्यांना भविष्य विचारतात.

**भराडी –** भराडी लोकदेखील याभागात येतात. त्यांची 'शंकरपारवती'ची गाणी गाऊन ते लोकांना रिझवतात. त्यांचे खरे दैवत भैरवनाथ. जनावरांचा व्यापार त्यांचा भागातील मुख्य धंदा म्हणावा लागेल. यादृष्टीने या लोकांना या भागात महत्त्व आहे. या भागातील जनावरे ठाणे जिल्ह्यात नेऊन हे लोक विकतात.

**पोतराज –** आईचा देव्हारा डोक्यावर घेऊन पोतराजाची स्वारी गावोगाव फिरू लागते. 'आईचा फेरी' आला आहे, असे साऱ्या गावात डफाचा आवाज ऐकला की लगेच ध्यानात येते. मरिआईचा फेरा गावात आला आहे हे समजताच पोरे–सोरे रिकामी गडीमाणसे पोतराजाभोवती जमा होतात.

**बया! दार उघड बया! दार उघड**[४०]
**मरिआई बया! दार उघड**
**लक्ष्मीआई बया! दार उघड**

असा टाहो पोतराज मरिआईच्या दरवाज्यासमोर उभा राहून फोडतो आणि लोकांना मरिआई रुसली आहे असे सांगून आपल्या 'कडाक्याने' आसूडाने अंगावर वार काढतो. दाभण खुपसून रक्त काढतो असे अनेक आत्मक्लेशाचे प्रकार पोतराज करवून घेतो आणि अमानवी चित्तथरारक दृश्यांकडे लोक भान हरपून पाहात राहतात. मरिआईला प्रसन्न करून घेण्यासाठी चढाओढ लागते. आणि मग खण, नारळ, लिंबे, दाणेदुणे, खोबऱ्याच्या वाट्या, शिधापाऊड मिळू लागतो. पोतराजाची पोळी पिकते. आईचा उपासक पोतराज हा बहुशः महार किंवा मांग जातीचा असतो. 'कडकलक्ष्मी', 'मरिआई' यांच्याविषयीच्या लोककथा 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' या पुस्तकात उद्धृत केल्या आहेत.[४१] यावरून ही ग्रामदैवते लोकांच्या अंधश्रद्धोतच कशी भरी घालतात हे ध्यानात येईल.

**भुत्या –** भुत्ये किंवा भोपे विशेषतः नवरात्राच्या सुमारास गर्दी करतात. हे देशावरून वर डांगाणात येतात. डांगाणात आले की वणी, कळसूबाई आणि टहाकारीची देवता किंवा घोरपडाई यांची नावे घेतात. कवड्याची टोपी, आईचा टाक गळ्यात, खांद्याला झोळी आणि असल्यास हातात दिवटी असा त्यांचा साज असतो. हा देवीचा भक्त जणू सर्वावर कृपा करण्यासाठीच–

**आई भवानी, मी तुझा भुत्या**[४२]
**नाचतो घेऊन डंका तुझा**
**उधे बोलतो चौदिशा तुझा**
**तुझा ठाणा वनी**
**तुझा ठाणा टहाकारी**
**आई कळसूबाई वावल तुला**
**आई भवानी मी तुझा भुत्या**
**उधे बोलतो चौदिशा तुझा**

अशा प्रकारची गाणी म्हणत दारोदार अंगणाअंगणातून नावे ओळखत एका पायावर नाचत, तांदळाने झोळी भरीत अवघ्या डांगाणात तो फिरतो. उन्हाळ्यात कोठे गडप होतो ते कळत नाही.

**चाळीसगाव डांगाण आणि हे लोकसंस्कृतीचे उपासक –** चाळीसगाव डांगाणात या लोकांचे प्रस्थ असते ते फक्त मोजून पाच–सहा महिने नवरात्रापासून त्यांची सुरुवात होते आणि एकदा होळी झाली की ते जत्रा, यात्रा सोडल्या तर गावागावातून फिरताना दिसत नाहीत.

वस्तुतः या साऱ्या भटक्या जमाती असून त्यांचा डांगाणी संस्कृतीशी नाही. त्यांचे स्वतःचे पोट भरण्यापलीकडे त्यांचा या संस्कृतीशी काय संबंध आहे, असे वाटले तरी परंपरेने या आदिवासी लोकांची या दैवताच्या उपासकावर श्रद्धा आहे. हे लोक आले की डांगाणी लोक त्यांना भविष्यकाळाच्या बऱ्यावाईटाची चौकशी करतात. देवाचा क्रोध होणे ही गोष्ट डांगाणी लोकांना अगदी त्वरित पटण्यासारखी असते. कारण त्यांचा संबंध पूर्णतः निसर्गातील ऋतुचक्राशी असतो. पाऊस पडला, शेतीभाती पिकली तरच त्यांचे जीवन सुखाचे होऊ शकते. त्यांची गुरेढोरे जगू शकतात. अन्यथा त्यांच्या वाट्याला ओला किंवा कोरडा दुष्काळ असतोच. त्यामुळे ते अंधश्रद्धाळू न होतील तरच नवल. त्यामुळे ग्रामदैवतांना प्रसन्न करणारे, तोंड भरून आशीर्वाद देणारे, निसर्गाविषयी गोड भाकिते करणारे, साथीचे रोग म्हणजे देवाचा कोपच, ते पिटाळून लावणारे, ग्रामदैवतांचे महत्त्व व प्रस्थ आपल्या



भावपूर्ण गाण्यातून व्यक्त करणारे हे भटके उपासकदेखील त्यांना आपले उपकारकर्ते वाटतात.

शिवाय हे लोक भटके असल्यामुळे देशोदेशीच्या गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे म्हणजे ज्ञानदानाचे काम जाणता अजाणता हे करीत असतात. म्हणून लोकसंस्कृतीत त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे हे निर्विवाद. चाळीसगाव डांगाण संस्कृती आणि त्यातील त्यांचे स्थान लक्षात घेण्यासारखे आहे. चाळीसगाव डांगाणाची संस्कृती ही पूर्णतः मिश्र संस्कृती आहे. त्यात आदिवासींची संस्कृती आणि आदिवासी नसलेले जानपद लोकांची संस्कृती यांचे मिश्रण झाले आहे. त्यामुळे 'लोकसंस्कृती' या अर्थाने जी संस्कृती डोळ्यासमोर उभी राहते ती खऱ्या अर्थाने हीच संस्कृती आहे असे म्हणणे योग्य होईल. 'मराठी लोकसंस्कृती' ची ओळख करून देताना रां. चिं. ढेरे[४३] यांनी आदिम संस्कृती आणि नागर संस्कृतीशी जिव्हाळ्याचे संबंध असलेली जनपदसंस्कृती असे जे फरक करून आदिसंस्कृतीचे वेगळे स्वरूप दाखविले आहे. ते परंपरेने कदाचित वेगळे दाखविता येईलही. परंतु 'लोक' या शब्दाला जो वेगळा अर्थ आज प्राप्त झाला आहे तो लक्षात घेता चाळीसगाव डांगाणची ही संमिश्र संस्कृतीच खऱ्या अर्थाने 'लोकसंस्कृती' आहे असे म्हणणे योग्य होईल. अशा संस्कृतीची श्रद्धास्थाने जोपासून त्यात अद्‌भुतता वाढवून त्यांची करमणूक करून त्यांना दिलासा देणारे हे लोक खरोखरीच लोकसंस्कृतीचे उपासक आहेत म्हणूनच त्यांचे या संस्कृतीत मानाचे स्थान राहिले आहे. एक गोष्ट खरी की कालौघात हे सारेच नष्ट होण्याचीच दाट शक्यता. त्यांचे स्वरूप नागरी जीवनातील कलांच्या मानाने कोणत्या दर्जाचे आहे हे ठरविणे योग्य होणार नाही. येथील लोकांची अभिजातता, सशास्त्रता त्यांच्या मुक्त छंदातच आहे असे म्हणणे योग्य होईल.

**समारोप –**

या प्रकरणात आपण चाळीसगाव डांगाण संस्कृतीच्या अंतरंगाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, त्यांची दैवते व यात्रा–जत्रा त्यांचे सणोत्सव यातून त्यांची धर्मभावना दिसून येते. धर्माच्या कल्पना स्पष्ट होतात. तर सणोत्सवांच्या संदर्भातील कला व अन्य कला यातून त्यांचे कलाजीवन स्पष्ट होते. या संस्कृतीचे मूल्यमापन करताना तेथील परिसर आणि जमातींची संमिश्रता यांचा विचार केला तर या संस्कृतीत किती जिवंतपणा भरला आहे हे ध्यानात येईल. हे सारे लोक एकमेकांत मिसळून गेले आहेत. आता ही संस्कृती 'महादेव कोळ्यांची संस्कृती' म्हणून ओळखण्यास हरकत नाही. येथेदेखील ही

संस्कृती त्यांच्या लोकवाङ्मयातून कशी व्यक्त होते हे दाखविण्याचाच प्रयत्न केला गेला आहे. या संस्कृतीतील आगळेवेगळेपण जरी जाणवत असले तरी म हाराष्ट्राच्या सामान्य मराठमोळ्या संस्कृतीशी ती बरीच सुसंगत आहे. असे म्हणावेसे वाटते. येथे धर्म ही कल्पना अगदी मर्यादित अर्थानेच मांडली आहे.

**काही ठळक निष्कर्ष**

(१) हे लोक अत्यंत श्रद्धाळू आहेत.

(२) ते विशेषतः प्राणीपूजक असावेत; परंतु ते इतर हिंदू देवतांवर पूर्ण श्रद्धा ठेवून आहेत.

(३) त्यांच्या यात्रा-जत्रांतून त्यांची अंधश्रद्धा व धर्मभावना दिसून येते. त्यांच्या कष्टमय जीवनात ही दैवते त्यांना आधार. त्यांच्या उत्सवात त्यांचा जीवनानंद.

(४) कलात्मक जीवन मात्र अगदीच मर्यादित आहे. अत्यंत कष्टमय जीवनाचा तो परिणाम असावा.

(५) नृत्याचे प्रकार हे त्यांच्या सणोत्सवातील जीवनानंद लुटण्याचे खास अंग आहे, असे म्हणता येईल.

(६) कलाकुसरीपेक्षा नित्योपयोगी वस्तु तयार करण्यामध्ये त्यांना अधिक रस.

(७) त्यांची धर्मश्रद्धा कौटुंबिक जिव्हाळ्यातून व्यक्त झाली.

(८) त्यांची धर्मश्रद्धा व संस्कृती जगविण्याचे व उजळविण्याचे काम वासुदेव, गोंधळी, कडकलक्ष्मी इ. लोक करीत असतात.

(९) निसर्गावर अवलंबून असणाऱ्या रानावनात वाढणाऱ्या आदिवासींची संस्कृती म्हणूनच निसर्गाशी एकरूप झाली आहे. निसर्गाने त्यांना श्रद्धाळू बनविले आहे.

(१०) त्यांच्या प्राणीपूजेतून, निरनिराळ्या देवतांविषयीच्या कल्पनांतून, भुताखेतांवर असलेल्या विश्वासातून त्यांचे अज्ञान किंवा अंधश्रद्धा व्यक्त होण्यापेक्षा निसर्ग आणि मानव यांतील ऐहिक जीवनातील समरसताच अधिक स्पष्ट होते.

**संदर्भ**


१. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा', दैवतकथा, कथा क्र. ४.

२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोककथा', देवतांविषयी गाणी, गीत क्र. ११.

३. परिशिष्ट १, 'परिसरातील लोककथा', देवतांविषयी गाणी, गीत क्र. १२.

४. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा', दैवतकथा, कथा क्र. २.

५. परिशिष्ट २, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. २.

६. तत्रैव, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. १२.

७. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ४.

८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. २.

९. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ७.

१०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. ३.

११. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. १५.

१२. तत्रैव, गीत क्र. ८.

१३. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ६.

१४. तत्रैव, नवरात्रातील गाणी, गीत क्र. २.

१५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ३.

१६. तत्रैव, गीत क्र. १.

१७. तत्रैव, संकीर्ण गीते, गीत क्र. १०.

१८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', संकीर्ण गीते, गीत क्र. ३.

१९. तत्रैव, सणाउत्सवांची गाणी, गीत क्र. १७.

२०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', नवरात्रातील गाणी, गीत क्र. ९.

२१. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. २.

२२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. ९.

२३. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. १०.

२४. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. १३.

२५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', पांडुरंगाची भक्ती, गीत क्र. १.

२६. तत्रैव, जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. १.

२७. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. ५.

२८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. ४.

२९. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', भलरी गीते, गीत क्र. ७.

३०. तत्रैव, गीत क्र. ८.

३१. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', नवरात्रातील गाणी, गीत क्र. ९.

३२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', नवरात्रातील गाणी, गीत क्र. १०.

३३. तत्रैव, गीत क्र. १३.

३४. तत्रैव, गीत क्र. १५.

३५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. ११.

३६. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. १४.

३७. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. ५.

३८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. ६.

३९. तत्रैव, गीत क्र. १५.

४०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. १६.

४१. रां. चिं. ढेरे, 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' ज्ञानराज प्रकाशन,



पुणे.

४२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', देवतांविषयी गाणी, गीत क्र. १८.

४३. रां. चिं. ढेरे, 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' ज्ञानराज प्रकाशन, पुणे.

* * *

## प्रकरण पाचवे

# चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक अभ्यास : बदलते स्वरूप

**प्रास्ताविक–**

चाळीसगाव डांगाणच्या पारंपरिक संस्कृतीत आमूलाग्र बदल घडत आहे आणि कदाचित आणखी दहा वर्षात डांगाणाची पारंपरिक संस्कृती पार लयाला गेली आहे असे दिसेल. मग या बदलाला विकास म्हणावयाचे की आणखी काही हा दृष्टिकोन जसा असेल त्यावर अवलंबून राहील. स्त्रिया आणि प्रौढ तसेच वृद्ध अजून पारंपरिक संस्कृती जतन करत असताना दिसत असले तरी कर्ती पोरे वेगळीच आणि बदलत्या काळाच्या ओघाने वागताना दिसतात तरी पुढील दहा वर्षात कदाचित डांगाण नागरी संस्कृतीच्या बरेच जवळ येईल असे वाटते. शहराच्या औद्योगिकरणाबरोबरच खेड्यांचा किमान त्या प्रमाणात विकास होणे जरूर होते; परंतु गेल्या दहा वर्षापर्यंत साधा रस्तासुद्धा डांगाणातील गावांना पोहोचत नव्हता. अजूनही काही भागात (काही गावांची) परिस्थिती अशीच आहे. परंतु लोक याचा तीव्रतेने विचार करू लागले आहेत. आज गावागावातून शाळा दिसतात. लोक दुग्धव्यवसाय करताना दिसतात. वसतीगृहातून मुलांची गर्दी होताना दिसते. शहराकडे नोकरीची धाव वाढलेली दिसते. गावागावात विजेचे खांब पोहोचलेले दिसतात. अर्धेकच्चे, अर्धवट का होईना रस्ते आखलेले दिसतात. वनात राहणाऱ्या लोकांपर्यंत बस पोहोचलेली दिसते. पंचायतींचा कारभार दिसतो. गावागावात रेडिओचा आवाज ऐकू येतो. लग्नकार्याच्या प्रसंगी लाऊडस्पीकरचा दणका भासतो. लंगोट्यांच्या जागी चड्ड्या दिसतात. क्वचित भांगपट्टी केलेली कर्ती पोरे दिसतात. पैशापैशांसाठी भांडतांना दिसतात. कामासाठी आंदोलने करताना आढळतात. जीपगाड्या, लॉऱ्या, गावापर्यंत पोहोचल्या असे दिसते. अर्थात अजून अगदी वनात, डोंगरात, दऱ्याात असलेल्या गावापर्यंत नाहीच. ठिकठिकाणी पाझर तलाव दिसू लागले आहेत. भाताच्या गिरण्या वाढत आहेत.

हे सारे रूप बदलते आहे. त्याची कारणमिमांसा आणि फलश्रुती व सामान्य दोष यांचा उहापोह या प्रकरणात केला जाणार आहे.

**शिक्षण –**

अनेक वर्षे शिक्षणाच्या बाबतीत पूर्णतः उपेक्षित राहिलेला हा भाग जिल्हा परिषदांचा कारभार सुरू झाल्यानंतर शिक्षणाच्या बाबतीत थोडा का होईना स्वयंपूर्ण झाला. पूर्वीच्या सर्वोदय संस्था, राजूरने थोडे परंतु अत्यंत महत्त्वाचे असे शैक्षणिक कार्य केलेच होते. परंतु आता सर्व व्हॉलेंटरी स्कूल्स सरकारी झालेली असून प्रत्येक गाव, वाडी या ठिकाणी शाळा निघाल्या आहेत. विद्यार्थी संख्या फारच कमी असल्याने तीन चार इयत्ता एकत्रच चालतात. त्यामुळे एकाच खोलीच चालणाऱ्या या शाळा आहेत. परंतु अजिबात शाळेचे दर्शन न होणाऱ्या मुलांना शाळा नावाचे काही असते एवढी माहिती जरूर झाली आहे. येथेच एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी म्हणजे या शाळांविषयी गावकरी व त्यांची मुले सारीच उदासीन आहेत. तसेच त्याच भागातील शिक्षक नेमलेले असूनसुद्धा शाळेची ठराविक वेळ आणि ही उदासीनता तसेच त्यावर टाकलेल्या इतर जबाबदाऱ्या यामुळे तो देखील उदासीन झालेला आहे. मुलांच्या सोयीनुसार शाळांची वेळ असणे जरूर आहे. तसेच मध्यवर्ती मराठी भाषेत लिहिलेली पुस्तके त्यांना समजत नाहीत. परंतु त्यांच्या पुढच्या भवितव्याच्या दृष्टीने ती पुस्तके वा ती भाषा शिकविणे आवश्यक आहे. या मुलांना पाट्या, पुस्तके व अन्य शैक्षणिक साधने मोफत देऊन त्यांची आर्थिक समस्या दूर करून उदासीनता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

**(१) बालवाड्या आणि आश्रमशाळा –** प्रत्येक गावात बालवाडी काढून मुलांना लहानपणापासून शिक्षणाची गोडी लावण्याचा प्रयत्न स्तुत्य म्हणावा लागेल. त्यांना खाऊ म्हणून सकस आहार दिला जातो. ही गोष्टदेखील त्यांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने व त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्तुत्यच म्हणावी लागेल. त्याचप्रमाणे या बालवाड्यातून गाणी, गोष्टी, खेळ याद्वारा सांस्कृतिक

माहिती सांगून, शिकवून आणि गळी उतरवून संस्कार करण्याचा प्रयत्न केला जातो.

आश्रमशाळांची संख्या केवळ डांगाण भागात पंधराच्या आसपास झाली असून गणवेश, आहार, राहण्याची सोय आणि शिक्षणाची सोय या सर्वच गोष्टींची हमी घेतल्याने यातून मात्र शिक्षण-विकास घडू शकेल असे म्हणावयास हरकत नाही. परंतु ही मुले तेथेच ठेवावी लागल्याने पालक पाठवावयास तयार होत नाहीत आणि आग्रहपूर्वक मुलांना आणूनदेखील मुले कधी निघून जातील याचा नेम नाही ही वस्तुस्थिती आहे.

या भागाला जवळची अशी हायस्कूले म्हणजे खिरमिरे, मवेशी, राजूर, मिझळ ही होत. या हायस्कूलांना जोडून वसतीगृहांची सोय केलेली असल्याने शिक्षणाची सोय झाली असे दिसते. परंतु या हायस्कूलांची फलश्रुतीदेखील अपेक्षित अशी नाही.

या शाळांमुळे मुलांचे राहणीमान मात्र शहरी थाटाचे होऊ लागले आहे. हे निश्चित. शर्ट, पॅन्ट, पायजमा, विजार, मॅनेला, केशरचना या गोष्टी खेड्यापाड्यातून दिसू लागल्या आहेत. गुरे वळताना, शेतात राबतानादेखील, बनियन व अर्धी विजार किंवा नाईट पायजमे किंवा अंडरपँट दिसू लागल्या आहेत. निरनिराळ्या प्रसंगी म्हणावयाच्या पारंपरिक गाण्यांना व त्यांच्या भाषेची वैशिष्ट्ये अबाधित राखणाऱ्या गोष्टींना गळती लागली असून त्यात भाषिक शुद्धतेचा अवलंब करण्याचा प्रयत्न करताना ही मुले आढळतात. म्हणजे या शैक्षणिक संस्कारामुळे भाषेच्या स्वरूपात कालांतराने पूर्ण बदल झालेला आढळेल असे वाटते.

**(२) रेडिओ आणि शहरांशी आलेले संबंध –** शैक्षणिक साधनांमध्ये याचा समावेश करता येईल. ग्रामीण भागापर्यंत पोहोचता यावे व त्याद्वारा शेती, शिक्षण, आरोग्य याविषयी ग्रामीण डोंगरी भागातील लोकांना शहाणे करावे याकरिता प्रत्येक गावात एक एक रेडिओसेट सरकारने पुरविले आहेत. त्याद्वारा या कार्यक्रमाऐवजी गाण्यांच्या कार्यक्रमाकडेच लोकांचे लक्ष असले तरी देखील त्यातून शैक्षणिक कार्य घडले आहे. हे लोक शहरांच्या जवळ येत आहेत. या भागातील बरेच लोक कोरडवाहू जमीन आणि दुष्काळ यांना कंटाळून मुंबई, नासिक या शहरांकडे धावले आणि तेथे रेल्वे हमालापासून अनेक काबाडकष्टाची कामे करू लागले. परंतु ते लोक शहरी लोकांच्या संस्कृतीशी एकरूप झाले आणि त्यांच्या संबंधातून इकडच्या पारंपरिक संस्कृतीत आमूलाग्र बदल होण्याची चिन्हे दिसू लागली. शहरातून आलेल्या लोकांनी गावागावातील लोकांमध्ये चांगले स्थान मिळविले आणि भारूड, तमाशे, भजनी मंडळे या सर्वच करमणुकीच्या साधनात आधुनिकता आणली गेली. या भागातल्या गाणी, पदे, लावण्या, ओव्या, अभंग आणि पद्धती यांना बाजूला सारून सिनेमाचे अनुकरण सर्वदूर झाले. लाऊडस्पीकरचे आकर्षण वाढले आणि लाऊडस्पीकर रेकार्ड यांनी या लोकांच्या संस्कृतीचा प्रमुख आरसा म्हणून लग्न, टिळा, बारसे, पाचवी, जत्रा या गोष्टींकडे पाहायचे त्यातील उत्स्फूर्तता काढून टाकली गेली. लग्नातील पारंपरिक गाणी संपली आणि सर्व गोष्टी लाऊडस्पीकरवर होऊ लागल्या. या संस्कृतीचे वेगळेपण लवकरच समाप्त होईल अशी चिन्हे दिसू लागली आहेत असे म्हणावेसे वाटते.

**(३) या भागात फिरणारे कीर्तनकार –** हे कीर्तनकारदेखील या लोकांना त्यांच्या पारंपरिक संस्कृतीपासून दूर नेत आहेत असे म्हणावे लागेल. प्रत्येक गावात सप्त्याची प्रथा आहे. या प्रसंगी हे कीर्तनकार येतात व लोकशिक्षणाचे काम करतात.

**राजकीय जागृती –**

पूर्वी कम्युनिस्ट चळवळीसाठी प्रसिद्ध असलेला भाग असला तरी या कम्युनिस्ट चळवळी खऱ्या अर्थाने कम्युनिस्ट नव्हत्या. कारण त्या चळवळींनी या लोकांच्या पारंपरिक संस्कृतीला जराही धक्का लावला नव्हता. उलट त्यातून स्वाभिमानच जागृत झाला होता. परंतु अलीकडे सोसायट्या, दुग्धव्यवसाय, पंचायती यामुळे एका वेगळ्या प्रकारची राजकीय जागृती झालेली आहे असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. राजकीय विचार समजावून घेऊन त्यानुसार वागणारे मात्र फारच थोडे आहेत. त्याऐवजी हितसंबंधातून निर्माण झालेले पुढारीपण आणि त्याने केलेले राजकारण जास्त दिसते. या राजकीय जागृतीनेदेखील सांस्कृतिक परंपरांना खीळ बसू लागली आहे. जत्रा, यात्रा, दैवते यांचे मानपान व इतर परंपरा बदलू लागल्याने अंधश्रद्धा नाहीशा होत आहेत ही गोष्ट स्तुत्य आहे. परंतु हेवेदावे वाढून कौटुंबिक जिव्हाळ्यातून निर्माण होणारा एकजीवपणा मात्र नष्ट होईल अशी भीती वाटते.

**विविध कार्यकारी सोसायट्या –**

सोसायट्यांचे जाळे पसरल्याने लोकांना व्यवसायाच्या बाबतीत एक नवीन वळण लागू पाहाते आहे. कर्ज काढून आपली कामे करणे त्यांना सोयीचे झाले असले तरी वर्षानुवर्षे दारिद्र्यात राहणारे हे लोक पैसे मिळाल्यावर त्याचा पूर्ण फायदा योग्य कामांसाठी करून घेताना दिसत नाहीत.

**दुग्धव्यवसाय –**

सरकारी योजनांमुळे व सोसायट्यांमुळे या व्यवसायाला बरेच उत्तेजन मिळत आहे. या भागाला योग्य असाच हा जोड व्यवसाय. त्यामुळे लोकांकडे दर आठवड्याला पैसा खेळू लागला. काही लोकांना काम मिळाले. परंतु रस्त्यांची कामे फारशी झाली नसल्याने थोडा त्रास होतो ही गोष्ट खरी. तरी पूर्वी इतका त्रास राहिलेला नाही. प्रत्येकाचे लक्ष या व्यवसायाकडे जात असून दूधडेअरी – दुग्ध गोळा करण्यासाठी विशिष्ट केंद्रे, ठिकठिकाणी, अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहोचत असल्याने या व्यवसायाला जोर येत आहे. त्यातून शहरी लोकांप्रमाणे नित्य पैसा खिशात येत असल्याने व सोसायट्या, बँका यांच्या संबंधामुळे तो आता गावरान राहिला नाही. त्याला हे सारे व्यवहार आता हळूहळू समजू लागले आहेत. राजूर येथे चिलिंगप्लँट झाल्याने या व्यवहाराला अधिक गती येत आहे.

**बाजारहाटातील सुधारणा –**

पूर्वी निरनिराळ्या जत्रा किंवा यात्रा यातूनच या भागातील लोकांना वर्षभराचा मीठ, मिरची, मसाल्याचे पदार्थ, गूळ इत्यादी आदी किराणा घेऊन टाकावा लागत असे. परंतु आता गावागावात किराणा दुकाने झाली असून एस.टी च्या वाढीबरोबर हे पदार्थ आठवड्यातून एकदोन वेळा मिळू शकतात. पूर्वी डिंक, मध, धान्ये यावर ते बाजारहाट करीत असत. परंतु आता बरेच लोक रोख पैशांचा वापर करताना दिसतात. बाजारात रॉकेल देखील खरेदी करताना हे लोक आढळतात. चहा, साखर आदी पदार्थ देखील अलीकडेच त्यांच्या बाजारात दिसू लागले आहेत.

**जिल्हा परिषद व तालुका पंचायत समिती –**

जिल्हा परिषद व तालुका पंचायत समिती यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे रस्त्यांचे बांधकाम १९७४ सालच्या दुष्काळात या भागात जी रस्त्यांची कामे या विभागातर्फे झाली त्यामुळे निदान पायी वा गाडी प्रवासाकरिता रस्त्यांचे जाळेच या भागात विणले गेले. त्यामुळे या भागात आता दळणवळण पुष्कळ सुकर झाले आहे. आता हरिश्चंद्राच्या बाजूला कोतूळ डांगाणात कोथळ्यापर्यंत एस.टी जाऊ शकते; तर इकडे घाटघरपर्यंत राजूर डांगाणात जाते; तर तिकडे खिरविरेपर्यंत समशेरपूर डांगाणात जाते. राजूर डांगाणातून कोल्हार घोटी हा राज्य हमरस्ता होतो आहे. तो मुंबई–आग्रा रोडला जाऊन मिळतो. या रस्त्याला सर्व रस्ते कसे येऊन मिळतील याकडे लक्ष दिले जाते. रस्त्यांप्रमाणेच शेतीसुधारणेकडे लक्ष दिले जाते.



त्यासाठी या विभागातर्फे कर्ज, सबसिडी व मोफत मदत दिली जाते. त्यामुळे जेथे पाणी आहे. तेथे किमान आठ ते दहा महिने शेतीत काम करता येते. बी–बियाणे, खते, औषधे यांचा पुरवठा मोफत व मार्गदर्शपूर्वक केला गेल्याने शेतीसुधारणा व त्यातील आधुनिक दृष्टिकोन त्यांना प्राप्त होत आहे. बंडींग कामाकडे देखील सरकारने पुरेसे लक्ष देऊन शेतीसुधारणा साधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय हळूहळू प्रत्येक गावी होत आहे. घरबांधणीच्या बाबतीत देखील मदत केली जात आहे. इंग्रजी कौलांची सोय करून घरे अधिक हवेशीर केली जात आहेत. कुटुंबकल्याणाच्या दृष्टीने मार्गदर्शन होत आहे. मलेरिया निर्मूलन, देवी निर्मूलन यासारख्या योजना या भागातही परिणामकारक काम करीत आहेत.

हे सर्व खरे असले तरी होणारा हा बदल सांस्कृतिकदृष्ट्या जरी झपाट्याचा दिसत असला तरी आर्थिक आणि भाषिक दृष्ट्या मात्र तितकासा वेगाचा नाही. शैक्षणिकदृष्ट्या नाराजीच पदरी येत आहे.

**अकोले तहसील –**

अकोला तहसीलच्यावतीनेदेखील बैलतगायी, विहिरतगायी, स्वस्त धान्य योजना, पालेमोड योजना, साखर वाटप वगैरे गोष्टी तसेच शेती मार्गदर्शन आदी गोष्टी तलाठ्यांमार्फत केल्या जातात. त्यांची आर्थिक व सामाजिक पाहणी केली जाते. त्यातूनच काही योजना राबविणे सोयीचे जाते.

**बँका –**

राजूर, शेंडी, समशेरपूर, कोतूळ या डांगाणाच्या सरहद्दीवरील भागातून स्टेट व सहकारी बँकांची सोय झाली असून लोकांना बँकांची भीती वाटत नाही. आदिवासींसाठी काही खास सवलती व कर्जयोजना असल्याने आर्थिक मदत मिळण्याची सोय होते आहे. परंतु एक खरे की त्या बाबतीतील मार्गदर्शन कमी पडते आहे. गावोगाव योजना व कार्यवाही समजावून सांगणे अत्यंत जरूरीचे वाटते.

**संस्था –**

डांग सेवा संघ, आदिवासी उन्नती मंडळ, आदिवासी सेवा संघ, गावोगावची तरुण मंडळी किंवा भजनी मंडळे, या संस्थादेखील सांस्कृतिक परिवर्तनाचे कार्य करीत आहेत. याद्वारा संस्कृतीचे शहरीकरण वा आधुनिकीकरण झपाट्याने होत आहे. त्यामुळे जत्रा–यात्रांचे स्वरूपदेखील श्रद्धोस राहिले नसून बाजारासारखे होत आहे. हा घडत असलेला योग्य की वाईट हे काळ ठरवील.

**पर्यटकांची ये–जा –**

कळसूबाई हे सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर असल्याने गिर्यारोहण पथके, विशेषतः विद्यार्थ्यांची गिर्यारोहण पथके, गिर्यारोहणासाठी येतात. त्यांची उपस्थिती हरिश्चंद्रगड, रतनगड, पट्टाकिल्ला या भागातही जाणवते. ही पथके आली म्हणजे शहरी संस्कृतीचे या भागातील लोकांना जवळून दर्शन घडते. हे लोक सांस्कृतिक कार्यक्रम करून लोकांचे मनोरंजन करतात. विल्सन डॅम (भंडारदरा धरण) हे थंड हवेचे ठिकाण समजले गेले असल्याने व नव्यानेच त्याच्या रचनेत केलेल्या बदलांमुळे सिनेमा कंपन्यांच्या भेटींची संख्या वाढली आहे. तसेच शहरी भागातील लोक मोठ्या संख्येवर या भागात येतात. त्यांच्या संपर्कामुळे या लोकांच्या राहणीमान खाणपिणे यात बराच फरक पडला आहे.

**संस्कृतीत होणाऱ्या बदलाचे ठळक विशेष –**

**(१) लग्नसमारंभ** – या भागात मुलीला देज किंवा दहेज देण्याची पद्धत होती. ती बदलत असून मुलगा आता रेडिओ, घड्याळ किंवा तत्सम अन्य गोष्टी मागू लागला आहे. लग्नातील स्त्रियांच्या गायनाची (धवलेरी) पद्धत बरीच कमी झाली असून त्यांची जागा लाऊडस्पीकर आणि रेकॉर्ड्स यांनी घेतली आहे. लग्नात पूर्वी दारूचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर असे. ते कमी झाले असून त्याची जागा चहाने घेतली आहे. लग्नसमारंभात विशेष म्हणजे लापशी, गोडभात, मालपोहे, हे पदार्थ कमी प्रमाणात होऊन त्यांची जागा बुंदी, मटकीची उसळ, अशा पदार्थांनी घ्यावयास सुरुवात झाली आहे. नवरदेवाचा पोशाख पूर्वी धोतर, बंडी, पागोटे असा असे. त्यावर रुमाल किंवा उपरणे असा असे. आता त्या बंडीची जागा नेहरू शर्टाने घेतली असून शिकलेली मुले सूट शिवून आणताना आढळतात. तयार फॅन्सी कपडे खरेदी करण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. लग्नाचे दिवसातदेखील कपात झाली आहे. आता एक दिवसात लग्न उरकले जाते. मुलीच्या पोशाखात देखील बदल झाला आहे. पातळ आणि ‘फडकी’ (ओढणीसारखे पदर घेण्यासाठी वस्त्र) यांच्याऐवजी आता ‘चोपडे पांघरून’ शालू घेताना हे लोक आढळतात. अर्थात हे परिस्थितीवर अवलंबून असते. दागिन्यांच्याबाबतीतसुद्धा असेच झाले आहे. नवीन प्रकारच्या रिंग्ज (रिंगा), टॉप्स हे कानातले प्रकार दिसू लागले आहेत. मंगळसूत्र, बांगड्या वगैरे करायला अलीकडे लोकांजवळ पैशाचा अभाव दिसतो. परंतु त्याचबरोबर सर्व चांदीचे दागिने हे लोक करीत असत. त्यात प्रचंड प्रमाणात घट झाली आहे. नथीचे प्रमाण मात्र अद्याप जास्तच आहे. शहरातील ‘वर’ करण्याकडे जास्त कल आहे. तसेच बालविवाहाची चाल कमी पडू लागली आहे. एकाच पुरुषाने दोन, तीन, मनात येतील तेवढ्या स्त्रिया करण्याची प्रथा हळूहळू बंद होत आहे.

**(२) जन्म** – लग्नाप्रमाणे जन्म ही जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट. याबाबतीत डॉक्टर, नर्स यांच्यावरचा विश्वास प्रचंड प्रमाणावर वाढतो आहे. पाचवी पूजनाचा कार्यक्रम हा फार मोठा सण समजला जात असे. त्याचे म हत्त्वदेखील आता कमी होऊ लागले आहे. बारा बळी करून ठेवण्याची पद्धत मात्र अद्याप आहे. बारसे करून नाव ठेवण्याची पद्धत फार मोठ्या प्रमाणावर वाढते आहे. त्यात पाळणे वगैरे पद्धतीत सुधारणा होते आहे.

**(३) मृत्यू –** मृत्यूसमयीचे विधीदेखील मराठमोळा पद्धतीने करण्याकडे या लोकांचे लक्ष जाऊ लागले आहे. दहावा, तेरावा करताना आता अगदी पत्रिका छापून कार्यक्रम साजरा केला जातो.

**(४) सत्यनारायण प्रथा –** सत्यनारायण करणे याला या गेल्या काही वर्षात फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. एखाद्या घराण्यापुरत्या जत्रा किंवा यात्रा यांचे स्वरूप जसे असावे तसे याचे स्वरूप बनत आहे. परंतु ब्राह्मणाचे प्रस्थ मात्र अजिबात नाही ही गोष्ट ध्यानात घेण्याजोगी आहे.

**(५) भाषा** – अधिकारी, पर्यटक व शिकलेली मुले तसेच रेडिओ यामुळे लोक आपल्या बोलीभाषेत जास्तीत जास्त नागरी भाषा कशी येईल याचा फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करतात. आपल्या स्वतःच्या भाषेत बोलण्याची त्यांना लाज वाटू लागली आहे. ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. त्यामुळे प्रसंगी अधिकाऱ्यांजवळ ते आपले मनोगत बोलून दाखविण्यासदेखील धजत नाहीत. त्यात स्त्री–अधिकारी आले तर मग त्यांची गाळण उडते. हळूहळू भाषेत बराच नागरीपणा येऊ लागला आहे. काही दिवसांनी त्यांच्या भाषेतील फक्त काही शब्द असलेली मध्यवर्ती मराठीच ऐकू येऊ लागेल असे भाकित करावेसे वाटते.

**(६) आहार खाणेपिणे –** आहारात भात, नागलीशिवाय आता बाजरी, गहू, जोंधळा या गोष्टी आढळू लागल्या आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की जंगली भाज्यांवरची भावना त्यांची उडू लागली आहे. ठाकर लोक मात्र अद्याप तशा भाज्या खाताना आढळतात. लवली, बरकी वा अन्य जंगली भाज्या खाणे त्यांना कमीपणाचे वाटू लागले आहे ही गोष्ट नक्की.

**(७) घरबांधणी –** घरबांधणीमध्ये देखील आता फारच फरक होऊ लागला आहे. गुरांसाठी स्वतंत्र झाप. घराला दालने, खिडक्या, माडी, मंगळूरी कौले या गोष्टी बऱ्याच प्रमाणात दिसू लागल्या आहेत. घराला सिमेंट चुना यांचा वापरदेखील

होऊ लागला आहे. पूर्वी घरात मोरीची व्यवस्था नसे. ती देखील अलीकडे दिसू लागली आहे. म्हणजे मोठ्या गावातील घरे आणि गावातील घरे यांत फारसा फरक आता राहिलेला नाही. वीज व्यवस्थेमुळे यात अधिकच रंगत आली आहे. घराला रंग देण्याची पद्धत नव्हती. फक्त दार रंगविले जाई. किंवा गेरूच्या रेघा मारल्या जात. स्वच्छ सारवलेले घर चांगले वाटत असे. आता घराला चुना वा पिवळी, निळी माती देण्याची प्रथा सुरू झाली. अजून संडासची व्यवस्था मात्र कोठेही नाही.

**(८) देवतांमध्ये बदल –** या साऱ्या बदलांबरोबरच दैवतांमध्ये बदल होत आहे. ग्रामदैवते व वाऱ्यासारखी प्राणीदैवते यांच्याकडचे लक्ष उडून दत्तात्रय, राम, विठ्ठलरखुमाई या दैवतांकडे ओढा अधिक सुरू झाला आहे. राजूर, शेंडी, कोदनी अशा ठिकाणी दत्ताची सुंदर मंदिरे बांधण्यात आली आहेत.

**(९) वृत्तीत बदल –** पूर्वी पाहुणचार, माणुसकी यासाठी प्रसिद्ध असलेले लोक. 'आमच्या गावाला रे, पाहुणा यायाचा पायी रं! हे ब्रीद बदलले आहे. ते कामापुरते व स्वतःपुरते पाहू लागले आहेत. तसेच खोटे, नाटे व्यवहारदेखील वाढलेले आहेत याविषयी खेदाने लिहिणे भाग पडते. याचे पडसाद नवीन गाण्यातून उमटू लागले आहेत. हे योग्य की वाईट हे पाहणे या ठिकाणचे काम नाही. यादृष्टीने पुढील गाणे हे फारच सूचक आहे. पारंपरिक गीतांप्रमाणेच ते रचले आहे. पारंपरिक गाणी गाताना मुलांच्या मनातून सहज बाहेर पडलेले ते त्यांच्या गावचे चित्र आहे.

**राम राम घ्या हो पाहुणं**
**गाव आमचं भरविर**
**ध्यान देऊन ऐका गाणं**
**हो रसिकजन ।।**
**वर्णू आणि सांगू किती**
**आमच्या गावची महती ।।**
**गुंग होतीया आमची मती**
**हो रसिकजन ।।**
**गाव आहे कडवा तिरी**
**चढून बघाव टेकडीवरी ।।**
**स्पष्ट दिसती दिशा चारी**



**हो रसिकजन ।।**
**गावाला दोन वाडे**
**आहेत पूर्वेकडे ।।**
**किती सांगू त्याचे पवाडे**
**हो रसिकजन ।।**
**बाहेर डौल दाविती**
**घरी उंदीर फारकत घेती ।।**
**अशा गमती सांगू किती**
**हो रसिकजन ।।**
**गावाला चिक्कार शेती**
**परी खायाची पडते भ्रांती ।।**
**गहाण ठेवून धान्य घेती**
**हो रसिकजन ।।**
**गावाला विहीर मळे**
**परि करिती नाना चाळे ।।**
**दरसाल वाजती खुळखुळे हो**
**हो रसिकजन ।।**
**गावाला आहेत शाळा**
**त्यांना नेहमीच असतो टाळा ।।**
**ठेवेदार सुदिककरितो चाळा**
**हो रसिकजन ।।**
**गावाला नाही पुढारी**
**गरिबांचा नाही कैवारी ।।**
**जो तो आपलीच तुंबडी भरी**
**हो रसिकजन ।।**
**गावाला दुकानं चार**
**पर नफ्याला बेसुमार ।।**
**एकवर्षात होती गबर**
**हो रसिकजन ।।**
**सोसायटीत एकसचिव**
**नित घेतो कोंबडीचा जीव ।।**

परी भलताच स्वत:ला माव
हो रसिकजन ।।
गावाला देवळे चार
परी माळकरी आहेत फार ।।
त्यांचा आचार नाही बरोबर
हो रसिकजन ।।
काहींनी माळा काढल्यात पार
त्यांना राम नाही सोडणार ।।
शेवटी हालच होतील फार
हो रसिकजन ।।

**(११) गावगाडा–न्यायनिवाडा –**

एकंदर गावांचे चित्र पार बदलून गेले आहे. आता पूर्वीप्रमाणे गावचा पाटील पंच यांना फारशी किंमत नाही. कायदेकोर्ट यांच्या जाणीवेमुळे गावागावातील पाटील पंचाची मिरासदारी मोडली असली तरी त्यामुळे गावातील एकोपादेखील नष्ट झाला आहे हे ध्यानी घेतले पाहिजे. पूर्वीचे 'इर्जिक' घडवून काम करण्याची पद्धती लोप पावते आहे. आपले प्रश्न आता कोणी पंचासमोर मांडतांना दिसत नाही. जवळपासच्या मोठ्या गावांशी दळणवळण वाढले असल्याने बाराबलुते पद्धत जवळजवळ नामशेष झाली आहे. भटक्या जातीचे लोक देखील तुरळकच फिरताना दिसतात. गावातील मारुतीचे मंदिर, प्रमुख शाळा, चावडी वगैरे सर्व तेच. तथापि त्याकडे अलीकडे दुर्लक्ष अधिक दिसून येऊ लागले आहे.

**समारोप –**

एकंदरीत चाळीसगाव डांगाणाच्या सर्वांगीण जीवनात आमूलाग्र बदल होत आहे हे म्हणणे भाग आहे. अशा रितीने बदल होत होत ज्याला डांगाणी संस्कृती असे संबोधावे व नागरी संस्कृतीपासून तिचे वेगळेपण दाखववावयाचे तेच नष्ट होऊन जाईल आणि डोंगरदऱ्यातील ही संस्कृती केवळ इतिहासजमा होईल असे वाटू लागले आहे. सरकारच्या निरनिराळ्या योजना जसजशा राबविल्या जातील, तसतसा हा फरक अधिकाधिक तीव्रतेने जाणवेल. नुकतेच केंद्र सरकारने प्रसिद्धीखात्याकडून शेतीविकास, दुग्धविकास व आरोग्य या विषयांच्या संदर्भात एकतीन महिन्यांची योजना राबविली. चित्रपट, व्याख्याने यांच्याद्वारे लोकशिक्षणाचे काम केले. असे सारे होत असले तरीसुद्धा होणारा हा बदल उन्नतीच्या दृष्टीने सुसंस्कृत व सुज्ञानी होण्याच्या दृष्टीने अद्याप तितका परिणामकारक होत नाही हे जाणवते. सरकारी योजना राबवितानादेखील त्या फॅड म्हणून नव्हे तर सामाजिक कार्य म्हणून व मूलगामी परिवर्तन करण्याच्या दृष्टीतून राबविल्या जायला हव्या आहेत. तसे करण्याचे प्रयत्न शासनाकडून चालू आहेत असे निदानन एकंदर योजनेच्या आराखड्यांवरून तरी वाटते. या भागात झपाट्याने प्रगती व्हावी म्हणून आमदार यशवंतराव भांगरे, मा. मधुकरराव पिचड–सभापती, कॉ. बी. के. देशमुख, मा. एकनाथ देशमुख, मा. मारुतराव गमाले इत्यादी त्यांच्यातीलच पुढारी सतत कार्यरत आहेत. हळूहळू शासनाचे लक्ष या भागावर केंद्रित होत आहे. परंतु हा सर्व बदल म्हणजे केवळ दिखाऊपणा ठरू नये असे वाटते.

**काही ठळक निष्कर्ष**

(१) डांगाणी संस्कृतीतील पारंपरिकता झपाट्याने नष्ट होत आहे.

(२) पारंपरिक संस्कृती नष्ट होण्यास शाळा, रेडिओ व शहरांशी संपर्क ही कारणे महत्त्वाची आहेत.

(३) सरकारी योजनांमुळे आधुनिक जीवनाचा परिचय करून दिला जात आहे.

(४) सोसायट्या व दुग्धव्यवसाय यामुळे खेळता पैसा व अन्य आर्थिक सवलती मिळू लागल्या असल्यातरी हितसंबंधाचे तथाकथित राजकारण चालू झाले आहे.

(५) या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे डांगाणी भाषेची ओढाताण करून तिला मध्यवर्ती मराठीच्या जवळ आणण्याचा प्रयत्न चालू आहे.

* * *

## प्रकरण सहावे

# चाळीसगाव डांगाण परिसर लोकगीतांचे वाङ्‌मयीन समालोचन

या भागात चाळीसगाव डांगाण परिसरातील लोकगीतांचे वाङ्‌मयीन समालोचन केले आहे. हे करीत असताना लोकगीतांमधील प्रेरणा, वाङ्‌मयीन सौंदर्याची रचना, भाषा, भाव, आनंदाचे स्वरूप या विविध अंगांनी चर्चा केली आहे. त्याचबरोबर धर्मसंदर्भाची चर्चा केली आहे. ही चर्चा करताना एकूण लोकसाहित्यातील लोकगीतांशी लोकगीते वरील गोष्टींचे बाबतीत कशी सुसंगत आहे हे तात्विच चर्चा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ही लोकगीते एकूण लोकगीतांशी सुंसगतच आहेत. त्यातील वेगळेपण हे केवळ प्रादेशिक स्वरूपाचे आहे हेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

चाळीसगाव डांगाण परिसरात विशेषतः स्त्रियांची ओवीगीतेच आढळतात. याखेरीज तालबद्ध गीते सापडतात. ती रचनेच्या दृष्टीने कोणकोणत्या प्रकारची आढळतात हे स्थूल स्वरूपात दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु रचनेपेक्षा आशय आणि भावाभिव्यक्ती महत्त्वाची असते; हे लक्षात घेता इतर मान्यवर लोकसाहित्य विशारदांनी मांडलेल्या लोकगीतांच्या प्रकाराची चर्चा करून परिसरातील लोकगीतांचे आशयानुरुप असे मोजकेच प्रकार करून त्यानुरुपच पुढे परिशिष्ट क्रमांक १ ची रचना केलेली आहे.

परिसरातील लोकगीतांचे वाङ्‌मयीन समालोचन करताना पद्धती कोणती वापरावी, असा प्रश्न नेहमीच पडतो. आतापर्यंत लोकसाहित्य विशारदांना लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या संस्कृती चित्राची जाणीव झाली आहे.



लोकजीवनाचे दर्शन लोकसाहित्यातून कसे घडते यादृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाला मार्ग हवा. ही दृष्टीदेखील लोकसाहित्याच्या अभ्यासाला मिळाली आहे. 'चाळीसगाव डांगाण सांस्कृतिकअभ्यास' या प्रकरणात त्यादृष्टीने परिसरातील लोकसाहित्याच्या संदर्भातून अभ्यास केला आहे. म्हणून येथे केवळ वाङ्‌मयीन अभ्यासाचा प्रयत्न आहे.

**चाळीसगाव डांगाण लोकगीत प्रेरणा –**

सर्व लोकगीतांच्या प्रेरणांपेक्षा चाळीसगाव डांगाण लोकगीतांच्या प्रेरणा काही वेगळ्या आहेत वा असाव्यात असे नाही.

लोकगीतांच्या मागील प्रेरणांच्या संदर्भात झालेल्या चर्चेचा कानोसा घेतल्यास वरील गोष्टीस दुजोराच मिळतो. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी लोकगीतांमागे तीन प्रेरणा असतात असे सांगितले आहे.[१] त्या अशा–

१) अद्‌भुततेची प्रेरणा २) देवाधर्माची प्रेरणा ३) कौटुंबिक प्रेरणा. त्यांच्या मते यात कौटुंबिक प्रेरणा अधिक बलिष्ठ असते.

लोकगीतांचे स्वरूप व वैशिष्ट्य स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे यांनी पुढील चर्चा केली आहे.[२]

१) लोकगीते ही समूहमनाची निर्मिती असल्यामुळे त्यातून समूहमनाला आवाहन असते.

२) लोकसंस्कृतीचे आणि प्रकृतीचे सरळ आणि भावगर्भ स्वरूपदर्शन लोकवाङ्‌मयातून घडते.

३) लोकगीताची निर्मिती होत असते आणि ती गीते लोप पावत असतात. त्यांची जडणघडण सतत चालू असते.

४) लोकगीतात सर्वांनी भाग घ्यावयाचा असतो.

५) लोकगीतांचा बहुधा कोणत्यातरी कृतीशी संबंध असतो. यावरून असे लक्षात येते की, सबंध जीवनातून गीतनिर्मितीला प्रेरणा मिळत असते. त्यात सामूहिककार्य किंवा सामूहिकश्रम या प्रेरणा लोकगीतांच्या मागे असाव्यात. सबंध संस्कृतीतून या प्रेरणा मिळत असल्याने संस्कृतीतील बदलामुळे प्रेरणांमध्ये बदल होईल. परंतु संपूर्ण संस्कृती हीच प्रेरणा आहे, असे म्हटले तर योग्य होईल. लोकजीवनातील कृतीमध्ये उत्कट झालेल्या भावना लोकगीतांच्या प्रेरकशक्ती होत असे म्हणता येईल.

तालबद्ध गद्याशी चर्चा करताना श्रीमती दुर्गा भावगत यांचे जे विचार आले आहेत ते विचारात घेण्यासारखे आहेत. ''गद्यापासून उंचावलेल्या एका अतर्क्य

नादमय तालान्वित स्वरात ही वचने विलीन झाली आहेत. वैयक्तिकअनुभूती व सामाजिक अनुभूती यांची एकतानता या स्वरात हमखास जाणवते. 'हे गद्य' शंभर टक्के गद्य असूनही गद्याच्या साऱ्या परिचित मर्यादा ओलांडते. आणि तरीही ते पद्यात सामावत नाही. जणू त्यातली ही सूक्ष्म गती पेलायला पद्याचेही बंधन असमर्थ असेच असते. विशिष्ट अनुभूतीच्या विश्वात्मक प्रेरणा अत्यंत सरळ व सुगम निवेदनात विलक्षण भावघन वृत्तीने हे ऋषी हे ओतताना दिसतात.''[३] यामध्ये जी तालमयता व नादमयता जाणवते ती सर्वच कृतींच्या मागी तीव्रतर भावना असेल तर येते व त्यातूनच काव्यनिष्पत्ती होते असे म्हणता येईल. वरील विचार जरी वेगळ्या संदर्भातील असले तरी त्यातील तालमयता आणि नादमयता ही गीतप्रेरणाच म्हणावी लागेल.

लोकगीतांच्या संदर्भातील श्रीमती दुर्गा भागवत यांनी क्रापने केलेले विवेचन दिले आहे. यासंदर्भात ते लक्षात घेणे जरूर आहे. ''लोकगीत हे संपूर्ण ललित प्रवृत्तीचे काव्य असून कमालीचे आत्मनिष्ठ असते. काव्यवस्तुचा आविष्कार लोकगीतात अत्यंत गांभीर्यपूर्ण असा असतो. कधी कधी तर गंभीरपणा इतका अतिरेकी असतो की त्याला बालिशपणाची कळा येते.''[४] यातील एकगोष्ट महत्त्वाची आहे; ती ही की हा ललित प्रकृतीचा आविष्कार असतो. ते आत्मनिष्ठ असते. ललित प्रवृत्ती म्हणजे जर कलात्मक जाणीव मांडली तर त्यातून नादमयता व तालमयता निर्माण होते. ही ललित प्रवृत्ती हीच गीतप्रेरणा असू शकेल.

एकूण लोकगीतांमागे संपूर्ण लोकगीताचीच प्रेरणा असते. १) अद्‌भुताची प्रेरणा २) देवाधर्माची प्रेरणा ३) कौटुंबिक प्रेरणा ४) कृतीतील तालमयता व नादमयता व ५) कलात्म वृत्ती किंवा ललित वृत्ती या प्रेरणा महत्त्वाच्या असतात असे म्हणता येईल.

हीच गोष्ट डांगाणी लोकगीतांच्या बाबतीत देखील खरी आहे. त्यांच्या गाण्यातून याच प्रेरणांची जाणीव होते. यात कौटुंबिक जिव्हाळा खूप असतो. संसारातून सुखदुःखे गीतातून व्यक्त होत असतात. जात्याती घरघर, कांडणाचा ठेका, पाट्याची घसरण, विळ्यांचा सपसप, रोपे लावताना हातांची होणारी हालचाल इत्यादी यातून नाद आणि ताल गवसला आणि त्या तालावर त्या नादात श्रमपरिहारार्थ मुखातून बोल बाहेर पडले. गुरांमागे धावताना, गुरांमागे चालताना, झाडे तोडताना, झोपड्या शिवताना, इरणे शिवताना, गायांच्या धारा काढताना संगीत लाभले आणि भावनांना वाचा फुटली. या भावना कौटुंबिक, सामाजिक, अध्यात्मिक स्वरूपाच्या होत्या. कुटुंब, समाज आणि अद्‌भुतातून अमानवी



गोष्टीतून लाभलेली श्रद्धा या गाण्यांना प्रेरक ठरली. लक्ष लक्ष चांदण्यांच्या घोळक्यात दिमाखाने आपल्या टिपूर चांदण्यासह चंद्र; तेजाने चकाकणारा गगनाधिपती सूर्य, गगनचुंबी पर्वतशिखरे यांनी त्यांच्या मनात दिव्यत्वाचा साक्षात्कार घडविला आणि ऊन, पाऊस, वारा, कडे, जनावरे व जमीन यांच्या सान्निध्यात कष्ट करताना, कष्टातील कष्ट नाहिसे होण्यासाठी गान स्फुरले. प्रत्येक अनुभवाने नवी प्रेरणा दिली आणि नव्या बदलाने नवीन अनुभव दिला. सामूहिक कार्यातून सर्वांच्या आत्मनिष्ठ परंतु सारख्या भावना आपोआप प्रस्फुरीत झाल्या. त्या समूहाने त्या गीतांना गायिले. पोरांनी ती ऐकली. गाऊन पाहिली. नवी रचून पाहिली. त्यांच्या प्रवासाबरोबर ती देशोदेशी गेली. तशीच ती डांगाणात रुजली. जुन्यातील नित्य नवी प्रेरणा घेऊन परंपरा टिकविणारी.

चाळीसगाव डांगाणी लोकगीते वाचू लागलो, ऐकू लागलो की याची जाण सामान्य वाचकाला देखील येईल.

अगदी पहिले लोकगीत कसे निर्माण झाले असेल याविषयी विचार करू लागले की भाषा कशी तयार झाली असावी याविषयी ज्या व्युत्पत्ती मांडल्या गेल्या आहेत त्यातच लोकगीतांचे बीज सापडले असे म्हणावे लागेल.

**वाङ्‌मयीन सौंदर्य –**

वाङ्‌मयीन सौंदर्य स्पष्ट करताना एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवावयास हवी ती ही की, ही चर्चा कोणत्या एका गीत प्रकाराची नाही. एकूण लोकगीतांचे वाङ्‌मयीन सौंदर्य काय दिसते हे अभ्यासावयाचे आहे.

**१) रचना सौंदर्य –** रचनेतील काटेकोरपणा येथे सापडणार नाही, परंतु रचनेतला विशिष्ट असा ठेका-ताल येथे जरूर आहे. शब्दांची कृत्रिम रचना व योजना यांना जमणारच नाही. लोकजीवनातील शब्द वापरताना मनातील भाव व्यक्त करण्यासाठी ओघात आला तो शब्द ते वापरतात. प्रासात्मक रचना त्यांना आली नाही. तरी मराठी कवितेचे वैशिष्ट्य 'यमक' ते विसरत नाहीत. सर्वदूर लोकगीतातून आपणास हेच पाहावयास सापडते. रचनेत पूर्ण ढोबळपणा दिसला तरी गाण्यातील लकेरीत तो दिसत नाही. आधी ताल, आधी नाद आणि त्याअनुसारी सहज स्वरातून बाहेर पडलेले दैनंदिन जीवनातील भावप्रधान शब्द. रचनेची बंधने कशी पाळणार? मग लोकगीतांची परंपरा आणि सार्वत्रिकतेत जी एकता दाखविता येते ती कशी हा प्रश्न मनात येतो. पण त्याचबरोबर उत्तर मिळते की लोकगीतातील परंपरेत नित्यनवता असली तरी सबंध लोकजीवनात श्रम, भावना, जीवन, जीवन यातील ताल, नाद आणि अनुभूतीत एकात्मता आहे.

म्हणूनच लोकजीवनातील कल्पनांमधून एकता आहे. शब्दात बदल असतील. जो जो दूर जावे तो तो ते अधिक आढळतील, पण ते एकाच कल्पनाबंधातून अडकलेले व ताल नादानुसारी आहेत. व हा ताल हा नाद एक आहे. नैसर्गिक आहे. त्याच्या लयीत भावनांच्या आंदोलनांना घेऊन जाण्याचे सामर्थ्य आहे. ही आंदोलने शब्दातून श्रवतात, चालीतून श्रवतात, मग रचनेतील ढोबळपणा तालात विरून जातो हे लक्षात घेतले की या गाण्यामधील रचनासौंदर्य हे या तालावरून, नादावरून ठरवावयाचे आहे. ठेका हीच त्याची रचना घडविणारी शक्ती. अगदी गद्य वाटणारी पद्ये सुद्धा अशीच आश्चर्यचकित करणारी आहेत यांची विपूल उदाहरणे देता येतील.

**२) भाषासौंदर्य –** रचनासौंदर्याबरोबरच भाषासौंदर्य अभ्यासणे जरूर आहे. भाषासौंदर्याचे दृष्टीने पाहता लौकिक साहित्यातील व अभिजात वाङ्मयातील भाषासौष्ठव यात नाही. हे खरे वाटत असले तरी प्रामुख्याने एक गोष्ट येथे ध्यानात घेणे जरूर आहे. ते हे की काव्यच मुळी काव्य करणे या हेतूने झाले नाही. एवढेच नव्हे तर ते कोणी ऐकणार आहेत म्हणून देखील झालेले नाही. म्हणूनच त्यात भाषासौंदर्य दिसत असेलच तर ते अत्यंत नैसर्गिक आणि सहज आले आहे असेच म्हणावे लागेल.

या गीतातून यमकांची रेलचेल आहे. किंबहुना प्रत्येक गाण्यात ते पाहावयास मिळतेच असे म्हणता येईल. त्यादृष्टीने प्रासात्मक रचना कमी आहेत. याची पुष्कळ उदाहरणे देता येतील.[५] वानगीदाखल काही उदाहरणे घेऊ.

**सीताला सासूरवास केलाई बहू बहू[६]**
**वाटून काई दिला समेली गहू गहू**
**सीताला सासुरवास केला मी केसकेशी**
**वाटून काय दिला समेली देशोदेशी**

यमक जवळजवळ प्रत्येक गाण्यात आहे तर अनुप्रास अगदी क्वचित घडतो. उदाहरणार्थ,

**देवूजीना दिल मला दैवनादासिच ।[७]**
**गुसळाया दिल दुध पारठ्या म्हसीच ।।**

या सर्वच गाण्यांतून उपमा, उत्प्रेक्षा, रूपक या साम्याधिष्ठित अलंकारांची अगदी रेलचेल दिसते. त्यातही उपमेने सर्वात मोठा प्रांत व्यापला आहे हे ओघानेच आले. त्यांची विपुल उदाहरणे संपूर्ण डांगाणी गीतांतून आढळतात. त्यातल्या कल्पना रोजच्या जीवनातून व निसर्गातून घेतल्या जातात. उदाहरणार्थ,



**भाऊ केला येही केला ज्या चालीचा[८]**
**बंधुराया महा हिरवा डोंगर घालीचा ।।**
**बाईला मांगना पल्यापल्यानी झालं धवं[९]**
**गवळण माझी ढगामंदी इज लव ।**
**वऱ्या पाई तुझं कान कसा मा पेलीलं पान[१०]**
**आमच्या गावच्या पोरी 'कशा...'**
**लांब लांब थानाच्या शेळ्या जशा ।।[११]**
**राज हौसां केला येही का जाई मी मवाला[१२]**
**नथीच्या डझणी मी लोळे का जाई भीमवाल्या**

याखेरीज इतर अलंकार दिसत नाहीत असे नाही पण ते क्वचित आढळतात. त्यांची उदाहरणे खूपच कमी आहेत.

उदाहरणार्थ, सीतेला झालेल्या सासुरवासाचे हे वर्णन अतिशयोक्तीपूर्ण परंतु भावगंभीर आहे –

**सीताला सासुरवास केलाई केशोकेशी[१३]**
**वाटून काई दिला सगळा देशोदेशी ।।**

पंढरीच्या विठ्ठलाचे हे वर्णन पाहा. किती साधे पण सालंकृत आहे.

**पंढरीचा विठू किती ग आहे घट[१४]**
**अवघ्याना सृष्टीला उभ्यान देतो भेट ।।**
**विठ्ठलाशेजारी राही रुक्मीन बसानं**
**अबीरबुक्याची इला गरदी सोसानं ।।**
**पंढरपुरात पैशाच्या माळा नऊ**
**पुरान महा हात विठ्ठलाखाली लऊ ।।**

छद्मीपणाने अलंकृत झालेले हे गीत पाहा –

**राजा हौसान केला येही[१५]**
**मी त मांगत नही काही ।।**
**मी त मांगते थोडा थोडा**
**नवरदेवाला कंठी कडा ।।**
**कंठी कड्या सोना फिका**
**माझ्या कंगण्या जोग रुपा ।।**
**कंठीकड्याचा झाला भार**
**मी त मांगते चंद्र हार ।। .. इत्यादी**

त्याचप्रमाणे काही कूटरचना देखील पाहावयास मिळते. त्यात कोढी देखील असतात.

**जानी गाय विली गणेशा जानी गाय विली**[१६]
**जानीला झालाय गोऱ्हा गणेश जानीला झालाय गोऱ्हा ।।**

**मह्या मळ्यातून जाई**[१७]
**गोपाळा, तुझ्या मळातून जाई**
**जाई पुन जाई तिरपून जाई**
**एवढ्यात लहान कायी? गोपाळा**
**उत्तर दे मंग जाई, गोपाळा**
**मह्या मळ्याची शिंगी, गोपाळा**
**तुझ्या मळ्याची शिंपी**
**यव्हढ्यात लहान मुंगी, गोपाळा**
**यव्हढ्यात लहान मुंगी ... इत्यादी**

अनेक खोचक प्रश्न विचारले जातात व त्यांची उत्तरे मिळतात.

अलंकारिकता हे या गाण्यांचे वैशिष्ट्य नाहीच. प्राथमिक स्वरूपातील अलंकारच येथे पाहावयास मिळतात. त्याचे कारण हेच. अर्थात अशा तऱ्हेची अलंकारिक रचना घडली तरीदेखील त्यात पूर्ण नैसर्गिकपणा असतो. ते अलंकार देखील परंपरेने आलेले असतात. शिवाय त्यात कमालीचा तोच तो पणा भरलेला आढळतो.

या लोकगीतांचे खरे वैशिष्ट्य आहे तेप्रासादिकता. सोप्या शब्दात सरळसरळ जसे दिसते तसे हुबेहुब सांगण्याची लकब त्यात असते. परंतु त्यात प्रसादगुणास आवश्यक तेवढे माधुर्य असतेच असे नाही. कदाचित ते नागरी भाविकांना जाणवत नसेल. ते लोक मात्र जीव ओतून ती गाणी म्हणत असतात. जवळजवळ सर्वच गाण्यांतून भाषेचा सोपेपणा आणि सहजता आढळते हे मात्र खरे. त्याची उदाहरणे स्वतंत्रपणे पाहाण्याची गरजच नाही. तरी काही वानगीदाखल घेऊ या.

उदा. १

**श्रावणबाळ रे चाला काशीला चाला काशीला**[१८]
**माते-पितेची र कावड खांदेला, चाला काशीला ।।**
**कावड उतरून ठेवली येला साईला ।**



**श्रावण ताणा बाळ गेला पाणी सोधिला ।।**
**दसरथ राजानं रं बान मारीला श्रावण बाळाला ।**
**श्रावण बाळ रं धरणी पडीला धरणी पडीला ।।**

उदा. २

**गाईच्या रं बाळा तुझ्या काठीला घुंगरु**[१९]
**घुंगराच्या नादा गाई चालल्या डोंगरू ।।**
**गाईच्या रे बाळा तुझ्या कंबरी फडका**
**फडकेच्या नादा गाई चालल्या सडका ।।**
**गाईच्या रं बाळा तुझ्या खांद्याव घोंगडी**
**घोंगडीच्या नादा गाई चालल्या बावडी ।।**

उदा. ३

**फुलली जाई येल मांडवी गेला ग सई**[२०]
**आईबापानी तुला माहयेरी नेला काय काय**
**बोळवण केली ग सई? ।।**
**आईबापानी मला माह्येरी नेला**
**नथीची बोळवण केली ग सई ।।**
**आईबापानी माह्येरी नेला**
**चोळीची बोळवण केली ग सई ।।**

अशा प्रकारे अत्यंत साधे बोलीतील शब्द भावपूर्णपणे बाहेर पडतात. त्यात कोठे म्हणून कृत्रिमता नाही. जसे बोलणे तसे गाणे.

असे जरी असले तरी या वर्णनातदेखील बऱ्याच वेळा ग्राम्यता येते. अर्थात ही ग्राम्यता त्यांना जाणवत नाही. त्यांना ते सहज वाटते. त्यांना या ग्राम्यतेचा अजिबात विधिनिषेध नाही. त्यांच्या संस्कृतीत ते अगदी सहज आहे. ज्याला नागरलोक ग्राम्यता म्हणतात ते त्यांच्या वापरण्यात नित्य असते. मग त्याला ग्राम्यता म्हणता येईल का? याची उदाहरणेदेखील उदंड आढळतात.

उदा. १

**दिन दिन दिवाळी गाईमची ववाळी**[२१]
**गायी कुनाच्या लक्ष्मणाच्या**

**चोळून मोळून केली हरका**
**हारका हारका दळले गहू**
**आमच्या गावाचे पंडित पवू**
**पंडिताचे उभे टिळे**
**न्हायाच्या बोच्यात ठोकळे खिळे**
**खिळे वाजे करावर**
**न्हाही पादे परापर**

उदा. २

**आमच्या गावच्या पोरी कशा पोरी कशा**[२२]
**लांब लांब थानाच्या शेळ्या जशा ।।**
**आमच्या गावचे पोरे कसे पोरे कसे**
**गावातून हिंडतात जामे जसे ।।**

उदा. ३

**आंधळी पुसती पांगळीला**[२३]
**हा गाया चालतीय खंगळीला ।।**

इत्यादी कितीतरी उदाहरणे अशी आढळतात. केवळ सौंदर्य लक्षात घेतानाच ही बाबदेखील लक्षात घेतली पाहिजे. 'लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडिस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीस मागे खेचून धरणारा आहे'[२४] असे जरी श्रीमती दुर्गा भागवत यांनी म्हटले असले तरी सर्वस्वी ते खरे वाटत नारी. शिवाय असा प्रकार असला तरी परंपरा, अनुभूतीची कक्षा व लोकजीवन यांचा विचार करता आपली दृष्टी लावण्यापेक्षा, त्यांची दृष्टी स्वीकारल्यास यातील प्राम्यता काही वेगळी वाटते. शिवाय तोच तो पणालादेखील काही वेळा वेगळे अर्थ व संदर्भ मिळालेले असतात हे ध्यानात घ्यावयास हवे असे वाटते.

**(३) भावसौंदर्य –** मानवी जीवनातील साऱ्याच भावना या गीतांतून व्यक्त झालेल्या असतात. येथे एक शंका येणे शक्य आहे की खरोखरीच जर अशा भावना व्यक्त होत असतील तर गीतांमध्ये जो तोच तोच पणा किंवा पारंपरिकता असेल तिचे समर्थन कसे करावयाचे? अशा प्रकारचा तोच तोच पणा किंवा पारंपरिकता असली तरी भावनांच्या उत्कटतेबरोबर शब्द बदलतात; शब्दातील भावनांचा आर्तपणा वाढतो. त्याच त्या गाण्यातून आपली भावना व्यक्त होऊ शकते, हे सहानुभूतीचा विचार करता ध्यानात येईल. म्हणूनच या लोकगीतांतून भावना व्यक्त झालेल्या असतात असे म्हटले. केवळ परंपरेने गायची म्हणून ती



गायली जात नाहीत हे खास.

परमेश्वरावरील श्रद्धा त्यांच्या गीतातून पाझरत असते. यालाच धर्मश्रद्धा असे म्हणता येईल. यात राम, कृष्ण, पांडव व संत यांचे संदर्भ असतात व त्यांची नावे घेत घेत आपले श्रद्धामय जीवन ते त्यातून व्यक्त करतात. ही धर्मश्रद्धा फार मोठ्या प्रमाणावर या डांगाणी लोकगीतांतून दिसून येते. या धर्मश्रद्धोत कौटुंबिक जिव्हाळा असतो. त्यामुळे राम, कृष्ण व संत व स्थानिक दैवते ही कुटुंबियांप्रमाणेच गीतातून उल्लेखिलेली दिसतात. उदाहरणार्थ–

(१)

**जनी जाते ओ श्येनाला**[२५]
**उभा पाठी मागे काना**
**''जने येऊंदे ग मला, शान येचुन देईन तुला''**
**घालून पीतांबराची काच, शान येच चहू बाज**
**शान येचून बांधली म्वाट, काना देतो मोटला गाठ**

(२)

**सीता चालली वनवासा आडव्या गेल्या म्हशी**[२६]
**बारा वर्षाचा वनवास सीता भोगशील कशी ।।**
**रामाला आला घाम सीता पुशी फडकीना**
**रामजीला रथ कसा पुढची हालना ।।**

(३)

**देवथबाई बाळवंतीन इला बारावा लोटला**[२७]
**इच्या न्हानी बरी बाई इला पाना दाटला ।।**
**जल्मीला किसन देवू दोह्या मांडीव माहेना**
**कोनी इसायती पानी कोनी न्हानी किसनाला ।।**

(४)

**जनाबाई साळी सडी नामदेव मुसाळ धरी**
**'नामदेवा मुसाळ सोड तुझ्या हाता येतील फ्वाड'**
**'फ्वाड आले त येऊंद्या साळी कांडून घेऊंद्या ।।**

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.[२८]

कुटुंबातील, समाजातील, वैयक्तिकजीवनातील सारी सुखदुःखे गाण्यातून व्यक्त झालेली असतात म्हणूनच श्रम करताना आपोआप गाणी बाहेर पडतात. जात्यावरच्या ओव्या तर खरीखुरी भावगीते आहेत.[२९]

सणाउत्सवांची गाणी, अंगणातील गाणी, दैवतांविषयीची गाणी ही सारीच गाणी सुख, आनंद, श्रद्धा व्यक्त करण्यासाठी उत्सव साजरे करण्यासाठी गायली जात असली तरी त्यात, पडणारे श्रम, घर, मुले, सासुरवास, नातीगोती, रोगराई, आयुष्य, म्हणजे एकूण जीवनातील साऱ्या गोष्टींविषयीच्या भावभावना व्यक्त होत असतात. या भावना व्यक्त होताना ती ओठातून बाहेर पडणारी गाणी भारावून बाहेर पडतात. म्हणूनच त्याच त्या शब्दातूनसुद्धा जिवंतपणा दिसू लागतो. आणि आपोआपच त्यातला तोचतोपणा नाहीसा होतो. आपल्या साऱ्या हौशीमौजी उदाहरणार्थ, दागदागिने, कपडालत्ता, सोयरसंबंध इत्यादी गाण्यातून का होईना पुरवून घेतल्या जातात. प्रत्यक्ष झोपड्यातून राहणारे, गुडघा गुडघा चिखलात काम करणारे अहर्निश काबाडकष्ट करणारे हे लोक गाण्यातून का होईना, जीवनातील पूर्ण आनंद मिळवितात. सर्वच गीतांतून हे पाहावयास मिळते.

काही लोकगीते असे म्हणण्यापेक्षा सर्वच लोकगीते कृतीशी निगडित असल्याने विधी गीतांना मंत्र सामर्थ्य प्राप्त होणे साहजिकच आहे. लग्न, बारसे, पाचवी किंवा दैवतांची गाणी यांना मंत्र सामर्थ्य आहे. विधींची संपन्नता ही त्या गीतांवर अवलंबून असते. अत्यंत श्रद्धेने, अत्यंत प्रेमाने, जिव्हाळ्याने ही गीते गायिली जातात. येथे त्यांच्या जीवनातील पवित्रता, उदारता, महानता या गीतांना निगडित असते. लग्नसमारंभाची मागणी घालण्यापासून मुलीला पाटी नण्यापर्यंतची सर्व गीते आहेत. ती गीते लग्नसमारंभप्रसंगी न झाल्यास त्या समारंभास अर्थ उरत नाही. त्याचबरोबर विधींमध्ये काही कमतरता घडली तर एक वेळ चालेल; ही गीते झाली की सारे मांगल्य लाभले; सारे यथासांग झाले, किती भावना यात गुंतलेल्या आहेत ते या गीतावरून लक्षात येईल. नवरीचे सौंदर्य, शृंगार, कपडालत्ता, सासरमाहेरच मोठेपण अत्यंत सुरेखपणे या गाण्यात प्रतिबिंबित झालेले दिसते.

साऱ्या नवरसांची रेलचेल वास्तविक पाहता या गीतांतून झालेली आहे असेच पाहावयास मिळेल. एवढेच की त्या रसपोषणासाठी कृत्रिम शब्दयोजना केलेली आढळणार नाही. येथे पूर्वतयारी कोठेच नसते. हे सारे उत्स्फूर्त असते. मात्र एक गोष्ट येथेच नमूद करावीशी वाटते. शृंगारगीते जेवढी असावयास पाहिजेत किंवा शृंगाररसाचा प्रत्यय डांगाणी लोकगीतात फारच सामान्यपणे आढळतो. शृंगार व्यक्त झाला ती तो गौळणींच्या रूपात. उदा.

**दडीवर दुडी गवळणी आल्या लई**[३०]
**सोड किसना वाट दुधाची झाली कोई ।?**



**दुडीवरी दुडी गवळणी झाल्या बारा**
**सोड किसना वाट दुधाच्या झाल्या नारा ।।**
**दुडीवरी दुडी गौळणी आल्या थोड्या**
**कळंबाच्या खोडी किस्ना मारितोयी खड्या ।।**

अशी अनेक उदाहरणे देता येतील. परिशिष्टात दिलेली आहेतच. लोकगीतांतून उघड शृंगार मात्र या भागातील गाण्यांतून आढळत नाही. मात्र त्यांच्या तमाशांतून ज्या शृंगारिक लावण्या गायिल्या जातात त्या वास्तविक पाहाता सर्वच पुरुषांच्या तोंडी ऐकू येतात.

डोंगरदऱ्यात राहाणाऱ्या, रानावनात भटकणाऱ्या, शेतातून काम करणाऱ्या या आदिवासींच्या भावना एकच असल्याने त्या व्यक्त करण्यास लोकगीते हे एक साधनच झाले आहे. म्हणूनच प्रत्येक वेळी प्रत्येक गाण्याला प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक व्यक्तीगणित एक आगळेवेगळे भावविश्व तयार होते.

व्यक्तींपासून समष्टीपर्यंत सर्वांच्या अंतःकरणाचे वस्तुनिष्ठ, भावस्पर्शी चित्रण या गीतांतून झालेले आढळते. निसर्गाचे आणि लोकांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असल्याने निसर्गाचे आणि निसर्गाच्या सान्निध्यात वाढणाऱ्या लोकजीवनाचे भावनामय चित्र त्यांच्या अगदी साध्या शब्दसृष्टीतून चित्रित झालेले आढळेल. जीवनातील मुष्ट-दुष्ट-भाव, सुखदुःखाचे अनुभव, प्रेम, माया, अहेवपणा या साऱ्या गोष्टी मुक्तपणे व्यक्त झालेल्या असतात. म्हणूनच लोकजीवनाचे अंतरंग लोकवाङ्मयात मनमुरादपणे व्यक्त झालेले असते असे म्हणावेसे वाटते.

लोकजीवनातील गोंधळी, भुत्या, कडकलक्ष्मी, नंदीबैलवाले इत्यादी फिरत्या लोकांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या गाण्यांतून त्यांच्या स्वतः च्या नव्हे तर लोकांच्या भावना चेतविल्या जातात. विशेषतः धर्मभावना, विशेष जागविली जाते. निसर्गातील अद्भुत-चमत्कारांमुळे, निसर्गशक्तीवरील श्रद्धेमुळे तर लोकजीवन सबद्ध झाले आहेच; तथापी या लोकांनी ते अधिक सबद्ध बनविले. डोंगरदऱ्या, राने यांच्या सान्निध्यात राहाणाऱ्या लोकांना वेळोवेळी या संस्थांनी भेटी दिल्या आणि दिलासा दिला आहे. लोकजीवनातील धर्मश्रद्धा व जीवनावरील श्रद्धा जगविण्याचे कार्य या लोकांनी केले. असेच त्यांच्या गीतांवरून दिसते. त्याच श्रद्धा लोकगीतांतून व्यक्त झालेल्या दिसतात.[३१]

**वाङ्मयीन आनंदाचे स्वरूप –**

इतर सर्वदूर लोकगीतातील वाङ्मयीन आनंदाचे जे स्वरूप असते त्यात आणि येथील गीतांत फारसा फरक नाही असे म्हणता येईल.

या आनंदाचे स्वरूप त्रिविध स्वरूपाचे आहे असे दिसते.

(१) श्रमपरिहार व श्रमसाफल्याचा आनंद

(२) आत्मप्रगटीकरणाचा - वैयक्तिक आणि सामूहिक - आनंद

(३) कलात्मकतेचा आनंद

लोकगीतांचा जवळजवळ सर्वच भाग श्रमांशी वा अन्य कृतींशी जोडलेला आहे. कृतीबरोबरच श्रद्धा, भावना यांचे प्रगटीकरण चालू असते. हे श्रम किंवा या कृती म्हणजेच त्यांचेजीवन. हे सारे जीवन उजळण्याचे कलात्मक नैसर्गिक साधन म्हणजे ही लोकगीते. दुःखाचे विवेचन, आनंदाचे व्यक्तिकरण, सुखाचे प्रदर्शन, इच्छा-आकांक्षांचे प्रगटीकरण, रचनेचा आनंद, शक्तींचे पूजन, समारंभाची संपन्नता, निर्मरमनाचे क्रीडन, रुढींचे पालन, या साऱ्याच गोष्टी गायनातून साधल्या जातात. त्यामुळे जीवनातील चैतन्य, आनंद, सुख यांचे निधान म्हणजे ही लोकगीते आहेत. लोकमानसातील कलात्मकता अशी अजाणता या गीतांतून व्यक्त होते आणि लोक बेहोश होऊन कधी जाणीवपूर्वक तर कधी अजाणता ही गीते म्हणतात. आणि आपले सारे जीवन त्यातून फुलवितात.

या आनंदाला कोणत्याही मर्यादा असत नाहीत. त्यामध्ये एक नैसर्गिक गतिशिलता असते. कोणत्याही भावनांना येथे बंधन नसते. मग कधी स्वैरपणे बीभत्स स्वरूपाची गीते गायली जातात आणि त्यातूनदेखील त्यांना एक स्वैर आनंद मिळतो. मग कमओ अभिरूचीच्या बाबतीत त्यांना काही म्हणेल याची त्यांना क्षिती नसते कारण ही काणी म्हणताना ती कोणालाच ऐकविण्याचा त्यांचा मानस नसतो. ती त्यांच्यासाठीच असतात.

परंपरेने चालत आलेल्या गीतांत आपले आपल्या प्रदेशाचे, आपल्या काळाचे जीवन गोवताना, त्यात ते पूर्ण मिसळून टाकताना, रचनेचा आनंद त्यांना मिळत असतो. आशय तोच, अनुभव भिन्न परंतु त्या नव्या अनुभवाचे प्रगटीकरण त्यांना हवे असते. म्हणूनच गीतांचे प्रकार तेच असले तरी अनुभूती भिन्नतेमुळे त्यातला तोच तो पणा जातो आणि नित्य नाविन्यातील चैतन्य या लोकगीतात गवसते. म्हणूनच लोकगीतांतील आनंद कधीच संपत नाही. तो चिरंतन स्वरूपाचा असतो. म्हणूनच लोकगीताचा प्रत्येक पाठ हा अस्सल आणि शुद्धच असतो. तसाच त्यातील प्रत्येक वेळी मिळणारा आनंद शुद्धच असतो.

जीवनातील सारे दुःख, सारे श्रम, साऱ्या काळज्या, नष्ट करण्याचा सामर्थ्य या आनंदात असते. सुकाळ असो, दुष्काळ असो, यांची गाणी जीवनाबरोबर पुढे जात असतात आणि गाण्यांमध्ये सारे जीवन सामावले जाते. आणि निसर्गाच्या



छायेत जगणे अत्यंत सुकर होते. ही लोकगीते जर या लोकजीवनातून वगळली तर सारे जीवनच रूक्ष होईल. पण ती लोकगीते दुर्दैवाने नष्ट होऊ पाहात आहेत. सुधारणेच्या साधनेत आणि सान्निध्यात, यंत्रयुगाच्या कचाट्यात, लोकगीतरूपी भावनिक अमृतकुंभ लवंडून जातो की काय अशी शंका काही लोकांच्या मनात येणे साहजिकआहे. परंतु तसे वाटत नाही. कारण त्यात असलेली सवसमावेशकता; काळ, प्रदेश यांतील बदल क्षणकाल गोंधळात टाकणारे दिसले तरी त्यांचे 'जुन्यावर नवे कलम' होते आणि सारे नवीन देखील लोकगीताचे अंग बनून जाते. युगानुयुगे झालेले असंख्य बदल या गीतांनी किंवा या संपूर्ण लोकसाहित्यानेच म्हणाना, समजावून घेऊन आपला प्रचंड स्रोत चालू ठेवला आहे. ते नैसर्गिक ठरले आहे. या अर्थानेच ते अपौरुषेय आहे. म्हणूनच त्यातील आनंद चिरंतन, चैतन्ययुक्त गतिशील स्वरूपाचा आहे. त्याच्या येणाऱ्या, असणाऱ्या व भूतकाळातील बऱ्यावाईटासह ते असेच चिरंतन चालत राहील. पुढे जाईल, आनंद देत जाईल, असेच त्यांच्या प्रकृतीकडे पाहाता म्हणावेसे वाटते.

**धार्मिकसंदर्भ -**

या भागातील दैवते म्हणजे कळसुबाई, टाकेद, घोरपडबाई, पट्ट्याकंदी म्हसूबा, बिरोबा, काळुबा, टाहाकारीची देवी, तातोबाचा मठ, सीतापाऊल, याशिवाय बांधाबांधाला, घाटाघाटाला, वेशीवेशीवर असलेली अगदी स्थानिकस्वरूपाची दैवते; तसेच हरिश्चंद्र, अमृतेश्वर, चेमदेव ही दैवते व महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा व तुळजापूरची भवाना माती ही होत.

मरीआईसारखी फिरती देवीदेखील त्यांचे श्रद्धास्थान आहे. गडागडाच्या मावलया, वाऱ्या, बळी, सली इत्यादी गोष्टींवर देखील त्यांची श्रद्धा आहे.

या सर्वांना नवस करणे, त्यांना प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करणे यासाठी केवढा जीवाचा आटापिटा. त्यांची पूजा, त्यांच्या जत्रा, त्यांच्या यात्रा, त्यांचे नियमधर्म या गोष्टी म्हणजे त्यांचे धर्मपालन होय. या सर्व धर्मश्रद्धास्थानांचा भावपूर्ण संदर्भ येथील गीतातून ओथंबून वाहात आहे. कोणी जात्यावर बसल्या बसल्या या साऱ्या दैवतांना दंडवत घालते तर कोणी ओवी म्हणते. कोणी गानरूपाने या दैवतांची जयगाथा गाते. हे सारे संदर्भ म्हणजे त्यांचा आधार आहे. दिलासा आहे. आपल्या पाठीशी प्रचंड शक्ती उभी आहे अशी श्रद्धा त्या गीतांमधून व्यक्त झालेली असते. ऊन, वारा, पाऊस, डोंगर, दऱ्याा यांतील कष्टमय जीवनात ही डोंगरदऱ्याातील दैवतेच त्यांना साथ देतात.

रामायण-महाभारतातील राम-पांडवांचे जे संदर्भ येथील गीतांमधून आलेले

आहेत ते पाहिले तर राम-पांडव हे त्यांचे जीवाचे सोबती आहेत खरे, पण ते राज्यावर बसलेले राम-पांडव नव्हेत, तर वनवासी राम-पांडव आहेत. आपल्या प्रमाणेच रानावनातून भटकणारे राम-पांडव त्यांना प्रिय होणे अगदी स्वाभाविक आहे. आत्यंतिक श्रद्धोने आणि कौटुंबिक जिव्हाळ्याने येथील लोकांनी त्यांना आपणास पाहिले आहे. सीतेचा सासुरवास, रामसीतेचे प्रेम, लवकुश व सीता यांचे वाल्मिकींच्या मठातील त्यांचे वास्तव्य, पांडवांची लेणी, पांडवांची तीर्थयात्रा हे सारे त्यांचे गीतांचे विषय झाले आहेत व डांगाणापुरतेच ते मर्यादित आहेत.

गाय आणि नाग हे देखील त्यांच्या गाण्याचे विषय झालेले आहेत आणि त्यापाठीमागे देखील हीच धर्मश्रद्धा दिसून येते. गाय हे तर त्यांचे धन. साऱ्या देवांची वस्ती गाईच्या ठिकाणी. सारी तीर्थस्थाने गाईच्या ठिकाणी दिसतात. पंढरीचे रूपक गाईवर केलेले दिसते. गाईसंबंधी कूटरचना देखील या श्रद्धोतून केलेली आढळते.

या सर्वच गीतांची विपूल उदाहरणे देता येतील. ती परिशिष्टात दिलेली आहेतच.[३२] म्हणून केवळ उल्लेख केला आहे.

या दैवतांवरील धर्मश्रद्धांबरोबरच संतसंदर्भ विपूल प्रमाणात आढळतात. विठ्ठल, कृष्ण, काना, जना, नामा आणि तुका यांचे उल्लेख इतर सर्व संतांच्या मानाने फारच मोठ्या प्रमाणावर आढळतात. या संतांना देखील त्यांनी आपल्या जीवनात सामावून घेतले आहे. आपल्या सुख-दुःखाच्या भावना व्यक्त करणाऱ्या असंख्य ओव्या या सबद्ध स्त्रियांनी त्यांचे नाव मुखातून घेत घेत त्यांना अर्पण केल्या आहेत. जणू या साऱ्या संतांना सुखदुःखाची गाऱ्हाणी ऐकविली तर पंढरीचा विठोबा आपले सारे दुःख हरण करील अशी त्यांची भावना असावी असे दिसते. या गीतांतून नामा, जना, तुका ही मंडळी अगदी येथील लोकांच्या कौटुंबिक जीवनातील भाषेत बोलतात. तशीच कामे करतात. अगदी काना, आणि विठू देखील गोवऱ्या वेचू लागतो. जाते दळू लागतो. ते सारे त्यांचे कुटंबीयच बनतात. या संदसंदर्भाची देखील विपूल उदाहरणे येथील गीतांतून सापडतात. ती परिशिष्टात पाहावयास मिळतीलच.[३३]

स्थानिकदैवतांचे संदर्भ गीतांतून असणे क्रमप्राप्त आहे; पण रामायण, म हाभारत व संत यांचे संदर्भ या गीतांतून दिसू लागतात तेव्हा मनात शंका उद्‌भवते की हे संदर्भ येथील गीतांमधून आले कोठून? आले कसे? हे सारे लोकांच्या स्थलांतरातून घडले असावे असे वाटते. परंतु त्याचबरोबर गोंधळी, भुत्या, भोप्या, वासुदेव, नंदीबैलवाले असे लोक ज्यांना डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'संस्कृतीचे उपासक' संबोधिले आहे,[३४] त्यांनी देखील ते पोहोचविले असावेत. दुवे सांधण्याचे काम केले असावे. त्याचबरोबर कीर्तनकार व वासुदेव, वारकरी यांनादेखील या गोष्टींचे श्रेय दिले पाहिजे असे म्हणावेसे वाटते. त्यांनी या कथा सांगितल्या, ऐकविल्या व लोकजीवनातील सर्वसमावेशकतेच्या सूत्राने त्यांना आपल्यात सामावून टाकले असे म्हटल्यास योग्य होईल.

लोकगीतांतील या धर्मसंदर्भानी लोकजीवनाला एक सांस्कृतिक परंपरा व सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. जीवनात पावित्र्य व उदारता निर्माण केली आहे. येथील लोकांच्या मुक्त जीवनाला या मुक्त श्रद्धोने साज चढविला आहे. या श्रद्धांच्या संबंधात अनेक लोकसाहित्यविशारदांनी पुष्कळ चर्चा केली आहे. या धर्मसंदर्भांनी लोकसाहित्यातील रुततेली, बीभत्सतेला व क्वचित आढळणाऱ्या हिडीसपणाला वळण लावण्याचे काम केले आहे, असे म्हणावे लागेल.

**प्रादेशिकता आणि एकात्मता –**

चाळीसगाव डांगाणी लोकगीते ही सर्वदूरच्या लोकगीतांपेक्षा काही वेगळी आहेत असे नाही. त्यांतील प्रादेशिक संदर्भामुळे ती वेगळी सिद्ध झाली आहेत, असे म्हणता येईल. वर उल्लेखिल्याप्रमाणे दैवते, कपडे, पेहराव, काही चालीरीती, स्थले, पिके, वनस्पती आणि डोंगराळ भाग यांच्या स्थानिकसंदर्भामुळे स्थानिकअनुभूतीमुळे त्यांचे वेगळेपण सिद्ध झाले आहे हे निश्चित. ही या लोकगीतातील प्रादेशिकता होय. अन्यथा महाराष्ट्रातच अन्यत्र आढळणाऱ्या काही गीतांशी या लोकगीतांचे खूपच साम्य आहे; एवढेच नव्हे तर एकत्व आहे. सर्व लोकसंस्कृतीतील एवढेच नव्हे तर जागतिक एकात्मता कशी सिद्ध होऊ शकते हे जे श्रीमती दुर्गा भागवत[३५], प्रभाकर मांडे[३५] आदि लोकसाहित्यविशारदांनी उल्लेखिले आहे किंवा अन्य देशातील लोकसाहित्यविशारदांनी जो यास दुजोराच दिला आहे, ते म्हणणे सत्य वाटते.

विशेषतः सणाउत्सवांची गाणी, गायीचे संदर्भातील गाणी व खेळ गीतांतून या गोष्टीची विशेष साक्ष पटते, असे दिसते. आतापर्यंत श्रीमती सरोजिनी बाबर व अन्य लोकसाहित्यविशारदांनी जे संकलनाचेच व त्यावरील चर्चेचे मोठे काम केलेले आहे.[३७] त्याशी व अन्य ग्रंथातील लोकगीतांशी या लोकगीतांतील आशयाची प्रकाराची तुलना करता ते सत्य आहे असे वाटते, ठरते.

प्रादेशिक संस्कृतीचे वैशिष्ट्य या लोकगीतांतून व्यक्त होत असतानाच वरील गोष्टींमुळे जागतिक लोकजीवनात हे लोकजीवन कसे सामावून जाते हे

ध्यानात येईल. विशेषतः आदिम जमातींच्या बाबतीत तर ही एकता अधिक प्रकर्षाने जाणवते. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट नजरेत भरते. ती म्हणजे सांस्कृतिक जीवनाकडे वाटचाल करण्याची व समष्टीमध्ये विलीन होऊन जाण्याची प्रवृत्ती यातून स्पष्ट होते. यादृष्टीने देखील ही लोकगीते महनीय ठरतात.

**लोकगीतांची परंपरा –**

या लोकगीतांची परंपरा शोधू जाता या भागातील लोकांच्या वस्तीचा, जमातीचा विचार करावा लागतो. याची सविस्तर चर्चा ऐतिहासिक पार्श्वभूमी व भौगोलिक पार्श्वभूमी या प्रकरणात येऊन गेलेली आहे. चाळीसगाव डांगाणातील संस्कृती तर संमिश्र स्वरूपाची आहे. त्यामुळे परंपरेतील जुनेपणाबरोबरच देवाणघेवाण आढळते. लोकगीतांच्या या परंपरांचा कालावधी ठरविणे अत्यंत कठीण आहे. परंतु रामकथांची रेलचेल लक्षात घेता व वन्य जनावरांना देव मानण्याची प्रथा लक्षात घेता शेकडो वर्षांची यामागे परंपरा असावी असे वाटते. परंपरेमुळे नित्य नाविन्य हे अभिप्रेत आहेच. त्यामुळे काही संकेत, श्रद्धा नष्ट होऊन नव्या त्यांच्या जागा घेतात. त्यामुळे या परंपरांचा शोध घेणे जरा कठीणच जाते. तथापी एक गोष्ट मात्र या अभ्यासावरून सांगाविशी वाटते की महाराष्ट्रातील लोकसाहित्याच्या परंपरेशी ती सुसंगत आहे. चाळीसगाव डांगाणातील परंपरा जागृत ठेवण्याचे कार्य विशेषत्वाने स्त्रियांनीच केले आहे. पुरुष फारसे त्याबाबतीत उत्सुक दिसत नाहीत. पुरुषांचा तमाशा प्रकाराकडे मात्र विशेष ओढा आहे असे दिसते. त्यातील कवने ते गुणगुणतात. सणाउत्सवाची गाणी देखील पुरुष लोक म्हणताना आढळतात. परंतु त्यात देखील फारसा उत्साह जाणवत नाही. कथांची परंपरा मात्र त्यांनी जतन केली आहे.

यात संतसंदर्भाची परंपरा केव्हा अस्तित्वात आली असेल याविषयी थोडी साशंकताच मनात आहे. संतांच्या उल्लेखावरून त्या कालापासून ती चालत आली असावी असे मान्य केले तरी सर्व संत आढळत नाहीत. तसेच नामदेव आढळतो पण त्याचे समकालीन संत म्हणून ज्यांची चर्चा केली जाते त्यांचे संदर्भ आढळत नाही.

काहीही असले तरी या परंपरा पुढे चालू राहाणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांचा जिवंत स्त्रोत असल्यामुळे त्या परंपरा चालू राहातील. त्यात नवे खूप येईल परंतु यंत्रविद्येमुळे त्याला खीळ बसण्याची शक्यता अगदीच नाकारता येत नाही. सर्वसमावेशकतेमुळे तसे घडणार नाही असा विश्वास वाटतो. परंतु त्याचबरोबर रेडिओ, ग्रामोफोन या साधनांमुळे लोकजीवन गीतांच्या बाबतीत परंपरेच्या दृष्टीने



तुटून पडेल की काय अशी शंका येते. अर्थात लोकगीतात जे संपूर्ण लोकजीवन व श्रद्धा गुंतलेल्या आहेत त्यामुळे श्रद्धोतून, मंत्र म्हणून त्यांचे जतन होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

वर्षानुवर्षे परंपरेतून, नवता व नवतेतून परंपरा असे चक्र फिरत आले असावे असे मात्र या लोकगीतांचा अभ्यास करताना जाणवते हे सत्य आहे.

**लोकगीतांचा विपुलता –**

डांगाणी लोकगीते वैपुल्याने सापडतात. गाणी येत नाहीत अशी पोरे वा स्त्रिया सापडत नाहीत. अर्थात तोचतोपणा सर्वदूर आढळतो. त्यातून अगदीच क्षुल्लक असे बदल आढळतात. तसे बदल प्रत्येक व्यक्तीगणिक होत असतात. तितकी लोकगीते समजली तर त्याला संख्यात्मक गणती राहणे शक्य होणार नाही. म्हणूनच आशय, शब्द व भावना या सर्वात समानता असलेली गीते प्रतिनिधित्वानेच घेतलेली आहेत. दैवत संदर्भाच्या बाबतीत तर ही गोष्ट प्रामुख्याने जाणवते. गाव तेथे दैवत व त्या दैवताचा त्या गाण्यातून संदर्भ. म्हणूनच त्याबाबतीत देखील प्रतिनिधित्वाचेच सूत्र वापरले आहे. ठाकरांच्या कांबडवणा नृत्याची गीते देखील तशी एकाच प्रकारची आहेत. जेवढी सोंगे निघतील, जेवढ्या दैवतांची आठवण होईल तेवढ्यांना पाण्यात गोवले म्हणजे झाले. म्हणूनच त्यांची लोकगीते देखील वानगीदाखलच घेतलेली आहेत.

**चाळीसगाव डांगाणी कथागीते –**

या भागात कथीगीते फारशी प्रचलित नाही. तरीसुद्धा जी काही आहेत त्यात पौराणिक कथाच जास्त आहेत. उदाहरणार्थ, थियाळ–चांगुणा कथा, हरिश्चंद्रकथा, कृष्णकथा, रामकथा इ.[३८] लोककथा गीतकथांच्या स्वरूपात जवळजवळ नाहीतच. त्यामुळे तेवढ्या मर्यादित अर्थानेच कथागीतांचे दालन समृद्ध आहे. या कथागीतातूनसुद्धा लोकगीतातूल जी वाङ्मयीन मूल्यांवर चर्चिली आहेत त्यांचा भरपूर आढळ आहे.

या गीतांचे मुख्य व अगदी वेगळे वैशिष्ट्य म्हणजे ही गीते इतरांसाठी असतात. श्रोते ती ऐकत आहेत याची जाणीव पूर्णतः झालेली असते व त्यामुळे निवेदनाचा भाग यात मोठ्या प्रमाणावर असतो असे दिसते. त्यात नाट्यमयता आणण्याचा प्रयत्नदेखील गाणारी किंवा गाणारा करीत असतो. म्हणूनच लोकगीतातीत कथागीतांचे दालन भिन्न स्वरूपाचे आहे असेच म्हणावे लागते. या कथागीतातील निवेदक पाण्यांचे तोंडचे उद्‌गार प्रथम पुरुषी सांगत असतो. त्यामुळे त्यातील उद्‌गारांवर त्याचे स्वतःचे असे संस्करण झालेले आढळते. असे असले

तरी कथागीतातील भावविश्व हे लोकगीतातील भावविश्वापेक्षा भिन्न नसते हेच जाणवते.

**तमाशा व भारूड यांतील गीते –**


चाळीसगाव डांगाणात तमाशाची प्रथा मोठ्या प्रमाणावत होती. गावोगाव करमणुकीचे दुसरे साधन नसे. अर्थात यातील कलाकार घराघरातीलच असत. त्यामुळे लोकगीतांचे रुपांतर किंवा पडसाद या तमाशातील गीतांमध्ये आढळतात. कथागीतांचा तर उपयोग वग गीतांसारखा देखील केला जातो. तमाशांचीच जागा आता मोठ्या प्रमाणावर भारूड संचांनी घेतली आहे. त्यात देखील ही कथागीते नाट्यीकरण करण्यासाठी वापरली जातात. तमाशा, भारूड हे प्रकार लोकगीतांम धूनच पुढे आले असावे. कारण वर्णनाची धाटणी थेट तशीच असते. शिवाय लोकगीतांप्रमाणेच यांचा कर्ता देखील अज्ञात असल्याचे आढळते. या गीतांना लोकगीतांत समाविष्ट करणे योग्य ठरणार नसले तरी लोकसाहित्याला जवळचे एक अंग म्हणून त्याचा विचार करणे आवश्यक वाटते. शिवाय या गोष्टी लोकजीवनात दैनंदिन स्वरूपात नियमित असतात. त्यामुळेही त्यांचा विचार होणे आवश्यक असते. या सर्व गीतांना प्रेरणा देखील याच लोकजीवनातून मिळालेल्या असतात हे लक्षात घेणे जरूर आहे. याच हेतूने त्यांचा येथे विचार मांडला आहे. त्यातील गीतांना संकीर्ण गीतांमध्ये टाकणे सोयीचे ठरेल.

**चाळीसगाव डांगाण परिसरातील लोकगीतांचे प्रकार –**

लोकगीतांची विपुलता पाहाता त्यांची प्रकारानुसार मांडणी करणे कसे शक्य आहे हे पाहाणे इष्ट होईल.

लोकगीतांचे प्रकार किती व कसे करता येतील हा एक चर्चेचा विषय आहे. अनेकांनी यासंदर्भात चर्चा केलेली आढळते. लोकसाहित्याचे अभ्यासक आणि उत्तम जाणकार डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकगीतांच्या प्रकारांचा आराखडा पुढीलप्रमाणे मांडला आहे.[३९]






त्यांनीच लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करताना (१) खेळगीते व बडबडगीते; (२) ओवीगीते; (३) फेरावरची गीते; (४) भोंडल्याची किंवा मुलाबाईची गाणी; (५) विधी गीते; (६) पुरुषांची लोकगीते; (७) गोंधळ्याची गाणी (८) वासुदेवांची गाणी; (९) पांगुळ; (१०) डहाकाची गाणी; (११) धनगराची गाणी; (१२) पोतराजाची गाणी; (१३) डवकलवाराची पुराणगाथा ; (१४) नागपंचमीची वाऱ्याची भजने; (१५) सहदेव भाडळीची वचने – असे प्रकार केलेले आहेत.[४०] लोकसाहित्यसमिती महाराष्ट्र राज्य, समितीच्या अध्यक्षा लोकविशारद व यशस्वी संपादिका डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकसाहित्यमालेचे संपादन करताना लोकगीताचे आशयानुरूप व रचनेनुरूप प्रकार करून संपादन केले आहे.[४१] लोकसाहित्यातील वाङ्मयीन लालित्याविषयी चर्चा करताना महान लोकसाहित्यविशारद श्रीमती दुर्गा भागवत यांनी, क्रापने लोकगीतांचे अंतरंग व बहिरंग यासंबंधीची लक्षणे सांगून विषयवारीप्रमाणे सांगितलेले प्रकार दिले आहेत.

ते पुढीलप्रमाणे - (१) प्रणयगीते; (२) नृत्य गीते; (३) विलपिते; (४) श्रमगीते; (५) स्त्रियांची गीते; (६) पाळणे व बाळगीते; (७) विधीगीते; (८) विनोदी गीते- मालागीते. हे सांगून लोकगीतांच्या काही प्रकारांची चर्चा भारतीय पार्श्वभूमी घेऊन करावी लागेल असे म्हटले आहे.[४२]

एकूण वरील लोकसाहित्यविशारदांनी केलेले प्रकार व चर्चा लक्षात घेता लोकगीतांचे प्रकार किती, कोणते व कोणत्या सूत्राने केले असता पूर्ण सशास्त्र व सर्वसमावेशक होतील हे निःसंदिग्धपणे सांगणे कठीण आहे. अगदी स्थूल मानाने रचनेनुसार व आशयानुसार वर्गीकरण करणे इष्ट होईल असे वाटते. तसेच स्त्रियांची गीते, पुरुषांची गीते, मुलांची गीते व गोंधळी, वासुदेव इ. लोक जातींची गीते, आदिवासींची गीते, कोकणी, खानदेशी, डांगाणी इ. प्रदेशानुसार अशी निरनिराळी सूत्रे घेऊन देखील वर्गीकरण करणे शक्य आहे.

चाळीसगाव डांगाण परिसरातील लोकगीतांचे (१) रचनेनुसार, (२) आशयानुसार असे प्रकार केले आहेत. हे प्रकार अर्थातच अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून केलेले आहेत. ते अगदी स्थूल स्वरूपात आहेत. हे देखील लक्षात ठेवले पाहिजे.

**(१) रचनेनुसार -** (१) ओवीगीते, (२) तालबद्ध गीते - बडबडगीते, (३) ओवी व लावणी यांशी सदृश्य गीते, (४) चुर्णिकासदृश्य गीते असेच प्रकार करून त्यांचे प्रकरणाच्या शेवटी उदाहरणांसह वर्णनात्मक स्पष्टीकरण केले आहे. मात्र परिशिष्ट १ मध्ये त्याप्रमाणे विभाजन केलेले नाही.

**(२) आशयानुसार -** (१) जात्यावरच्या ओव्या, (२) नवरात्रातील गाणी, (३) दिवाळी, शिमगा इतर सणाउत्सवांची गाणी, (४) दैवतांविषयीची गाणी, (५) पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, (६) लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंबंधी गीते, (७) भलरी गीते (श्रमगीते), (८) संकीर्ण गीते - असेच प्रकार करून त्यांचे स्वरूप पुढेच स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारानुसार परिशिष्ट १ मध्ये गीतांचे प्रकारानुसार संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे.

हे प्रकार अत्यंत स्थूल असून ते चाळीसगाव डांगाण परिसरात आढळणाऱ्या गीतांपुरतेच मर्यादित आहेत. हे ध्यानात घेतले पाहिजे. यातील सर्वच गीते अगदी नेमकी त्या त्याच वेळी म्हटली जातात असेही आढळत नाही. अंगणात बसले की या सर्वच प्रकारच्या गाण्यांची उजळणी होत असते. आठवून आठवून ती गाणी गायली जातात. मुले ही गाणी अंगणातच शिकतात. नवीन तयार करण्याचा प्रयत्न करतात. जुन्यांना उजाळा देतात. रोज सायंकाळी अंगणाअंगणातून



लोकसाहित्याची जणू शाळाच भरते. हीच गोष्ट चांदण्यारात्रीची आणि हीच मारुती मंदिरातील. त्या त्या प्रसंगी तर ती मोठ्या उत्साहाने म्हटली जातात. परंतु खरे पाहता या गीतांना काळवेळ लागत नाही. मनात आले की मनमुरादच्या गाण्याची ही गीते. मनमुरादपणे रचण्याची गीते. म्हणूनच त्यांचे प्रकार करताना संभ्रम निर्माण होतो.

प्रत्येक प्रकाराचे स्वरूप पुढे स्पष्ट केले आहे. स्वरूप स्पष्ट करताना आवश्यकता तेथे उदाहरणे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून प्रत्यक्ष स्वरूप स्पष्ट होईल.

**आशयानुसार प्रकारांचे स्वरूप** -

**(१) जात्यावरच्या ओव्या -** जात्यावरच्या ओव्या असे जरी नाव दिले असले तरी वस्तुतः त्यात स्त्रियांची श्रमगीते अभिप्रेत स्त्रिया दळण कांडण करताना, निंदणी-खुरपणी, लावणी करताना गाणी म्हणत असतात. ही सर्व ओवीगीतेच वाटतात. एकीकडे कामाचा झपाटा आणि रगाडा चालू असतो आणि दुसरीकडे मुखातून या ओव्या बाहेर पडत असतात ही गाणी एक स्त्रीदेखील दळताना किंवा अन्य कामे करताना म्हणते असे दिसते. परंतु जोडीदारीणी असल्या म्हणजे या गीतांना उधाण येते. ओव्या म्हणताना चढाओढ लागते. या गीतामधून सारे स्त्रीजीवन उभे झालेले असते. श्रद्धा, राग-लोभ, सुख-दुःख या भावना आपोआप व्यक्त झालेल्या असतात. मराठी लोकसाहित्यात ओवी, गीतांची फार चर्चा मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.

**(२) नवरात्रातील गाणी -** कळसूबाई, घोरपडेआई, टहाकारी येथील देवी आणि पट्ट्याई या देवी व इतर सर्व स्थानिकदैवते यांचा उत्सव असल्याचे या काळात गाणी सुरू होणे अगदी नैसर्गिक आहे. शेतावरची कामे उरकत आलेली असतात. अशा वेळी अंगणाअंगणातून खेळगीते सुरू होतात. मुली झिम्माफुगडया खेळताना गाणी म्हणतात. म्हाताऱ्या बाया एकमेकींना दैवतांविषयी गाणी ऐकवितात. मुलींची फेरावरची गाणी देखील ऐकावयास मिळतात. उदा-

**आजा बाजा बेंडबाजा**[४३]
**कुठं वाजतो बेंडबाजा?**
**झुनुकराजाच्या माडीवरी**
**झुनुकराजा तुझी कन्या**
**कन्या कोनाला देऊकेली... इत्यादी**

उदा.

**आई मी खेळते गं, खेळ त्या वाटाला**[४४]
**तिकून आली वाऱ्याची झुळूक**
**वाऱ्याची झुळूक**
**नेली माझी सुफली गं सुफली ...इत्यादी**

पाचव्या माळेपासून कळसूबाईच्या शिखरावरील देवीला जायला सुरुवात करतात. त्यावेळी ठाकर लोक आपल्या आवडता कांबड (कोंबड, कांबडवणा) नाच करतात. त्यातील त्यांची गाणी नेहमीचीच असतात; परंतु येथून ती सुरू होतात.

**रंगाण रंगाण ऽऽ हे**
**सोन्याचं रंगाण ऽऽ हे**
**याही रिंगणात आजूच पायी दिला ऽऽ हे**
**आजूच नाच केला ऽ आ ऽ हे**

सर्व देवतांना प्रसन्न करण्यासाठी ते रुसवा काढतात. ही सारी नृत्यगीतच असतात.

**(३) दिवाळी शिमगा व इतर सणाउत्सवांची गाणी –** ही गाणी विशेषतः मुले व मुली म्हणताना आढळतात. दिवाळी सणाला मुले गवताच्या 'दिवाळ्या' करून घरोघर तेल मागताना गाणी म्हणतात. ही गाणी बडबडगीतांच्या स्वरूपाची असतात. हीच गाणी व तशाच स्वरूपाची काही अन्य गाणी शिमगा सणाला म्हणताना दिसतात. दिवाळीत मुलींची गाणी फारशी ऐकू येत नाहीत. तर शिमगा, नागपंचमी या सणांना मुलींची गाणी स्वतंत्रपणे ऐकू येतात व स्त्रियादेखील त्यात मोठ्या प्रमाणात सामील होतात. सर्वच सणांचा आनंद या गाण्यातून व्यक्त केला जातो. हे ध्यानात येऊ शकेल.

**(४) दैवतांविषयी गाणी –** दैवतांविषयीची गाणी मुख्यत्वे करून स्थानिकदैवतांविषयी आढळतात. अन्य दैवतांचे संदर्भ गाण्यातून आढळतात. काही वेळा राम, कृष्ण व पांडव यांच्या संदर्भातील स्थळांविषयी गीते आढळतात. या गीतांचे मुख्य वैशिष्ट्य असे की या गाण्यांना मंत्रसामर्थ्य आहे एवढ्या श्रद्धोने म्हणतात. एकीकडे दैवतांचे विधी चालू असता दुसरीकडे बायका मोठ्या श्रद्धोने ही गाणी म्हणतात. हे विशेष वाटते. 'मसराजाविषयीचे गाणे' 'तातोबाच्या मठाविषयीचे गाणे' ही त्यांची उत्तम उदाहरणे होऊ शकतील.[४६]

**(५) पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ –** पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ यांची



तर विपूल गाणी सापडतात. त्यात जात्यावरच्या ओव्यांचा भरणा अधिक असतो. खेळगीतातून हे संदर्भ आढळतात. केवळ सोयीच्या दृष्टीनेच एक स्वतंत्र प्रकार म्हणून याकडे पाहाता येईल. या दृष्टीने 'पंढरीगाय'[४७] हे रूपक फार सुरेख आहे. इतर अनेक उदाहरणे देता येतील.

**(६) लग्न, पाचवी, बारसे इत्यादीविधीसंबंधीची गाणी –** यांना विधी गीते असे म्हणता येईल. मंत्रसामर्थ्य प्राप्त झालेली अशी ही गाणी असतात. लग्न समारंभाचे बाबतीत तर प्रत्येक विधीच्या वेळचे स्वतंत्र असे गीत आढळते. पाचवी, बारसे याप्रसंगी 'कृष्णजन्मकथा'[४८] गीत विशेष गायिले जाते. या गाण्यांमध्ये भरपूर विविधता आहे. पुरुष मात्र अशी गाणी म्हणताना दिसत नाहीत. ही पूर्णतः स्त्री-गीतेचे आहेत.

**(७) भलरी गीते –** शेतात कामे करताना विशेषतः कापणी, निंदणी करताना व पडत्या पावसात लावण्या करताना स्त्रिया मोठ्या प्रमाणावर ओव्या गाताना दिसतात. पुरुष क्वचित लकेरी मारताना दिसले तरी त्यांची सामूहिक अशी गीते आढळत नाहीत. क्वचित एखादी लावणीच तो गुणगुणताना दिसतो. म्हणूनच भलरीगीतांची जी चर्चा इतरत्र झालेली आहे तशा स्वरूपाची गाणी या भागात आढळत नाहीत असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

**(८) संकीर्ण गीते –** या प्रकारात कूटरचना, गावाचे नावे एकत्र गुंफणारी गीते, नव्याने आढळणाऱ्या रचना इत्यादी गीतांचा समावेश केला आहे.

शिवाय लावणी, गवळणीसदृश्य रचना स्वतंत्र गटाने दिल्या आहेत. तमाशातील गीते असे त्यांना म्हणावे लागेल. परंतु लोकगीतांचे ते एक जवळचे अंग व कर्ता न आढळणे हे लोकगीतांचे वैशिष्ट्य त्यात आढळते.

तीच गोष्ट भारूडातून आढळणाऱ्या कथागीतांची आहे. ती कथागीते याच भागात ग्रथित केली आहेत. अगदी मर्यादित अर्थाने त्यांचा लोकगीतात समावेश केला आहे.

**लोकगीतांचे काटेकोरप्रकार करता येतील का? –**

लोकगीतामध्ये ओवी गीते फार मोठ्या प्रमाणावर आढळतात. अर्थ असा की ओवीचा उपयोग लोकगीतात सर्वच प्रकारच्या गीतात केलेला आढळतो. तसेच प्रादेशिकउल्लेख, संतसंदर्भ, रामायण-महाभारत संदर्भ हे वरील सर्व प्रकारच्या गीतात सापडतात. रचनेवरून प्रकार करावेत म्हटले तर पुन्हा स्वरूप सर्वांगपरिपूर्ण होणार नाहीच. वरील प्रकारे स्थूल स्वरूपात वर्गीकरण करूनसुद्धा काटेकोरपणे ते एक-दुसऱ्यापासून वेगळे करता येईल याची शंकाच. एकूण पाहाता अशा प्रकारे

काटेकोर प्रकार करण्याचा प्रयत्न पूर्ण सफल होत नाही. असेच म्हणावेसे वाटते. त्यांच्या प्रकारांविषयी कितीही काटेकोरपणा आणण्याचा प्रयत्न केला तरी तो शक्य होऊ शकणार नाही. ही लोकगीतात असलेली मुक्त ता हेच लोकगीताचे खरे स्वरूप होय असे म्हणावेसे वाटते.

**रचनेनुसार प्रकारांचे स्वरूप –**

मागे आशयानुसार चाळीसगाव डांगाणातील लोकगीतांचे कोणते प्रकार करता येतील हे अभ्यासण्याचा प्रयत्न केला. आता रचनेनुसार कोणते प्रकार आढळतात ते पाहू या. अर्थात या प्रकारानुसार परिशिष्टात संकलन केलेले नाही. यात बाह्यस्वरूपाचेच वर्णन शक्यतो करण्याचा प्रयत्न केला आहे.

**(१) ओवी** : या भागातील गीते ही मुख्यत्वेकरून स्त्रियांनी गायिलेली ओवीगीतेच आहेत. ही ओवी पूर्णतः मुक्त स्वरूपाची दिसते. काही ओव्यांचा आधार घेऊन त्यांचे स्वरूप समजावून घेऊ व त्यांचे प्रकार कसे पडतील ते पाहाण्याचा प्रयत्न करू .

**प्रकार १ –**

**लहान नवरी । ही ची कुकाची पावूलां ।**[४९]
**(गौ) गवळणीच्या माझ्या । मामा घालती बहुला ।।**

येथे साधारणतः पहिल्या व तिसऱ्या चरणात सहा अक्षरे येतात व दुसऱ्या व चवथ्या चरणात आठ अक्षरे येतात. दुसऱ्या व चवथ्या चरणात यमक साधलेले असते. कधी कधी तर अक्षरांची अनियमितता आढळते.

उदा–

**ये ये बंधुराया । तुही इहिण व्हईन ।**[५०]
**तुपापोळ्याचा उल्फा । उभ्या गावाला घालीन ।।**

अक्षरांची अनियमितता असली तरी तालबद्धतेत ती कळत नाही. अक्षरांवाचून मात्रांची संख्या मोजल्यास त्यातील अनियमितता तर फारच जाणवेल. वर दिलेल्या पहिल्या ओवीत पहिल्या चरणात ४ अधिक ४ मात्रा. एकूण ८ मात्रा (पद्म). दुसऱ्या चरणात २+२+५+६ मात्रा म्हणजे ४+५+६ अशा आल्या आहेत. तर तिसऱ्या मात्रा ७+४ अशा आल्या आहेत. चवथ्या चरणात ४+५+५ अशा आल्या आहेत. म्हणून एकूण ओवी ८+१५ व ११+१४ अशा दोन ओळीत विभागली आहे. अक्षरसंख्येत मात्र थोडी समानता दिसते. ह्या साऱ्या समानता– असमानतेला एक लय असते आणि त्यात हे काहीच कळून येत नाही.



**प्रकार २ –**

**राज हौसानं केला येही । मी त मांगत नाही काही**[५१]
**मी त मांगते थोडा थोडा । नवरदेवाला कंठी कडा ।।**

यात पहिली दोन चरणे धृपदासारखी वापरण्याची प्रथा आहे. या प्रकारच्या ओवीत प्रत्येक चरणात साधारणतः आठ ते दहा अशी अक्षरे असतात. परंतु एक व दोन, तीन व चार यात यमक साधलेले असते.

**प्रकार ३ –**

**वन्या गायी तुझी शिंगा । महादेवा तुझी लिंगा**[५२]
**तुका बोले**

या प्रकारच्या ओवीत तीन चरण असून पहिल्या दोन चरणात साधारणतः समान अक्षरे असतात. शेवटच्या चरणात त्या दोन चरणातील अक्षरांच्या साधारणतः निम्मी किंवा एखाद्दुसरे अधिक अक्षर असते.

**प्रकार ४ –**

**देवयबाई बाळवंतीन । गोकुळी लावा दिवा**[५३]
**जलमीला किसनदेवू । मामा मावशीला दावा ।।**

चार चरणांच्या या ओवीत साधारणतः असमान अक्षरे असतात; परंतु दुसऱ्या व चवथ्या चरणात यमक असते. पहिल्या व तिसऱ्या चरणात वरील प्रमाणे समान अक्षरे ही आढळतात. म्हणता मात्र मात्रा सरत्या करून म्हणतात असे आढळते.

**प्रकार ५ –** पुढील प्रकार मोठा मजेशीर असतो. त्यात पुढील प्रकारची ओवी असते.

**चौथा महा दंडवत । बाई चौथा महा दंडवत**[५४]
**चढं घाटाच्या पायिऱ्या बाई चढं घाटाच्या पायिऱ्या ।।**
**अशी दे या ई रे भेट । बाई दे या ई रे भेट**
**अिट्या वरील्या सोयीऱ्या । अिट्या वरील्या सोयीऱ्या ।।**

वास्तविक पाहाता चारच चरण या ओवीत दिसतात. परंतु प्रत्येक चरण दोनदा म्हणावयाचे अशी पद्धत दिसते. यात चवथ्या व आठव्या चरणात यमक आढळते. चारच चरणाची ओवी मानली तर ती पुढीलप्रमाणे मांडता येईल

**चौथा महा दंडवत । चढं घाटाच्या पायिऱ्या**
**अशी दे या ई रे भेट । अिट्या वरल्या सोयिऱ्या ।।**

यात १–३ व २–४ या चरणात यमक दिसते. साधारणतः १–३ व २–४ या

चरणांपेक्षा चवथ्या चरणात अक्षरे कमी असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणात यमक साधण्याचा प्रयत्न दिसतो.

मराठी छंदोरचनेचे अभ्यासक मा. ना. ग. जोशी यांनी ओवीसंबंधी बरीच चर्चा केली आहे.[५६] ही चर्चा विचारात घेता असे म्हणावेसे वाटते की, या लोकगीतातून परंपरेने चालत आलेल्या लयबद्ध ओवीगीतातूनच संतादी कवींच्या ओवी रचनेचा – ग्रांथिक ओवीचा विकास झाला असावा या साऱ्याच ओव्या गेय, लयबद्ध असून त्या गाताना परंपरेने मात्रा किंवा लयक्रम मांडून दाखविणे अत्यंत कठीण व अपूर्णच राहाणारे काम दिसते. शिवाय तो प्रबंधाचा विषय नाही. केवळ रचनेची स्थूल कल्पना यावी म्हणूनच ओवी प्रकार मांडून दाखविण्याचा अत्यंत ढोबळ असा प्रयत्न केला आहे. जेथे ठेका किंवा जेथे थांबावे लागते अशा ठिकाणी दंड दिला आहे. प्रत्यक्ष ऐकताना तो दंड कदाचित आगेमागे होण्याची शक्यता आहे. साधारणतः स्वरूप काय एवढेच दाखविण्याचा प्रयत्न.

**(२) तालबद्धगीते व बडबडगीते –** स्त्रियांची खेळगीते प्रत्यक्ष फेर धरून नाचताना हातात हात घालू तंगड्या उडवून म्हणण्याची गाणी, सणाउत्सवाची गीते, मालागीते, अर्थाच्या दृष्टीने आज जी दुर्बोध वाटतात किंवा निरर्थक वाटतात अशी बडबडगीते यांचा समावेश या प्रकारात केला आहे.

या प्रकारच्या गीतांची रचनेच्या दृष्टीने वैशिष्ट्य पुढीलप्रमाणे दिसतात.

(१) यात ताल व ठेका यांना अत्यंत महत्त्व असते. अर्थापेक्षाही ते अधिक असते असे दिसते.

(२) यमक मात्र साधले जावेच याकडे विशेष कल आहे.

(३) या गीतांना एक प्रकारची द्रुत अशी गती भासते.

(४) नृत्य आणि वाद्याचा ठेका कधीकधी या गाण्यांना लाभतो. टाळ्यांचा ठेका तर या गीतांना लागतोच.

ही साधारणतः आढळणारी वैशिष्ट्येच येथे दाखविण्याचा प्रयत्न आहे. विशिष्ट मात्रांचे आवर्तन यात आढळते. हे लक्षात येते. परंतु त्यांची तांत्रिक चर्चा येथे करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

उदा.–

**आई मी खेळते गं । खेळ त्या वाटाला**[५७]
**तीकून आली । वाऱ्याची झुळूक**
**वाऱ्याची झुळूक**
**नेली माझी । सुपली ग सुपली**



**सुपली ग सुपली**
**तीकून आला । गायख्या ग गायख्या**
**गायख्या ग गायख्या**

उदा. –

**यवढा खळा सारवू सारवू**[५८]
**शेंगा वाळत घालू घालू**
**येक शांग उडाली उडाली**
**खिडकीस जाऊन बुडाली बुडाली**

उदा.–

**आजा बाजा बेंडबाजा**[५९] ..२
**कुठं वाजतो बेंडबाजा** ..२
**झुनुकराजाच्या माडीवरी** ..२
**झुनुकराजा तुझी कन्या** ..२
**कन्या कोनाला देऊकेली** ..२
**दशरथ राजाला देऊकेला** ..२

उदा.–

**नेटकूच लागला डोळा गेंदबा**[६०] ..२
**आला श्रावणी पोळा गेंदबा** ..२
**पोळ्याची काढल्यात चित्रा गेंदबा** ..२
**आयवडिलांची पित्रा गेंदबा** ..२

उदा. –

**दिन दिन दिवटी**[६१]
**सोन्याची कवटी**
**पाच गायी पाच म्हशी**
**यव्हढा दुबता कोण खावी**
**नरसे येऊन घेऊन जाई**

उदा. –

**काळा कोळसा झिकझिकमाव**[६२]
**घरात खेळे चिमण बाळ**
**शिळकदोरी**
**ती गेली वैदापुरी**

तीकून आला एकमींग
त्याच्या अंगाला स्वयचा तीर
एकतीर उंबरल्या
सीतेच्या घरात बोळ्या

**(३) ओवी न लावणी यांशी सदृश्य रचना –** या गीतात रचनेच्या दृष्टीने तालबद्धता, यमक साधण्याची वृत्ती, अक्षर संख्येची आवर्तने व चरणांची संख्या ही ओवी व लावणी यांशी सदृश्य वाटते. तसेच लावणीसदृश्य रचना म्हणताना आढळतात. लावणी, पोवाडा इत्यादी लौकिक गीतांचे प्रकार अशा प्रकारच्या लोकवाङ्‌मयातूनच विकसित झाले आहेत, असे विचार उत्कृष्ट साहित्यिकडॉ. गं. ना. मोरजे यांनी मांडलेले आहेत.[६३] या रचनांची काही वानगीदाखल उदाहरणे घेऊ.

उदा. १ –

**माझ्या अंगणी बाई रंगणी[६४]**
**खेळं चक्रपाणी**
**आम्ही देवाच्या बाई देवाच्या**
**किसनाच्या गवळणी ।।धृ।।**
**बाळी घडावा बाई घडावा**
**किसनाच्या कानाची**
**लहू लाखाची बाई लाखाची**
**बत्तीस तोळ्यांची**
**माझ्या अंगणी बाई रंगणी ..**

उदा. २ –

**राजा हौसेनं केला येही[६४]**
**का जाई भीमवाला ।।धृ ।।**
**नथीच्या उझणी मी लोळे**
**का जाई भीमवाल्या**
**बाळ्याच्या उझणी मी ल्याले**
**का जाई भीमवाल्या**
**राजा हौसानं ....**

उदा. ३ –

**महिन्यामधी ग महिना[६५]**
**शिमगा उगविला**
**सारंगपती ग पती माझा**
**कोन्या वनी ग्येला ।। धृ ।।**
**मार वतीच्या हावदावर**
**देऊ आंघुळीला**
**जायाची घाई ग जायाची घाई**
**दर्शनाला**
**महिन्यामधी...**

उदा. ४ –

**उभी राय उभी राय[६६]**
**छन छन बुगडी**
**किती मारू तुला ग हाका**
**माग बघावा नवशिका ।।धृ।।**
**किती मागून येऊ**
**भिती म्होरून येऊ**
**उभी राहून बोल राधिका**
**माग बघावा....**

उदा. ५ –

**नई नयनी आली ग इकून[६७]**
**चालली ग थटून चालली थटून**
**कोनाची मैना कोनाची मैना ग जी ऽ ग ऽ जी**
**कुठले दैवाशी आले कशापाई**
**सोडून घर झाली दैना**
**मंग कशाला कोनाची मैना...**

अशीच गीते डांगाणी तमाशातून देखील गायिलेली आढळतात.

**(४) चूर्णिकासदृश्य –** चुर्णिकासदृश्य असे ज्या रचनांना म्हणता येईल अशी काही गीते आढळतात. या गीतांमध्ये चांगला ठेका तर आहेच; त्याचबरोबर नाट्यमयता आहे. एखादी कथा यात सांगण्याचा प्रयत्न असतो. तालबद्ध गद्य कथाकाव्य एवढ्या मर्यादित अर्थानेच ते चुर्णिकासदृश्य वाटते असे वाटते. लोकसाहित्य विशारद दुर्गा भागवत यांनी वामनाचे विचार सांगून अगदी थोडक्यात यांचे स्वरूप मांडले आहे. त्याच्याशी ते तंतोतंत मिळले नाहीत.[६८] याचे एक

उदाहरण पुढे दिलेले आहे.

उदा. १ –

**धन्य धन्य लक्षेपती** [६९]

**ह्या राजाला मुलं किती?**

**ह्या राजाला मुलं चार**

**त्यांची नावा काय काय?**

**अपिगान गोपीगान**

**अभीगान सखा ग मारवती**

**धन्य धन्य लक्षेपती**

**ह्या राजाला सुना किती ?**

**याला सुना चौघ्याजनी**

**त्यांची नावा काय काय?**

**घईबाई, जाईबाई, अंबाबाई, निंबाबाई ग**

येथपर्यंत आशयानुसार व रचनेनुसार चाळीसगाव डांगाणी लोकगीतांचे प्रकार केल्यास त्यांचे स्थूल स्वरूप काय दिसेल ते पाहाण्याचा प्रयत्न केला. या प्रकारांना सशास्त्रता कितपत असू शकते याचा विचार करावयास हवा.

**लोकगीते– प्रकार (चाळीसगाव डांगाण लोकगीत प्रकार) सशास्त्रता –**

अगदी काटेकोर असे प्रकार जरी करता येत नसले तरी त्यात जागवण्याजोगे वेगळेपण असते. त्या वेगळेपणामुळे असे प्रकार करणे योग्य होईल. हेच सूत्र या ठिकाणीदेखील लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भागात जी लोकगीते आढळतात त्यांच्यापुरते मर्यादित हे प्रकार आहेत. असे असले तरी आतापर्यंत लोकसाहित्य विशारदांनी जे लोकगीतांचे प्रकार केले आहेत त्यांची सुसंगत असेच ते दिसतात. याचे लोकगीतातील बीजात्मकएकता असेच म्हणावे लागेल. यादृष्टीने हे प्रकार सशास्त्र आहेत. वर लिहिलेल्या स्थूल प्रकारातच परिशिष्टात एकंदर गाण्याची विभागणी करण्याचा प्रयत्न आहे.[७०]

**चाळीसगाव डांगाण परिसरातील लोकगीते –**

या भागातील विशेषत्वाने महादेव कोळी जमातीची ही लोकगीते. हे लोक आदिवासी आहेत. आदिवासींमध्ये स्त्री–पुरुष संयुक्त नृत्याचा प्रकार आढळतो तो या भागात नाही. त्यामुळे तशा प्रकारची लोकगीते येथे उपलब्ध नाहीत. सणा–उत्सवांच्या गाण्यात गायख्ये यांच्या रानातील गीतास विशेषत्वाने मुलांचा सहभाग असला तरी लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत लोक त्यात भाग घेतात. त्या दृष्टीने ती



पुरुषगीते आहेत. ठाकर लोकात मात्र पुरुषांची नृत्ये आहेत व त्यामुळे पुरुषगीते आहेत. भलरीगीतेदेखील पुरुषांची आढळतात. ही आदिवासी जमात संख्येने महादेव कोळ्यांच्या तुलनेत फारच कमी आहे. एकूण पुरुषांच्या गीतापेक्षा स्त्री–गीते अधिक उपलब्ध आहेत. त्यात देखील ओवीगीतांचाच भरणा अधिक आहे असे दिसून येईल.

**समारोप –**

आतापर्यंत चाळीसगाव डांगाण परिसरातील लोकगीतांचे वाङ्मयीनदृष्ट्या स्वरूप काय आहे हे पाहाण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे सर्वदूर आढळणाऱ्या लोकसाहित्यात काही स्थान असू शकेल काय असल्यास त्याच्या मर्यादा कोणत्या याचा विचार केला. काव्याच्या प्रेरणा, त्यांचे आंतरबाह्य स्वरूप, त्यातील संदर्भ इत्यादी गोष्टी पाहाण्याचा प्रयत्न केला. या लोकगीतांचे प्रकार करता येतील का? कोणते करता येतील? त्यात काटेकोरपणा किती असू शकेल? याचा विचार केला.

खरोखरीच लोकवाङ्मयाचे वाङ्मयीन समालोचन या प्रकरणात ज्या पद्धतीने अभ्यास केला तसा तो करणे कितपत योग्य आहे हा कदाचित चर्चेचा विषय होईल. लोकगीतांच्या स्वरूपाचा व त्यातील वाङ्मयीन सौंदर्याचा एकंदर विचार करता लोकगीतातून इतर वरिष्ठ दर्जाचे म्हणून जे साहित्य समजले गेले त्यास प्रेरणा मिळाल्या असाव्यात असा तर्कनिश्चित करता येईल. त्यादृष्टीने तमाशा व भारूड यांचा विचार मुद्दाम यात ओझरता मांडला आहे. त्यादृष्टीने अधिक संशोधन व्हावे असे जरूर वाटते.

आतापर्यंत केलेल्या चर्चेतून पुढील निष्कर्ष काढता येतील.

**काही ठळकनिष्कर्ष**

(१) या लोकगीतांमागे संपूर्ण लोकजीवनाचीच प्रेरणा असते. त्यात अद्‌भुताची प्रेरणा, देवाधर्माची प्रेरणा, कौटुंबिक प्रेरणा, कृतीमधील तालमयता व नादमयता आणि कलात्मवृत्ती किंवा ललितकृती या प्रेरणा महत्त्वाच्या असतात असे म्हणता येईल.

(२) रचनासौंदर्य, भाषासौंदर्य, भावसौंदर्य या दृष्टीन लोकगीतात कृत्रिमपणा अजिबात असत नाही. ताल, नाद व भावोत्कटता यातून निर्माण झालेले ते स्फूट शब्द असतात. त्यांचे रंग, रूप, गंध व स्पर्श पूर्ण तरल व मुक्त आहेत. या विशिष्ट अर्थाने ती लोकगीते अपौरुषेय वाटतात.

(३) वाङ्मयीन आनंदाचे स्वरूप, श्रमपरिहार व श्रमसाफल्याचा आनंद,

आत्मप्रकटीकरणाचा आनंद, कलात्मकतेचा आनंद असे त्रिविध स्वरूपाचे असते.

(४) या लोकगीतातील धार्मिक संदर्भामागे या लोकांची सबद्धता आणि निसर्गशक्तीवरील विश्वास नजरेत भरतो.

(५) या लोकगीतांना फार जुनी परंपरा असावी.

(६) कथागीतांचे वेगळे वैशिष्ट्य जाणवते; परंतु ती फारशी नाहीत.

(७) तमाशा, भारूड या लोककलांनी या गीतातून प्रेरणा घेतली असावी.

(८) कलात्मकतेच्या दृष्टीने प्राथमिक स्वरूपाची वाटणारी परंतु कमालीची भावोत्कट अशी ही भावगीते असतात. ती स्वतःसाठी गायलेली व समष्टीमधून परंपरेने चालत आलेली असतात.

(९) यांचे प्रकार काटेकोरपणे करता येणे अशक्य वाटते.

(१०) आशयानुरूप व रचनेनुरूप प्रकार करणे योग्य होईल.

(११) चाळीसगाव डांगाणाची लोकगीतांचे आशयानुसार जात्यावरच्या ओव्या, नवरात्रातील गाणी, दिवाळी, शिमगा, व इतर सणाउत्सवांची गाणी, दैवतांविषयीची गाणी, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, लग्न, पाचवी, बारसे इत्यादी विधीसंबंधी गीते, भलरी गीते व संकीण असे प्रकार करता येतील.

(१२) रचनेच्या दृष्टीने ओवीगीते, तालबद्ध गीते, बडबडगीते, ओवी व लावणी यांशी सदृश्य गीते, चुर्णिकासदृश्य गीते असे प्रकार करता येतील.

**संदर्भ –**


१. श्री. ना. बनहट्टी, 'लोकगीतातील प्रेरणा', लोकसाहित्य साजशिणगार, संपादक सरोजिनी बाबर, मराठी लोकसाहित्य समिती, पृ. १५.

२. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७५.

३. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

४. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते'.

६. तत्रैव, भलरीगीते, गीत क्र. ४.

७. तत्रैव, जात्यावरच्या ओव्या क्र. ५.

८. तत्रैव, लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

९. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

१०. तत्रैव, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. १२.

११. तत्रैव, सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ११.

१२. तत्रैव, लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १.

१३. तत्रैव, भलरी गीते, गीत क्र. ४.

१४. तत्रैव, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. ४.

१५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ७.

१६. तत्रैव, सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. ७.

१७. तत्रैव, संकीर्ण गीते अ. गीत क्र. १०.

१८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' संकीर्ण गीते अ. गीत क्र. १३

१९. तत्रैव, भलरी गीते, गीत क्र. ९.

२०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', नवरात्रातील गाणी, गीत क्र. ३.

२१. तत्रैव, सणाउत्सवाची गाणी, गीत क्र.२.

२२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीत सणाउत्सवाची गाणी. गीत क्र. ११.

२३. तत्रैव, संकीर्ण गीते अ. गीत क्र. ३.

२४. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', प्रस्तावना, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.

२५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', भलरी गीते, गीत क्र. ७.

२६. तत्रैव, गीत क्र. ५.

२७. तत्रैव, लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २६

२८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', भलरी गीते, गीत क्र. ८.

२९. तत्रैव, जात्यावरच्या ओव्या.

३०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. ९.

३१. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' देवतांविषयीची गाणी.

३२. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते'.

३३. तत्रैव.

३४. रां. चिं. ढेरे, मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६४.

३५. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.

३६. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३७. मराठी लोकसाहित्यसमितीची प्रकाशित पुस्तके, संपादक सरोजिनी बाबर.

३८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', संकीर्ण अ.

३९. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७८.

४०. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७८.

४१. एकहोता राजा, जनलोकांचा सामवेद व इतर ग्रंथ, म. रा. लो. माला, पुणे, संपादक सरोजिनी बाबर.

४२. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.

४३. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' नवरात्रातील गाणी, गीत क्र.१.

४४. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' नवरात्रातील गाणी, गीत क्र.५.

४५. तत्रैव, गीत क्र.९.

४६. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' दैवतांविषयीची गाणी, गीत क्र. १-२.

४७. तत्रैव, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र. २.

४८. तत्रैव, लग्न, पाचवी, बारसे इ.विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २६.

४९. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ६.

५०. तत्रैव.

५१. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. ७.

५२. तत्रैव, पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ, गीत क्र.१२.

५३. तत्रैव, लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. २६.

५४. तत्रैव, जात्यावरच्या ओव्या, गीत क्र. ३.

५५. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', सणाउत्सवाची गाणी, गीत क्र. २१.

५६. ना. ग. जोशी, 'मराठी छंदोरचनेचा विकास, मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. मे १९६४, पृ.क्र. ४, १५, ३८, ३९, ७४, ११६, १३४, ३५ इ.

५७. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' नवरात्रातील गाणी, गीत क्र.५.

५८. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते' नवरात्रातील गाणी, गीत क्र.५.

५९. तत्रैव, गीत क्र.६.

६०. तत्रैव, सणाउत्सवाची गाणी, गीत क्र.१७.

६१. तत्रैव, गीत क्र.४.

६२. तत्रैव, गीत क्र.११.

६३. गं. ना. मोरजे, 'मराठी लावणी वाङ्मय', मोघे प्रकाशन, पुणे १९७४.

६४. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १०.

६४. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंदर्भातील गीते, गीत क्र. १०.

६५. तत्रैव, सणाउत्सवाची गाणी, गीत क्र.१५.

६६. तत्रैव, संकीर्ण क, गीत क्र.२२.

६७. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', संकीर्ण क, गीत क्र.२३.

६८. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, प्रथमावृत्ती १९५६, पृष्ठ ८१.

६९. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते', संकीर्ण अ, गीत क्र.१२.

७०. परिशिष्ट १, 'परिसरातील लोकगीते'.

* * *

## प्रकरण सातवे

# चाळीसगाव डांगाण परिसर लोककथांचे वाङ्‌मयीन समालोचन

**लोककथांचा अभ्यास –**

लोककथांच्या अभ्यासाची फार जुनी परंपरा आहे. लोककथा हा सर्व शास्त्रांच्या अभ्यासकांना कुतुहलाचा विषय होणे साहाजिक आहे. लोककथांच्या अभ्यासाला सुरुवात कोठून? त्याची परदेशीय व भारतीय परंपरा कोठून व काय? लोककथांमधील आशय, कल्पनाबंध याचा चर्चात्मक अभ्यास, त्याविषयीचे संप्रदाय या सर्वांचाच विचार व रूपरेषा मांडण्याचा अत्यंत उपयुक्त असा प्रयत्न डॉ. सरोजिनी बाबर[१], श्रीमती दुर्गा भागवत[२], डॉ. प्रभाकर मांडे[३] या लोकसाहित्य विषारदांनी केला आहे. हा प्रयत्न मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासकाला जागतिक क्षजत्रापर्यंत पोहचून विचारास प्रवृत्त करणारा आहे. या विषयात सशास्त्रता आणण्याचा जो प्रयत्न झाला त्यामुळे अभ्यास करणे सोपे झाले आहे. व अभ्यासाला एक दिशा मिळाली आहे हे नक्की. त्याशिवाय शास्त्रीय परिभाषा निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम या महनियांनी केले आहेच.

या ठिकाणी चाळीसगांव डांगाणी लोककथांचा अभ्यास करावयाचा आहे. आढळणाऱ्या लोककथांचे वर्गीकरण एकूण वर्गीकरणात कोठे बसू शकेल हे पाहण्याचा प्रयत्न करणे जरूर आहे.

**लोककथांचे वर्गीकरण –**

'लोकसाहित्याची रूपरेखा' सांगताना श्रीमती दुर्गा भागवत यांनी लोककथांची चर्चा–



(१) दैवतकथा– इंद्रकथा– उत्पत्तीकथा– प्रलयकथा– ज्योतिषकथा– सूर्यकथा–चंद्रकथा– नक्षत्रकथा.

(२) परिकथा किंवा अद्‌भुत कथा.

(३) दंतकथा– भ्रमणशील किंवा भटकी दंतकथा– स्थानिकदंतकथा आणि

(४) कल्पित कथा.

या चार भागांत स्वतंत्रपण केली आहे.[४] त्याचबरोबर त्यांनी परदेशीय व भारतीय अभ्यासकांनी कथासंबंधी केलेले प्रकार व संकल्पनांचे स्वरूप देखील दिले आहे. सर रिचर्ड टेंपल यांनी केलेले वर्गीकरण त्यांनी दिले आहे.[५] ते लोककथांच्या अंतरंगावरून आहे. लोककथांच्या अंतरंगाचे चार मुख्य घटक आहेत. (१) पाण्यांचा (Actors), (२) कथेतील अभिववृद्धीचा (Progress), (३) अभिवृद्धीला पूरक साधने (Means), (४) संकीर्ण घटनांचा (Miscellany), या प्रत्येक घटकातील मुख्य मुद्दे पुढे दिले आहेत. यावरून वर्गीकरण करता येईल इतके ते सूक्ष्म आहेत. श्रीमती दुर्गा भागवत यांनी कल्पनाबंध (Motif) संबंधी चर्चा केली. हा शब्द रिचर्ड टेंबलच्या काळी फारसा प्रचलित नव्हता.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोककथांचे मूल घटक नऊ मांडले आहेत.[६] (१) कथेतून व्यक्त होणारे किंवा कथेच्या मूळाशी असलेले लोकमानस (२) कथारूप (३) मानवी, अतिमानवी व प्राणीपात्रे लोककथातून ठरीव नमून्यात असतात. (४) लोककथांमध्ये अनेक कल्पनाबंध (Motif) अनेक कथा समान असू शकतात. त्यांची रचना प्रत्येक कथेत भिन्न असते. (५) घटना (६) समान कथा विशेष किंवा कथा बीज असते. मूळ कथा सर्वदूर एकच राहते. घटना, कल्पनाबंध, पात्रे प्रांतपरत्त्वे बदलतात. मूळ कथा किंवा कथाबीज नाही. (Tale type) (७) वातावरण निर्मिती (८) निवेदक व त्याचे निवेदन कौशल्य (९) कथाहेतू या सर्व घटकांचा विचार वर्गीकरण करताना ध्यानात घेणे आवश्यक होय.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी वर्गीकरणाच्या अभ्यासाचा आढावा घेतला आहे.[७] त्यांच्या मते 'अजूनही निर्दोष वर्गीकरण व्हावयाचे आहे. गौमने Narratives ची किंवा पारंपरिक कथनांची चर्चा केली. त्यात (१) लोककथा (२) वीरकथा (३) पोवाडे किंवा गीतकथा (४) स्थानिकदंतकथा– या प्रकारांचा समावेश आहे. क्रॉपने केलेल्या वर्गीकरणात – (१) परिच्या किंवा अद्‌भुत कथा (Fairy tales), (२) नर्मकथा (Merry tales), (३) प्राणीकथा (Animal tales), (४) स्थानिककथा (Local legends), (५) भटकी कथा (६) गद्यवीर गाथा

याप्रकारांची चर्चा केली आहे.

याशिवाय लोककथांमध्ये दैवतकथा (Myths), कल्पित कथा, दंतकथा इ. प्रकार येतात.

डॉ. प्रभाकर मांड्यांनीच दीघानिकायच्या ब्रह्मचालसूत्रात लोककथेचे जे अनेक भेद दाखविलेले आहेत. ते दिले आहेत ते असे- (१) राजकथा, (२) चोरकथा, (३) महामात्रकथा, (४) सेनाकथा, (५) भयकथा, (६) युद्धकथा, (७) अन्नकथा, (८) पानकथा, (९) वस्त्रकथा, (१०) शयनकथा, (११) म ालाकथा (१२) गंधकथा, (१३) ज्ञातीकथा, (१४) यानकथा, (१५) ग्रामकथा, (१६) निकमकथा, (१७) नगरकथा, (१८) जनपदकथा, (१९) स्त्रीकथा, (२०) पुरुषकथा, (२१) शूरकथा, (२२) विशिखाकथा (बाजारातील गणिका), (२३) अद्‌भुत कथा, (२४) पूर्वप्रेतकथा, (२५) निरर्थक कथा, (२६) लोकाख्यायिका, (२७) समुद्राख्यायिका- वगैरे वर्गीकरणाचा हा प्रयत्न चिकित्सक आहे हे खास.

वर्गीकरणाविषयी आढावा घेऊन त्यांनी रचनेच्या दृष्टीने लोककथांचे वर्ग केले आहेत. पुढीलप्रमाणे वर्गीकरण होईल असे त्यानी म्हटले आहे.

(१) पहिल्या प्रकारच्या कथांमध्ये काही व्यक्ती एकत्र येतात. आणि त्या व्यक्ती आपापल्या गोष्टी सांगतात. या गोष्टी कोणत्यातरी एका सूत्राभोवती गुंफलेल्या असतात. कधी कधी त्यांचा एकमेकांशी काही संबंध नसतो.

(२) या वर्गातील कथांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यात एकापेक्षा अधिक कथा असतात. पहिल्याप्रथम एक कथा सुरू होते. ही कथा संपताच त्या कथेतून दुसऱ्या कथेचा प्रारंभ होते. एका कथेतून दुसरी, मग तिसरी याप्रमाणे शृंखला सुरू होते. या गोष्टी रात्ररात्र चालतात.

(३) पहिल्या कथेमध्येच असे एक तत्त्व ग्रथित केलेले असते की त्याच तत्त्वातून नवीन नवीन गोष्टी सुरू होतात. आणि सलग अशी कथामाला सुरू होते. अशा कथा क्वचित आढळतात.

(४) या वर्गातील कथा दुसऱ्या प्रकारच्या कथांप्रमाणेच असतात. एक माणूस कथा सांगतो. त्याच्या पहिल्या गोष्टीनंतर त्याच्याशी संबंधित दुसरी, तिसरी गोष्ट अशी कथांची मालिका असते. यात आणि वर निर्दिष्ट केलेल्या दुसऱ्या प्रकारच्या कथांमध्ये फरक एवढाच असतो की त्यात एका कथेतून दुसऱ्या कथेची सुरुवात होते. येथे मात्र तसे न होता दोन किंवा दोनपेक्षा अधिक कथांना स्वतंत्र अस्तित्व असू शकते. त्यातील नायक-नायिका व इतर पात्रे, स्थल यात फरक नसतो.



(५) या वर्गातील कथांमध्ये कोणत्यातरी एका कथा बीजाभोवती घटनांची गुंफण केलेली असते.

असे वर्गीकरण त्यांनी केलेले असले तरी त्यातील शास्त्रीयदृष्ट्या अपूर्णतेविषयी त्यांनीच उल्लेख केलेला आहे. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे कथाविशेष (Tale type) आणि कल्पनाबंध (Motif) यांचा विचार करणेच योग्य होईल. त्यांनी 'मराठी लोककथा : परंपरा व स्वरूप' या प्रकरणाला दिलेला परिशिष्टात कल्पनाबंधसूची (Motif Index) दिलेली आहे.[८] त्यावरून कल्पनाबंधाचे प्रकार केले आहेत ते विचारात घेता त्यावून वर्गीकरण केल्यास जागतिक क्षजत्राशी स्थानिकप्रचलित लोककथांचा संबंध काय हे चटकन ध्यानात येईल. ते प्रकार असे- (१) A : क : दैवतकथांतील कल्पनाबंध (Mythological Motifs), (२) B : ख : प्राणीविषयक कल्पनाबंध (Animals), (३) C : ग : निषेधपर कल्पनाबंध (Taloo), (४) D : घ : यातूविषयक (Magic), (५) E : च : मृत्युविषयक कल्पनाबंध (Th dead), (६) F : छः चमत्कार (Marvels), (७) G : ज : चेटूक (Ogres and Witches), (८) H : झ : परीक्षा (Tests), (९) J : ट : चातुर्याच्या परीक्षा (The wise and foolish), (१०) K : ठ : फसवणूक किंवा धोका, (११) L : ड : भाग्योदय , (१२) M : ढ : भविष्य निर्देशन, (१३) N : त : नशिब आणि दुर्भाग्य, (१४) P : थ : सामाजिक, (१५) Q : द : पुरस्कार आणि दंड (Rewards and Punishment), (१६) R : ध : कैदी आणि पळून जाणारे (Captures and Fugitives), (१७) S : न : क्रौर्य (Unnatural Cruelty), (१८) T : प : प्रेम, तारूण्य (Sex, Love, Marriage), (१९) U : फः जीवनाचे स्वरूप (Nature of life), (२०) V : ब : धर्म (Religion), (२१) W : म : चरित्रविषयक (Trails and Characters), (२२) X : म : हास्योत्पादक (Humour), (२३) Z : य : इतर संकीर्ण कल्पनाबंध या कल्पनाबंधानुसार वर्गीकरण केल्यास ते सर्वसमावेशक होईल असे वाटते.

डांगाणी लोककथांमध्ये यापैकी सर्वच कल्पनाबंध सापडत नाहीत. परंतु एक लक्षात येते की या बाहेरचे काही नाही. पर्वत, नद्या, यांना माणसासारखे अस्तित्व देऊन कथा सांगणे हा एक कल्पनाबंध मात्र या भागात स्वतंत्र असा सापडतो. दैवतांविषयी कल्पनाबंधात मोडू शकेल.

**परिसरातील लोककथांचे वर्गीकरण –**

येथील लोककथांचे अभ्यासाचे सोयीचे दृष्टीने स्थूल स्वरूपात पूढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल. त्यात कथाविशेष (tale type), व कल्पनाबंध (Motif),

यांचा सामान्यपणे विचार अनुस्यूत आहे.

(१) अद्भुत कथा (Fairy), (२) प्राणीकथा (Animaltale), (३) आख्यायिका (Legend), (४) दैवतकथा (Myth), (५) हास्यकथा, (६) संकीर्ण

कथेतील आशयाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे वर्गीकरण डांगाणी लोककथांचे करता येतील.

(१) दैवतकथा, (२) परिकथा किंवा अद्भुतकथा, (३) आख्यायिका, (४) बोधकथा, (५) नीतिकथा, (६) चातुर्यकथा, (७) हास्यकथा, (८) चोरकथा, (९) मयकथा, (१०) जातीकथा, (११) अनुभूतीकथा, (१२) संकीर्ण.

या सर्व कथांचे तीन प्रकारात केवळ मुख्य वर्गीकरण करता येईल.

(१) कल्पितकथा, (२) दैवतकथा, (३) अनुभूतीकथा- या तीन प्रकारात सर्व लोककथांचा समावेश दुरान्वयाने करता येणे शक्य आहे.

वर स्थूल स्वरूपात केलेल्या वर्गीकरणाची थोडक्यात ओळख करून घेणे सोयीचे होईल. परिशिष्टात अभ्यासाचे सोयीचे दृष्टीने कथाविशेष व कल्पनाबंध यावर आधारित केलेले वर्गीकरणानुसारच वर्गीकरण केलेले आहे. वास्तविक पाहता हे वर्गीकरण काटेकोर नाहीच. कथांचे स्वरूप व आशय आणि त्यातील कल्पनाबंध यामुळे वर्गीकरणाचे बाबतीत संभ्रम निर्माण होतो खरा.

**कथाप्रकारांचे स्वरूप –**

**(१) अद्भुतकथा –** यात राक्षस, चमत्कार, मंत्रतंत्र, साधू, शाप, वनगायी, पऱ्या, नाग आदींपासून ज्या अद्भुत गोष्टी कथांमध्ये आहेत अशा साऱ्या कथा एकत्र केलेल्या आहेत. यात शेवट नेहमी नायकाचे बाजूने व सुखावह झालेला आहे. या साऱ्या गोष्टी परिशिष्टात दिलेल्या असल्याने[१] येथे केवळ त्यातील कल्पनाबंध (Motifs) मांडल्यास त्याचे स्वरूप स्पष्ट होईल.

१) शापाने सर्वनाश देखील होऊ शकतो. शाप निरनिराळ्या प्रकारचे असतात. दुखावले गेले की शाप दिला जातो.

२) गोसाव्याच्या प्रसादाने मूल होणे, भगतापासून मूल.

३) उकिरड्यात मूल पुरणे, पुरलेले मूल अनेक दिवस जिवंत असते, खणताना दुसऱ्यास सापडले.

४) आंबा आणि मूल यांचा संबंध. आंब्याचाप्रसाद दिला जातो.

५) शापामूळे माणसाचे जनावर होणे किंवा जनावराचे माणसात रूपांतर होणे हाच प्रकार जादूने किंवा राक्षसाच्या मायेने होणे.

६) मंत्राच्या छडीचा किंवा पाठीचा वापर.

७) राक्षसकन्या नायकाला नेहमी मदत करतात.

८) शिर कापून पुन्हा जोडले जाणे. शिरातून रक्त ठिबकणे. त्याचे रूपांतर हिरे-माणके यात होणे.

९) मायावी स्त्री किंवा यक्षीण रूप पालटते.

१०) मायावी स्त्रिया किंवा यक्षिणींनी नायकाच्या चातुर्यपरीक्षा पाहणे.

११) तपस्यांची किंवा साधूची नकळतपणे सेवा केल्यास साधू सहाय्य करतो.

१२) राक्षस नेहमी बारा माणसांची मोळी आणतो.

१३) राक्षसाचा जीव एखाद्या पक्ष्यात विशेषतः पोपटात असतो. हा पक्षी गुप्त ठिकाणी ठेवलेला असतो.

१४) नावडतीच्या पोराचा छळ केला जातो.

१५) नावडतीचा मुलगा हाच कथानायक असतो.

१६) राजा आपली इच्छा पूर्ण केल्यास, पण जिंकल्यास, स्वप्नपूर्ती केल्यास, अर्धी काठी राज्य किंवा कन्या देतो.

१७) सावत्र मुलाचा छळ होतो.

१८) शंकर पार्वती सहाय्य करतात. दुःखहरण करण्यासाठी काही अद्भुत असे साधन देतात. जादूचे खडे इत्यादी.

१९) वनगायींची सेवा केल्यास त्या प्रसन्न होतात व नायकास अद्भुत असे काही त्यांचे दुःखहरण करण्यासाठी देतात. उदा. दुःखाचा आणि सुखाचा पावा.

२०) राजकन्या नेहमी अनपेक्षित आणि चमत्कारिक असा पण करते.

२१) डोहात संपत्ती, हिरे-माणके सापडणे.

२२) रंभा, वनदेवता, पऱ्या यांचेजवळ अद्भुत असे सामर्थ्य असते. त्या वनक्रीडा, जलक्रीडा करण्यासाठी रानात दूरवर एकांतस्थळी असलेल्या उद्यानात, तलावात येतात. त्या नष्ट होऊन क्रीडा करतात. त्यांचे कपडे पळविल्यास त्या शरण येतात.

२३) नायकाने पराक्रम किंवा धाडस करताना सांगितलेल्या अटींचे पालन न केल्यास शिळा होते, जनावर होते, झाड होते. त्याचे पुन्हा रूपांतर करण्याचे सामर्थ्य ज्याने त्या अटी घातल्या त्यात किंवा त्यापेक्षा महान व्यक्तीस असते.

२४) सरणाखालून रस्ता काढून पळून जाणे.

२५) सर्पाचे फार महत्त्व आहे. माणसाचे रूपांतर सर्पात होते. सर्प मानवी अंशापासून बनतो. सर्पाला वाचा असते. मूल होण्याचा आणि सर्पाचा संबंध असतो. सर्प आणि धन यांचा संबंध.

२६) एका शरीरापासून अनेक शरीरे तयार होतात. त्यात रक्ताचा संबंध असणे.

२७) गायांना व प्राण्यांना वाचा असते.

२८) अद्‌भुत गोष्टी या सात समुद्राच्या, सात खंडाच्या किंवा सात डोंगरांच्या पलीकडे असतात. सात आकडा महत्त्वाचा.

एवढे कल्पनाबंध (Motifs) या डांगाणी अद्‌भुत कथेत सापडले आहेत. त्यांचा कथांचे स्वरूप समजण्यास मदत होते.

**२) प्राणीकथा –**

चाळीसगाव डांगाणात अद्‌भुत कथांप्रमाणेच परिकथांचे प्रमाण मोठे आहे. कदाचित जंगलांशी व डोंगरदऱ्यांशी व त्यामुळे तेथे असलेल्या प्राण्यांशी आलेल्या संबंधामुळे हे घडले असावे. प्राण्यांचा संबंध ज्या कथांमध्ये आढळतो अशा कथा येथे एकत्रित करून त्यांना प्राणीकथा असे म्हटले आहे. अशा काही कथा परिशिष्टात[१०] दिलेल्या असल्यामुळे त्यांचा उल्लेख न करता त्यात आढळणाऱ्या कल्पनाबंधांचा उल्लेख केला आहे.

१) उंदीर सर्वात लहान असूनही सर्वांची फजिती करतो. सर्वांच्यावर मात करतो.

२) कोल्हा सर्वात चतुर प्राणी आहे.

३) प्राण्यात माणसांसारखेच हेवेदावे असतात.

४) अस्वल समंजस तितकेच क्रूर असते.

५) ज्या प्राण्यांचे माणसाशी नित्य संबंध येतात ते माणसाकडून कामे करून घेण्याची अपेक्षा करतात.

६) कावळा मतलबी असतो.

७) खेकडा व सुसर हे प्राणी जलचरात अधिक हुशार असतात.

८) वाघावर, लांडग्यावर इतर प्राणी युक्तीने मात करतात.

९) वाघ शक्तीने मोठा व वृत्तीने क्रूर असला तरी त्याला लबाडी माहिती नाही.



१०) सुसर खेकडीच्या धावेत राहते.

११) खेकडीचा पेंद हे अन्य प्राण्यांचे आवडते अन्न आहे.

१२) वाघ जेव्हा जेव्हा अडचणीत असतो तेव्हा इतर प्राणी त्याला मदत करण्याची धिटाई दाखवतात.

१३) माकड या इतर प्राण्यांच्या फंदात पडत नाही.

१४) कोणत्याही प्राण्यांची गोष्ट असो त्यात कोल्ह्याचा सहभाग असतोच.

१५) सर्वच प्राणी या कथांमध्ये माणसांसारखे बोलतात.

असे कल्पनाबंध डांगाणी प्राणीकथांमध्ये सापडतात. प्राणीकथा या बहुधा बोधकथा असतात. म्हणून प्राण्यांना वाचा फुटलेली असते.

**३) आख्यायिका –**

१) यात विशेषतः एक ऐतिहासिक व्यक्तींचा व घटनांचा संबंध असलेला वर्ग. २) स्थलांच्या आख्यायिकांचा वर्ग. ३) पुरलेल्या धनांच्या कथांचा वर्ग. ४) भुताखेतांच्या झपाटलेल्या घरांच्या व झाडांच्या विशिष्ट घराण्यांच्या आख्यायिकांचा वर्ग. असे चार वर्ग श्रीमती दुर्गा भागवत यांनी स्थानिककथांचे दिले आहेत.[११] साधारणतः तसेच वर्ग येथील स्थानिकदंतकथांचे देता येतील. दैवतकथा आणि आख्यायिका किंवा दंतकथा यातील सीमारेषा दाखविणे कठीण जाते. हे म्हणणेदेखील योग्यच वाटते. या स्थलांना एकप्रकारचे देवत्व प्राप्त झालेले असते. येथे १) ऐतिहासिक व्यक्तींचा संबंध असलेल्या आख्यायिका. २) रामायण–महाभारतातील महान व्यक्तींचे संबंध असलेल्या आख्यायिका. ३) स्थलांविषयीच्या आख्यायिका. ४) दैवतांशी संबंध असलेल्या आख्यायिका. ५) भुताखेतांसंबंधीच्या आख्यायिका. ६) चोरासंबंधीच्या आख्यायिका. अशा काही आख्यायिका केवळ प्रातिनिधिक स्वरूपात परिशिष्टात[१२] स्वतंत्र वर्ग करून एकत्र केल्या आहेत. वास्तविक पाहाता प्रत्येक गावात अशा प्रकारची आख्यायिका असतेच. प्रत्येक शेतास, दरीस, ओढ्यास, मैदानास नाव असतेच व त्यापाठीमागे आख्यायिका दडलेली असतेच. विस्तारभयामुळे अशा आख्यायिका परिशिष्टात संग्रहीत करणे योग्य वाटत नाही. यात काही कल्पनाबंध असतात ते असे–

१) रामायण–महाभारत यातील महान व्यक्ती, डोंगर–दऱ्याा यांच्या रूपाने आपले कायम अस्तित्व ठेवतात.

२) इतिहासाशी संबंध जोडल्याने स्थळाला महनीयता येते.

३) भुता-खेतांचे त्या विशिष्ट स्थळावर अधिराज्य असते.

४) नद्या काही विशिष्ट अडचणींमुळे आपले मार्ग बदलतात.

५) नाग, वाघ हे अत्यंत भीतीदायक प्राणी दैवतांच्या ठिकाणी लीन झालेले असतात. ते पाया पडण्यास, भेटण्यास नित्य येतात. ते पवित्र ठिकाणाचे रक्षण करतात.

६) प्रत्येक दैवताच्या ठिकाणी यात्रेच्या दिवशी काही विशिष्ट चमत्कार घडतात.

७) डोंगरातील गडदी या पांडवांनी केल्या आहेत.

८) उंच डोगरांतील गडदींमध्ये चोर राहतात.

अशा प्रकारचे कल्पनाबंध यात असतात. त्या आख्यायिका एकाच गावात वेगवेगळ्या स्वरूपात ऐकावयास मिळतात. त्यामुळे त्या भाकडकथा आहेत असे वाटण्याची शक्यता असते. परंतु त्यापाठीमागे वास्तविक निश्चित अशी परंपरा असते व त्याच्या मुळाशी काही सत्यता असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. काही शिकारकथासुद्धा अशा स्वरूपात चालत आलेल्या असतात. स्पष्टीकरणासाठीदेखील त्या सांगितल्या असतील.

**४) दैवतकथा –**

या कथांचा आख्यायिकांशी अतुट संबंध असतो. येथे त्या त्या ठिकाणच्या दैवतांमागे काही कथा असते. त्या अवतार मानल्या जातात. अशा कथा परिशिष्टात एकत्र केल्या आहेत.[१३] त्यांच्या मागे एक अद्‌भुततेचे वलय असते. लोकांची त्यावर पूर्ण श्रद्धा असते. ही वलये येथे कशी आली, त्यांचे महत्त्व काय, त्यांचा त्या लोकांशी संबंध कोणता याचा विचार त्या कथात असतो. या कथा पूर्णतः ज्यांना देव म्हणून मान्यता मिळाली आहे अशा देवतांच्याच आहेत. वास्तविक डोंगर, दऱ्याा, नद्या, जनावरे, विशिष्ट झाडे या सर्वांनाच देवत्व बहाल करण्याची या लोकांची दृष्टी आहे. परंतु येते मात्र त्या परिसरातील सर्वच लोकांचे जे दैवत झाले आहे अशीच दैवते अभिप्रेत आहेत. या दैवतकथांमध्ये पुढील कल्पनाबंध आढळतात.

१) दैवतांना बळी आवश्यक असतात. ते ठराविक प्रकारचेदेखील असतात.

२) दैवतांची जत्रा किंवा यात्रा करायला लागतात.

३) देवता नवसास पावतात.

४) देवतांना कौल लावल्यास भविष्य कळते.



५) देवतांचा कोप होतो. त्यामुळे रोगराई इत्यादी गोष्टी होतात.

६) दैवतांच्या सान्निध्यात लग्न, जावळ असे विधी केल्यास त्यातून पुण्य लाभते.

७) दैवतांची प्रत्येक घराण्यात काही व्रते असतात. त्यात त्यांचा प्रसाद ठराविक असतो.

८) देवता या पार्वतीचा अवतार असतात.

९) दैवते क्षेत्ररक्षण व वंशरक्षणाचे काम करतात.

१०) चमत्काराचे व अद्‌भुततेचे एक वलय त्यांच्याभोवती असते.

११) दैवतांचे बोहाडे किंवा आखाडे असतात. त्यांना विधिनाट्य म्हणता येईल.

१२) काही क्रूर वृत्तीच्या देवतांचेदेखील त्यांना प्रसन्न ठेवल्यास त्या रक्षण करतात.

१३) देवतांची स्थाना ही बहुधा डोंगरावर असतात.

या कथा कधीही कहाण्यांच्या स्वरूपात असतात. या कथा सांगताना त्याचबरोबर दैवतातील कडकपणा वर्णन करण्याची प्रथा आहे. या दैवतांचा वनातील प्राण्यांशी जिव्हाळ्याचा संबंध असून मानवाचे संरक्षण जशा या देवता करतात तसेच प्राण्यांचे रक्षणदेखील त्या करतात. त्या कथांना एक प्रकारचे पावित्र्य असते. या कथा सांगतानाच लोक त्या दैवताचा विधी कसा करायचा तेदेखील सांगतात. अशा कथांवर प्रादेशिकतेचा पगडा अतिशय असतो.

**५) हास्यकथा –**

या कथांचा हेतू पूर्णपणे करमणूक असा असला तरी त्यात खरे अनुभव मुख्यत्वेकरून असतात. अशा प्रकारच्या कथांचा एक स्वतंत्र वर्ग परिशिष्टामध्ये केलेला आहे.[१४] या हास्यकथांमध्ये पुढील प्रकारचे कल्पनाबंध आढळतात.

१) जावयाचा मूर्खपणा २) वाघाची फजिती ३) अतिशयोक्ती ४) खोड मोडणे ५) प्राण्यांचे वागणे ६) जावयाचा भामटेपणा ७) फसवाफसवी करणे ८) स्त्री-पुरुष संबंधाचे उघडेवाघडे प्रदर्शन.

स्वतंत्र असे कल्पनाबंध असले तरी त्यात प्राणीकथा या प्रकारात घातलेल्या कथा समाविष्ट करता येतील. या हास्यकथांमध्ये रोजच्या जीवनातील, अनुभवातील विपरितता, अतिशयोक्ती, अज्ञान यांचे प्रदर्शन केलेले असते, असे दिसून येईल.

**संकीर्ण –**

यामध्ये उरलेल्या सर्व कथा समाविष्ट केल्या आहेत. त्यातील काही कल्पनाबंध या कथांमध्ये आहेत. ज्या कथा वरील प्रकारात घालणे योग्य झाले नसते त्या सर्व या प्रकारात घालून त्याचा एक स्वतंत्र वर्ग केला आहे.[१५] यात भुताखेताच्या गोष्टी, चोरकथा, शिकारकथा याही गोष्टींचा समावेश केला आहे. या कथांमध्ये सत्यकथा तर आहेतच, त्याशिवाय काही काल्पनिक कथादेखील आहेत. या प्रकारच्या कथांमधून येथे आढळलेले कल्पनाबंध बघणे जरूर आहे.

१) काही जन्म अयोनीसंभव असतात.

२) मुली दुसऱ्याच्या असतात. मुलगा मात्र स्वतःचे धन असतो.

३) चोर विहिरीत लपतात. राजाच्या घरीच चोरी करतात. चोर एकमेकांना दगा देण्याचा प्रयत्न करतात तेव्हा फसतात.

४) निसर्गसंपत्ती ही परमेश्वराची संपत्ती असते.

५) काही कथांच्या मागे प्रत्यक्ष अनुभूती असते. म्हणींवरून गोष्टी किंवा गोष्टींवरून म्हण हा त्यातलाच प्रकार आहे.

६) अंगावरच घेतल्यावर माणूस हरप्रयत्नाने त्यातून निभावण्याचा प्रयत्न करतो.

७) कर्माप्रमाणेच घडते.

८) कावळा निरोप सांगण्याचे काम करतो.

अधिक आढळलेले कल्पनाबंधच येथे स्वतंत्र मांडलेले आहेत.

**कथाप्रकार आणि कल्पनाबंध –** वरील वर्गीकरण देऊनदेखील प्रत्येक कथाप्रकारात सामान्यपणे आढळणारे कल्पनाबंध दिलेले असले तरी काल्पनिक कथांमध्ये यातील अनेक प्रकार मोडतील. तसेच कल्पनाबंध वेगळ्या कथाप्रकाराम ध्येसुद्धा सारखेच पाहावयास मिळतील. कथांचा बराचसा भाग हा कल्पनेवर अवलंबून असल्याने तसे घडले असण्याची दाट शक्यता आहे. दुसरे कारण असे वाटते की, स्पष्टीकरण देण्याची वेळ आली की तेच तेच कल्पनाबंध तर्कक्रियेत उपयोगात येणे शक्य आहे. तसेदेखील झाले असण्याची शक्यता आहे.

**आशयदृष्ट्या कथा वर्गीकरणाचे महत्त्व –** वर कथेचे आशयावरून वर्गीकरण करता येईल असे म्हणून वर्गीकरण केले आहे. काही प्राणीकथा किंवा अद्‌भुत कथा किंवा आख्यायिका असूनसुद्धा त्या बोधकथा, नीतीकथा, चातुर्यकथा, विशिष्ट जातीविषयक कथा, चोरकथा, भयकथा असू शकतील.



कथांचे वर्गीकरण करताना निरनिराळ्या प्रकारे केली तरी सुद्धा ते पूर्ण करता येईलच असे वाटत नाही. फारतर अधिकाधिक सूक्ष्म भेद होऊ शकतील. काही वेळा दैवतकथेतून अद्‌भुत कथा निघते किंवा अद्‌भुत कथेतून दैवतकथा साकार होते. तेव्हा असे वर्गीकरण करणे हेदेखील केवळ अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने करावयाचे हेच खरे. लोककथा हे एक लोकांचे शिक्षणाचे माध्यम समजले तर आशयावरून वर्गीकरण महत्त्वाचे ठरते.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या 'लोकसाहित्याचे स्वरूप'[१६] या पुस्तकात वर्गीकरणातील अडचणी मांडल्या आहेत. त्या ध्यानात घेण्यासारख्या आहेत. तसेच प्राणीकथा आणि बोधकथा यांचे संबंध इत्यादी गोष्टीचे विवेचन केलेले आहे. अनुभवकथा हा एक स्वतंत्र वर्ग कल्पिलेला आहे. येथे मात्र तो संकीर्ण या सदरातच घातलेला आहे.

**लोककथांमागील प्रेरणा व हेतू –** डांगाण लोककथांमागे इतर ठिकाणच्या लोककथांपेक्षा काही वेगळ्या प्रेरणा असतील असे नाही. सर्वदूर त्याच प्रेरणा असतात. या प्रेरणा पुढीलप्रमाणे सांगता येतील. १) अद्‌भुताची प्रेरणा २) आत्मनिवेदन व प्रकटीकरण ३) स्पष्टीकरणात्मक भूमिका ४) श्रद्धा, कौटुंबिक जिव्हाळा ५) अनुभवांचे प्रसारण व संकलन ६) निषेधाची प्रेरणा ७) परंपराविषयी प्रेम, स्वाभिमान ८) सुरक्षिततेची प्रेरणा ९) नाविन्याचा अनुभव १०) निसर्गचक्रातील चक्रनेमीक्रमातून मिळालेली प्रेरणा.

अशा निरनिराळ्या प्रेरणा या कथांमागे असतात. असे एकंदर कथांवरून दिसते. याच प्रेरणा लोकगीतांमध्ये आहेत ही गोष्ट जाणवते. निसर्गातील चमत्कार मानवाने जेव्हा पाहिले तेव्हा त्याने ते तर्क करावयास सुरुवात केले असतील. परंतु या सर्व प्रेरणांमधून अद्‌भुताची जी प्रेरणा आहे ती अधिक बलिष्ठ दिसते. त्यात भीती व श्रद्धा या दोन भावना अंतर्भुत असतात असे दिसते. अन्न, वस्त्र व निवारा यातील अन्न व निवारा हे मिळविताना आलेले अनुभव व त्याचबरोबर मानवी शरीर हाच एक मोठा चमत्कार माणसासमोर होता. त्यातून निर्माण झालेल्या कल्पना तसेच प्राण्यांचे नियमित वागणे, सूर्य, चंद्र, तारे, नद्या, धबधबे, उल्कापात, वादळे व प्राण्यांशी संबंध यातून जे चमत्कार घडतात त्यातून या प्रेरणा मिळाल्या असाव्यात, असे म्हणावेसे वाटते. मनुष्यजन्म किंवा प्राणीजन्म या घटना व वासनांनी मानवाला अनुभव ग्रथन, प्रसारण, त्यातील तार्किक सुसंगती लावण्याची प्रेरणा मिळाली असावी असे वाटते. भूक आणि कामवासना या दोन्ही गोष्टी त्यात प्रमुख वाटतात. एका कथेमागे अमूक एकच प्रेरणा असेल असे मात्र नाही. एकाच

कथेमागे अनेक प्रेरणादेखील असतात असे आढळेल.

या कथांच्या मागे परंपरा असल्याने अगदी सुरुवातीला जेव्हा ती कथा सांगितली गेली त्यावेळची त्याची प्रेरणा आणि वर्तमानकाळात तीच कथा पुन्हा सांगणाराची प्रेरणा भिन्न असू शकेल.

प्रेरणा आणि हेतू यात सीमारेषा आखणे कठीण आहे. परंती या गोष्टी सांगण्यामागे काही हेतू स्पष्टपणे जाणवतात ते पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) मनोरंजन करणे २) ज्ञानार्जन, ज्ञानदान – कळतनकळत ३) स्पष्टीकरण ४) महिमाकथन ५) प्रौढपणाचे प्रदर्शन ६) भक्ती, प्रेम, आदर, भय यांचे प्रदर्शन.

असे सामान्य हेतू आढळतात. प्रेरणांप्रमाणेच एकाच वेळी एकच हेतू असेल असे म्हणता यावयाचे नाही.

**लोककथांचे वैपुल्य –**

प्रत्येक गावात मारुतीचे देऊळ असतेच किंवा शेकोटीची जागा व चावडी असतेच. ती सार्वजनिक झोपण्याची जागा. तेथे बहुतेक धुनी कायम पेटलेली. या धुनीभोवती घोंगड्या, गोधड्या अंथरल्या गेल्या की शेकोटीवर हात जातात आणि सहज गप्पा सुरू होतात. यातच कोणीतरी कथा सांगायला सुरुवात करतो. अशा गोष्टी एकदा सुरू झाल्या की काही वेळा रात्र–रात्र चालतात. या शेकाटीजवळच्या गोष्टी आजी–आजोबांच्या वेगळ्या रानात गाया घेऊन जाणारे वेगळ्याच गोष्टी सांगतात. यात सर्व प्रकारच्या कथा असतात. प्रत्येक व्यक्तीला गोष्ट एक का होईना येतच असते. सांगायचे किंवा ऐकायचे. एक मात्र खरे की प्रत्येक गावात खास गोष्टी सांगण्यात प्रसिद्ध असे मोजकेच लोक असतात. असे का, याचा विचार नंतर करू . एकूण व्यक्तिगणिक गोष्टी वाढत जातात. इतके गोष्टीचे वैपुल्य डांगाणात आढळते. आता यात एक गोष्ट खरी की, थोड्याफार फरकाने त्याच गोष्टी पुन्हा आढळतात. पण त्यात फरक केलेला असतो. काही कथा मात्र अत्यंत प्रसिद्ध व ठरीव स्वरूपात असतात. त्यांचे जतन सामूहिकपणे केले जाते. त्या सांगण्याचा आग्रह केला जातो. व सांगताना काही गोष्टी बदलू लागल्या तर आजूबाजूचे माहितगार त्यास परंपरेची आठवण करून देतात. 'मंत्राची छडी', 'वनगाईची गोष्ट' या कथा अशा स्वरूपाच्या आहेत.[१७] दैवतकथांच्या बाबतीतदेखील हीच गोष्ट जाणवते. दुसरी एक गोष्ट येथे जाणवते की येत असलेली गोष्टसुद्धा हे लोक मनःपूर्वक ऐकतात. तसेच आपणास अमूक गोष्टी सांगता आल्या पाहिजेत अशी त्यांची उत्कट इच्छा असते. या लोकसमूहातून अनेक गोष्टींचे जतन केले गेले



आहे. नवीन गोष्टी आणून सोडल्या गेल्या आहेत. त्यात अनुभव, आख्यायिका, दैवतकथा, अद्‌भुतकथा यांचे मोठे भांडार आहे. त्यातील आढळणारा तोचतोचपणा सोडला तर डांगाणी कथाभांडार मोठे आहे हे निश्चित.

**लोककथांचे अस्थिरतेतील स्थिर रूप –**

वर उल्लेखिल्याप्रमाणे अगदी व्यक्तिपरत्वे कथा बदलतात. गावोगाव या कथांना किंवा कथांतील घटनांना अगदी वेगळे असे पर्याय सापडतात. 'कोल्हा आणि वाघ' यांची गोष्ट, 'बोकड आणि वाघ' यांची गोष्ट जवळ जवळ सारख्या स्वरूपाच्या व एका कल्पनाबंधातून निर्माण झालेल्या आढळतात.[१८] या कथा दोनच असतात परंतु त्या एका वेगळ्या अर्थाने एकच असतात. हीच गोष्ट 'वनगायीची गोष्ट' व 'गुराख्याची कथा' यांच्याबाबतीत आहे.[१९] असे एकट्या चाळीसगाव डांगाण भागात घडते. डॉ. सरोजिनी बाबर यांनी संग्रहित केलेल्या कथा,[२०] श्रीमती दुर्गा भागवत यांनी दाखविलेले पर्याय[२१] हे देखील यातील कथांशी जुळणारे दिसतात. प्रादेशिकतेच्या दृष्टीने किंवा व्यक्तिपरत्वे जरी कथांचे पर्याय आढळले तरी त्यातील कल्पनाबंधाचा विचार केला तर असे आढळेल किंवा अगदी वेगळ्या अशा कथा आढळल्या तरी त्यातील कल्पनाबंधाचा विचार केला तर असे आढळेल की देशोदेशीच्या कथांमध्ये एक प्रकारची कल्पनाबंधात्मक स्थिरता आहे. त्यातच खऱ्या अर्थाने परंपरा आहे. एवढेच नव्हे तर हेच कल्पनाबंध रामायण, महाभारतात आढळतात. सीता जमीन नांगरताना पेटीत पुरलेली आढळली. तोच कल्पनाबंध येथे 'उकिरड्यात पुरलेले मूल' यात आढळतो. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. 'राक्षसाचा जीव पक्षात असतो, हा कल्पनाबंध अनेक अद्‌भुतकथांतून सापडतो. दैवतांविषयीच्या कथांत असे साम्य आढळते. पक्षीसंकेताच्या बाबतीत तेच. प्राणी बोलतात व माणसाप्रमाणेच त्यांना प्रवभाव व भावना असतात हे तर सर्वदूर आढळतेच. हे सर्व पाहाता प्रत्यक्ष कथा ऐकत असताना कथांमध्ये प्रचंड गोंधळ, अस्थिरता आढळली तरीसुद्धा त्यात एक सूत्ररूप अशी स्थिरता असते असे म्हणता येईल.

**डांगाणी लोककथांचे वेगळेपण –**

वरील गोष्ट ध्यानात घेता डांगाणी लोककथेतील वेगळेपण हे केवळ प्रादेशिक परिस्थितीनेच घडलेले आहे असे आढळेल. ते पुढील विशेषांतून जाणवते.

(१) या भागात प्राणीकथा अधिक प्रमाणात आहेत. त्यात कोल्ह्याच्या वाट्यास कथेचा मोठा प्रांत आला आहे.

(२) देवता डोंगरावर आहेत.

(३) डोंगरांना रामायण-महाभारतातील व्यक्ती मानले आहे.

(४) सातासमुद्रापलीकडे, सप्तखंडात याऐवजी सात डोंगरांच्या पलीकडे, असे म्हटलेले आढळेल.

(५) वाघ, रान, तळी, नदी यांचे उल्लेख विशेषत्वाने आहेत.

(६) गुराखी, शेतकरी व राजा यांशी संबंधित कथा आढळतात.

(७) वातावरणनिर्मितीमध्ये नागल्या, तांदूळ, गवत, या भागातील झाडे, टेकडी वगैरेंचे उल्लेख अधिक आढळतात.

(८) स्थानिकस्वरूपाच्या आख्यायिका तर पूर्ण याच भागातील आहेत.

(९) येथील चालीरीतींचा त्या कथांवर परिणाम झालेला आहे. कथानायक या भागातील लोकांच्या चालीरीती पाळताना दिसतो.

एकंदतीर पाहाता वर म्हटल्याप्रमाणे प्रादेशिक वेगळेपण हेच या डांगाणी लोककथांचे वेगळेपण आहे. त्यातील रामायण-महाभारतातील व्यक्ती या डोंगर शिखरे रूपाने येथे वास्तव्य करतात ही कल्पना येथे अधिक वेगळी व क्वचितच इतरत्र आढळणारी आहे. येथे हरिश्चंद्र, तारामती व रोहिदास हे डोंगर होऊन राहिले आहेत. आपले आख्यान ते ऐकवितात. पट्टागड हा जटायु आहे तर रावणाचा आंगठा अजून तेथेच जवळ उभा आहे. वाल्मिकी ध्यानस्थ बसला आहे. हे सारे येथील आख्यायिकांतून ऐकावयास मिळते.[२२] हे या कथांचे वेगळेपण मानावयास हरकत नाही असे वाटते.

**डांगाणी लोककथांचे वाङ्मयीन सौंदर्य –**

लोककथांचे वाङ्मयीन सौंदर्य अभ्यासावयाचे म्हणजे काय? याविषयी मतभेद होण्याची दाट शक्यता आहे. येथे सामान्यपणे वाङ्मयीन सौंदर्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. हे अभ्यासताना कथा घटकांचा विचार येतो व त्या अनुषंगाने विवेचन करणे शक्य वाटते. रिचर्ड टेंबलने कथांची जी प्रमुख चार अंगे सांगितली ती अगोदरच्या चर्चेत आलेली आहेतच. त्याच बरोबर डॉ. प्रभाकर मांडे यांनी नऊ अंगांची वा घटकांची चर्चा केली आहे. ती त्या दृष्टीने उद्बोधक आहे. येथे काही मुख्य घटकांच्या आधारे वाङ्मयीन सौंदर्याचे अभ्यास करावयाचा आहे. अभ्यासासाठी पुढील गोष्टींचा विचार करू.

(१) कथानिवेदक, कथनशैली व कथानिवेदन वेळ

(२) कथानक – घटनामाला – संघर्ष

(३) कथाबीज – कल्पनाबंध



(४) वर्णनातील सुसंगती, स्थलवर्णन व संवाद, व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णन

(५) ऐकणारे श्रोते

या पाच गोष्टींचा यासंबंधात विचार करावा लागेल. कथा म्हटली की, मुख्य दोन घटक आलेच पाहिजेत. सांगणारा – निवेदक आणि ऐकणारा – श्रोता. त्याखेरीज कथा होऊ शकणार नाही. त्यात पुन्हा आणखी एक गोष्ट लक्षात घेणे जरूर आहे की, ऐकणारा घटक हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण निवेदकाला त्या कथेत नाविन्य नसते. त्यातील अद्‌भुत, चमत्कारिक भाग, विनोद, संकटांची मालिका या साऱ्या गोष्टी त्यास ज्ञात असतात. त्या त्यास श्रोत्यास ऐकावावयाच्या असतात. त्याच्या भावना जागृत करणे, त्यास बोध करून देणे, त्यास ज्ञान देणे हा कथा निवेदनाचा मुख्य हेतू असतो. म्हणूनच निवेदक कुशल असला पाहिजे.

**(१) कथानिवेदक, कथनशैली व कथानिवेदनाची वेळ –**

वर सांगितल्याप्रमाणे कथानिवेदक कुशल असला पाहिजे हे अर्थातच त्याचा अनुभव, त्याच्या बुद्धीची प्रगल्भता, त्याची कल्पनाशक्ती, त्याच्यातील नाट्याभिनयता गुण व त्याचा खेळकर स्वभाव यावर अवलंबून असेल. म्हणूनच कथांचे वैपुल्य पुष्कळ असले व प्रत्येक व्यक्तिगणिक कथासंख्येत भर पडत असली तरी प्रत्येक गावात कथानिवेदनात निपुण असलेले लोक फारच कमी असतात. त्यांना या गोष्टी सांगण्यापुरते तरी बरेच महत्त्व असते. कथानिवेदन ही एक स्वतंत्र कला आहे आणि ती फारच थोड्यांना अवगत असते. परंतु असे असले तरी केवळ असे ठराविकच लोक गोष्टी सांगताना आढळतात असे नाही तर कारणपरत्वे प्रत्येकजण गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतो किंवा त्याला सांगावीच लागते.

यासाठी कथानिवेदन किंवा कथन जर सर्वच लोकांना करावे लागते तर त्यांच्या कथाकथनाची वेळ कोणती हे ध्यानी घेणे जरूर आहे. कारण त्यावर त्याची कथनशैली अवलंबून आहे. तो कथनशैलीतील एक घटक मानावा लागेल. या कथाकथनाच्या वेळा पुढीलप्रमाणे देता येतील –

(अ) रात्री मारुतीच्या देवळात धुनीजवळ गप्पा सुरू झाल्या की गोष्टी सुरू होतात. (ब) रानात गुरांकडे गेल्यावर सबंध दिवस गुरे चारताना अधूनमधून ही गायख्येपोरे एके ठिकाणी जमतात. हे ठिकाण बहुधा गुरांचे पाणी पिण्याचेचे ठिकाण असते. तसेच काही वेळा गुरे घेऊन दोन किंवा तीन गायख्यांना रात्ररात्र रानात, डोंगरमाथ्यावर वा डोंगरातील गडदींमध्ये राहावे लागते. अशा वेळी

त्यांच्यातील कोणीतरी गोष्टी सांगतात. हेच गायख्ये निरनिराळ्या ठिकाणाहून गुरांना घेऊन जात असताना नवख्या गायख्यास स्थलांविषयी आख्यायिका सांगताना आढळतात. (फ) गावातील म्हाताऱ्या माणसाजवळ पोरे गोळा होतात आणि त्यांच्या मनोरंजनासाठी म्हातारा त्यांना गोष्टी ऐकवतो. अशा वेळी ती मुले त्याला खूप प्रश्न विचारतात आणि हा म्हातारा त्यांच्यासमोर सर्वज्ञ असल्यासारखा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना कथा सांगतो. हीच गोष्ट घरातील म्हाताऱ्यांची. अंगणात संध्याकाळी पोरांना जवळ घेऊन बसल्या की, गोष्टी सांगाव्या लागतात. त्यांनाच आजी-आजोबाच्या गोष्टी म्हणता येते. (ड) जत्रेच्या निमित्ताने लोक एकत्र येतात आणि देवदर्शन, जेवणखाण चालू असताना क्षेत्रमहिमा, स्थानमहिमा आणि दैवतमहिमा सुरू होतो. (इ) नवखी माणसे गावात आली की हळूहळू लोक त्याच्या जवळ जातात आणि मग आख्यायिका सांगणे सुरू होते. याव्यतिरिक्त मयतविधीसमयी, बारसे, लग्न या विधींच्या वेळीदेखील मोठ्या प्रमाणावर कथाकथन होते.

यात गप्पांच्या ओघात जेव्हा कथाकथन चालते तेव्हा आपण कथा सांगत आहोत किंवा आख्यायिका सांगत आहोत याचे भान कथन करणाऱ्यास नसते. परंतु केवळ कथाच सांगावयाच्या उद्देशाने जेव्हा कथन सुरू होते तेव्हा आपण कथा सांगत आहोत असे भान असते. कथानिवेदक कोण असतात आणि कथाकथनाच्या वेळा कोणत्या असतात हे वर सांगितले आहे. आता कथाकथनशैलीचा विचार करू .

कथाकथनास लागणारे वर उल्लेखिलेले गुण ज्या व्यक्तीजवळ आहेत अशा व्यक्तींचाच यादृष्टीने विचार करणे योग्य होईल. कथाकथनशैलीतील जी समान वैशिष्ट्ये आढळली ती पुढीलप्रमाणे आहेत.

(१) कथन करणारा सर्वांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यासाठी कथा सांगण्यास सावरून बसतो. 'त्याला का असा झाला', 'एकदा का', लई दिसा मागं', 'त्या ह्याच्यावानी झाला' अशी सुरुवात करतो आणि सर्वांना पुढे काय सांगणार याविषयी उत्सुकता निर्माण करतो.

(२) चेहऱ्यावर, गांभीर्य, भय, दुःख, हास्य आदी भाव व्यक्त करतानाच आवाजात विशिष्ट चढउतार करतो आणि श्रोत्यांना रंगविण्याचा प्रयत्न करतो.

(३) रानाचे, राक्षसाचे, राजाचे, देवतांचे, त्यातील अद्भुत गोष्टींचे तो यथोचित वर्णन आपल्या पदरचे भरपूर घालून करतो. त्यामुळे एक गोष्ट जाणवते की अशी काही वर्णने सर्वच गोष्टीत या भागात सारखीच आढळतात. एवढेच



नव्हे तर या वर्णनात वास्तवता किंवा सत्यता निर्माण करण्यासाठी तो स्थानिकस्थलांचे वर्णन त्यात घुसडवतो.

(४) स्थानिकप्रचलित वाक्प्रचारांचा भरणा, तसेच त्यांची बोलीभाषा तो सरळ वापरतो पण त्याचबरोबर गोष्टीमध्ये काही शंकाकुशंका स्वतःच निर्माण करून त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो. उदाहरणार्थ, राक्षसकन्या राक्षसास मरण विचारते. राक्षस तिला विचारतो, 'इतके दिवस नाही विचारलेस, आताच कसे विचारते.' शंकेचे ती लगेच निरसन करते. त्याचबरोबर एखादा प्रश्न मध्येच एखाद्या मुलाने विचारला तर येत असल्यास स्पष्टीकरण करतो. नाहीतर 'त्या तसाचन असे म्हणून त्याला गप्प करतो.

(५) इतर कोणाची दुरुस्ती तो कथेला सहन करीत नाही. 'त्या दुसऱ्या ह्याच्यात आहे' 'ह्या असाच' असे तो सांगून आपलेच घोडे पुढे दामटतो.

(६) कथाकथन करीत असताना 'त मंग', 'आन मंग', 'न', 'हांग', 'एरीच', 'तिकिल्या आंग', 'इकिल्या आंग' इत्यादी पालुपदे सतत वापरली जातात असे सामान्यपणे दिसते.

(७) कथन करीत असताना मुख्यत्वे करून दोन पद्धती दिसतात. (अ) कमीतकमी शब्दात वर्णन करणे, (ब) लांबण लावण्यासाठी खूप वर्णन करणे. असे वर्णन करीत असताना परिसरातील स्थलांचे दाखले देणे.

हे सारे करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की, कथन करणाराचे लोकरंगले आहेत, कंटाळले नाहीत याकडे सदैव लक्ष असते. गोष्टीतील कथानक आणि भावविश्व यात श्रोता अगदी रंगून जातो. निवेदकाला निवेदनाचे बंधन नसते तसेच श्रोत्याला समाशिष्टाचाराचे बंधन नसते. श्रोता रंगला की तो कधी पोट धरधरून हसतो, संकटाच्या भावनेने दुःख व्यक्त करतो, राग आला की शिवी हासडायला देखील मागेपुढे बघत नाही. कथानकात ताल असेल तर तोदेखील कथानिवेदकाबरोबर ताल धरावयास कमी करीत नाही. वक्ता आणि श्रोता यांच्यातील सीमा अनेकवेळा नाहीशी झाल्याचे आढळते. हे या कथानिवेदनशैलीचे निश्चितच वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

### (२) कथानक – घटनामाला – संघर्ष –

लोककथेतील कथानक हे परंपरेने चालत आलेले असते. म्हणजे मागच्याने पुढच्या पिढीस ऐकवलेले असते. पुढच्या पिढीत एकप्रकारे त्या कथानकाचे पुनरुज्जीवन घडत असते असे म्हणता येईल. कथा कोणतीही असली तरी त्यात

एक प्रकारची घटनामालिका असते आणि त्या मालिकेतून कथानक विकसित होत जाते. या घटनामालिकेची लांबी कथा सांगणाऱ्याच्या निवेदनपद्धतीवर अवलंबून असते. कथानक जरी तेच असले तरी अनेकवेळा निरनिराळ्या कथेतील सरस, घटना कथा सांगताना घुसडून दिल्या जातात आणि कथा खूप लांबविली जाते. तर काही वेळा मोजक्याच महत्त्वाच्या घटना सांगून कथा सरती केली जाते. असे होत असताना घटनामालेच्या बाबतीत पुढील बाबी आढळतात.

(१) कथानक ठराविक असले तरी त्यातील घटना ठराविकच नसतात.

(२) या घटना निवेदकाच्या मनाने व श्रोत्यांचा कल पाहून वाढविल्या वा कमी केल्या जातात.

(३) कथेतील घटनांची संख्या व निवेदनात्मक लांबी वाढविणे, वा कमी करणे हे कथा प्रकारावर देखील अवलंबून असते. उदाहरणार्थ, प्राणीकथा, हास्यकथा आणि अद्‌भुत आख्यायिका यात कथेतील घटना मोजक्यात वापरल्या जातात. त्या अधिक वापरल्या जाऊ लागल्या की त्याचे कथानिवेदन कोलमडून पडते. या उलट अद्‌भुतकथा किंवा परिकथा यांतील घटना फार मोठ्या प्रमाणावर वाढविल्या जातात.

(४) कथांमध्ये जे फरक आढळतात व त्यामुळे एक कथा दुसऱ्या कथेपासून वेगळी वाटते किंवा कथेचे पर्याय आढळतात त्यामागे हे कारण असले दिसते.

(५) घटनांची मालिका ही संघर्षाच्या जिवंतपणावर व तीव्रतेवर अवलंबून असते. त्याचबरोबर कथानिवेदक आणि श्रोते यांच्या मनोवृत्तीवर असते असेदेखील आढळते.

(६) रात्र रात्र चालणाऱ्या कथा किंवा एका कथेतून दुसरी कथा, एकाच नायकाच्या एकापाठोपाठ आलेल्या कथा या घटनामाला आणि त्यातील संघर्षाच्या तीव्रतेवर आणि नायकाच्या पराक्रमवर्णनावर अवलंबून असतात.

(७) काही कथा आणि आख्यायिकांमध्ये घटनामाला आढळत नाहीत. तर ती आख्यायिका किंवा ती कथा ही एकच घटना असते.

(८) घटनामालेतील क्रम हा कथानकाच्या बोधावर अवलंबून असतो. काही वेळा दोन ठिकाणच्या परिस्थितीचे वर्णन करताना समांतर सांगाव्या लागतात. तिकडे असे होते तर इकचे असे चालले होते, अशी स्थिती घटनांच्या बाबतीत घडते.

(९) काही घटना केवळ पराक्रमवर्णन, मार्गक्रमवर्णन अशासाठी आलेल्या असतात. त्यांचा केवळ श्रोत्यांची उत्सुकता वाढविणे एवढाच हेतू असतो. अशा



वेळी निरनिराळ्या ठिकाणचे कथानिवेदन, घटनाक्रम निरनिराळा वापरताना आढळतात.

एकूण कथानक आणि कथानकातील घटना, संघर्षावर अवलंबून दिसतात. या भागातील कथांमध्ये संघर्षाचा विचार करताना येथील कथेतील संघर्ष हा पुढील प्रकारचा आढळतो.

(१) हा संघर्ष तात्त्विक स्वरूपाचा बहुधा नसतो, तर तो ऐहिक स्वरूपाचा असतो. छळ, नैसर्गिक घटनांची भीती, पण, अटी, पैज यातून पराक्रम दाखविण्यासाठी तो जाणीवपूर्वक, ओढवून आलेला असतो. हास्यकथांमध्ये हा संघर्ष फजितीच्या स्वरूपात आढळतो. प्राणीकथा किंवा अन्य मानवी जीवनातील संघर्ष हा मूर्खपणा, लुच्चेगिरी, दारिद्र्य, राजाचा जुलूम, फसवेगिरी, चोरांची कृत्ये, रानटी जनावरांची शिकार वा त्यांचे मानवावरील आक्रमण यातून उभा झालेला आढळतो.

(२) हा संघर्ष बहुधा सुखपर्यवसायी असतो. असंख्य संकटांनंतर, भीतीनंतर, गांभीर्यानंतर कथेचा शेवट सुखान्तच होतो.

(३) दैवतकथा किंवा आख्यायिका यांच्यातील संघर्षदेखील माणसावर झालेला दैवतांचा, पिशाच्यांचा वा निसर्गाचा कोप किंवा माणसाच्या त्यांच्या बाबतीत घडलेल्या चुका यांतूनच उद्‌भवलेला आढळतो.

(४) हा संघर्ष वास्तविक जीवनाचे पूर्ण प्रतिबिंब उभे करणाराच असतो असे दिसते.

(५) संघर्षाच्या पाठीमागे ठराविक गोष्टीच कारणीभूत असल्याने त्याची तीव्रता निर्माण करणे आणि कथेला रंगत आणणे हे निवेदकावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे ते श्रोत्यांवरदेखील अवलंबून असते असे वाटते.

कथानक, घटनामाला आणि त्यातील संघर्ष या सर्वांच्या मागे मुख्य सूत्र असते ते कथाबीज किंवा कल्पनाबंधाचे. असे येथील कथांवरूनदेखील जाणवते.

### (३) कल्पनाबंध व कथाबीज –

प्रत्येक प्रकारच्या कथांत कोणत्या प्रकारचे कल्पनाबंध येतात ते अगोदरच्या चर्चेत पाहिले आहेच. या कल्पनाबंधाचाच वापर वरचेवर कथा व आख्यायिकांमधून झालेला आढळतो. त्यामुळे कथांमध्ये तोचतोपणा जाणवतो हे खरे. कथा निवेदनाला कथा सांगताना हे कल्पनाबंध स्मरत असतात असे जाणवते. एखादी

अद्‌भुतकथा ऐकताना हे विशेषत्वाने जाणवते. अमुक प्रकारचे संकट आपल्या कथानायकावर आले नाही हे जणू निवेदकाच्या किंवा श्रोत्यांच्या मनाला पटतच नसावे. तेव्हा अन्य कथात घटना आसल्या तरी त्या आवर्जून पुन्हा सांगितल्या जाणाऱ्या कथेत येतात. म्हणून मूळ बीजे आधारास घेऊन कथानक कितीही लांबविण्यात किंवा कथानकातून कथानके गुंफत जाण्यात गावातील गोष्टीवेल्हाळ पटाईत होतात. अर्थात एक गोष्ट येथे ध्यानात घ्यावयास हवी की, कल्पनाबंधांचा निवेदक वापर करतो याचा अर्थ त्याला त्याची जाणीव असते असे मुळीच नाही. अगदी अनाहुतपणे त्याच्याकडून ते घडत जाते. एकप्रकारे त्याचा तो स्वभावच बनलेला असतो. म्हणूनच गावात असे लोक फार थोडे सापडतात. निरनिराळ्या कथांमधून जे कल्पनाबंध वापरले जातात त्यांचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(ग) कल्पनाबंध अनाहुतपणे न ठरविता वापरले जातात.

(म) कथांमध्ये सारखेच किंवा एकच कल्पनाबंध आढळतात. उदाहरणार्थ दैवतकथांमध्ये दैवत नवसाला पावते व नवस न फेडल्यास त्या दैवताच्या कडकपणाची प्रचिती येते हा कल्पनाबंध सर्वच दैवतकथांमधून ऐकावयास मिळतो. दैवत वेगळे व नवसाचा प्रकार भिन्न एवढेच.

(भ) अनेक कल्पनाबंध एकाच कथेमध्ये वापरले जातात.

(न) कोणत्याही कथा, त्यातील उपकथानकप्रसंग एखाद्या कल्पनाबंधाभोवती गुंफलेले असते.

(य) वापरल्या जाणाऱ्या कल्पनाबंधातून अन्य कल्पनाबंध स्फुरतात. असे होत असताना त्या कथानिवेदकाची कल्पनाशक्ती तीव्रतेने कार्यरत झालेली असते.

(र) कल्पनाबंधातील समानता देशोदेशीच्या कथांमध्ये सापडते. त्यामुळेच कथेचे वाङ्मयीन व सामाजिक तसेच सांस्कृतिक मूल्य वाढते. कल्पनाबंधातील समानतेची जाणीव या वन्य, आदिम जमातीतील कथानिवेदकांना व श्रोत्यांना देखील असते हे जाणवते.

(ल) कल्पनाबंध हे बीजरूप असल्याने कथेला एकप्रकारचा घाट मिळतो हे सहज जाणवेल.

(व) बीजरूप कल्पनाबंध आणि त्यामुळे कथांना मिळालेला घाट यामुळे परंपरेने कथा संक्रांत होणे शक्य झाले आहे असे लोककथांचे कथन प्रत्यक्ष ऐकताना जाणवते.



कथा डांगाणी असोत की अन्य कोणत्या असोत कल्पनाबंध हे कथेचे मूलभूत असे अंग आहे असेच जाणवते. लोककथांच्या जागतिक क्षजत्राविषयी विचार मांडताना अभ्यासकांना याच गोष्टींची जाणीव झाली आहे हे जाणवते. श्रीमती दुर्गा भागवत यांनी आपल्या 'लोकसाहित्याची रूपरेषा' या पुस्तकात यासंबंधीची चर्चा केली आहे तीवरूनही हेच त्यांनी दाखविले आहे.[२३]

डॉ. प्रभाकर मांडे यांनी देखील कल्पनाबंधाचे महत्त्व व त्यावरील चर्चा त्यांच्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात केलेली आहे.

कल्पनाबंधाबरोबरच कथानक, घटनामाला, संघर्ष या गोष्टी जशा महत्त्वाच्या तशाच व्यक्तिचित्रण, प्रसंगवर्णन यात सुसंगती, रंजकता व यथायोग्यता, मार्मिकता अशा गोष्टी लोककथांमध्ये असतात की नाहीत हे पाहाणे महत्त्वाचे असते. कथेचे सौंदर्य या वर्णनातून जुळत असते. त्याचा विचार करणे योग्य होईल.

**(४) वर्णनातील सुसंगती – व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णन, स्थलवर्णन आणि संवादात्मकता –**

या लोककथा सांगितल्या जात असताना वर्णनामध्ये सुसंगती साधण्याचा प्रयत्न आटोकाट केला जातो. व्यक्ती, स्थल, प्रसंग व वेळ यांचा अनुसरून यथोचित वर्णन म्हणजेच वर्णनातील सुसंगती होय. राक्षसाचे राहाण्याचे ठिकाण, गुहा, पाताळ, जंगल यांचे वर्णन राक्षसासारखेच भयानक. त्याचे माणसे तळळ्याचे भांडे म्हणो प्रचंड कढई, सावत्र आईने केलेले छळ म्हणजे 'कोंड्यारोंड्याची भाकर', उंदराच्या फिरण्याचे वर्णन करताना, 'तो चाला कुपाटीकुपाना' असे वर्णन करतील. साधूच्या मठाचे वर्णन करताना, आग, झाडी, मठ आदी गोष्टी आवर्जून आणल्या जातील. दैवताच्या कोपाची भयानकता तशीच वर्णिली जाईल. वर्णनातील विशेष पुढीलप्रमाणे दाखविता येतील.

(ह) अनेक गोष्टींचे वर्णन केवळ एका शब्दात केले जाते असे आढळते. 'पका पाऊस' यास संपूर्ण मुसळधार, संततधार, वादळी पाऊल या साऱ्याचे वर्णन होते. त्या शब्दाला प्रतिमारूपता आलेली असते. 'जाला व्हलपटत' 'बस रडत' या दोन शब्दांत संपूर्ण दुःखाचे वर्णन येते. 'यकलाच' या एकाच शब्दात त्याची निराधारता स्पष्ट होते. 'रानात ग्येला' यात काम करण्याच्या संदर्भातील संपूर्ण आशय आला.

(ळ) समयोचित वर्णन असते परंतु त्यात प्रादेशिकता असते.

(श) व्यक्तिचित्रण अत्यंत थोडक्यात आटोपले जाते.

(ज्ञ) वर्णनात सरसता आणण्यासाठी व अधिक अनुरूप होण्यासाठी त्यांच्याजवळ असलेले शब्द ते वापरतात व त्यातून ते तो विशिष्ट भाव व्यक्त करतात. 'लई, भयंकार, यव्हडाबी, गपक्यान, इ्याप / इ्यापेत, यव्हढ्यात, एकी, पका, अशा प्रकारची विशेषणे, क्रियाविशेषणे वापरून काम भागविले जाते.

(म) वरील प्रमाणेच वाक्प्रचार व म्हणी वापरून आशयघनता थोडक्यात साधली जाते.

वर्णनातील दोष पुढीलप्रमाणे आढळतात -

(त) वर्णनात तोचतोपणा आढळतो.

(घ) प्राम्यतेची काळजी घेतली जात नाही.

(ज) हे वर्णन कथाकथन करणाऱ्या व्यक्तीवर अवलूंन असते. त्यामुळे एकच कथा अनेक व्यक्तींकडून ऐकताना वर्णनातील कमीजास्तपणा जाणवतो.

(ग) वर्णनातील सांकेतिकता ही काही वेळा दुर्बोध होते.

वर्णनातील या गुणदोषाबरोबर काही विशिष्ट प्रकारच्या वर्णनांचा अभ्यास करणे जरूर वाटते.

डांगाणी लोककथांमध्ये व्यक्तिचित्रणे तितकी परिणामकारक वाटली नाहीत. व्यक्तिचित्रणापेक्षा कथानकाकडेच त्यांचे अधिक लक्ष असते. आणि ते साहजिकच असते. 'यकृ श्यातकरी व्हता', 'तो रोज श्यातावर कामाला जात अस' एवडे म्हटले की संपले. अर्थातच या कथांमधून विशिष्ट व्यक्तीचा उल्लेखच नसतो. ती व्यक्ती नेहमी अज्ञात गावची, अज्ञात देशाची व अनेक वेळा अज्ञात नावाचीदेखील असते. 'यक व्हता राजा' कोण? व्यक्तिचित्रणात सर्वदूर गोष्टींतून तोचतोपणा आढळतो असे लक्षात येते. या व्यक्तिचित्रणामध्ये त्या व्यक्तीचे स्वभावचित्र, भावनाचित्र प्रसंग व कथानक यातून काय उभे राहील तेवढेच. अन्यथा त्याचे स्वतंत्र वर्णन करण्यासाठी निवेदकाला तेवढा वेळ नसतो. व श्रोत्यांनादेखील उत्सुकता नसते. श्रोते व निवेदक दोघे इतके पटकन शेतकऱ्यांशी एकरूप होतात की व्यक्तिचित्रणाचीही इतर अंगे त्यांना आपोआप जाणवतात. दुसरे म्हणजे आख्यायिकांमध्ये तर या गोष्टींचा जवळजवळ संबंधच पोहोचू दिला जात नाही. ऐकूण व्यक्तिचित्रणाचे डांगाणी लोककथातील स्थान जवळजवळ गौणच आहे असे जाणवते.

प्रसंगवर्णनाबाबत मात्र इतकी उदासीनता किंवा दुर्लक्ष झालेले आढळत नाही हे निश्चित. वर जी वर्णनाविषयी चर्चा केली आहे ती मुख्यत्वेकरून प्रसंग-



वर्णनाच्या संदर्भातीलच आहे असे म्हणता येईल. प्रसंगवर्णनाच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आढळते म्हणजे त्यावर भोवतालच्या वातावरणाची, परिस्थितीची तसेच कालविशेषांची मोठ्या प्रमाणावर छाप पडलेली आढळते. लोककथांमधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते ते यामुळेच. प्रसंगवर्णन करताना कधी कधी तर इतकी तल्लीनता येते की एकेका प्रसंगात बराच वेळ निघून जातो.

विशेषतः आख्यायिकांच्या संदर्भात स्थलवर्णने येतात. स्थलवर्णने ही पूर्णतः वस्तुनिष्ठ केलेली आढळतात. स्थलवर्णन करताना त्या स्थलाची परंपरा आणि महत्त्वविशेष स्पष्टीकरणाकडे अधिक लक्ष पुरविताना आढळथे. इतर कथांमधील स्थलवर्णन हे परिसराशी असेच निगडित असते. कोणतीही कथा जणू याच ठिकाणी घडली असावी असा आभास निश्चित निर्माण होताना आढळतो.

या कथाकथनांमध्ये एकपात्री च्योगासारखे संवाद आढळतात. निवेदक प्रत्येक पाण्याचे बोल आविर्भाव करून सांगतो. त्यामुळे कथेला वास्तवता तर येतेच परंतु त्यातील नाट्यमयता वाढते आणि कथेला अधिक रंगत येते असे दिसून येते. हे संवाद सांगत असताना आवाजातदेखील फरक म्हणजे नाटकीपणा आणण्याचा प्रयत्न काही निवेदक करताना दिसतात. ही अभिनयात्मकता हे लोककथांचे एक विशेष अंग आहे. वर्णनातील उणीवा या विशेषामुळे सहज निघून जातात.

डांगाणी लोककथांच्या संदर्भात ज्या विशिष्ट घटकांची चर्चा केली त्याचबरोबर आणखी एका घटकाचा विचार करणे आवश्यक वाटते. तो घटक म्हणजे श्रोते.

**(५) श्रोते -**

लोकगीते ऐकावयास श्रोते आहेत किंवा नाहीत याचे भान गाणारास किंवा गाणारांना असत नाही. लोककथेत मात्र समोर ऐकणारे बसले आहेत व त्यांनाच आपण कथा ऐकवत आहोत याचे सदैव भान कथा सांगणाराला ठेवावे लागते. शेकोटीजवळ किंवा मारुतीच्या देवळात चालणाऱ्या कथांच्या बाबतीत आणखी एक विशेष दिसतो. तेथे ऐकणारे काही आणि झोपणारे बरेच असता. अशा वेळी ऐकणारांचे रंजन करणारांची जबाबदारी निवेदकावर येते. श्रोत्यांच्या बाबतीत एक महत्त्वाचा भाग असतो, तो म्हणजे कधी त्यांनादेखील ती कथा येत असते परंतु मनोरंजनासाठी म्हणून ते स्वतः अमुक कथा सांग, अशी मागणी करतात. अशा परिस्थितीत ती कथा, आख्यायिका, अधिक रंगवून सांगण्याची जबाबदारी

त्याच्यावर येते. या कथा ऐकणाऱ्यांचा असा विशिष्ट वर्ग करता येणे कठीण आहे. असे असले तरी त्यांचा हेतू मनोरंजन आणि माहिती संपादन किंवा कुतुहलपूर्ती हाच असतो. हेतूची समानता असल्याने त्यांचा स्वतंत्र वर्ग करण्याचे कारणच नाही. श्रोते आणि वक्ता यांचे ज्ञान कमीअधिक प्रमाणात असले तरी ते त्या एकाच प्रदेशाशी अत्यंत निगडित असे असते. कथा ऐकताना हे श्रोते अत्यंत सावध असतात हे त्यांचे वैशिष्ट्य सांगता येईल. ते वक्त्यास जमेल तेथे सूचनादेखील करतात. अनेकवेळा दोन अथवा अधिक कथांची सरमिसळ निवेदकाकडून होऊ लागते. अशावेळी श्रोते त्यास थांबवितात व 'हे ह्या कथात नाही, ती दुसरी आहे' अशा सूचना करतात. एवढेच नव्हे तर काही वेळा असा अनुभव येतो की कथानिवेदक कथा चुकू लागला की सरळ त्याला थांबवून, दुसरा कथा सुरू करतो व त्याला श्रोते अनुमती देतात. पहिला निवेदक श्रोता बनून निमूटपणे ऐकू लागतो. परंतु दुसऱ्या निवेदकाचे चुकते कोठे यावर त्याची करडी नजर असते. म्हणजेच वक्त्यांच्या वर्ग वेगळा व श्रोते वेगळे असे असत नाही. एक कोणीतरी कथा निवेदक होतो. ज्या वक्त्यांना अडवूच शकत नाहीत असे वक्ते अत्यंत थोडे असतात. वक्ताच श्रोता यात कोणी महत्त्वाचे व कोणी कमी महत्त्वाचे असा फरक करता येत नाही. तसेच आपले ज्ञान व्यक्त करण्यास वा अधिक ज्ञान मिळवण्यास दुसरे स्थान नसल्याने कथानिवेदन सुरू झाले की तेथे एक प्रकारचे मुक्त विद्यापीठ सुरू होते आणि मनोरंजनातून ज्ञान हे सूत्र प्रत्यक्ष अमलात आणले जाते. तसे ते वर्षानुवर्षे चाललेले आहे. असते. त्यापुढे मुलांना शाळा दुय्यम वाटतात. फावला वेळ अशा गोष्टीत घालविणे हे अगदी सहज घडते. नैसर्गिकरित्या घडते आणि म्हणूनच येथे श्रोत्याची भूमिका ही कृत्रिम स्वरूपात नसून ती अजाणताच घडत असते.

कथा म्हटलीं की ती कोणत्याही प्रकारची असली तरी तीस निवेदक व श्रोते यांच्याशिवाय अस्तित्वच असू शकत नाही. ही या लोककथांची खरी अवस्था आहे. म्हणूनच निवेदक श्रोते यांच्या लहरीनुसार ती प्रगट होते, लांबते, आखूड होते, बदलते. तरी तिचा स्त्रोत अखंड असतो. कथांमध्ये नवीन खूप गोष्टी मिसळल्या जातात. जुन्या काही गळून जातात. काळाला, परंपरेला, लोकमानसाला या लोककथा उजाळा देतात. वर्तमानाचे दर्शन त्यात अनाहुतपणे घडते आणि अशा रितीने संपूर्ण लोकजीवनाशी त्याचे अतूट नाते जोडले जाते.

लोकजीवनातील सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे महनीय कार्य या कथा करीत असतात. लोकजीवनातील सुख वा दुःख यांचे बरेवाईट अनुभव या



लोककथातून देखील व्यक्त झालेले असतात. त्यांच्या कल्पना त्यांच्या श्रद्धा भावपूर्णतेने कथांतून देखील व्यक्त झालेल्या असतात. म्हणूनच कथांना एक प्रकारचे भावनिक सामर्थ्य निर्माण झालेले असते.

या कथांना परंपरेन जतन केले आहे. त्यांना नित्य नवीन बनविलेले आहे. म्हणूनच त्या एका अर्थाने अक्षरवाङ्मयात मोडणाऱ्या असतात असे म्हणावेसे वाटते. डांगाणातील लोककथा अशा स्वरूपाच्या आहेत आणि त्यांचे इतर सर्वदूरच्या लोककथांशी अतूट असे नाते आहे.

डांगाणी लोककथा या विपूल प्रमाणात आहेत. त्यांच्या परीने त्यांचे वेगळेपण जाणवते. परंतु जगाशी त्यांचे असलेले नाते अतूट आहेच. गिरिकंदरात राहणाऱ्या या लोकांनी आपले कथावाङ्मय जतन करून ठेवण्यात जराही कुचराई केलेली नाही. किंबहुना रानातल्या जीवनात या कथा त्यांचा आधार आहेत

या साऱ्या कथा केवळ तोंडी स्वरूपात आहेत हे सांगावयास नकोच. शिवाय व्यक्तिपरत्वे या कथा बदलल्या तरी त्या शुद्धच म्हणाव्या लागतील. मुक्त ता हेच या लोककथांचे मुख्य वैशिष्ट्य. म्हणूनच या कथा केव्हा उत्पन्न झाल्या आणि किती काळ त्यांची परंपरा आहे हे सांगता आले नाही तरी त्यामुळे त्यांचे महत्त्व वाटते असे वाटते.

या कथा प्रातिनिधिक स्वरूपात परिशिष्टात ग्रथित केलेल्या असल्यामुळे[२४] वरील सर्व निवेदनाला आधार त्या कथात सापडतील. सर्व विवेचन त्या कथांच्या अभ्यासातूनच केलेले आहे. अशा या लोककथांचा वाङ्मयीन अभ्यास करताना त्यांचे निवेदक आणि श्रोते यांनी संबंधित असलेले स्वरूप लक्षात घेणे आवश्यक वाटते. अशा प्रकारच्या वाङ्मयीन अभ्यासाविषयी कदाचित मतभेद होतीलही. तरी ते याप्रकारे असल्यास योग्य होतील असे वाटते. लोकजीवन आणि संस्कृती ही वाङ्मयातून कशी व्यक्त होते हे सांस्कृतिक अभ्यास या प्रकरणात सविस्तर आले आहे. म्हणूनच त्याची येथे चर्चा करण्याचे टाळले गेले आहे.

**लोककथांचे इतर कलांमध्ये रूपांतर –**

लोककथांचे रूपांतर लोककलांमध्ये झालेले असावे असे वाटण्याइतके साम्य यात दिसते. येथे मुख्यत्वेकरून डोळ्यासमोर येते ते तमाशे, बोहाडे व भारूड.

तमाशामधील वग हा जो प्रकार आहे हा बहुधा या कथांमधूनच परिणत झाला असे वाटते. हे वग पौराणिक कथानकांवर आधारित असतात. तर कधी

ऐतिहासिक कथानकांवर आधारित असतात. पण बऱ्याच वेळा अनेक काल्पनिक वग असतात आणि ते थेट अद्‌भुत कथांसारखे असतात. त्यात व्यक्ती, प्रसंग, घटना थेट त्या वळणाच्या असतात. अर्थात पौराणिकव ऐतिहासिकवगांमध्येदेखील कथानक जरी रामायण-महाभारत, पुराणे यातून घेतले असले किंवा ऐतिहासिक वगांचे कथानक इतिहासाशी संबंधित असले तरी त्यातील प्रसंगवर्णन व घटना याला हे भाग पूर्णतः या लोककथांशी संबंधित वाटतात. एवढेच नव्हे तर लोककथांमध्ये ज्याप्रमाणे निवेदक आणि श्रोते हे एकरूप झालेले दिसतात त्याप्रमाणेच तमाशामध्ये देखील पात्रे, कलाकार आणि श्रोते एकरूप होतात. कलाकार प्रेक्षकांशी बोलतो, सल्ला घेतो, मनातील विचार समजावून सांगतो, हे घडते. प्रेक्षक मध्येच उठून सूचना करतात. खलनायकाची हुर्यो करतात. हे सारे पाहिले की कथावाङ्मयातून या कलेला प्रेरणा मिळाली असावी असे म्हणावेसे वाटते.

भारूडाची देखील तीच गोष्ट. काही वेळा जे मध्ये चुटके करून दाखवितात ते कथांवरून घेतलेले असतात. दैवतकथा व आख्यायिका यांचे तर सरळसरळ नाट्यीकरण केलेले आढळते.

बोहाडा हा प्रकार तर विशेष आहे. यात पुराण, रामायण, महाभारत यातील महान व्यक्तींची सोंगे निघतात. त्याचबरोबर दैवतांची, जनावरांची, माणसांमधील सावकार, भटजी आदी सोंगे निघतात. दैत्यांच्या जोड्या मिरविल्या जातात. त्या म्हणजे राक्षसाची सोंगे असतात. ही सोंगेसुद्धा काहीवेळा भांडणे करतात. या साऱ्यांशी कथेतील पात्रे त्यांचे संवाद व त्यांचे स्वभावदर्शन यात साम्य असते. शिवाय हे बोहाडे म्हणजे एखाद्या दैवताची जत्राच असते. त्यामुळे याही प्रकारास लोककथांचाच मोठा आधार असावा असे म्हणावेसे वाटते.

तमाशातील फार्स हा प्रकार तर पूर्ण हास्यकथांवरून परिणत झाला असावा असे वाटते. अशा प्रकारे लोककथांनी या लोककलांना मोठा आधार दिला आहे, असे म्हणता येण्याजोगे आहे. याची काही उदाहरणे देता येतील परंतु विस्तारभयास्तव येथे देण्याचे टाळले आहे.

एकंदर पाहाता लोककलांना प्रेरणा देण्याचे कार्यदेखील या लोककथांनी केले असावे असे म्हणण्याव्यतिरिक्त पुरावा सापडतो. परंतु या लोककथांना मिळाली असेल ती मुख्यत्वेकरून कथेमध्ये जो निवेदक हा घटक असतो यातून तो वर सांगितल्याप्रमाणे जणू एकपात्री च्योगच करून दाखवितो. या त्याच्या कौशल्यातूनच ही सामूहिक अभिनयाची कल्पना सुचली असावी, असे म्हणावेसे वाटते. कारण



निवेदक कथा सांगतांना प्रसंगोचित भाव तर व्यक्त करतोच पण त्याचबरोबर संवादांची रेलचेल करतो. हे संवाद त्याच्या कौशल्यावर अवलंबून असतात. नेमका हाच प्रकार या वरील लोककलांमध्ये आढळतो. कथानक माहीत असते आणि त्यातील संवाद हे त्या प्रसंगाला अनुसरून समयोचित करावयाचे असतात.

अशा रितीने लोकगीते जशी लौकिक गीतांना आधारभूत ठरली तशाच या लोककथासुद्धा अशा प्रकारच्या लौकिक मार्गदर्शक ठरल्या आहेत.

**डांगाणी लोककथांच्या अभ्यासाची दिशा –**

डांगाणी लोककथांच्या अभ्यासाची काय दिशा असावी असा प्रश्न जेव्हा उपस्थित झाला तेव्हा दोन दृष्टिकोन स्वीकारण्यात आले ते प्रबंधाच्या संदर्भातील असेच स्वीकारले आहेत. संस्कृतीचे व लोकजीवनाचे चित्र या डांगाणी लोककथांमधून कसे उभे राहावे? त्यातून लोकजीवनाचे दर्शन कितपत घडते? या प्रश्नांची चर्चा चाळीसगाव डांगाणाच्या सांस्कृतिक अभ्यास या प्रकरणांतून झाली आहे. तेथे घडविलेले संस्कृतीचेच लोकजीवनाचे चित्र लोकगीते व लोककथा यांच्या आधारेच उभे केले आहे. दुसरा दृष्टिकोन वाङ्मयीन समालोचन कसे करता येतील? या प्रश्नाची स्थूल स्वरूपात चर्चा या प्रकरणात आलेली आहेच.

असे करताना वाङ्मयीन अभ्यासाच्या बाबतीत असे दिसून येते की लौकिक वाङ्मयाचे समालोचन करणे आणि लोकसाहित्याचे समालोचन करणे यात खरेच अंतर आहे. येथे वाङ्मय बदलते व मौखिक स्वरूपात असते. शिवाय वाङ्मयीन समालोचन केल्यास त्यातून निघालेले निष्कर्ष हे बदलते असतात.

म्हणूनच, लौकिक कथावाङ्मयाचे समालोचनाची पद्धत येथे वापरता येत नाही. म्हणूनच येथे केलेली चर्चा ही रचना, कल्पनाबंध, प्रकार, घटक यांच्या संदर्भातच करणे योग्य वाटले.

लोककथांचा अभ्यास करताना सांस्कृतिक, समाजशास्त्रीय, ऐतिहासिक दृष्टिकोनातूनदेखील विचार व्हावयास पाहिजे. असा अभ्यास अधिक उपयुक्त होतील असे वाटते. विशेषतः आदिवासींच्या संदर्भात असलेल्या या डांगाणी लोककथांचा अभ्यास त्या दृष्टीने होणे जरूर वाटते. हा अभ्यास करताना अनेक प्रश्न उभे राहतात. हे आदिवासी आले कोठून? सर्वदूर प्रचलित असलेल्या लोककथांचा आणि त्यांचा परिचय कसा झाला? भावांची नावे, त्यांच्या चालीरिती, त्यांच्या कथांतून आढळणारे रामायण-महाभारतातील संदर्भ हे सारे

एक प्रकारचे कुतुहल निर्माण करतात. एका म्हाताऱ्याने 'सीताची गोष्ट'[२५] म्हणून संपूर्ण रामायण अवघ्या एका तासाभरात अत्यंत वेधकपणे ऐकवले. त्यातल्या कथा, त्याची भाषा सारे काही आगळेवेगळे वाटले. परिशिष्टात ते प्रणित केलेले आहे. प्रत्यक्ष डोंगरदऱ्याा म्हणजेच त्या महान व्यक्ती आहेत असे जेव्हा येथील लोक ऐकवितात तेव्हा त्यांच्या परंपरेचे व कल्पकतेचे कौतुक करावेसे वाटते. हरिश्चंद्राचे सारे आख्यान हरिश्चंद्रगड येथील डोंगर ऐकवितात. तेव्हा मन थक्क होवून जाते. त्यापाठीमागचा इतिहास, कारणमीमांसा सारे शोधून काढणे जरूर आहे.

रामायण, महाभारत यासारख्या महाकाव्यांना या लोककथा व लोकगीते यातूनच प्रेरणा मिळाली असावी असे सहज मनात येते. रामायण, महाभारतातील कथांचा येथील तौलनिक अभ्यास होणे जरूर आहे. सर्वच लोकसाहित्याच्या बाबतीत असे म्हणता येईल. या एका वेगळ्या दृष्टीने या साहित्याकडे पाहाणे जरूर आहे. महाकाव्यांमध्ये जीवनातील सर्व अंगांचा समावेश जसा असतो तसेच जीवनाचे प्रत्येक अंग लोकसाहित्यात प्रतिबिंबित झालेले दिसून येते. अमुक प्रकारचा अनुभव वा अमुक एक प्रकारची कल्पना लोकसाहित्यात नाही असे होत नाही. तसेच अमुक एक अनुभव, नवीन गोष्ट लोकसाहित्याला वर्ज्य आहे असे दिसत नाही. त्यात सर्व समावेशकता दिसून येते. ही सर्व समावेशकता विचारात घेऊन सर्व महाकाव्ये किंवा सर्व अभिजात वाङ्मयाचे मूल स्थान या लोककथा व लोकगीते असावे असे समजून त्यादृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न होणे जरूरीचे लाटते.

लोककथांमध्ये सापडणारे कल्पनाबंध आणि महाकाव्यातील कल्पनाबंध यांचा तौलनिक अभ्यास होणे जरूर आहे. असे झाल्यास हे सहज दाखविता येतील की महाकवी हे अव्वल दर्जाचे लोकसाहित्य विशारद होते. त्यांना महाकवी ही प्रतिमा प्राप्त झाली ती लोकसाहित्यातूनच. महाकाव्यांतील किंवा पुराणातील कथा ऐकून भय या लोककथा रचल्या गेल्या असाव्यात असे कोणी म्हणावयास धजेलसे वाटत नाही. महाकाव्यातील कथा लोकांनी आपल्या परिसरात, आपल्या जाती-जमातीस, आपल्या मायांमधून पाहिल्या हे खरे परंतु ती त्यांची श्रद्धा आणि सर्वसमावेशकता होती. महाकाव्यांमध्ये जी पुढे पुढे मर पडत गेली आणि त्यांचा व्याप वाढला असे लोकांचे मत बनले आहे त्यामध्ये देखील हीच दृष्टी दिसते. म्हणूनच लोककथांच्या अभ्यासास हीदेखील एक दिशा मिळणे आवश्यक वाटते. चाळीसगाव डांगाणच्या लोककथांमध्ये असे उल्लेख फार मोठ्या प्रमाणावर



सापडतात. वाल्मिकीचा आश्रम, लवांकुशाचा जन्म, रावण-जटायू युद्ध असे कितीतरी प्रसंग येथील लोक पत्त्यामुद्यासह दाखवितात. ऐकवितात. ही जाणीव आणि दृष्टी ज्या लोकांमध्ये आहे त्यांच्यातून वाल्मिकी निर्माण झाले नाहीत असे कसे म्हणावे?

वर जे ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास व्हावयास हवा असे म्हटले आहे ते अशा अर्थाने की, या भागात अगस्ती ऋषींच्या आख्यायिका आहेत, राम चंद्रांविषयी आहेत, गार्यीविषयी आहेत. या भागातील महादेव कोळी हे मध्यप्रदेश मधील महादेवाच्या डोंगरातून आले असावेत असे कॅ. मॅकिनटोश यांनी म्हटले आहे.[२६] तसेच येथे दक्षिणी भाषा बोलणारे (कानडी) हटकरकानडी लोक राहतात. तसेच मराठी भाषा चांगल्या प्रकारे वा महादेव कोळ्यांच्या प्रमाणे बोलणारे 'तलवारकानडे' नावाची जमात येथे राहते. ते स्वतःला आदिवासी तर म्हणवत नाहीतच शिवाय या भागाचे मूळचे रहिवासी म्हणून म्हणवितात. या भागातील गावांची नावे कोळटेंभे, अकोले वगैरे. तसेच या भागात प्रत्यक्ष गायांसाठी डोंगरात आढळणाऱ्या गुहा व त्याविषयीच्या आख्यायिका, तुळजापूरची भवानी हे दैवत, विश्वनाथ खैरे यांनी आकोला या गावाची लावलेली तमिळ भाषेशी संगती[२७] आ म्हणजे गाय व कोल म्हणजे धरणे इ., तसेच या भागातील प्रत्यक्ष लोकांचा धंदा शेती व गाई पाळणे हा पाहाता अगस्त्यांनी आणलेली आर्यसंस्कृती आणि दाक्षिणात्य संस्कृतीचा पहिला मिलाफ याच ठिकाणी झाला असावा. महादेव कोळी ही श्रमजीवी जमात इकडून तिकडे (मध्यप्रदेशातून) आली असावी असे म्हणता येईल. व इतिहासाचा - अतिप्राचीन दुवा सांधला जाईल असे म्हणता येणे शक्य झाले आहे.

अर्थात अशा प्रकारे अभ्यास करताना तो वाङ्मयीन अभ्यास होईल काय? याबाबतीत असे म्हणावेसे वाटते की वाङ्मय आणि जीवन यांचा जर इतका अन्योन्यसंबंध असेल तर जरूर एक भाग म्हणून तो अभ्यास व्हावयास पाहिजे. शिवाय सांस्कृतिक विकासाबरोबर जर भाषेचा, लोकवाङ्मयाचा, अभिजात वाङ्मयाचा विकास होत असेल तर अशा प्रकारचा अभ्यास न्हावयास हवा असे म्हणणे योग्य होईलसे वाटते.

**समारोप -**

चाळीसगाव डांगाणी लोककथांचा वाङ्मयीन अभ्यास करताना अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. या कथा इतर ठिकाणच्या लोककथांपेक्षा काही वेगळ्या वाटतात. हे सर्वार्थाने खरे काय? या लोककथांचा वाङ्मयीन अभ्यास करावयाचा

म्हणजे व्यक्तिचित्रण, कथावस्तु, घटना, प्रसंग, संघर्षाच्या बाबतीतील तीव्रता वगैरे गोष्टींची चर्चा करता येईल काय? मग वाङ्मयीन चार्च करावयाची म्हणजे नेमके काय करावयाचे? या कथांचे वर्गीकरण करता येते का? ते करावयाचे असेल तर कोणते सूत्र लावता येईल? हे वर्गीकरण सशास्त्र होऊ शकेल काय? यातील कल्पनाबंध कोणते? ते इतरत्र आढळणाऱ्या कथांशी कितपत जुळतात? या कथांचे वेगळेपण नेमके कशात आहे? या कथांच्या संदर्भातील तात्विक चर्चा ही वास्तविक पाहाता सर्वच कथांना लागू पडते. या कथांच्या संदर्भात मुख्य कोणत्या घटकांचा विचार करावा लागतो? असे कितीतरी प्रश्न.

या प्रश्नांची शक्यतो चर्चा करण्याचा प्रयत्न झाला आहे. अर्थातच प्रबंधाच्या एकूणच विषयाच्या दृष्टीने या चर्चेला मिळालेले स्थान याचा विचार करात हे विवेचन स्थूल स्वरूपात आहे. हे निर्विवाद.

दुसरे म्हणजे कथा म्हटली (लोककथा) की त्यात वक्ता(निवेदक) आणि श्रोते हे घटक अत्यंत महत्त्वाचे वाटतात आणि त्यांच्याच संदर्भात ही चर्चा अधिक प्रमाणात केली आहे. कारण वाङ्मयीन पैलू हे मुख्यत्वेकरून त्याच ठिकाणी प्रकट झालेले असतात. त्यांच्या सान्निध्यात ती कथा उजळली जाते, त्यात नाविन्य भरते, ती परंपरेने सिद्ध होते.

चाळीसगाव डांगाण हे डोंगर शिखरांच्या कुशीत, औद्योगिक जगापासून दूर असल्याने ज्ञान आणि मनोरंजनाचे, कथा हे मुख्य साधना आहे. प्रचंड प्रमाणावर कथा येथे आढळतात. किती गोळा करात्रयात हा प्रश्नच पडतो. अर्थातच तारतम्याने प्रातिनिधिकत्वाने या कथा गोळा केल्या आहेत. ज्या कथांच्या आधाराने या प्रकरणातील पूर्ण विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे त्या सर्व कथा परिशिष्टात एकत्र केलेल्या आहेत.[२८] म्हणूनच उदाहरणे म्हणूनदेखील त्या संक्षेपाने चर्चेस घेतलेल्या नाहीत. परिशिष्टांचाच आधार दिलेला आहे.

कथांच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने अधिक विचार केलेला असला तरी काही विशिष्ट हेतू, अर्थात चर्चेला पूरक असा हेतू, मनात बाळगून त्याचे स्थूल वर्गीकरण विवेचनासाठी आधारभूत मानले असून परिशिष्टातील वर्गीकरण हे त्याप्रमाणेच केलेले आहे. एकंदर विवेचनावरून पुढीलप्रमाणे काही ठळक निष्कर्ष असे निष्कर्ष काढता येतील.



**काही ठळक निष्कर्ष –**

(१) लोककथांच्या वर्गीकरणाचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. असे दिसते.

(२) डॉ. प्रभाकर मांडे यांनी वर्गीकरणाचा आढावा घेऊन रचनेच्या दृष्टीने लोककथांचे वर्ग केलेले आहेत

(३) डांगाणी लोककथांचे अभ्यासाचे दृष्टीने– (१) अद्भुत कथा, (२) प्राणीकथा, (३) आख्यायिका, (४) दैवतकथा, (५) हास्यकथा, (६) संकीर्णकथा असे स्थूल वर्गीकरण केले आहे. तर आशयाचे दृष्टिकोनातून (१) दैवतकथा, (२) परिकथा किंवा अद्भुतकथा, (३) आख्यायिका, (४) बोधकथा, (५) नीतिकथा, (६) चातुर्यकथा, (७) हास्यकथा, (८) चोरकथा, (९) मयकथा, (१०) जातीकथा, (११) अनुभूतीकथा, (१२) संकीर्ण कथा असे वर्गीकरण केलेले आहे. या सर्वांचे केवळ तीन प्रकारात वर्गीकरण करता येणे शक्य आहे. (१) कल्पितकथा, (२) दैवतकथा आणि (३) अनुभूतीकथा.

(४) वरील अभ्यासाचे दृष्टीने केलेल्या वर्गीकरणातील प्रत्येक प्रकारात कोणते कल्पनाबंध आढळतात ते स्वतंत्रपणे सांगता येणे स्थूलपणे शक्य आहे.

(५) एकच कल्पनाबंध अनेक कथांमधून किंवा अनेक कल्पनाबंध एकाच कथेत अंतर्भूत असणे शक्य असते.

(६) लोककथांच्या मागे पुढीलप्रमाणे निरनिराळ्या प्रेरणा आढळतात. १) अद्भुताची प्रेरणा २) आत्मनिवेदन व प्रकटीकरण ३) स्पष्टीकरणात्मक भूमिका ४) श्रद्धा, कौटुंबिक जिव्हाळा ५) अनुभवांचे प्रसारण व संकलन ६) निषेधाची प्रेरणा ७) परंपराविषयी प्रेम, स्वाभिमान ८) सुरक्षिततेची प्रेरणा ९) नाविन्याचा अनुभव १०) निसर्गचक्रातील चक्रनेमीक्रमातून मिळालेली प्रेरणा इ.

(७) लोककथांमागे पुढील हेतू आढळतात १) मनोरंजन करणे २) ज्ञानार्जन, ज्ञानदान – कळतनकळत ३) स्पष्टीकरण ४) महिमाकथन ५) प्रौढपणाचे प्रदर्शन ६) भक्ती, प्रेम, आदर, भय यांचे प्रदर्शन.

(८) डांगाणी लोककथा भरपूर आहेत. कथा सांगणारे काही मोजकेच लोक गावात प्रसिद्ध असतात.

(९) लोककथांमध्ये स्थल, काल, यांचे दृष्टीने बदलते स्वरूप दिसले व त्यात अस्थिरता भासली तरी कल्पनाबंधाच्या दृष्टीने त्यात स्थैर्य असते.

(१०) स्थानिकव प्रादेशिक उल्लेखांमुळे तसेच भोवताली असलेल्या उंच पर्वतराजी व जंगल यांच्या वातावरणाच्या परिणामाने डांगाणी लोककथेत वेगळेपण आढळते.

(११) डांगाणी लोककथांचे वाङ्‌मयीन सौंदर्य पुढील गोष्टींच्या अभ्यासातून पाहाणे योग्य ठरते. (१) कथानिवेदक, कथनशैली व कथानिवेदन वेळ (२) कथानक – घटनामाला – संघर्ष (३) कथाबीज – कल्पनाबंध (४) वर्णनातील सुसंगती, स्थलवर्णन व संवाद, व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णन (५) ऐकणारे श्रोते.

(१२) कथानिवेदक, त्यांची शैली व कथनाची वेळ यावर कथेचे सौंदर्य अवलंबून असते. वेळेनुसार कथेत फरक होतो.

(१३) घटनासंख्या वाढविता वा कमी करता येते. कथेतील संघर्ष रंगणे हे कथावस्तूप्रमाणेच निवेदकावर देखील अवलंबून असते.

(१४) अनेक कथा या एकमेकींच्या पर्याय आहेत हे कल्पनाबंधावरून स्पष्ट होते. तसेच कल्पनाबंधावरून नैसर्गिक वातावरणाचादेखील अंदाज बांधता येतो.

(१५) कथानिवेदक श्रोत्यांच्या मनोविनोदार्थ व्यक्तिचित्रण, प्रसंगवर्णन, स्थूलवर्णन आणि संवादात्मकता रंगवितो तरी ही चारी अंगे वाखाणण्यासारखी वाटतात.

(१६) वर्णनात तोचतोचपणा, ग्राम्यता, निवेदकावरील अवलंबित्व, दुर्बोधता असे काही दोषही आढळतात.

(१७) सांकेतिकता थोडक्यात सांगण्याचे कसब, समयोचित वर्णन, समरसता, वाक्प्रचार व म्हणी यातून व्यक्त होणारी आशयघनता असे काही गुण देखी आढळतात.

(१८) कथांचा अभ्यास करताना निवेदक व श्रोते हे महत्त्वाचे घटक त्यात अंतर्भूत आहेत हे लक्षात घेऊनच अभ्यास करावा लागतो.

(१९) लोककथांचे इतर कलांमध्ये रूपांतर झाले असावे वा त्यातून इतर कला निपजल्या असाव्यात असे म्हणावेसे वाटते.

(२०) डांगाणी लोककथांचा अभ्यास करताना समाजशास्त्र, इतिहास, भौगोलिक पार्श्वभूमी, मानववंशशास्त्र, संस्कृती यांचा विचार करून करावयास हवा. त्या दृष्टिकोनातून अभ्यास होण्याची गरज आहे.



**संदर्भ –**


१. सरोजिनी बाबर, मराठी लोककथा, पुणे १९५०, प्र.आ.

२. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६२, प्र.आ.

३. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५.

४. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६२, प्र.आ.

५. तत्रैव, पृ. ११

६. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, ३०.

७. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृ. ४३ ते ४६.

८. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृ. ७३ ते ८१, प्र.आ.

९. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१०. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

११. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, पृ. २१९ ते २२२.

१२. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१३. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१४. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१५. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१६. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७८, प्र.आ.

१७. परिशिष्ट २, परिसरातील लोककथा.

१८. तत्रैव, प्राणीकथा, क्र. ८ व २.

१९. तत्रैव, अद्‌भुतकथा, क्र. ५ व ८.

२०. एक होता राजा, संपा–सरोजिनी बाबर, म. लोक सा. समिती, मुंबई.

२१. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.

२२. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा'.

२३. दुर्गा भागवत, 'लोकसाहित्याची रूपरेखा' मुं, म. ग्रंथसंग्रहालय, मुंबई २.

२४. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा'.

२५. परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा'.

२६. Gasetteer of India, Maharashtra state, Ahmednagar District, Second Edition (Revised), 1976.

२७. विश्वनाथ खैरे, 'द्रविड महाराष्ट्र', साधना प्रकाशन, पुणे १३.

२८ परिशिष्ट २, 'परिसरातील लोककथा'.

* * *



## प्रकरण आठवे

# चाळीसगाव डांगाण परिसर– भाषिक अभ्यास

**भाषिक अभ्यासाचे स्वरूप –**

येथे चाळीसगाव डांगाण परिसरातील बोलीचा स्थूल स्वरूपात भाषिक अभ्यास करावयाचा आहे. मॉडर्न लिंग्विस्टिकच्या दृष्टिकोनातून त्याकडे कृपया पाहू नये. या प्रबंधामध्ये वाङ्मयीन, सांस्कृतिक आणि भाषिक अभ्यास म्हणजे डांगाणी बोली व वाङ्मयाचा त्रिविध प्रकारचा अभ्यास करावयाचा असल्याने हा अभ्यास स्थूल स्वरूपात करणे क्रमप्राप्त आहे. वास्तविक हा प्रबंधाचा स्वतंत्र विषय होणे शक्य आहे. परंतु चाळीसगाव डांगाणातील भाषा ही मध्यवर्ती मराठीशी तशी फार दूरची नाही. त्यात मध्यवर्ती मराठीपेक्षा भिन्न अशी स्वतःची वैशिष्ट्ये आहेत. मध्यवर्ती मराठीची ती एक प्रादेशिक भाषा वाटते. दुसरी गोष्ट अशी की या परिसरात महादेव कोळी, ठाकर, तलवारकानडे, व हटकरकानडे, असे लोक राहातात. त्यातील हटकरकानड्यांची भाषा मराठी नाही. ती दक्षिणेकडील बोली आहे. तेव्हा तिचा येथे विचार करण्याचे कारण नाही. तिसरे म्हणजे या परिसरातील उपरोक्त लोकात महादेवकोळी लोक संख्येने सर्वात अधिक म्हणजे सुमारे ऐंशी टक्के आहेत. त्या खालोखाल तलवारकानडी व ठाकर लोक असून उर्वरित चारदोन टक्क्यात हटकरकानडे व अन्य लोक येतात. म्हणजे प्रामुख्याने अभ्यास करावयाचा तो महादेवकोळी लोकांच्या भाषेचा. ठाकरांची भाषा अन्य ठिकाणी जी ऐकावयास मिळते ती खरोखरीच भिन्न प्रकारची असते. तसे त्या भाषेचे स्वरूप येथे भिन्न नाही असे नाही. परंतु त्यावर महादेव कोळ्यांच्या भाषेचा परिणाम कमालीचा झाला आहे. त्यामुळे भाषिकदृष्ट्या पाहिले तर ठाकर व तलवारकानडे यांस महादेव

कोळी लोकांच्या तुलनेत आता फरक नाहीच. तरीदेखील त्यांचे भिन्न स्वरूप जे जाणवते ते येथे मांडण्याचा प्रयत्न आपण करू या.

**प्रचलित बोलीचा अभ्यास –**

भाषा ही जिवंत माणसांच्या विचारांचे आदानप्रदान करण्याचे एक साधन. अर्थात जिवंत माणसांच्या परंपरेबरोबरच ती परंपरागत होते असे होत असताना ती बदलत जाते हे निश्चित. म्हणूनच भाषेच्या बाबतीत आजी, आई, लेक अशी नाती किंवा क्रम लावता येतात. अशा प्रकारे परंपरेने भाषा म्हणजेच शब्दसंकेत चालत येत असताना त्यांच्यात निरनिराळ्या कारणाने स्वरूपात बदल घडतात.[1] ''भाषा, तिचा नाद, तिने व्यक्त केलेले विचार, तिची रचना हे सर्व जुन्या पिढीपासून नवी पिढी घेत असते.'' ''भाषा ही क्रमबद्ध वस्तू आहे. परंतु भाषा स्वच्छंदी आहे. परंपरेने संकेताने भाषेत शब्दांना प्रत्ययांना अर्थ येतात. चिकटतात, गळून पडतात, बदलतात. भाषा स्वच्छंदी आहे तिला कोणी बंधन घालू शकत नाही. जर कोणी बंधन घालण्याचा अगर आदेश देण्याचा प्रयत्न केला तर तो यशस्वी होईलच याची खात्री नाही. तशीच ती बोलणाऱ्यांच्या छंदाप्रमाणे वागणारी आहे. भाषेवर बंधन नसल्यामुळे ती जिवंत झऱ्याप्रमाणे प्रवाहिनी बनते आणि योग्य वाटेल त्या तऱ्हेने आपले जीवितकार्य पार पाडीत असते.''[2] एकूण भाषेचा अभ्यास करताना प्रश्न असा निर्माण होतो की हा अभ्यास कोणत्या काळातील करावयाचा. पुन्हा भाषा बदलत असताना अमुक ठिकाणी म्हणजे अमुक काळातील भाषेचे स्वरूप भिन्न असू शकेल. येथे मात्र अर्थातच वर्तमानकाळातील या परिसराच्या प्रचलित बोली भाषेचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास उपलब्ध होऊ शकलेल्या तेथील लोकवाङ्मयाच्या आधारे तसेच बोलीतील वाक्ये घेऊन करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे दोन गोष्टी संभवतात. एक परंपरागत चालत आलेली शब्दरूपे काही प्रमाणात येणार आणि दुसरे म्हणजे प्रचलित युगाचा ठसा त्यावर उमटलेला असणार. हेही निर्विवादच आहे. म्हणजे हा अभ्यास एकाच काळाचा व ठराविक भूप्रदेशाचा वर्णनात्मक भाषाशास्त्राच्या दृष्टीने होणार आहे.

**अभ्यासाची पद्धती –**

हा भाषिक अभ्यास करताना तो जास्त सशास्त्र व्हावा असा प्रयत्न केला आहे. या भाषेची पूर्ण मोड कळण्यासाठी ज्या ज्या म्हणून आवश्यक अशा गोष्टी असतील त्या सर्व करण्याचा प्रयत्न येथे करणार आहोत. मात्र मॉरफोलॉजिकल अभ्यासच.



प्रथम आपण नामे, विशेषणे, सर्वनामे व क्रियापदे यांचा अभ्यास करू. हे करीत असताना लिंग-वचन आणि विभक्ती यांचा विचार आलाच.

**नामे–**

**(अ) अकारान्त पुल्लिंगी नामे**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| लेक | लेकां | कोट | कोटां (कोट) |
| बाजार | बाजारां | पाझर | पाझरा |
| पदर | पदरा | बामण | बामणा (बामणं) |
| सूर्य | -- | चंद्र | -- |
| शेठ (सेठ) | शेठ (सेठ) सेठां | नाच | नाचा |
| पितांबर | पितांबरां | डवण | डवणां |
| हार | हारां | मांडव | (मांडव) मांडवा |
| चोर | चोरां | आऊत | आऊतां |
| वड | वडां | पोपट | पोपटां |
| पख | (पखं) पखा | पिंपळ | (पिंपळ) पिंपळा |
| मठ | मठां (मठ) | मंतर | मंत्रा |
| मुंगूस | मुंगसा | गैवर | गैवर |
| महाठक | महाठक | पलंग | पलंगाट |
| राग | राग | वानार (वांदार) | (वांदरा) (वानरं) (वानरां) |
| कान | (कान)काना | चिखल | चिखल |
| उंबर | उंबरा | ओहळ | ओहळ(ओहळां) |
| कुंभार | कुंभार (कुंभारां) | दात | दात (दातां) |
| दिर | (दिर) दिरां | दंड | (दंड) दंडा |
| जोहार | जोहार | मील | मीलां |
| खडक | खडक (खडकां) | भंडार | (भंडार) भंडारा |
| संत | संत | बाप | (बाप) बापां |
| साहेब | साहेबां | पाऊस | पाऊस |
| चाबूक | (चाबूक) चाबकां | जीव | जीव |
| झरतमुडात | झरतमुडातां | उमातर (उमाचा) | (उमात्रं) उमतरा |
| आहार | आहार | सुतार | (सुतार) सुतारां |
| गंज | गंज | डोह | डोहा |

| | | | |
|---|---|---|---|
| दिस | दिसां | फोड | (फोड) फोडां |
| रोज | रोज | उंदीर | उंदरा |
| घाम | घाम | बैल | (बैल) बैलां |
| न्याय | न्याय | वंश | वंश |
| मोर | मोरां | गड | गड |
| शब्द (शबुद) | (शब्द) शब्दां | मोहन | -- |
| शेयीर | (शयीरां) शेयीरां | गाबूड (गाबडू) | गाबडां |
| पगार | पगार | माळ | (माळ) माळां |
| नांगर | नांगरा | सड | सडा (सडं) |
| बाजीबंद | बाजीबंदा | भांग | भांगट |
| खांब | खांबा | दरबारा | दरबारां |
| पुत्र | पुत्रा | चैत | चैता |
| बोंड | बेंडा (बोंडा) | सावकार | सावकारा (सावकार) |
| गुजर | गुजरा (गुजर) | दैत्य | दैत्या (दैतां) |
| वाघ | वाघा (वाघ) | पहिलवान | पहिलवाना (पहिलवाना) |
| गोसाय | गोसाई | करप | करपा |
| साग | साग | अळीव | अळीवां |
| महारूक | महारूकां | खैर | खैरां |
| कावीत | कावीतां | टीक | टीकां |
| अळींद | अळींदा | मुक्काम | मुक्काम |
| हात | हातां(हात) | किसनदेव | -- |
| निवद | निवदा | मार्ग | मार्ग (मार्गा) |
| नामदेव | -- | नारळ | नारळां (नारळ) |
| नवर | नवरं | व्यापार | व्यापारां |
| भरतार | भरतारां (भरतार) | येताळ | येताळां (येताळ) |
| सर्प | सर्पा (सर्प) | नवस | नवस(नवसा) |
| डोंगर | डोंगरा | देव | देव |
| गेळ (गेठळा) | गेळा (गेळे) | भुस्कुट | भुस्कुटां |
| वरस | वरसां | गुलमोहर | गुलमोहरां |
| निंब | निंब (निंबा) | मोह | मोहां |
| चादाण (चांदा) | चांदणा | साईल | साईला |



(१) उपरोक्त अकारान्त पुल्लिंगी नामांपैकी नव्वद नामे अनेकवचनी होताना आकारान्त होतात. त्यांची आकारान्त रूपे वैकल्पिक स्वरूपात आढळतात. ती वर कंसात दिलीच आहेत. परंतु अकारान्त पुल्लिंगी नामांचे अनेक वचन होताना नामे अकारान्त होतात असे दिसते.

(२) वरील अकारान्त पुल्लिंगी नामांपैकी एकवीस नामे अनेकवचनी होताना देखील अकारान्त राहिली आहेत. त्यात बारा नामे न मोजता येण्याजोगी अशी आहेत. म्हणजे न मोजता येण्याजोग्या वस्तूंची नामे अनेकवचनी होताना अकारान्त राहतात. अन्य नामे वरीलपैकी वैकल्पिक असावीत

(३) विशेष नामांचे अनेकवचन करण्याची पद्धत नाही.

(४) अनेकवचनी नामे होताना त्याचे आकारान्त रूप होते. त्यावेळी जो उच्चार होतो तो अनुच्चारित अनुस्वारांसारखा असते म्हणून तो दिला आहे.

(५) उपरोक्त नामे म्हणजे भाषेतील संपूर्ण नामांचे भांडार नव्हे तर या प्रबंधात समाविष्ट होणाऱ्या अलिखित वाङ्मयात जे कोठेना कोठे आले आहे अशीच नामे प्रातिनिधिक स्वरुपात घेतली आहेत. वर जवळजवळ एकशेपंधरा नामे दिली आहेत.

**(ब) अकारान्त स्त्रीलिंगी नामे–**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| पपय | पपया |
| तुळस | तुळसी (तुळसा) |
| पेंद | पेंदा |
| भीक | भीक (भीका) |
| भेट | भेटी (भेटा) |
| गाठ | गाठी (गाठां) |
| पंगत | पंगती |
| अंघुळ | अंघुळी |
| एस | एसा (एशी) |
| चापट | चापट्या (चापटी) (चापटां) |
| राक्षशीन | राक्षशीनी (राक्षशीनां) |
| जांबळ | जांबळा |
| इहिर | इहिरी (इहिरा) |

| | |
|---|---|
| चांडलीन | चांडलनी |
| खीर | खीरां |
| मांजर | मांजरी (मांजरा) |
| करंज | करंजी |
| खेकड | खेकडी (खेकडा) (खेकड्या) |
| लाथ | लाथा |
| बाज | बाजा |
| म्हैस (म्हस) | म्हैसा (म्हशी) (मसा) (मशी) |
| वेसण | वेसणी (वेसणां) |
| बहीन | बहीनी |
| कास | कासां |
| कुटीन | कुटीना |
| खूण | खुणा |
| साल | साली |
| वाट | वाटा |
| टांग | टांगा |
| बाग | बागां |
| हरणं | हरणां |
| रात | राती (रात्रां) |
| नात | नाती (नातां) |
| भानगड | भानगडी |
| हकीगत | हकीगती |
| नदर | नदरां (नद्रा) |
| बोर | बोरां |
| रास | राशी |
| कड | कडा |
| सुसर | सुसरी (सुसरां) |
| घागर | घागरां (घागरीं) |
| एकादस | एकादशी (एकादसा) (एकादश्या) |
| पाभर | पाभरां (पाभरी) |
| भीत | भीती |



| | |
|---|---|
| भावजय | भावजया (भावजयी) |
| जमीन (जमीन) | जमीनीं (जमीली) |
| टीप | टीपा |
| भोकर | भोकरां |
| तार | तारा |
| शेप | शेपटी (शेपां) |
| साक्ष | साक्षा (साक्षी) |
| भाकर | भाकरीं (भाकऱ्यां) |
| दावन | दावनी |
| वळक (वळकी) | वळक्या (वळकी) (वळका) |
| कोथंबीर | कोथंबीर (कोथंबिरी) |
| भुरसड | भुरसडा (भुरसडी) |
| नार (नारी) | नारी |
| हरळ | हरळी (हरळा) |
| निर्गुडी | निर्गुडा (निर्गुडी) |
| कवठा (कवठ) | कवठा |
| पिंपर (पिपर) | पिपरी (पिंपरा) |
| भोयन | भोयना |
| मोटर | मोटरी |
| माळ | माळी |
| डाळ | डाळी |
| शाल | शाली (शालां) |
| बाभूळ | बाभळी (बाभूळ) |
| लेक | लेकी |
| खारीक | खारका (खारीक) |
| नथ | नथवा (नथा) (नथी) |
| वटपुनव | वटपुनवा |
| खेप | खेपा |
| सून | सुना |
| मोदळ | मोदळा |
| चिल्लार | चिल्वार |

| | |
|---|---|
| सिताफळा | सिताफळ |
| पाईर | पायरा |
| धामण | धामणा |

(१) अकारान्त स्त्रिलिंगी नामांपैकी वरील एकावन्न नावे अनेकवचनी होताना आकारान्त होतात. परंतु विकल्पाने त्यांची ईकारान्त रूपे काही वेळा आढळतात.

(२) अकारान्त स्त्रीलिंगी नामांपैकी वर निर्दिष्ट केलेली चोवीस नामे अनेकवचन होताना ईकारान्त होतात. परंतु ही नामेदेखील विकल्पाने आकारान्त होताना आढळतात.

(३) क्वचित काही नामे अकारान्त रूप बदलत नाहीत असे दिसते.

(४) स्त्रीलिंगी नामांच्या बाबतीत अनेकवचने करताना थोडासा गोंधळच उडालेला दिसतो.

**(१) अकारान्त नपुंसकलिंगी नामे–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| ठिगाळ | ठिगळं (ठिगळां) | शिवार | शिवारा |
| शीत | शीतां | दान | दान |
| गंध | गंध | लोटांगण | लोटांगणा |
| गंगन (गंगान) (गगान) | -- | जीन | जीना |
| फुल | फुलां | डांगर | डांगरां |
| पुस्तक (बुक) | पुस्तकां (बुकां) | मांजार | मांजरां |
| दरबार | दरबारां | आड | आंड (आडा) |
| सुपाट | सुपाटां | वर्स (वरस) | वरसां |
| तोंड | तोंडां (तोंडं) | शात | शातं |
| पाल | पाली (पालां) | भात | भातं |
| टाळ | टाळां | बाळ | बाळं (बाळां) |
| शिलंगण | शिलंगणा | ताट | ताटां |
| रंगाण | रंगाणां | मूळ | मूळां |
| दार | दारां | कुंड | कुंडा |
| घर | घरां (घरं) | सराण | सरणा (सराणं) |
| ईख | ईखां | गाडग (गाडगा) | गाडगी (गाडगां) |



| | | | |
|---|---|---|---|
| झाड | झाडां (झाडं) | कणस (कणीस) | कणसा (कणसां) (कणसं) |
| सरपन | सरपन | भुयार | भुयारां |
| धड | धडां | सीर | सीरां |
| अमृत | अमृत | घासत्याल | घासत्याल |
| सैन्य | सैन्य | मेण | मेण |
| पान | पाना | खोड | खोडां (खोडं) |
| असवल | अस्वला (अस्वली) | शेपूट | शेपटा (शेपटी) |
| | | | (शेपट्या) (शेपटं) |
| घोळख | घोळखं (घोळखे) | विमाईन | विमाईना |
| ईमाईन | ईमाईना | ईवाईन | ईवाईना |
| कास | कास | मांड | मांडा |
| मांडी | मांडं | घर | घरां |
| डुकर (डुकार) | डुकरां | थारुळ | थारुळा |
| तीतुर | तीतरा | अंड (अंडा) | (अंडीं) |
| | | | (अंडा) (अंडी) |
| वन | वन | सपान | सपनां (सप्नं) |
| गठुड (गथुडा) | गठुडां (गठुडी) | जीवन | जीवन |
| मरन | मरनं | मन | मनां |
| पीस | पीसा | हरन | हरनां |
| मावस | मावस | | ठिकाणठिकाणां |
| धाव | धावां | काम | कामं (कामा) |
| उखळ | उखळा (उखळी) | बक्षीस | बक्षीसा (बक्षीसं) |
| वैकुंठ | वैकुंठ | मोघाड | मोघाडं(मोघाडां) |
| ढोलक (ढोलकी) | ढोलक्या (ढोलकीं) (ढोलक्यां) | | |
| हाटेल | हाट्याला (हाटली) (हाटलां) | | |
| सिंग | सिंगा | उर | उरा |
| वारूळ | वारूळा | शान | शान |
| पक | पकां | अंग | अंगा |
| ऊन | ऊन, ऊन्हा | दूध | दूध, दूधा |
| ठाणं | ठाणां | वरड (वऱ्हाड) | (वराडां) वऱ्हाडां |
| लगीन | लग्ना (लगीन) | रावूळ | रावूळां (रावळां) |

| | | | |
|---|---|---|---|
| अन्न | अन्न | सत्व | सत्व (सत्वां) |
| अंगण (अंगाण) | आंगणा | जोड | जोडं |
| रेशम (रेशीम) | रेशम (रेशमां) | दर्शन (दरशन) | दर्शन (दर्शना) |
| देऊळ | देवळां (देवळं) | बोट | बोटां |
| मन | मनां | तुपां | तुपां (तुपं) |
| पाताळ | पातळां | भोजन | भोजनां (भोजनं) |
| गोपीगान | गोपीगान | भक्त | भक्तां |
| वाळूक | वाळकां | सिंद | सिंदा |
| घुंगरू | घुंगरां | दळण | दळणां |
| रान | रानां | (ठाणा) | ठाणां |
| मानिक (माणिक) | मानकां (माणकां) | जुंदर | -- |
| लाकूड | लाकडे लाकडां | पोट (प्वाट) | पोटां (प्वाटां) |
| काकन | काकना | गाढव | गाढवां |
| नाक | नाकां (नाकं) | वडन्यार | -- |
| केस | केसां (केस) | पाय | पाय |
| जन | जन | रूप | रूपां (रूप) |
| जेवण | जेवणां | लष्कर | लष्कर |
| अपीगान | अपीगान | पानकणीस | पानकणीसां (पानकणसां) |
| टरबुज | टरबुजा | आंबळ | आंवळां |

(१) वर निर्देशिलेली अकारान्त नपुसकलिंगी नावापैकी सत्यांशी नावे अनेकवचनी होताना आकारान्त होताना आढळतात. परंतु काही विकल्पाने अकारान्त राहातात. परंतु एकारान्त अगदीच क्वचित होताना दिसतात. त्यावर अनुच्चारित अनुस्वार येतो.

(२) उपरिनिर्दिष्ट अकारान्त नपुसकलिंगी नामांपैकी बत्तीस नामें अकारान्तच राहिलेली आढळतात. व त्यावर अनुच्चारित अनुस्वार येताना दिसतो.

(३) असे असले तरी विकल्पाने ती आकारान्त होतात.

(४) न मोजता येण्याजोगी (Uncountable) नामे यात अधिक आहेत.

(५) उपरिनिर्दिष्ट नामांपैकी फारच थोडी नामे ईकारान्त होताना आढळतात.



**(ड) आकारान्त पुल्लिंगी नामे**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| बंगला | बंगलं | लुगडा | लुगडं (लुगडी) |
| तबला | तबलं | रुसवा | रुसवा |
| दऱ्याा | दऱ्याा | गोळा | गोळं |
| मासा | मासं | खडा | खडं |
| महिना | महिनं | घोडा | घोडं |
| तांब्या | तांबे, तांबं | काताडां | कातडी, कातडं, काताडं |
| कासोटा | कासोटं | हिरा | हिरं |
| धुळवडा | -- | दागिना | दागिनं |
| आजा | आजं | बगा | बगं |
| मुडदा | मुडदं | पिंजरा | पिंजरं |
| दादा | दादां | मुंडका | मुंडकं (मुंडकी) |
| घोंघारा | घोंगार | पोऱ्या (पऱ्या) | पोरं (पोरा) |
| पोता | पोती, पोतं | कावळा | कावळं |
| ठनका | ठनकं | चिमकुडां | चिमकुडं, चिमकोडं |
| डिंगऱ्या (डिंगरी) | डिंगऱ्या | कुरकुला | कुरकुलं |
| काटा | काटं | टिकला | टिकलं |
| गजरा | गजरं | काना (कान्हा) | -- |
| खिचा | खिचं | सोगा | सोगं |
| गायखा | गायखं | काकडा | काकडं |
| बावटा | बावटं | सोना | सोनं, सोना |
| वाळा | वाळा | मळा | मळं |
| दिवा | दिवं | गेंदबा | -- |
| चुडा | चुडं | तोडा | तोडं |
| येवला | -- | पाळणा | पाळणं |
| सासरा | सासरं | खोबरा | खोबरा |
| धक्का | धक्कं | बोचा | बोचं, बोची |
| मासा | मासं | कोल्हा | कोल्हं |

| | | | |
|---|---|---|---|
| ढुमक्यावाला | ढुमक्यावालं | वस्तरां | वस्तारं |
| खांदा | खांदं | पाला | पालं |
| वारा | वारं, वारा | खुरपा | खुरपं (खुरपी) |
| जोडा | जोडं | झोपाटा | झोपाटं, झोपाटा |
| टेला | टेलं | विठ्या | -- |
| तडा | तडं | वाळा | वाळं |
| गळा | गळं | पैका | पैकं |
| पवा | पवं | बोळा | बोळं |
| धोपा (धोप) | धोपा, धोपं | उतारा | उतारा |
| बस्ता | बस्तं | रस्ता | रस्तं |
| भाया | भायं | नवरा | नवरं |
| मामा | मामे | धंदा | धंदं |
| सौदा | सौदं | कासरा | कासरं |
| मेवना (मेव्हना) | मेव्हनं | महिना | महिनं |
| बाबा | बाबा, बाबं | राजा | राजं |
| आंबा | आंबे | बदडा (बडधा) | बडधं, बदडा |
| वावळां | वावळं | बिबवा | बिबवं |
| चाफा | चाफं | पांगारा | पांगारा, पांगारं |
| हिर्डा | हिर्डं | बाहवा | बाहावं, बाहवा |
| यला | यलं | गोंडा | गोंडं |
| मसराजा | -- | फेटा | फेटं |
| गोविंदा | -- | बुवा | बुवं, बुवा |
| सखा | सखा सखं | कवला | कवला |
| कन्हेरा | कन्हेरां कन्हेऱ्या | रिठा | रिठें |
| एहळा | एहळें | आंबाडा | आंबाडं |
| अर्जुनासादडा | अर्जुनसादाडं | (सौदंड) सादडा | (सौदडा) सादाडं |
| आपटा | आपटं, आपटा | धावडा | धावडं (धावडा) |
| पंजा | पंजं | | |

(१) उपरोक्त आकारान्त पुल्लिंगी नामांपैकी पंचाण्णव नामे अनेकवचनी होताना अकारान्त होऊन अनुच्चारित अनुस्वार येताना आढळतो. विकल्पाने काही



नामे इकारान्त किंवा आकारान्त होताना किंवा राहताना आढळतात.

(२) उपरोक्त आकारान्त पुल्लिंगी नामांपैकी पंधरा नामे आकारान्तच राहिलेली आढळतात. त्यातही विकल्पाने काही आकारान्त झालेली देखील आढळतात. परंतु मुख्यत्वेकरून न मोजता येण्याजोग्या नामांचा त्यात अधिक भरणा आहे.

**(इ) आकारान्त स्त्रीलिंगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| दुनिया | दुनिया | पताका | पताकी |
| लजा | लजा | जागा | जागां |
| हारका | हारका | साया | साया |
| कपिला | -- | पतिवर्ता | पतिवर्ता |
| मैना | मैना | सरजा | -- |
| सेवा | सेवा | चिरका | चरिका |
| इद्या | इद्या | बया | बया |
| शिळा | शिळा | ढोला | ढोल्या,ढोली |
| कथा | कथा | आकाजा | -- |
| चंद्रभागा | -- | दिशा | दिशा |
| राधिका | -- | माळसा | -- |
| खाजा | खाजा | | |

(१) उपरोक्त आकारान्त स्त्रीलिंगी नामांपैकी १५ नामे अनेकवचनी होताना रूपे बदलत नाहीत असे आढळते.

(२) वरीपैकी सहा नामे आकारान्त स्त्रीलिंगी विशेषनामे असून त्यांची अनेकवचने झालेली नाहीत.

(३) एक नाम अनेकवचनात रूपांतरीत होताना इकारान्त झाले.

**(फ) आकारान्त नपुसकलिंगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| शिका | शिक | चित्रा (चितार) | चित्रां |
| सड्या | सड्या | घाणा | घाणा |
| हारडा | हारडां | | |

(१) आकारान्त नपुसक नामांची संख्या या भाषेत कमी आहे असे दिसते.

(२) उपरोक्त नामांपैकी घाणा, चित्रा, शिका ही नामे नपुसकलिंगी असून हारडा, सड्या ही नामे सर्वलिंगात वरील स्वरूपात वापरताना आढळतात.

(३) एकंदरित आकारान्त नपुसकलिंगी नामाच्या बाबतीत सुव्यवस्थितपणा नाही.

(४) आकारान्त नामे ही बहुदा पुल्लिंगी स्वरूपातच वापरली जातात असे दिसते.

**(य) इकारान्त स्त्रीलींगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| एकादशी | एकादशा | झांजरी | झांजऱ्या |
| होळी | होळ्या | लबाडी | लबाड्या |
| धरती | -- | पळशी | पळसा, पळशी |
| दाढी | दाढ्या | जवारी | जवारी |
| फांदी | फांद्या | कढई | कढया |
| पेटी | पेट्या | दिंडी | दिंड्या |
| शेणी | शेण्या | रुई | रुया |
| कळसाई | -- | धुणी | धुणा |
| चोंढी | चोंढ्या | फजिती | फजिती |
| पारंबी | पारंब्या | उदबत्ती | उदबत्त्या |
| मोळी | मोळ्या | मांडी | मांड्या |
| नाणी–न्हाणी | न्हाण्या, न्हाणी | कुपी | कुप्या |
| कामगिरी | कामगिऱ्या | मिरची | मिरच्या |
| चिमनी | चिमन्या | दिवानी | दिवान्या |
| म्हातारी | म्हाताऱ्या | लंगोटी | लंगोट्या |
| कुपाटी | कुपाटी | घोंगडी | घोंगड्या |
| बाई | बाया | फळी | फळ्या |
| भाची | भाच्या | कुशी | कुशी, कुसवा |
| चोळी | चोळ्या | शिंगी | शिंग्या, शिंगी |
| कुळी | कुळ्या | मुघडी | मुघड्या |
| गरदी | गरद्या | तयारी | तयाऱ्या, तयारी |
| कायेरी | -- | छडी | छड्या |
| विक्ती | विक्त्या | थाळी | थाळ्या |
| दासी | दासी | झोपडी | झोपड्या |
| शेंडी | शेंड्या | दाळमी | दाळम्या |
| मुळी | मुळ्या | मोती | मोती |
| कामटी | कामट्या | आळी | आळ्या |
| येणी | येण्या | चांदणी | चांदण्या |
| जाळी | जाळ्या | माडी | माड्या |
| फांटी | फांट्या | वावडी | वावड्या |
| मुंगी | मुंग्या | शेळी | शेळ्या |
| फुगडी | फुगड्या, फुगडी | बंडी | बंड्या |
| आखाडी | आखड्या | काठी | काठ्या |
| टोपी | टोप्या | तवली | तवल्या |
| गुडी | गुड्या | ओंबी | ओंब्या |
| बेडी | बेड्या | काकी | काकी |
| बोंडबाळी | बोंडबाळ्या | मुलगी | मुली |
| नगरी | नगऱ्या | भोळी | भोळ्या |
| दंडनाळी | दंडनाळ्या | एकसरी | एकसऱ्या |
| खाशी | खाश्या | रानी | रान्या |
| कवळी | कवळ्या | चत्रशिंगी | -- |
| गादी | गाद्या | पोळी | पोळ्या |
| खोली | खोल्या | राईबाई | -- |
| अंबाबाई | -- | बरकी | बरकी |
| काकडी | काकड्या | सुफली | सुफली |
| पांढरी | पांढऱ्या | झोंबी | झोंब्या |
| दिवाळी | दिवाळ्या | डोकी (डोका) | डोकी |
| कडी | कड्या | झळी | झळ्या |
| चिंचपेटी | चिंचपेट्या | मानाली | -- |
| अस्तरी | अस्तुरी, अस्तरी | सईबाई | -- |
| वरमायी | वरमाया | नई नैती | नईनैता |
| आई | आया | लाडी | लाड्या |

| | | | |
|---|---|---|---|
| देवळी | देवळ्या | पायरी | पायऱ्या |
| मेव्हणी | मेव्हण्या | नदी | नद्या |
| जाईबाई | -- | निंबाबाई | -- |
| चाई | चाया | आरती | आरत्या |
| गोळी | गोळ्या | भेंडी | भेंड्या (भेंडी) |

(१) इकारान्त स्त्रीलिंगी नव्वद नामे अनेकवचनी होताना आकारान्त झालेली आढळतात. इकारान्त स्त्रीनामे अनेकवचनी करताना याकारान्त करण्याकडेच कल दिसतो. अनेकवचन होता अन्त्य इ चा य होतो व आ लागतो.(२) उपरोक्त केवळ १४ इकारान्त स्त्रीलिंगी नामे आपली रूपे अनेकवचनी होताना तशीच ठेवताना आढळतात. परंतु त्यातही विकल्पाने आकारान्त होतातच.

(३) विशेषनामांचे अनेकवचन करीत नाहीत.

(४) वरील केवळ दोन नावे अनेकवचनी होताना आकारान्त झालेली आढळतात.

**(र) ईकारान्त पुल्लींगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| बरम्हचारी | बरम्हचारी | शेतकरी | शेतकरी |
| नाही (नायी) | नाही (नायी) | जोगी | जोगी |
| ढोलकरी | ढोलकरी | कोळी | कोळी |
| मोती | मोती | लक्षपती | लक्षपती |
| औतकरी | औतकरी | फासपारधी | फासपारधी |
| गवळी | गवळी | सूरकरी | सूरकरू |
| वैरी | वैरी | टाकारी | टाकारी |
| दाजी | दाजी | मारवती | -- |

(१) येथे फक्त १४ नावे ईकारान्त पुल्लिंगी आढळली. इकारान्त स्त्रीलिंगी नामाच्या तुलनेत पुल्लिंगी नामे अगदीच कमी आहेत.

(२) ईकारान्त पुल्लिंगी नामे अनेकवचनी होता ईकारान्तच राहतात. असे वरील १४ नामांवरून दिसते.

(३) विशेषनामे अनेकवचनी होत नाहीत.



**(ल) ईकारान्त नपुसकलिंगी नामे :–**

| **एकवचनी** | **अनेकवचनी** |
|---|---|
| पानी | पानी |

(१) उपरोक्त एकच ईकारान्त नपुसकलिंगी नाम आढळते.

(२) अनेकवचनी होताना ईकारान्तच राहतात.

**(व) ऊकारान्त पुल्लींगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| लाडू | लाडू | विंचू | विंचू |
| वाघू | वाघ, वाघां | साधु | साधूं |
| पेरू | पेरूं | जंतु | जंतू |
| वेळू | वेळू | ताकू | ताकूं |
| बंधु | बंधु | | |

(१) वरील ऊकारान्त पुल्लिंगी ८ नामे अनेकवचनी होताना ऊकारान्तच राहतात.

(२) वाघू या नामाचे अनेकवचन वैकल्पिक आहे.

(३) अनेकवचनी रूपांवर अनुच्चारित अनुस्वार येतो.

**(श) ऊकारान्त स्त्रीलींगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| लवू | लवू, लवा | बायकु | बायका |
| आवू | आवा | सासु | सासवा |
| आबरू | आबरू | येनू | येना |

(१) उपरोक्त उकारान्त स्त्रीलिंगी ४ नामे अनेकवचनी होताना आकारान्त होतात.

(२) आबरू सारखे एखादे नाम वैकल्पिक रूप धारण करते.

(३) विशेषनामाचे अनेकवचन होत नाही.

**(स) ऊकारान्त नपुसकलिंगी नामे :–**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| पिलू | पिलां | बकरू | बकरां |
| पाखरू | पाखरां | वासरू | वासरां |

उपरोक्त ऊकारान्त नपुसकलिंगी चार नामे अनेकवचनी होताना आकारान्त होऊन त्यावर अनुच्चारित अनुस्वार येतो.

आत्तापर्यंत एकशे अकरा अकारान्त पुल्लिंगी नामे, पंचाहत्तर आकारान्त स्त्रीलिंगी नामे, एकशे नऊ अकारान्त नपुसकलिंगी नाम, एकशे दहा आकारान्त पुल्लिंगी नामे, आकारान्त स्त्रीलिंगी नामे एकोणावीस, आकारान्त नपुसकलिंगी नामे सहा, एकशेदहा ईकारान्त स्त्रिलिंगी नामे, ईकारान्त पुल्लिंगी नामे चौदा, ऊकारान्त पुल्लिंगी नामे नऊ, ऊकारान्त स्त्रीलिंगी नामे सहा आणि ऊकारान्त नपुसकलिंगी नामे चार अशी सुमारे पाचशे पंचाहत्तर नामे येथे उदाहरणे म्हणून दिली आहेत.

याशिवाय पुढील नामे थोडी विशिष्ट स्वरूपात प्रचलित आढळतात. ती उदाहरणादाखल मांडूया.

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| मूल (पु. : न.) | मूलां, मुलगे |
| कुत्रा : कुत्र (पु. : स्त्री. : न.) | कुत्री |
| खंडार (स्त्री. : न.) | खंडारी, खंडारां |
| नाव (पु. : न.) | नावां |
| खुरासनी (पु. : स्त्री.) | खुरासन्या |
| पाणी (पु. : न.) | पाणी |
| शिंगरू (पु. : न.) | शिंगरां |
| माजली, मजली, मजला (पु. : स्त्री.) | मजल्या |

येथे नामाची अनेकवचने होताना आत्तापर्यंत अनेकवचनांच्या बाबतीत जे संकेत आढळले, ते येथेदेखील आढळतात.

वर दिलेली किंवा आलेली नामे ही केवळ उदाहरणस्वरूप आहेत. तसे शब्दभांडार मोठे असून सर्वच नामांचा विचार करणे शक्य होणार नाही.

वर प्रत्येकप्रकारच्या नामांची संख्या अशा करता दिली आहे की त्यावरून नामांचे प्रमाण समजण्यास मदत होईल.

**सर्वनामे :–**

**अ) पुरुषवाचकसर्वनामे :–**

(१) प्रथम पुरुष एकवचन मी, म्या, आपुन
अनेकवचन आमी, आम्ह्या, आम्ही, आपण, आपुन

(२) द्वितिय पुरुष एकवचन तू, त्या
अनेकवचन तुमी, तुम्ही

(३) तृतीय पुरुष एकवचन तो, त्या, ते, ती, हा, ह्या, ह्यो, ही, ई, हे
अनेकवचन त्या, त्ये, ह्या, या

या सर्वांची विभक्ती प्रत्ययांत रूपे खाली देण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रथम पुरुष**

तिन्ही लिंगी तिच रूपे असल्यामुळे ती स्वतंत्र दाखविली नाहीत.

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | मी, म्या, आपण | आमी, आम्ही, आपण, आपुन, आम्ह्या |
| द्वितिया | मला, आपनाला | आमाली, आम्हाली, आमाला, आपनाला |
| तृतीया | म्या, मी, आपन, आपण | आमी, आम्ही, आपण, आपुनी |
| चतुर्थी | मला, आपनाला | आपल्याली, आमाली, आपणाली, आमाला, आम्हाली |
| पंचमी | आपणापून, म्हयाकून, म्हयापासून, म्हयापून | आपनाकून, आमापून, आमापासून |
| षष्ठी | म्हवा, म्हयावाला, म्हयी, माझा, मरा, माजवाला, मयी, मवा, म्हया, मना, मयावालं, आपनावालं | आमचं, आमचा, आमचं, आमजा, आमची, आपनाची |
| सप्तमी | मयजवळ, मयाप, माझाक, माझ्याप, आपनाक, मयापाशी, आपपनाप | अमाप, आम्हाप, आपनाक, आम्हाजवळ, आमापाशी, आमाशी, आपनाशी |

**द्वितीयपुरुष**

तिनही लिंगी तीच रूपे असल्यामुळे ती स्वतंत्र दाखविली नाहीत. वरीलप्रमाणेच मांडणी केली आहेत.

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | तू, त्वा | तुमी, तुम्ही |
| द्वितिया | तुला | तुमाली, तुम्हाली, तुमाला |

| | | |
|---|---|---|
| तृतीया | त्वा, तू | तुमी, तुम्ही |
| चतुर्थी | तुला, तुजला | तुमाली, तुम्हाला, तुम्हाली |
| पंचमी | तुह्याकून, तुह्यापासून | तुमापून, तुम्हापून, तुम्हापासून |
| षष्ठी | तुम्हा, तुझ्या, तुझी, तुझा,<br>तुह्ये, तुझे, तुही | तुमचा, तुमची, तुमचा, तुमचं |
| सप्तमी | तुह्याक, तुह्याकडं,<br>तुह्याप, तुह्याजवळ | तुमाप, तुमाक, तुमाकडं, तुम्हाकडं,<br>तुमाजवळ, तुम्हावं |

**तृतीयपुरुष**

तिन्ही लिंगी रूपे भिन्न भिन्न होतात. पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी या क्रमाने प्रत्येक विभक्तीची रूपे देण्याचा प्रयत्न केला आहे.

| **विभक्ती** | **लिंग** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| प्रथमा | पु. | तो, त्या, हा, ह्या | ते, त्या, ह्या |
| स्त्री. | ती, ही | त्या, ह्या | |
| | न. | ते, हे, त्या | ते, त्या, ह्या |
| द्वितिया | पु. | तेला, त्याला,<br>ह्याला, हेला | त्यांला, त्याली,<br>त्यांनतली, ह्याली |
| स्त्री. | तिला, हिला | | त्याला, त्याली, त्यानली,<br>ह्यांली, ह्यांला |
| न. | तेला, हेला, | त्याला, ह्याला | तेंली, त्यांला, त्यांली,<br>ह्यांली |
| तृतीय | पु. | त्याना, ह्याना,<br>त्यानी, ह्यानी | त्यांनी, यांनी |
| स्त्री. | तीना, तिने, हीना | | त्यांनी, ह्यांनी |
| न. | तेनी, त्यानी, ह्यानी | | त्यांनी, तेनी, ह्यांनी |
| चतुर्थी | पु. | त्याली, त्येला,<br>ह्याला, ह्याली, ह्यासी | त्यांली, त्यानली, ह्यांली,<br>ह्यांला, त्यांला |
| स्त्री. | तिला, हिला | | त्यांली, ह्यांली, त्यानली,<br>ह्यांला, त्यांला |
| न. | त्येला, यायी, हेला | | त्यांली, त्याला, ह्यांली,<br>ह्यांला |
| पंचमी | पु. | त्यापून, त्याच्यापुन,<br>त्याच्यापासून, ह्यांपून | त्यांच्यापासून, त्यांच्यापुन,<br>त्यांपून, ह्यांपून |
| स्त्री. | तीपुन, तिच्यापून, | हीपुन, हिच्यापुन,<br>तिच्यापासून, हिच्यापासून | त्यांच्यापासून,<br>ह्यांच्यापासून,<br>ह्यांच्यापासून, ह्यांपून,<br>त्यांपून |
| न. | तेच्यापुन, हेच्यापून, | तेच्यापासून हेच्यापासून | त्येंच्यापून, ह्यांच्यापून,<br>त्येंच्यापासून, ह्येंच्यापासून,<br>त्यांच्यापासून |
| षष्ठी | पु. | त्याचा, त्याची, त्याचं,<br>ह्याचा, ह्याचं, ह्यावला,<br>त्यावालं, त्याच्यावालं,<br>ह्याच्यावालं | त्यांचा, त्यांची, त्यांचं,<br>ह्यांचा, ह्यांची, ह्यांचं,<br>ह्यांच्यावला, ह्याच्यावालं,<br>त्यांवालं, त्यांच्यावालं |
| स्त्री | तिचा, तिची, तिचं, | हिचा, हिची, हिचं,<br>हिच्यावालं, हिच्यावालं,<br>तिच्यावालं, तिह्यावालं | त्यांच्यावालं, ह्यांच्यावालं,<br>त्यावालं, ह्यावलं, ह्यांचा,<br>त्यांचा, त्यांची, त्यांचं,<br>ह्यांची, ह्यांचं. |
| न. | त्येचा, ह्येचा, त्येची, | ह्येची, त्येची, त्येचं | त्येंची, त्येंचा, त्यांची,<br>त्येंनी, त्येंचा, ह्याची, ह्यांचं |
| सप्तमी | पु. | त्याच्याकड,<br>त्याच्याजवळ,<br>त्येचेकड, त्याच्याक,<br>त्याव्याप | त्यांच्याकड, त्यांच्याक,<br>त्यांच्याप, त्यांच्याजवळ,<br>ह्यांच्याक, ह्यांच्याजवळ |
| | स्त्री. | तिच्याकड, तिच्याप,<br>तिच्याक, हिच्याप,<br>हिच्याक | ह्यांच्याजवळ, ह्यांक,<br>ह्यांप, ह्याच्याक<br>त्यांच्यापं, त्यांच्याजवळ इ` |
| | न. | त्येच्याक, ह्येच्याक,<br>त्येंचेकड, ह्येंचेकड,<br>ह्येंचेप, त्येंचेंप | त्यांच्याकड,<br>त्यांच्याजवळ, त्यांच्याप,<br>ह्यांच्याकड, ह्यांच्याप |

एकंदरित पाहता प्रथमपुरुष आणि द्वितीयपुरुष व तृतीयपुरुष यांच्यात तुलना करता तृतीयपुरुषी सर्वनामाची रूपे विविध प्रकारची आहेत हेच ध्यानात येते.

**तत्का, स्थतां**

| विभक्ति | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | सवता, स्वतः | स्वतां |
| द्वितीया | सवताला, सवताली | स्वतांली, स्वतःला |
| तृतीया | सवतानं, सवताले, स्वातानं, स्वतानी | स्वतांनी, स्वतानं |
| चतुर्थी | सवताला, सवताली, स्वताली | स्वतांली, स्वतःला |
| पंचमी | सवताकडून, सवतापून, | स्वतांपून |
| षष्ठी | सवताचे, स्वताचा, स्वताचं, स्वताच्या, सवताची | स्वंताच्या, सवताचं, स्वतांची, स्वताचा |
| सप्तमी | स्वताकड, स्वताप, सवताशी | स्वतांकड, स्वताप, स्वतःशी |

**(ब) दर्शकसर्वनामे**

| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| हा, ह्या | हा, ह्या | ती | त्यां |
| असां | असं | यठ | यठ |
| ही | ह्या | तिक | तिक |
| इक | इक | तो | त्या, त्यां, त्ये |
| त्यें | त्यें | इड | इड |
| इठ | इठ | तिकड | तिकड |
| हिक | हिकं | त्या | त्यां |

वरील सर्वनामात ज्यांनी अनेकवचनी रूपे बदलली नाहीत त्यांची अनेकवचने होत नाहीत असे समजावे. यात ह आणि इ पासून तयार तयार झालेली दर्शकसर्वनामे जवळचा निर्देश करतात तर त पासून तयार झालेली दर्शक सर्वनामे लांबचा निर्देश करतात. प्रकरणात व ह्यांचा समावेश केलेला आहे त्यावरून ही गोष्ट लक्षात येतीलच.

**(क) संबंधी सर्वनामे**

| **लिंग** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| | जो, जी, ज्ये, ज्या | जी, ज्या |
| पु. | जो, ज्या | जी, ज्या |
| स्त्री. | जी, ज्या | जी, ज्या |
| न. | ज्ये, ज्या | जी, ज्या |



**(ड) प्रश्नार्थकसर्वनामे**

**कोन : कोण तिन्ही लिंगी समानरूपे**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | के, कोण, कोन | कोण, कोन |
| द्वितीया | कोनला, कोनाली, कोनाकोनाला/ली | कोनाला, कोनाकोनाला/ली, कोनाली |
| तृतीया | कोना, कोनी, कोन्या, कोणत्या, कोणा, कुना | कोन्या, कोनी, कोनां, कोन्ह्या, कोणा |
| चतुर्थी | कोणला, कोनाली, कोनाकोनाला/ली | कोनाला, कोनाली, कोनाकोनाला/ली |
| पंचमी | कोनापुन, कोनापासून | कोनापून, कोनापासून |
| षष्ठी | कोनाचा, कोनचं कंच, कंचा, कोनच्या, कुनाचा | कोनाचा, कोनाची, कोनाच्या, कोनाचं, कुनाचं |
| सप्तमी | कोनाक, कुनाक, कोनाप, कोनाकड | कोनाकडं, कुनाप, कोनापं |

**काय– तिन्ही लिंगी समानरूपे**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | काय, कायी | काय, कायी |
| द्वितीया | क्याला, कह्याला, क्याली, कह्याली | क्याली, कायांला, क्याला, कह्याली |
| तृतीया | क्यानं, क्यानी, क्याशी, क्याना | क्याना, क्यानी, क्यानं, क्याशी |
| चतुर्थी | क्याला, कह्याला, कह्याली | क्याला, कह्याला, क्याली, कह्याली |
| पंचमी | क्यापून, कह्यापून, कह्यापुन | कह्यापून, कह्यापासून, क्यापासून |
| षष्ठी | क्याशी, क्याचा, कायाची | कायाचा क्यांची, कायांची कायाचा |
| सप्तमी | क्याप, कायाकड क्याकड | क्याप, कायाकडं |

**किती**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | किती | किती |

| | | |
|---|---|---|
| द्वितीया | कितीला, कितीसा | कितींला, कितीकांलां |
| तृतीया | कितीना, कितीशी | कितीना, कितींशी |
| चतुर्थी | कितीला, कितीशा | कितींला, कितींकांला |
| पंचमी | कितीपून, कितीकून | कितींपून, कितींकून |
| षष्ठी | कितीचा/ची/चं | कितींचा/ची/चं |
| सप्तमी | कितीकं, कितीकड | कितीकं, कितींकड |

वरीलप्रमाणेच कुठं, केव्हढा, कुहीकं, कवा अशी प्रश्नार्थक सर्वनामे आहेत.

टिप – दोन अक्षरे जोडण्यासारखी दिसतात ती तशी नाही. उदा. क.य.

**(ई) सामान्य सर्वनामे –**

कोण, कोना, कोनी, अमक्या, ह्या, कित्येक, ऐक, क्यएक, कही, काही, समदे, समदं, समदां, एव्हढां, त्यवढां, क्यव्हढां, सगळां, वरकाड, पुष्काळ, लई, इकुडला, तीकुडला, त्यांयचा, ह्यांचा, इठीला, तीठीला, यठला, यहली, यठलं, परस्पऱ्या, परवारे, कंचा अशी एकवचनी व अनेकवचनी सर्वनामे आढळतात. ती एकवचनी व अनेकवचनी अशी स्वतंत्र दाखविताना साशंकता निर्माण होते. कारण ती देखील रूप बदलत नाही. अनेकवचनी आकारान्तावर अनुस्वार (अनुच्चारित) येथे, अकारान्त अनुच्चारित अनुस्वारांसह रूप येणे अशी रूपे नामांच्या यांप्रमाणेच आढळतात. परंतु त्यादेखील बराचसा गोंधळ आढळतो. अर्थात हा फक्त प्रत्यक्ष मांडताना जरी असला तरी बोलताना तो गोंधळ राहात नाही. बोलताना ती रूपे बरोबर योजली जातात. वाक्यानुरूप त्यांना अर्थ प्राप्त होतो. या प्रकरणात दिलेल्या कथा, पाणी आणि वाक्ये यावरून हे ध्यानात येतीलच.

**नाम, विभक्तीप्रत्यय आणि सामान्यरूपे**

**(अ) विभक्तीप्रत्यय**

| **विभक्ती** | **एकवचनी प्रत्यय** | **अनेकवचनी प्रत्यय** |
|---|---|---|
| प्रथमा | --उ (विकल्याने) | -- |
| द्वितीया | ला, ली, यी | ला, ली, यी |
| तृतीया | ना, मी, नं. शी | ना, नी, नं. शी |
| चतुर्थी | ला, ली, यी | ला, ली, यी |
| पंचमी | कून, पून, पासून | पुन, पासून |
| षष्ठी | चा, ची, चं (चे अपवादात्मक), वाला/ली/लं | चा, ची, चं(चे) (अपवादात्मक) वाला/ली/लं |
| सप्तमी | प, क, पश, कड, मंदी | प, क, पश, कड |
| संबोधन | न | -- |



प्रचलित विभक्तीव्यवस्थेनुसार विभक्ती प्रत्यय आढळतात. प्रत्यय देखील तुलनेने पाहाता पुष्कळच समान आहेत. द्वितीया, चतुर्थी यांचा ली, मी हे प्रत्यय, पंचमीचा पून हा प्रत्यय, तृतीयाचा नी, नं प्रत्यय, षष्ठीचा वाला/ली/ले, च हे प्रत्यय, सप्तमीचे प, क, कड, पशी, हे प्रत्यय थोडे भिन्न वाटले तरी मध्यवर्ती म राठीतील प्रत्ययांना अगदी जवळची वाटतात यात संशय नाही. कड, पशी, पुन, पासून, वाला हे वास्तविक पाहता प्रत्यय नाहीतच. ती शब्दयोगी अव्यये आहेत. पुढे येथे निर्दिष्ट केलेल्या नामातील प्रत्येकी एक उदाहरण घेण्याचा प्रयत्न करू. त्यामुळे रूपे समजतील आणि त्याचबरोबर सामान्यरूपे समजायाला मदत होतील.

**(१) अकारान्त पुल्लिंगी नामे – आउत**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | आउत | आउतां |
| द्वितीया | आउताला, आवताली | आवतांली |
| तृतीया | आउतानं, आवतानी, आवताशी, आवताना | आउतांना, आवतांनी, आवतांशी, आवतानी |
| चतुर्थी | आउताला, आवताली | आवतांली |
| पंचमी | आवतापून, आवतापासून | आवतांपून, आवतांपासून |
| षष्ठी | आवताचा, आवताची, आवताला, आवताचं, आवतावालं | आवतांचा, आवतांची, आवतांवाला, आवतावाले, आवताचं |
| सप्तमी | आवताक, आवताप, आवतापशी, आवताकड | आवतापशी, आवताकडं |
| संबोधन | -- | -- |

**(२) अकारान्त स्त्रीलिंगी नामे– तुळस**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | तुळस | तुळसां/तुळसा |
| द्वितीया | तुळशीला, तुळशीली | तुळशीली, तुळसांली |
| तृतीया | तुळशीन, तुळशीना, तुळशीनी | तुळशींनी, तुळशीला, तुळशीनं |

| | | |
|---|---|---|
| चतुर्थी | तुळशीला, तुळशीली | तुळशीली, तुळसांली |
| पंचमी | तुळशीपुन, तुळशीपासून | तुळसांपुन, तुळसांपासून, तुळशीपुन |
| षष्ठी | तुळशीचा, तुळशीचं, तुळशींची | तुळसांचं, तुळसांची, तुळशींची, तुळशींचा |
| सप्तमी | तुळशीप, तुळशाकड, तुळशीपशी | तुळसांव, तुळसांकड, तुळशींपशी |
| संबोधन | -- | -- |

**(३) अकारान्त नपुसकलिंगी नामे – घर**

| | | |
|---|---|---|
| प्रथमा | घर | घरां |
| द्वितीय | घरला, घराली | घरांला, घरांली |
| तृतीया | घरनं, घरना | घरांन, घरांनी, घरांना |
| चतुर्थी | घरला, घराली | घरांली, घरांली |
| पंचमी | घरापून, घरापासून | घरांपुन, घरांपासून |
| षष्ठी | घरचा, घराचा, घराची, घरवाला, घरचं | घरांचा/ची/चं घरांवाला |
| सप्तमी | घराप, घराकड, घरापशी, घरामंदी | घरांप, घरांकड, घरांपशी घरांमंदी |
| संबोधन | -- | -- |

**(४) आकारान्त पुल्लिंगी नामे – रस्ता**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | रस्ता | रस्तं |
| द्वितीया | रस्त्याला, रस्त्याली | रस्त्यांला, रस्त्यांली |
| तृतीया | रस्त्याला, रस्त्याली | रस्त्यांनं/नी/ना |
| चतुर्थी | रस्त्याला/ली | रस्त्यांला/ली |
| पंचमी | रस्त्यापुन/पासून | रस्त्यांपून/पासून |
| षष्ठी | रस्त्याचा/ची/चं वाला | रस्त्यांचा/ची/चं वालं |
| सप्तमी | रस्त्याप/कड/क/ पशी/मंदी/च्याअंग | रस्त्यांप/कड/क/पशी/ मंदी/च्याअंगानी |
| संबोधन | -- | -- |

**(५) आकारान्त स्त्रीलिंगी नामे – कथा**



| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | कथा | कथा |
| द्वितीया | कथला/ली | कथाला/ली |
| तृतीया | कथना, कथानी, कथनं | कथाना/नी, कथानं |
| चतुर्थी | कथला/ली | कथाला/ली |
| पंचमी | कथपून/पासून | कथापुन/पासून |
| षष्ठी | कथचा/ची/चं, कथाची/वाला/वालं | कथाचा/ची/चं/वालं |
| सप्तमी | कथाप/पशी/क कड, मंदी | कथांप/पशी/क कड, मंदी |
| संबोधन | -- | -- |

**(६) आकारान्त नपुसकलिंगी नामे – चाणा**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | चाणा | चाणं/चाणा |
| द्वितीया | चाणाली/ली | चाणाला/ली |
| तृतीया | चाण्यानं/नी | चाण्यानं/नी |
| चतुर्थी | चाण्याला/ली | चाण्याला/ली |
| पंचमी | चाण्यापुन/पासून | चाण्यापुन/पासून |
| षष्ठी | चाण्याचा/ची/चं | चाण्याचा/ची/चं |
| सप्तमी | चाणाकड/कमंदी/पशी/क/प | चाण्या/कड/मंदी/पशी/प/क |
| संबोधन | -- | -- |

**(७) ईकारान्त पुल्लिंगी नामे– कोळी**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | कोळी | कोळी |
| द्वितीया | कोळ्याला/ली | कोळ्यांला/ली |
| तृतीया | कोळ्याना/नी/नं | कोळ्यांना/नी/नं |
| चतुर्थी | कोळ्याला/ली | कोळ्यांला/ली |
| पंचमी | कोळ्यापुन/पासून | कोळ्यांपुन/पासून |
| षष्ठी | कोळ्यांचा/ची/च/वाला | कोळ्यांचा/ची/चं/वाला |
| सप्तमी | कोळ्याक/प/कड/ पशी/मंदी | कोळ्यांक/प/कड/पशी/मंदी |
| संबोधन | कोळी | कोळ्यानू |

### (८) ईकारान्त स्त्रीलिंगी नामे–तवली

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | तवली | तवल्या |
| द्वितीया | तवलीला/तवलली | तवल्यांला/ली |
| तृतीया | तवली मी/ना/नं | तवल्यांना/नी/नं |
| चतुर्थी | तवलीला/ली | तवल्यांला/ली |
| पंचमी | तवलूपुन/पासून | तवल्यांपुन/पासून |
| षष्ठी | तवलीचा/ची/चं/ वाल/वाली, वाला | तवल्यांचा/ची/चं/वाला/वाली |
| सप्तमी | तवलीप/क/कड/ पशी/मंदी | तवल्यांप/क/पशी/कड/मंदी |
| संबोधन | -- | -- |

### (९) ईकारान्त नपुसकलिंगी नामे – पानी

| | | |
|---|---|---|
| प्रथमा | पानी | पानी |
| द्वितीया | पाण्या/पान्याला/ली | पाण्या/पाण्या/ला/ली |
| तृतीया | पपान्याना/नी/नं | पाण्यानान्नीन्नं |
| चतुर्थी | पान्याला/ली | पान्याला/ली |
| पंचमी | पान्यापुन/पासून | पान्यापुन/पसून |
| षष्ठी | पान्याचा/ची/च/ वाला/वाली/वालं | पान्याचा/ची/चं/वाला/ वाली/वालं |
| सप्तमी | पान्याक/प/पशी/कड/मंदी | पान्याक/प/पशी/कड/मंदी |
| संबोधन | -- | -- |

### (१०) ऊकारान्त पुल्लिंगी नामे – विंचू

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | विंचू | विंचू |
| द्वितीया | विंचाला/ली | विंचाला/ली |
| तृतीया | विंचाना/नी/नं | विंचांनी/ना/नं |
| चतुर्थी | विंचाला/ली | विंचाला/ली |
| पंचमी | विंचावुन/पासून | विंचापुन/पासून |
| षष्ठी | विंचाचा/ची/चं वाला | विंचांचा/ची/चं वाला |
| सप्तमी | विंचाप/क/पशी कड/मंदी | विंचाप/क/पशी कड/मंदी |
| संबोधन | -- | -- |

### (११) ऊकारान्त स्त्रीलिंगी नामे – सासू

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | सासू | सासवा |
| द्वितीया | सासुला/ली | सासवांला/ली |
| तृतीया | सासूना/नी/नं | सासवांना/नी/नं |
| चतुर्थी | सासुला/ली | सासवांला/ली |
| पंचमी | सासुपून/सासूपासून | सासवांपून/पासून |
| षष्ठी | सासुचा/ची/चं वालं/वाला/वाली | सासवांचा/ची/चं वालं/वाला/वाली |
| सप्तमी | सासूक/प/पशी कड/मंदी | सासवांप/क/कड पशी/मंदी |
| संबोधन | सासू | सासवानु |

### (१२) ऊकारान्त नपुसकलिंगी नामे पिलू

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | पिलू | पिलां |
| द्वितीया | पिलाला/ली | पिलांला/ली |
| तृतीया | पिलाना/नी/नं | पिलांना/नी/नं |
| चतुर्थी | पिलाला/ली | पिलांला/ली |
| पंचमी | पिलापुन/पासून | पिलांपुन/पासून |
| षष्ठी | पिलाचा/ची/चं वाला/वाली/वालं | पिलांचं/चा/ची/ वालं/वाली/वाला |
| सप्तमी | पिप/क/कड/ पशी/मंदी | पिलांप/क/पशी/ कड/मंदी |
| संबोधन | पिला | पिलांनु |

अशा प्रकारे नामांना विभक्तिप्रत्यय लागून त्यांची रूपे कशी होतात ते वर मांडले आहे. यावरून महत्त्वाची जी गोष्ट लक्षात येते ती म्हणजे मध्यवर्ती मराठीमध्ये जसे विभक्ति प्रत्यय होण्यापूर्वी नामाचे सामान्यरूप होण्याची लकब आहे ती लकब याही ठिकाणीआहे. काही 'सासू' सारखे अपवाद वगळावयाचे

म्हटले तरीसुद्धा तेच त्याचे सामान्यरूप देखील आहे. मध्यवर्ती मराठीतदेखील याची काही उदाहरणे मिळू शकतात.

**(ब) सामान्यरूपे –**

वरीलप्रमाणे डांगाणी भाषेमध्ये नामांचे सामान्यरूप करण्याची पद्धत आहे. एवढे लक्षात घेतले तरी पुरेसे आहे. ती सामान्य रूपे कोणत्या स्वरूपात होतात ते प्रत्यक्ष वर विभक्तिप्रत्यय व विभक्तिप्रत्ययानुसार रूपे दिलेली आहेत. यावरून लक्षात येतेच. तेव्हा पुन्हा येथे मांडून दाखविण्याची गरज वाटत नाही.

**विशेषणे –**

**(अ) प्रथम नामसाधित विशेषणांचा विचार करू .**

| **नाम** | **नामसाधित विशेषण** |
|---|---|
| रक्त / रगत | रक्ताचं / रक्ताचं / चा / ची |
| इख | इखाचं / चा / ची |
| सुख | सुखी, सुखाचा / ची / चं |
| वाघ | वाघाच्या / चीं / चं |
| करंज | करंजांची / चा / चं |
| खेकडी | खेकडीचा / ची / चं |
| काम | कामाचा / ची / चं |
| चैत | चैताची / ची / चं |
| सत्य | सत्याचा / ची / चं |
| | सत्यवान / सत |
| गर्व | गर्वीया / गर्वी |
| नेम | नेमाचा / ची / चं |
| निंब | निंबवाचा / ची / चं |
| तांबा | तांब्याचा / ची / चं |
| कास | कासाचा / ची / चं |
| सरप / स्वर्ग | स्वर्गाचा / ची / चं / स्वर्गीया |
| कडा | कड्याचा / ची / चं |
| उसगजणी | उसगजणीचा / ची / चं |
| कसब | कुसुबी |
| हौस | हौशी, हौसाचा / ची / चं |
| सून | सुनघरी |



| | |
|---|---|
| पाणवटा | पाणवट्याचा / ची / चं |
| हाळद | हाळदी, हाळदीचा / ची / चं |
| गाय | गायीचा / ची / चं |
| हाती | हातीचा / ची / चं / हत्या |
| चंदन | चंदनी / चंदनाचा / ची / चं |
| सोगा | सोग्या / सोग्याचा / ची / चं |

**(ब) धातुसाधित विशेषणे –**

| **धातु** | **धातुसाधित विशेषणे** |
|---|---|
| हस | हसणारा / रे / री |
| कुढ | कुढ्या / कुढी / ढे, कुढणारा / री / रं |
| पड | पडत्या / ती / त, पडणारा / री / रं |
| मोड | मोड्या / डी / डं, मोडणारा / री / रं |
| झड | झड्या / डी / डं, झडणारा / री / रं |
| डचमळ | डचमळ्या / ळी / ळं |
| | डचमळणारा / री / रं |

**(क) सार्वनामिक विशेषणे**

| **सर्वनाम** | **विशेषण** |
|---|---|
| मी | मह्या, माझा / झी, मह्यावालं / ला / ली |
| तू | तुही / तुह / तुह्या, तुह्यावाला / ली / लं |
| तो | त्याचा / ची /चं /त्येच्या / |
| | त्याच्यावाला / ली / लं |
| त्ये | त्येचा / ची / चं / त्येच्या, |
| | त्येच्यावाला / ली / लं |
| आमी | आमचा / ची / चं, आमच्यावाला / लं /ली |
| त्यें | त्येंच्या / ची / चं, त्येंच्यावाला / ली / लं |
| हा | ह्याचा / ची / चं, ह्याच्यावाला / ली / लं |
| ही | हिचा / ची / चं, हिच्यावाला / ली / लं |
| हये | ह्येचा / ची / चं, ह्येच्यावाला /ली / लं |

**(ड) दर्शक विशेषणे –**

ह्या, ह्यो, हये, तो, त्या, ती.

**(इ) गुणविशेषणे –**

वरील नामसाधित व धातुसाधित विशेषणे ही वास्तविक पाहाता गुणविशेषणे असल्याने त्यांचा पुन्हा येथे विचार करण्याचा कारण नाही. पुढे अन्य गुणविशेषणे मांडली आहेत. विशेषणे –

चांगली / लं / ल्या / ला, निताळ / मूर्ख / येडा /
वला / ली / लं / ल्या / ल्ये, खरा / री / रं / ऱ्या,
लहूबाळ / लाल, हिरवा / वी / व्या / व्यें,
निळा / ळी / ळं / ळ्यें, पिवळा / ळी / ळां / ळ्या / ळ्ये
मारी / कुरुप / मोहरी, नाग्या / नागी / नागं / नाग्यें / नाग्यां
वितुळका / की / कं / क्या, पुतळ्या / ळी / ळां / ळ्यां,
टिपुर / टिपुऱ्या / टिपुरी, कुरळा / कुरळी / ळ्या / ळं,
मंडाऱ्या / री / रं
फुगीर / लांब, आंबटा / टी / टां / ट्या / ट्ये,
मोळी / ळ्या / ळा / ळं, दिवानी / न्या / ना / नं,
कोरडा / डी / ड्या / डं, काफेर, तिखाट, मुंढ्या / ढी / ढ्ये,
घोटी, लंगडा, सावतर, सडका, वाळलेला / ली / लं / ल्या / ल्यें
शेवडी / डा / डं / ड्या / ड्ये, फिळवडी / डा / डं / ड्या / ड्यें,
सडकी / का / क / कां, सडकी मडकी

**(फ) संख्याविशेषणे –**

पुरा; सारी / रा / रं; तीनशेड्या; मोठी / ठा / ठं;
अवघाविचार, अवघी / घं; पहिला तोडा, पहिली / लं;
अवघी तयारी; इरीमीरीपाणी; येव्हढ्यात लहान येन्हाढा / ढी / ढं;
लईमोठा / पाक (संपूर्ण); बारीकाका / की / क्या / कं;
हजारो लोक; शंभर मुलां; तीरगुन / ना / नी; चौगुन / ना / नी

**(य) अव्ययसाधित विशेषणे –**

वरला / ल्या माळ; खालचा माळ; खालतील्या;
वरतील्या; उभ्यादंडानं;

(र) विशेषणाचे लिंगवचन विभवित – विशेषण हे विशेष्यावर अवलंबून असल्याने विशेष्याच्या लिंगवचनविभवितनुसार ते चालते.

(ल) अधिविशेषण व विधिविशेषण– डांगाणी भाषेमध्ये मध्यवर्ती म राठीप्रमाणेच विशेषन दोन ठिकाणी येताना दिसते. त्यामुळे विशेषणाचे अधिविशेषण (विशेष्याच्या पूर्वी येणारे) आणि विधिविशेषण (विशेष्यानंतर येणारे) असे प्रकार करता येतील,

**संख्या –** पुढीलप्रमाणे संख्या आढळतात.

(अ) अंक –

| | |
|---|---|
| एक – | एकान / ना / नी / चा / ची / चं / च्या |
| | एकला / ली / लं / इकली / इकला |
| दोन – | दोघांनी / ना / घांचा / ची / चं / च्या दोघं |
| तीन – | तिघांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या तिघं |
| चार – | चौघांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या चौघं |
| पाच – | पांचांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या पाच |
| सहा – | साहांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या सा |
| सात – | सातांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या सात |
| आठ – | आठांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या आठ |
| नऊ – | नवांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या नऊ |
| दहा – | दहांनी / ना / नं / चा / ची / चं / च्या धा / दा |

एक्या, एकी, एका,
दोन – दोही / दोघी / दोघां
तीन्ही, तीही
चारी, पाची, साही, साती, आठी, दाही

बारा – ही संख्या अनेक ठिकाणी येते – बाराशे, बारा वर्षे, बारामाई, बारा महिनं, बाराचा (शिवी),

पंधरादि, पंधरादिसा, पंधरवडा
वीस, विसा, विशी
पंचीस
शंभर, शंभरां, शंभरी, पाशे, शेदोनशे, पास्सं
हजार, हजारो
लाक, लाख
काठी, अर्धीकाठी – कोस, दोनकोस
पाटी, अर्धीपाटी – बिघं, एकर, पांड
शेराची

पायली

निठं

किलू

(ब) पट –

दोनपुना, तिरपुन, चारपुन, पाचपुन, दापुन

(क) अनियमित –

पकं / पका / पकी;

मोठा / मठा / मोठी

लहान / नी / ना

यव्हढा / ढी / ढे / ढं

त्येव्हढा / ढी / ढे / ढं

व्यव्हढाक

किती

इकी

वाढूळ

कैकं

समदं

सर्वा

पुरा

यव्हढायबी

आला

कितीकं

बराच

लांब

जवळ – इड

एक ते दहापर्यंत सलग संख्या आढळतात. तर मग पंधरा, वीस, तीस, पन्नास, शंभर, दोनशे, पाचशे, हजार अशाच संख्या सापडतात. अनियमित संख्याच जास्त वापरात आढळतात. संख्यांचा वापर फारच थोड्या प्रमाणात करताना आढळतात.



**क्रियापदे –**

**(अ) धातू :–**

खाली क्रियापदातील धातु मांडले आहेत. ते धातु शक्यतो क्रियापदांच्या प्रकारांनुसार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. असे प्रकार मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे या ग्रंथात मांडलेले आहेत.[३] त्याप्रमाणे पूर्ण विभाजन केलेले नाही.

| डांगाणी धातू | डांगाणी धातू | डांगाणी धातू | डांगाणी धातू |
|---|---|---|---|
| लाम | निघ | धाव | इचार |
| पळ | जेव | म्हण (म्हन) | चमक |
| यी (ई) | बस | येंग | अस |
| बोल | आण | पाव | वाण |
| पड | खेळ | उमज | जा |
| उसर | खप | कवळ | पळ |
| घाल | हस | दी | चालॉ |
| राह (रय) | पाह | खताव | रुत |
| हिंड | कळ | उठ | आगड |
| नाच | सोब | हो | धक |
| वीह | नास | जन | रागाव |
| भेट | (२) | उग | पे (पी) |
| पुस | उघड | ना (न्हा) | ओळख |
| उत्तर | ने | कंटाल | घाल |
| फाक | लाट | पसर | वाढ |
| कुडकुड | घर | पोहच | लाव |
| लोंबकळ | जुन | लय | हालव |
| मूत | अखा | वरड | आदळ |
| मूक | हालव | इक | छाप |
| निज | वाट | रिंग | बांध |
| ऊड | सोड | पाहिजे (पायजे) | घी |
| डाळ | फेक | दळ | लाव |
| कांड | पडक | संप | हेर |
| संपव | एक (अमक) | पाठव | फोड |
| सांडव | गुतव | ऊपट | करान्ड |

| | | | |
|---|---|---|---|
| आपट | गवस | गुंडाळ | फसव |
| जीत | सूस | जीळ | |

वर दोन भागात विभागलेले धातू अनुक्रमे अकर्मक आणि सकर्मक आहेत. परंतु ते पूर्णतः तसेच चालतात असे नाही तर केव्हा ते उभयविधदेखील असतात. म्हणून धातूंचे असे विभाजन करणे कठीण आहे. किंबहुना ते न केल्यास बरे. कारण धातू म्हणजे भाषेतील मूळ शब्द. तो कसा वापरावयाचा ते च्योगावर अवलंबून आहे. आणि त्यामुळे हा वापर सशास्त्र, स्वतंत्र वर्गीकरण अयोग्य ठरते.

**(ब) संयुक्त क्रियापदे –**

नामे व धातुसाधिते यांच्याशी संयोग होऊन संयुक्त किंवा जोड क्रियापदे तयार होतात.[४] असा विचार करता डांगाणी मराठीमध्ये ही लकब फार मोठ्या प्रमाणावर वापरली जाते असे दिसून येईल. 'रे. नवलकर हे याच्याही पुढे जाऊन प्रीती करणे, विश्वास धरणे ही देखील संयुक्त क्रियापदेच मानावीत असे म्हणतात.' हे म्हणणे देखील थोडा विचार करता भाषा व्यवस्थापनाच्या दृष्टीने योग्य म्हणावेसे वाटते. ह्यावरील दोन्ही प्रकारची संयुक्त क्रियापदे खाली मांडण्याचा प्रयत्न झाला आहे.

| | | |
|---|---|---|
| पळत सुटला | जनाया झाली व्हती | पुसायला जायाचा |
| नाऊ गेली | लोंबकळून वर गेला | लवून बसला |
| वरडत आला | आरडत आला | भीक मांगाया लागला |
| पलंगावर जायाला पाहिजे | मांग फिरून मी | घेऊन गेली |
| वाटून दिल्या | कापून ठिवतो | मांगुन घेतला |
| साळित व्हता | फेकुन दिली | अमकून घेतला |
| उस्तारून पहील्या | पेत अस | आखडून घेतली |
| चेतून दिला | जाळून टाकली | कोरून ठिवा |
| मोडून गेला पाहिजे | संपून गेली | काढीत व्हते |
| सोडून देईन | सोडवून आनला | हाती लागना |
| वचन मोडता | शा दिल्या | कबुल केला |
| युद्ध खेळाया | सपक सयपाक कर | सपान पडल |
| विचित सुसली | विचार केला | लाथ मारली |
| राग आला | बुहडान केला | कडका लागला |



| | | |
|---|---|---|
| भीकमांग | भूक लागली | ठनकी दी |
| बेत पहा | रात पडली | भेटा दिल्या |
| मुरसढ आली | पाया पड | सराणरच |
| वस्ता बांध | घर धाल | |

उपरोक्त रे. नवलकर यांच्या मताप्रमाणे दिलेल्या क्रियापदात ग. ह. केळकरांच्या मताप्रमाणे कर्मे नसली तरी त्याशिवाय नीट अर्थबोध होत नाही.[५] त्यामुळे ती संयुक्त क्रियापदेच मानणे योग्य वाटते.

**(क) सहायक धातू –**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अस | या | यी (ये) | दी | पड | घाल | हो | कर |
| बस | पाहिजे | सूट | घी (घे) | टाक | ठीव | सोड | लाव |

**(ड) काळाचे प्रकार दाखविणारी सहाय्यक क्रियापदे –**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अस | हो | पड | घी | कर | दिला | सोड | जा |
| बस | राह (रय) | | | | | | |

(५) नकारार्थी – न + अस = नस

**काळ**

(अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ (क) रीतिभूतकाळ

(ड) भविष्यकाळ (इ) आज्ञार्थ (फ) विध्यर्थ (म) संकेतार्थ

काळानुसार वरील क्रियापदे चालवून दाखविली आहेत.

**वर्तमानकाळ**

**(१) अस**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | मी आहे / हाये | आमी आहे / हैती |
| द्वितीयपुरुष | तू हेस / हाये / आहे | तुमी आह्यात / हायात / हयात |
| तृतीयपुरुष | तो हाये / आहे | ती हायात / हयात |
| | ती आहे / हाये | त्या हायात / हयात |
| | तो आहे / हाये | |

**भूतकाळ**

| | | |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हता / व्हतो / व्हत्ये | आमी व्हतो |
| द्वितीयपुरुष | तू व्हता / व्हतीस | तुम्ही व्हता |
| तृतीयपुरुष | तो व्हता | त्या व्हत्या |

| | | |
|---|---|---|
| | ती व्हती | त्यां व्हती |
| | त्ये व्हतं | ती व्हती |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | असं | असांत / असत |
| द्वितीयपुरुष | असं | असांत / असत |
| तृतीयपुरुष | तो । | असांत |
| | ती । अस | |
| | ते । | |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | असल | असांल |
| द्वितीयपुरुष | असल | असांल |
| तृतीयपुरुष | असल | असांल |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | असा | असा |
| द्वितीयपुरुष | अस | असा |
| तृतीयपुरुष | अस | असा |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | अस | असा |
| द्वितीयपुरुष | अस | असा |
| तृतीयपुरुष | अस | असा |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | आहे / हाये | आहेत / आह्यात |
| द्वितीयपुरुष | हाये / आहे | आह्यात |
| तृतीयपुरुष | हाये / आहे | आह्यात |

(२) हो



**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हतो / त्ये | व्हतो |
| द्वितीयपुरुष | व्हतो / व्हती | व्हतां |
| तृतीयपुरुष | व्हतो / व्हती / व्हतं | व्हतांत |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | झालो / झाले | झालो |
| द्वितीयपुरुष | झाला / झाली | झालां |
| तृतीयपुरुष | झाला / झाली / झालं | झालं / झाल्या |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हई | व्हयार्थ / च्या |
| द्वितीयपुरुष | व्हयाचा / ची | व्हयाचं / व्हयाच्या |
| तृतीयपुरुष | व्हयाचा / ची / चं | व्हयाचं / व्हयाच्या |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हईल | व्हवं |
| द्वितीयपुरुष | व्हशील | व्हाल / व्हशान |
| तृतीयपुरुष | व्हईल/व्हईल/व्हईल | व्हतील / व्हत्याल |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | – | – |
| द्वितीयपुरुष | हो | व्हा |
| तृतीयपुरुष | (हो) | (व्हा) |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हाव | व्हावं |
| द्वितीयपुरुष | व्हाव | व्हावं |
| तृतीयपुरुष | व्हावा / वी / वं | व्हावां |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | व्हतो | व्हतो |
| द्वितीयपुरुष | व्हता | व्हते / त्या |
| तृतीयपुरुष | व्हता / ती / तं | व्हते / त्या |

**(३) कर**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | करीतोय / करतो | करतोय / करतो |
| द्वितीयपुरुष | करतो / करीतोस / ती | करतां / करत्या |
| तृतीयपुरुष | करतो / ती / तं | करतात / त्यात / त्येत |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | केला/क्येला/ली/ल्ये | केला/ल्या/ली/ल्ये |
| द्वितीयपुरुष | केला/ली/ल्ये/ल्या | केला/ल्या/ली/ल्ये |
| तृतीयपुरुष | क्येला/ली/ल्या/लं | केला/ल्या/ली/ल्ये |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | करीत अस/करायचा/ची | करीत असं |
| द्वितीयपुरुष | करकीत अस/करायचा/चीस | करीत असं |
| तृतीयपुरुष | करीत अस | करीत असं |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | करील | करूं |
| द्वितीयपुरुष | करील / करशील | कराल / करताल |
| | | करतील / करत्याल |
| तृतीयपुरुष | करील | करतील / करत्याल /कारवाल |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | कर | करी |
| द्वितीयपुरुष | कर | करा |
| तृतीयपुरुष | कर | करू |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | करावा / वी / वं | करावा / वी / व्या / वं |
| द्वितीयपुरुष | करावा / वी / वं | करावा / वी / व्या / वं |
| तृतीयपुरुष | करावा / वी / वं | करावा / वी / व्या / वं |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | करतो | करतो |
| द्वितीयपुरुष | करतो / त्ये / ती | करतां |
| तृतीयपुरुष | करतो / त्ये / ती / तं | करत्यात |

**रय (रात्रह)**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रयतो व रयत्ये | रहातो / रयतो |
| द्वितीयपुरुष | रयतो / रयती | रहात्या / रयतां |
| तृतीयपुरुष | रयतो / ती / तं | रहात्यात / रमतां |
| | राहतों / ती / तं | रयतं |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रयलो / रयल्ये | रयलो |
| द्वितीयपुरुष | रयला / रयली | रयलां |
| तृतीयपुरुष | रयला / रयली / रमलं | रमल्येत / रमलं |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | राह्याचो रह्याची | राह्याचं रयत असतं |
| | राही / राई / रयत अस | |
| द्वितीयपुरुष | आह्याचा / ची / चं | आह्याचं / रयत असात |
| तृतीयपुरुष | रह्याचा / ची / चं | आह्याचं / आह्याच्या |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रैल / रईल | राहू |
| द्वितीयपुरुष | रमशील | रयताल |
| तृतीयपुरुष | रईल | रमत्याल / तील |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रमतो / रयत्ये | रमतो |
| द्वितीयपुरुष | रम | रहा |
| तृतीयपुरुष | रयतो / ती / तं | रमत्यात |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रहावा | रहावा |
| द्वितीयपुरुष | रहावा | रहावा |
| तृतीयपुरुष | रहावा | रहावा |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | रयतो / रम | रयतो |
| द्वितीयपुरुष | रयतो / ती | रयतां |
| तृतीयपुरुष | रयतो / ती / तं | रयतान |

**(५) ची (चे)**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घ्येतो / घ्यत्ये | घ्येता |
| द्वितीयपुरुष | घ्येतो / घेती | घ्येता |
| तृतीयपुरुष | घ्येतो / ती / तं | घ्येतात |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घ्येतला/ली/लं/ल्या | घ्येतला/ली/ली/घेतल्या |
| द्वितीयपुरुष | घ्येतला/ली/लं/ल्या | घ्येतला/ली/लं/ल्या |
| तृतीयपुरुष | घ्येतला/ली/लं/ल्या | घ्येतला/ली/लं/ल्या |



**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घेई / घीयाचा / ची | घीयाचं |
| द्वितीयपुरुष | घियाचा / ची | घीयाचं |
| तृतीयपुरुष | घीयाचा / ची / चं | घीयाचं |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घील | घीऊ |
| द्वितीयपुरुष | घेशील | घ्याल / घ्येतला / घ्येशान |
| तृतीयपुरुष | घील | घ्येतील |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घ्येतो | घ्येतो / घ्येतु |
| द्वितीयपुरुष | घी | घ्या |
| तृतीयपुरुष | घी / घ्येतो / ती / तं | घ्येत्यात |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | घ्यावा/घेवा/वी/वं | घ्यावा/घ्येवा/वं/वी |
| द्वितीयपुरुष | घ्येतु/घ्येतो/घ्येती | घ्येतां |
| तृतीयपुरुष | घ्येतु/घ्येतो/ती/तं | घ्येत्यात/घ्येतु |

**काळाचे प्रत्यय**

वरील चालविलेल्या क्रियापदांवरून काळांचे प्रत्यय पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**(अ) वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | तो / त्ये | तो |
| द्वितीयपुरुष | तो / ती / त्ये | तां / त्या |
| तृतीयपुरुष | तो / ती / तं / त्ये | ती / तां / त्या |

**(ब) भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | ला / ली / लं / ल्या | ला / ली / लं / ल्या |

| | | |
|---|---|---|
| द्वितीयपुरुष | ला / ली / लं / ल्या | ला / ली / लं / ल्या |
| तृतीयपुरुष | ला / ली / लं / ल्या | ला / ली / लं / ल्या |

**(क) रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | ई / चा / ची | च्ये / चो / चं |
| द्वितीयपुरुष | चा / ची | च्ये / च्यं / च्या / ची |
| तृतीयपुरुष | चा / ची / चं | च्ये / च्या / ची / च्ये |

**(ड) भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | ल | लूं |
| द्वितीयपुरुष | ल | ल / न |
| तृतीयपुरुष | ल | ल / न |

**(इ) आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | तो / त्ये | तो |
| द्वितीयपुरुष | – | – / या |
| तृतीयपुरुष | तो / ती / त्ये / तं | त्या / ती / तं |

**(फ) विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वा / वी / वं / व्या | वा / वी / वं / व्या |
| द्वितीयपुरुष | वा / वी / वं / व्या | वा / वी / वं / व्या |
| तृतीयपुरुष | वा / वी / वं / व्या | वा / वी / वं / व्या |

**(म) संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | तो / त्ये | तो |
| द्वितीयपुरुष | तो / ती / त्ये | तो / ती / त्या |
| तृतीयपुरुष | तो / ती / तं व त्ये | तात / ती / तं |

वरील प्रत्यय हे सर्वसामान्यपणे आढळणारे आहेत. डांगाणी भाषेची लकब मुक्त संचाराची असल्यामुळे वैकल्पिक रूपे सापडतात. तसेच रूपांचे पूर्ण भिन्नत्वदेखील आढळते. परिशिष्टात शेवटी दिलेल्या कथा व गाणी यावरून ते सहज लक्षात येईल.



आता आणखी काही धातू – उदाहरणार्थ चालवून दाखविले आहेत.

**(१) जनाया झाली – जनाबा हो**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | जनाया व्हत्ये / जनाया झाली / ल्ये | जनाया व्हतो / झाल्या |
| द्वितीयपुरुष | जनाया व्हतीस / झालीस | जनाया व्हता / झाल्या |
| तृतीयपुरुष | जनाबा व्हती / झाली | जनाया झाल्या / व्हत्या |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | जनाया झाल्ये | जनाया झाल्या |
| द्वितीयपुरुष | जनाया झाली | जनाया झाल्या |
| तृतीयपुरुष | जनाया झाली | जनाया झाल्या |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | जनाया व्हशी | जनाया व्हयाच्या |
| द्वितीयपुरुष | जनाया व्हयाची | जनाया व्हयाच्या |
| तृतीयपुरुष | जनाया व्हयाची | जनाया व्हयाच्या |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | जनाया व्हईल | जनाया व्हऊ |
| द्वितीयपुरुष | जनाया व्हशील | जाया व्हाल / व्हशाल |
| तृतीयपुरुष | जनाया व्हईल | जनाया व्हाल / व्हशाल |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | जनाया व्हात्ये | जनाया व्हतो |
| द्वितीयपुरुष | जनाया व्हती | जनाया व्हत्या |
| तृतीयपुरुष | जनाया व्हती | जनाया व्हत्या |

**(२) लप – लपून रय**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रयतो / लपून रयत्ये | लपून रयतो |
| द्वितीयपुरुष | लपून रयतो / ती | लपून रयतां / त्या |
| तृतीयपुरुष | लपून रयतो / ती / तं | लपून रयती/रयतं/त्या/त्यात |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रयलो / ल्ये | लपून रयलो |
| द्वितीयपुरुष | लपून रयला / ली | लपून रयलां / लं |
| तृतीयपुरुष | लपून रयला / ली / लं | लपून रयल्ये / ल्या / लं |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रयी / चो | लपून रयचं / चो |
| द्वितीयपुरुष | लपून रयचा / ची | लपून रयचां / ची / च्यां / चं |
| तृतीयपुरुष | लपून रयचा / ची / चं | लपून रयचं / च्या / ची |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रलै / रईल | लपून रऊ |
| द्वितीयपुरुष | लपून रईल / रयशील | लपून रहाल / रहान |
| तृतीयपुरुष | लपून रईल | लपून रयतील / न |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रयतो | लपून रयतो |
| द्वितीयपुरुष | लपून रय | लपून रहा |
| तृतीयपुरुष | लपून रयतो/ती/तं/त्ये | लपून राहती / त्या |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रहावा / वं | लपून रहावा / वं |
| द्वितीयपुरुष | लपून रहावा / वं | लपून रहावा / वं |
| तृतीयपुरुष | लपून रहावा / वं | लपून रहावं / वा |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | लपून रयतो | लपून रयतो |



| | | |
|---|---|---|
| द्वितीयपुरुष | लपून रयतो / ती | लपून रयतां |
| तृतीयपुरुष | लपून रयतो / ती / तं | लपून रयत्यात / ती / तं |

**(३) वाट – वाटून दी**

**वर्तमानकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून देतो / त्ये | वाटून देतो |
| द्वितीयपुरुष | वाटून देतो / त्ये | वाटून देतां |
| तृतीयपुरुष | वाटून देतो/देती/त्ये/तं | वाटून देतान / देतं |

**भूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून दिल्या/ली/ला/लं | वाटून दिल्या/ली/ला/लं |
| द्वितीयपुरुष | वाटून दिल्या/ली/ला/लं | वाटून दिल्या/ली/ला/लं |
| तृतीयपुरुष | वाटून दिल्या/ली/ला/लं | वाटून दिल्या/ली/ला/लं |

**रीतिभूतकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून देई/द्यायचो/च्ये | वाटून द्यायचो |
| द्वितीयपुरुष | वाटून द्यायचा/ची | वाटून द्यायचा |
| तृतीयपुरुष | वाटून द्याचा / ची / चं | वाटून द्यायच्या / ची / चं |

**भविष्यकाळ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून दील / देईल | वाटून दिऊ |
| द्वितीयपुरुष | वाटून देशील | वाटून देशाल / न |
| तृतीयपुरुष | वाटून दील / देईल | वाटून देतील / देत्याल |

**आज्ञार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून देतो / त्ये | वाटून देतो / त्ये |
| द्वितीयपुरुष | वाटून दी | वाटून द्या |
| तृतीयपुरुष | वाटून देतो / ती / तं | वाटून देत्याल |

**विध्यर्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून द्यावा | वाटून द्यावा |

| | | |
|---|---|---|
| द्वितीयपुरुष | वाटून द्यावा | वाटून द्यावा |
| तृतीयपुरुष | वाटून द्यावा | वाटून द्यावा |

**संकेतार्थ**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | वाटून घ्येतो/त्ये | वाटून देतो |
| द्वितीयपुरुष | वाटून द्येतो/ती | वाटून द्येतां |
| तृतीयपुरुष | वाटून द्यतो/ती/त्ये/तं | वाटून देत्यात/द्योतां |

वरील चालविलेल्या क्रियापदांवरून एकंदर काळांची कल्पना येते. यात एक गोष्ट येथेच लक्षात ठेवणे जरूर आहे आणि ती म्हणजे संकेतार्थ, विध्यर्थ यांची रूपे फारशी मिळत नाहीत. आज्ञार्थाची प्र.पु. व तृ.पु. रूपे जवळ जवळ सापडतच नाहीत.

आता धातुसाधिताच्या किंवा कुदन्तांचा विचार करू या.

धातूपासून क्रियेचा अपूर्णत्वाने बोध व्यक्त करणारी जी रूपे तयार होतात त्यांना धातुसाधिते असे म्हणतात.[६]

(अ) वर दाखविलेले जे काळाचे प्रत्यय आहेत त्यांच्यापासून धातुसाधिते तयार होताना दिसतात.

(ब) त्याशिवाय इतर प्रत्यय लागूनदेखील धातुसाधिते तयार झालेली दिसतात.

(क) काळाच्या प्रत्ययांपासून तयार झालेल्या धातुसाधितांपेक्षा इतर अर्थानुरूप तयार झालेली रूपे अधिक आढळतील. प्रकरणाच्या शेवटी वाक्ये, कथा, पाणी दिलेली आहेत. त्यात यांची उदाहरे सापडतील. तसेच वर काही धातू चालवून दाखविलेले आहेत त्यातून देखील त्यांचा प्रत्यय येईल.

पुढे वानगीदाखल काही मांडून दाखविलेली आहेत.

**(१) ऊन –**

| | |
|---|---|
| येंग – येंगून | मोड – मोडून |
| ऊसर – ऊसरून | संप – संपून |
| लोंबकळ – लोंबकळून | सोड – सोडून |
| लप – लपून | फेक – फेकून |
| फिर – फिरून | अयक – अयकून |
| मांग – मांगून | फोड – फोडून |
| पेटव – पेटून (पेटवून) | ऊस्तार – ऊस्तारून |



| | |
|---|---|
| जाळ – जाळून | घी / घे – घिऊन / घेऊन |
| कोर – कोरून | वाट – वाटून |
| आन – आनून | काप – कापून |
| पड – पडून | निघ – निघून |
| ये – येऊन | जन – जनून |

**(२) त –**

| | |
|---|---|
| जन – जनत | कुडुकुडु – कुडकुडत |
| खेळ – खेळत | वरड – वरडत |
| लाग – लागत | निज – निजत |
| घाव – घावत | रुत – रुतत |
| पळ – पळत | बागड – बागडत |
| हिंड – हिंडत | साळ – साळीत |
| कर – करीत | काढ – काढीत |

**(३) या –**

| | |
|---|---|
| मांग – मांगाया | बागड – बागडाया |
| हस – हसाला | निज – निजाया |
| ने / नी – निया | रुत – रुताया |
| काढ – काढाया | साळ – साळाया |

**(४) ता –**

| | |
|---|---|
| मांग – मांगता | फोड – फोडता |
| हस – हसता | काप – कापता |
| काढ – काढता | फेक – फेकता |
| जाळ – जाळता | पड – पडता |

**(५) ताना –**

| | |
|---|---|
| मांग – मांगताना | वाट – वाटताना |
| फिर – फिरताना | मोड – मोडताना |
| पळ – पळताना | कर – करताना |

**(६) नार**

| | |
|---|---|
| मांग – मांगनार | वाट – वाटनार |
| फिर – फिरनार | मोड – मोडनार |
| पळ – पळनार | कर – करनार |

**(७) ऊ**

मांग – मांगू ऊतर – ऊतरू

फिर – फिरू दळ – दळू

ना / व्हा – नाऊ कां – ड – कांडू

**(८) ला / लेला / लं / ली –**

पळ – पळलेला / ली / लं धर – धरलेलं / ला / ली

वाट – वाटलेला / ली / लं

**(९) ल–**

वाट – वाटेल पाड – पाडेल

धर – धरेल मार – मारेल

मोड – मोडेल कर – करेल

वरीलप्रमाणे डांगाणी भाषेतदेखील धातुसाधितांची प्रथा आहे. मध्यवर्ती मराठीपेक्षा ती फारशी वेगळी नसल्याने त्याची जास्त चर्चादेखील करण्याचे कारण नाही.

**अव्यये**

**(अ) क्रियाविशेषणे –**

स्थलवाचक – इड, तीठ, याअंगून, त्यांगून, जवळ, लाभ, संमदीकड, मांगून, म्होरून, चहूकड, वरतील्या अंगून, खालतील्या अंदून, भाईर, मंदी, इ.

कालवाचक – मांगून, सबा, आज, उंद्या, परायी, पंधरादिसा, लवकर, चपळकईना, ताबडतोब, झटक्यात, औंदा, पहिल्यादी, शेवट, लमीख्य, पाठुपाठ, कायम, थोड्या येळ, खिनमर, सवासांजच, सकाळच्यापारी, तिसऱ्या पहारा, आदुगर, कथाच, कवाचं, तरी, रातोरात, रातचा, दरदी, मंदीमंदी, दोनतीनवार, लईदा.

संख्यावाचक – किंवा परिणामवाचक – लई, आखं, समदं, पाक, मुदलीच, पका, उलिसा, जरा, आजून, कवचित, बस, बेताचा, बेतशीर, हळूहळू, थोडाथोडा, घासघास इ.

रीतिवाचक – उगीच, एरीचा/एहरीच, सहज, फुक्काट, बरा, असा, अपाक, दाटून, हून, सवताच, निदान, गप, गपागपा इ.

**(ब) शब्दयोगी अव्यये –**

मंदी, पुढं, म्होरं, अलकड, वरती, खाली, मांग, बाहीर, अदुगर, मंदून, पून, पहोत, कडूनाकून, कारन, करता, कूळ, क, हातून, संबंधी, वाचून, इरहित, यगळा, पैकी, पोटी, बद्दल, जागी, बदल्यात, योग्य, सारका, सरसा, उलट, बरुबर, पण, सुदिक, देखील, पुरता, पसा.

**(क) उभयान्वयी अव्यये –**

आम, आणि, आणिक, का (किंवा), नहीत, पन, परंतु, म्हून, यव्हढ्यासाठी, कारनका, जर, तर.

**(ड) केवलच्योगी अव्यये –**

त्यहां, हत्ये, अगग, अबाबो, अगाई, हाड, हड, धू, इबया, वा, मले, शाबास, फूस, गप, हां, इ.

उपरोक्य अव्ययांची यादी ही पूर्ण आहे असे नव्हे. ती केवळ उदाहरणे आहेत. त्यांचे या प्रकरणात डांगाणी भाषेचा स्थूल अभ्यास करायाचा असल्याने एवढे पुरेसे आहे.

यानंतर पालुपदांचा विचार करून या प्रकरणाला आधारभूत असा भाग मांडण्याचा प्रयत्न झाला आहे.

**(इ) पालुपदे –**

ह्या, म्हन, त मंग, उजुक, मंग, त्यंठ, आनमंग, आक, परत, आता, का इ. येथवर मराठी व्याकरणाच्या आराखड्याप्रमाणे डांगाणी भाषेचा वर्णनात्मक भाषावैज्ञानिक अभ्यास मांडला. त्यावरून डांगाणी भाषेची ढब, वळणे आणि व्यवस्था लक्षात येते.

## वाक्ये

भाषिक अभ्यासास पुरक आणि जमातनिहाय तुलनात्मक भाषाविज्ञान अभ्यासण्यासाठी मध्यवर्ती मराठी भाषेची जमातवार भाषेतील वाक्यरचना आणि शब्दरूपे व अर्थ समजण्यासाठी येथे भाषासारणी तक्ता पुढील पानापासून देत आहे.

# वाक्ये

| वाक्य क्र. | वाक्ये | मध्यवर्ती मराठीतील बोली भाषा | महादेव कोळी बोली भाषा इतर जाती (१२ बलुते इ.) | ठाकर कानडे व | तलवार हाटकर कानडे |
|---|---|---|---|---|---|
| १) | हे कुत्रे आहे | ह्या कुत्रा आहे | ह्या कुत्रा आहे | मध्यवर्ती | नाय अओीता |
| २) | ही कुत्री आहेत | ह्या कुत्री आह्यात | ह्या कुत्री आह्यात | मराठी | नाय अओीता |
| ३) | ती तीन कुत्री आहेत | ती तीन कुत्री आह्यात | ती तीन कुत्री आह्यात | प्रमाणे | यू मूर नाय अशी घो. |
| ४) | ही मांजर आहेत | ही मांजर आहे | ही मांजार आहे | बोलण्याचा | एक अओीता |
| ५) | ह्या दोन मांजरी आहेत | ह्या दोन मांजरी आह्यात | हा दोन मांजरी आह्यात | प्रयत्न | धड्डुं एका अओी घो. |
| ६) | येथे एक कुत्रे व एक मांजर आहे | इड एक कुत्रा अन एक मांजर आहे | यड याक कुत्रा आन याक मांजार आहे | करतात<br>--''-- | उननाय बंद नाया बंद नेक |
| ७) | कुत्रा गायीवर भुंकतो | कुत्रा गायीवर भुंकतो | कुत्रा गायीव भुकात | --''-- | नाय अयिन्या बगोत |
| ८) | कुत्रा भुंकतो | कुत्रा भुकतो | कुत्रं भुकात | --''-- | नाय बगोत |
| ९) | हे घर आहे | ह्या घर आहे | ह्या घर आहे | --''-- | मानी अइता |
| १०) | ही दोन घरे आहेत | ह्या दोन घरं आह्यात | ह्या दोन घरां आह्याती | --''-- | यडु मान्या |
| ११) | हे घर माझे आहे | ह्या माझा घर आहे | ह्या माझवाला घर आहे | --''-- | नांद मान्या |
| १२) | ही माझी घरें आहेत | ह्या मनी घरा आह्यात | ह्या मयावाली घरां आह्यात | --''-- | नांद मान्या |
| १३) | त्याचे घर | त्याचा घर | त्याचा घर | --''-- | आर मान्या |
| १४) | त्यांची घरे | त्यांची घरा | त्यांची घरा | --''-- | आरध मान्या |
| १५) | तुझे घर | तुझा घर | तुझा घर | --''-- | नातृ मान्या अइत |
| १६) | तुझीं घरे | तुझ घरां | तुझी घरां | --''-- | नीत मान्या अइत |
| १७) | मा माझ्या घरात आहे | मी मह्या घरात आहे | मी माजल्या घरात आहे. | --''-- | ना नांद मान्या आंधान |
| १८) | माझ्या घरी जा | मह्या घरी जाय | मह्यावाल्या घरी जाय | --''-- | नांद मान्या होग |
| १९) | माझे घर लहान आहे | मवा घर बारीक आहे | मह्यावाला घर बारीक आहे. | --''-- | नांद मानी बारस आईक |
| २०) | ही पाच घरे आहेत | ही पाच घरां आह्यात | ही पांच घरां आह्यात | --''-- | अईध मान्या अईधो |
| २१) | ही छोटी बैलगाडी आहे | ही बारीक बैलगाडी आहे | ही बारीक बैलगाडी आहे | --''-- | ईझ बारीक गाडी अईत |
| २२) | ह्या दोन मोठ्यागाड्या आहेत | ह्या दोन मोठाल्यागाड्या आह्यात | ह्या दोनमोठ्यागाड्या आह्यात | --''-- | भू मडृ गाडी अईधो |
| २३) | हे माझे पुस्तक आहे | ह्या माझा पुस्तक आहे. | ह्या मजवाला पुस्तुक आहे | --''-- | ईध नांद पुस्तका अईत |
| २४) | मला दोन पुस्तके आहेत | मला दोन पुस्तका आह्यात | मला दोन पुस्तुका आह्यात | --''-- | नानी मडू पुस्तका अईधो |
| २५) | माझी पुस्तके येथे आहेत | मई पुस्तका इठ आह्यात | मई पुस्तका यठ आह्यात | --''-- | नान पुस्तका इल्लीम अइधी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६) | मी माझ्या गाडीत आहे | मी मया गाडीत आहे | मी माजवाले गाडीत आहे | --''-- | नान गाडी अईधान |
| २७) | माझ्या गाडीशी जा | मया गाडीपशी जाय | माजवाल्या गाडीपाशी जाय | --''-- | नान गाडीत हो ग |
| २८) | माझे पुस्तक येथे आण | मया पुस्तक इठ आण | माजवाला पुस्तक यठ आण | --''-- | नान पुस्तका आता |
| २९) | तो माझा पिता आहे. | तो मया बाप आहे | तो माजवाला बा आहे | --'-- | अध मान आप अईत |
| ३०) | हा माझा मुलगा आहे | हा मवा पोऱ्या आहे | हा मवा पोऱ्या आहे | --''-- | नांग बंद पोर अईत |
| ३१) | मला एक मुलगा आहे | मला एक पोऱ्या आहे | मला योक पोऱ्या आहे | --''-- | बंद नान मतान अईत |
| ३२) | मला दोन मुले आहेत | मला दोन मुलां आहात | मली द्वान पोरां आह्यात | --''-- | नान मडृ पऱ्या गोळाअईधो |
| ३३) | मला तीन मुले आहेत | मला तीन मुलां आहात | मला तीन पोरां आह्यात | --''-- | नांग मूर पऱ्या गोळअईधो |
| ३४) | माझा मुलगा घरात आहे | महा/मवा पोऱ्या घरात आहे | माजवाला पोऱ्या घरात आहे | --''-- | नांद प्वार मान्या अईत |
| ३५) | माझी मुले घरात आहेत | मही पोरा घरात आह्यात | माजवाली पोरां घरात आह्यात | --''-- | नांदपऱ्यागोळमान्या अईधो |
| ३६) | माझा मुलगा आला | मवा पोऱ्या आला | मवा पोऱ्या आला | --''-- | नांद पोर बत |
| ३७) | माझी मुले आली | मही पोरा आली | माजवाली पोरा आली | --''-- | नांद पऱ्या गोळ बांदव |
| ३८) | त्याचा मुलगा | त्येचा पोऱ्या | त्येचा पोऱ्या | --''-- | आर मार |
| ३९) | त्याची मुले | त्येची पोरा | त्येची पोरा | --''-- | आर प्वार |
| ४०) | त्याची मुले येथे आहेत | त्येची पोरा इठ आह्यात | त्येची पोरा यठ आह्यात | --''-- | आर माग लिंगईत |
| ४१) | तुझा मुलगा येथे आहे | तुवा पोऱ्या इथं आहे | तुजवाला पोऱ्या यठ आहे | --''-- | नांद माग लिंगईत |
| ४२) | तुझी मुले घरात आहेत | तुही पोरं घरात आह्यात | तुजवाली पोरा घरात आह्यात | --''-- | नांद पुरक मानीघो |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३) | ती माझी आई आहे | ती मई आई आहे | ती मायावाली आई आहे | --''-- | अद नाभीचा आईत |
| ४४) | ती माझी मुलगी आहे | ती मही पोर आहे | ती मही पोर आहे | --''-- | आदमान मगळ आईत |
| ४५) | मला एक मुलगी आहे | मला एक पोर आहे | माल योक पोर आहे | --''-- | नांग वंद मगळ आईत |
| ४६) | मला दोन मुली आहेत | मला दोन पोरी आह्यात | मला दोन पोरी आह्यात | --''-- | मांगयडरू मगळवीरआहिदो |
| ४७) | मला तीन मुली आहेत | मला तीन पोरी आह्यात | मला तीन पोरी आह्यात | --''-- | नांग मोर मागदीर |
| ४८) | माझी मुलगी बागेत आहे | मही पोर बागात आहे | मजवाली पोर बागात आहे | --''-- | नाग मगळ बागेर आईत |
| ४९) | त्याची मुलगी येथे आहे | त्येईची पोर इठ आहे | त्येईची पोर याठ आहे | --''-- | नातामगळ लिंग आईत |
| ५०) | तुझ्या मुलीला बोलाव | तुझ्या पोरीला बोलाव | तुह्या पोरीला गाग | --''-- | इन मगळ इक लकारी |
| ५१) | ती तुझी बहीण आहे | ती तुही बहीण आहे | ती तुजवाली बहीण आहे | --''-- | नांग तंगईत |
| ५२) | माझे भाऊ आणि बहीण | मवा भाव आन बहीण | माजवाला भाव आणि | --''-- | नान तंगमानी आईत नना |
| | घरात आहेत | घरात आह्यात | बहीणी घरात आहेत | बाहुट मान्या | |
| ५३) | त्याला तीन मुले आहेत | त्येला तीन पोरा आह्यात | त्येला तीन पोरा आह्याती | --''-- | मोर मागुद आहिदो |
| ५४) | त्याची मुले मोठी आहेत | त्येची पोरा मोठी आह्यात | त्येईची पोरी मठाली आह्यात | --''-- | आर मागुद दाडु आहिदो |
| ५५) | त्याची मुले कोठे आहेत | त्येची पोरा कुठं आह्यात | त्येईची पोरा कुहिक आह्यात | --''-- | आर मागदीर लिंग आहिदो |
| ५६) | माझी मुले शाळेत आहेत | मही पोरा साळात आह्यात | महावाली पोरा साळात | --''-- | आर मागदीर शाळेने |
| | | | आह्यात | आहिदो | |
| ५७) | तुझा मुलगा शाळेत | तुहा पोरगा साळात गेला | तुजवाला पोरा साळात गेला | --''-- | आर माग शाळेला हादी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | गेला आहे | | | | |
| ५८) | माझा भाऊ मोठा आहे | मवा भाव मोठा आहे | मवा भाव मठरा आहे | --''-- | नना आहुड दादड आईत |
| ५९) | माझे दोन भाऊ मोठे आहेत | माह्यावालं दोन भाऊ मोठे आहेत | म्हवं द्वान भाव मठ आहे | --''-- आहिदो | यडरू वाईड दाडरू |
| ६०) | हा तिचा मुलगा आहे | हा तिचा पोऱ्या आहे | हा तिजवाला पोऱ्या आहे | --''-- | आदार मागईत |
| ६१) | तुझी मुले येथे आहेत | तुही मुला इठ आह्यात | तुही पोरा यठ आह्यात | --''-- | आर मागदीर लिंग आहिदो |
| ६२) | त्यांची मुलेदेखील येथे आहेत | त्येंची पोरा इठ आह्यात | त्येंची पोरा बी यठ आह्यात | --''-- | आर मागदीर लिंग आहिदो |
| ६३) | माझा हात | महा हात | माजवाला हात | --''-- | नान कई |
| ६४) | माझे हात | मह हात | माजवाला हात | --''-- | नान कई |
| ६५) | तुझा पाय | तुहा पाय | तुजवाला पाय | --''-- | नान काल |
| ६६) | तुझे पाय | तुह पायी | तुह्यावालं पायी | --''-- | नान काल |
| ६७) | आमचे पुस्तक | आमचा पुस्ताक | आमच्यावाला पुस्तुक | --''-- | अर कागद |
| ६८) | आमची पुस्तके | आमची पुस्तका | आमच्यावाली पुस्ताका | --''-- | अर कागद |
| ६९) | त्याचा नोकर | त्येचा नवकर | त्येचा नवकर | --''-- | आर नौकरींद |
| ७०) | त्याचे नौकर | त्येचं नवकर | त्येच्यवालं नवकर | --''-- | आर गडीया ऐत |
| ७१) | त्यांचे घर | त्यांचा घर | त्यांचा घर | --''-- | नान मानी हिंगागो |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७२) | आम्ही तुला पाहातो | आम्ही तुला हेरितो | आम्ही तुज हरिता | --''-- | नील ना हेरस्तन |
| ७३) | मला भेट | मला भेट | माल भेट | --''-- | नोन्या रिहेत |
| ७४) | तो मला भेटतो | तो मला भेटतोय | तो माल भेटतोय | --''-- | अदनांग न्यारीहेत |
| ७५) | आम्हाला भेट | आम्हाली भेट | आम्हाल भेट | --''-- | नोन न्यारिहेत |
| ७६) | ती मला भेटतो | ती मला भेटतीये | ती माल भेटतीये | --''-- | अदनांग न्यारिहेत |
| ७७) | मुलगा त्याला भेटतो | पोऱ्या त्याला भेटतोय | पोऱ्या त्येल भेटतोय | --''-- | मागु मतान दिनईतो |
| ७८) | तिचे काम | तिचा काम | तिच्यावाला काम | --''-- | आदार कॅलस |
| ७९) | तिचे डोळे | तिचे डोळ | तिच्यावालं डोळं | --''-- | आदार कन |
| ८०) | मुलाचे हात | पोराचं हात | पोराचं हात | --''-- | बारकान पुरळकई |
| ८१) | मुलाचे हात लहान आहेत | पोराचं हात बारीक आहेत | पोराचं हात बारूक आहेत | --''-- आहिदो | बारकन पुरळकई बारकाई |
| ८२) | त्याचे शेत | त्याचा श्यात | त्येता श्यात | --''-- | अरचरी |
| ८३) | त्याची टोपली | त्येची टोपली | त्येच्यावाली टोपली | --''-- | अरपुट्टी |
| ८४) | मी तुला भेटतो | मी तुला भेटतोय | मा तुल भेटतु | --''-- | नानींग नहरी तान |
| ८५) | त्यांची घरे | त्येईची घरा | त्याच्यावाली घरा | --''-- | इदोर मानी |
| ८६) | ती मुलं तिला भेटतात | त्या प्वार तिला भेटताय | त्या प्वार तिला भेटतां | --''-- | यु मगडार मेरिथी |
| ८७) | ते तुला भेटतात | ते तुला भेटत्यात | ते तुल भेटत्यात | --''-- | अदनांग भेटनेरिथी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८८) ते मला भेटतात | ते मला भेटत्यात | त्ये माल भेटत्यात | --''-- | अदनांग मेरिथी |
| ८९) मी त्याला भेटतो | मी त्याला भेटतो | मा त्याला भेटतु | --''-- | नादक निरियान |
| ९०) मी तिला भेटतो | मी तिला भेटतोय | मा तिल भेटतु | --''-- | नादु निरयिन |
| ९१) मी त्यास भटतो | मी त्याला भेटतो | मा त्याला भेटतु | --''-- | नादुक न्यारे उथान |
| ९२) मी त्यांना भेटतो | मी त्येंली भेटतो | मा त्येंली भेटतु | --''-- | नादु न्यारेली हुना |
| ९३) त्याला भेट | त्येला भेट | त्येल भेट | --''-- | आदुक न्यारी लहू |
| ९४) तिला भेट | तिला भेट | तिल भेट | --''-- | मी आदक न्यारी |
| ९५) मी येथे येतो | मी इठ येतो | मी यठ येतु | --''-- | नाय इद बरतन |
| ९६) आम्ही येथे येतो | आम्ही इठ येतो | आम्ही यठ येतु | --''-- | नाय इद लिंबरया |
| ९७) इकडे ये | इकड यी | इकड यी | --''-- | इत लाआ |
| ९८) इकडे या | इकड या | इकड या | --''-- | इतला कुंडरी लगा |
| ९९) तो माझ्याकडे येतो | तो माह्याकडे येतोय | तो माह्याक येतो | --''-- | अदनांग मान्या बरथे |
| १००) ती आमच्या घरी येते | ती आमच्या घरी येतेय | ती आमच्या घरी येतेय | --''-- | |
| १०१) ते शाळेत येतात | ते साळात येत्यात | ते साळंत येतीयात | --''-- | अस शाळेतौ रथे |
| १०२) मूल येथे येते | प्वार इठ येताय | पोर यठ येताय | --''-- | पुरळी लिंबरथु |
| १०३) मुले बागेत येतात | पोरा बागात येत्यात | पोरा बागामंदी येत्यात | --''-- | पुरळ बागेनाथी |
| १०४) मी तेथे जातो | मी तीठ जातो | मा तेठ जात | --''-- | नाय लिंगाथोन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०५) आम्ही येथे जातो | आम्ही इठ जातो | आम्ही यठ जातु | --''-- | ना लिंगोधान लिंघो |
| १०६) तेथे जा | तीठ जाय | तेठ जाय | --''-- | अतला होग |
| १०७) तिकडे जा | तिकड जाय | तिक जाय | --''-- | अदलिंग हनती |
| १०८) तो तेथे जातो | तो तीठ जातोय | तो तेठ जातोय | --''-- | अदलिंग हचींथी |
| १०९) ती तेथे जाते | ती तीठ जातेय | ती तेठ जाती | --''-- | अदलिंग होयर अईत |
| ११०) ते तेथ जातात | ते तीठ जात्यात | ते तेठ जात्यात | --''-- | नमान मान हनतान |
| १११) मी घरी जातो | मी घरा जातो | मा घरी जातू | --''-- | नम लिंग थआंबुस्तान |
| ११२) आम्ही येथे थांबतो | आम्ही इठ राहातु | आमी यठ राहातु | --''-- | मर न्ययाली बिलथु |
| ११३) झाडातून पाने पडतात | झाडातून पाना पडत्यात | झाडीमंदुन पाना पडात्यात | --''-- | पक्षी मारेन्या कुंती |
| ११४) पक्षी झाडावर बसतात | पाखरा झाडाव बसात्यात | पाखरा झाडाव बसत्यात | --''-- | मारन वऱ्याड निसूर मुंगी |
| ११५) तो झाडाखाली गाढ झोपला | तो झाडाखाली मस्त निजला | तो झाडाखाली मस्त निजला | --''-- | पक्ष्यांकुंतो |
| ११६) तो पक्ष्यास मारतो | तो पाखराला मारितोय | तो पाखराल मारितोय | --''-- | पक्षी हारतो |
| ११७) पक्षी उडतात | पाखरा उडात्यात | पाखरा उडात्यास | --''-- | पाखरं राबिना आहिदो |
| ११८) जनावरे शेतात आहेत | जनावरा शेतात आह्यात | जनावरा शेतात आह्यात | --''-- | बस्त आडथु |
| ११९) गायी चरत आहेत | गायी चरता आह्यात | गायी चरात्यात | --''-- | आव आल कुडथी |
| १२०) गायी दूध देतात | गायी दूध देत्यात | गायी दूध देत्यात | --''-- | आईन हाल मागितू |
| १२१) आम्ही गायीची धार | आमी गायीची धार काढितोय/ | आमी गायीची धार काढितोय/ | --''-- | आईन हाल मागितु अइधो |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | काढतो | आमी गायी पाजितोय | आमी गायी पाजितोय | --''-- | |
| १२२) | आम्ही घोड्यावर स्वार होतो | आमी घोड्याव बसला होतो | आमी घोडेव बसलु होतु | --''-- (नाकुंदरान) | कुंदरा नाकुंदारान |
| १२३) | ते कुंपनावरून उडी मारतात | ते कुपनावरून उडी मारित्यात | ते कुंपनावरून उडी मारित्यात | --''-- | अदबिलेन अंववार हारथी |
| १२४) | मूल खाली पडते | पोर खाली पडताय | प्वार खाली पडातु | --''-- | प्वार बुडुक्कीदी |
| १२५) | तो तेथे उभा राहतो | तो सीठ उभा रहेतो | तो तेठ उभा रहेतो | --''-- | अद अलिंगा यवी निते |
| १२६) | तो त्या घरी जातो | तो त्या घरी जातो | तो ते घरी जातो | --''-- | अद आमान्या व्हादे |
| १२७) | मुलगा येथे बसत आहे | प्वार इड बसत आहे | प्वार यठ बसत आहे | --''-- | अली प्वार कुंडी थे |
| १२८) | तू काय खातोस | तू काय खातोय | मा भाकर खातो | --''-- | नामकरी तिथा |
| १२९) | तुला किती मुले आहेत? | तुला काय पोरां आह्यात? | तुला किती पोरां आह्यात? | --''-- | नांम भडू परक अइ धो? |
| १३०) | मला तीन मुले आहेत | मला तीन पोरा आह्यात | मला तीन पोरा आह्यात | --''-- | मांग मूर परक अइ धो |
| १३१) | तुझे नांव काय? | तुहा नाव काय? | तुहा नाव काय | --''-- | निंद अरु येन |
| १३२) | माझे नाव रामजी | महा नाव रामजी | माजवाला नाव रामजी | --''-- | नांद हेस्त्र शरद |
| १३३) | तू काय वयाचा आहेस? | तू काय वयाचा आहे? | तू काय वयाचा आहे? | --''-- अइ धो | नोग्याइर्द क्या वयान |
| १३४) | मी बावीसवर्षांचा आहे | मी बावीस वर्षांचा आहे | मी बाइस वर्षांचा आहे | --''-- युवक यठ उंब्ध हस्त | वंद यहुनूर नाक अइध आर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३५) | तू केंव्हा उठतोस? | तू कवा उठतोस? | तू कंधीउठतोय? | --''-- | य वाग यळथा? |
| १३६) | मी सहा वाजता उठतो | मी सहा वाजता उठतोय | मा सहा वाजता उठतू | --''-- | आर वधीर धो |
| १३७) | तू कोठे राहतोस? | तू कोठे रहे तोय? | तू कुठ रहे तो | --''-- | तल्ली नीडस्थान |
| १३८) | मी कोदनीत राहतो | मी कोदनीत राहतो | मा कोदनीत रहेतो | --''-- | कोदनी निडरथान |
| १३९) | तू काय करतोस | तू काय करतोय ? | तू काय करीतोय? | --''-- | कॅलसा माडथान? |
| १४०) | मी शेतात काम करतो | मी शेतात काम करितो | मा शेतामंदी काम करीतू | --''-- | बरीब कॅलसा माडथोन |
| १४१) | मी दुसऱ्या गावात काय करतो | मी दुसऱ्या गावात काम करीतोय | मा दुसरे गावामंदी काम करीतु | --''-- माडथान | दिसव्या उरा कॅलसा |
| १४२) | मी येथे आहे | मी इठ आहे | मी यठ आहे | --''-- | माग्र लिंग यडरथान |
| १४३) | आम्ही येथे आहोत | आमी इठ आहोत | आमी यठ आहोत | --''-- | माइ लिंग यडरथान |
| १४४) | तू येथे आहेस | तू इठ आहे | तू यठ आहे | --''-- | निलिंग अइधा |
| १४५) | तुम्ही येथे आहात | तुमी इठ आहात | तुमी यठ आहात | --''-- | निलींग निडंरथा |
| १४६) | तो तेथे आहे | तो इठ आहे | तो यठ आहे | --''-- | अनिलींग निंडरथा |
| १४७) | ती येथे आहे | ती इठ आहे | ती यठ आहे | --''-- | अली इलींग निडरथे |
| १४८) | तो येथे आहे | तो इठ आहे | तो यठ आहे | --''-- | इलिंग निडरथे |
| १४९) | ते येथे आहेत | ते इठ आहेत | ते यठ आहेत | --''-- | इलिंग निडरथे |
| १५०) | मी उंच आहे | मी उच आहे | मा उच आहे | --''-- | अद अइधान |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५१) तू उंच आहेस | तु उच आहे | तू उचं आहे | --''-- | म उद्रू अइधान |
| १५२) ती उंच आहे | ती उच आहे | ती उच आहे | --''-- | उद अइधान उद्दइना |
| १५३) तो उंच आहे | तो उच आहे | तो उच आहे | --''-- | उद्दइता |
| १५४) आम्ही उंच आहोत | आमी उच आहोत | आमी उच आहो | --''-- | उद्दा |
| १५५) ते उंच आहोत | ते उंच आहेत | ते उच आहेत | --''-- | अद्दा |
| १५६) ते उंच आहे | ते उच आहे | ते उच आहे | --''-- | अद्दा |
| १५७) हे झाड उंच आहे | ह्या झाड उच आहे | ह्या झाड उच आहे | --''-- | मार उद्द अहिता |
| १५८) ती टेकडी उंच आहे | ती टेकडी उच आहे | तो टेकाड उच आहे | --''-- | ओटकडी उदइता |
| १५९) तो माणूस उंच आहे | तो माणूस उच आहे | तो मनुष्य उच आहे | --''-- | उद्द अइता |
| १६०) ती माणसे उंच आहेत | त्या माणसं उंच आह्यात | त्या माणुसा उच आह्यात | --''-- | अमनात्रा उद अइता |
| १६१) तो माणूस जाडा आहे | तो माणूस जाड आहे | तो माणूस जाड आहे | --''-- | अमनुषा घुमड अइता |
| १६२) तो माणूस बुटका आहे | तो माणूस बुटा आहे | तो माणूस बुटा आहे | --''-- | मिड अइता |
| १६३) तो माणूस आंधळा आहे | तो माणूस अंधळा आहे | तो माणूस अंधळा ाहे | --''-- | आमनुषा आंधळा अइता |
| १६४) ती स्त्री अंधळी आहे | ती ठायी आंधळी आहे | ती काय आंधळी आहे | --''-- | आउ आंधळा अइतां |
| १६५) तो लंगडा आहे | तो लंगडा आहे | तो लंगडा | --''-- | आद लंगडीया अइता |
| १६६) ती शहाणी आहे | ती शहाणी आहे | ती शहाणी आहे | --''-- | बारख्यान अहिता |
| १६७) तो मुलगा आळशी आहे | त्या प्वार आळशी आहे | त्वा पोर आळशी आहे | --''-- | आजी आळशा अहिता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६८) ती मुलगी हुशार आहे | ती पोर हुषार आहे | ती पोर हुषार आहे | --''-- | वद वनूंद अहिता |
| १६९) बांगला मुलगा | बांगल प्वार | बांगल पोर | --''-- | बुनूंदा (अप्वार बुनूंद) |
| १७०) बांगली मुलगी | बांगल पोर | बांगल पोर | --''-- | हेन्ना वुनूंद |
| १७१) लहान मुल | बारीक प्वार | बारीक पोर | --''-- | बारख्यादं अइना |
| १७२) लहान मुलगा | बारीक प्वार | बारीक पोर | --''-- | बारख्यांद अइता |
| १७३) मोठी पेटके | मोठी पेटी | मठी पेटी | --''-- | द्वाड पेटी |
| १७४) मोठे पुस्तक | मोठा पुस्तक | मठा पुस्तुक | --''-- | ब्दाब्द पुस्तका अइता |
| १७५) पांढरा घोडा | धवला घोडा | धवला घोडा | --''-- | विली बुद्री |
| १७६) पांढरे घोडे | धवळ घोड | धवळ घोड | --''-- | खिळी बुद्री |
| १७७) काळा ढग | काळा ढग | काळा ढग | --''-- | कारीड व्हट्टे |
| १७८) काळे ढग | काळ ढग | काळा ढग | --''-- | करीढ |
| १७९) हिरवे पान | हिरवा पान | हिरवा पान | --''-- | हात नांदी याली |
| १८०) हिरवी पाने | हिरवी पानां | हिरवी पानां | --''-- | हात वांदी याली |
| १८१) मोठे घर | मोठा घर | मठा घर | --''-- | ब्दाड माने |
| १८२) मोठी घरे | मोठी घरा | मठी घरां | --''-- | ब्दाड माने |
| १८३) सुंदर गाव | मस्त गाव | मस्त गाव | --''-- | जुन्नु उर अइना |
| १८४) सुंदर गावात | मस्त गावात | मस्त गावामंदी | --''-- | चुन्नुंदा उर अहिता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८५) | ती गोष्ट चांगली आहे | ती मोठ चांगल आहे | ती मोठ चांगल आहे | --''-- | अद्दमाताड चुनुद अइता |
| १८६) | इकडे ये | इकड यी | इक यी | --''-- | इत लावा |
| १८७) | तीकडे जा | तीकड जाय | तीक जाय | --''-- | अतला होम |
| १८८) | घोड पाणी आण | घोडा पाणी आण | उलसाक पाणी आण | --''-- | उलसानी धिरंधा |
| १८९) | त्याला बोलाव | त्येला बोलाव | त्येला माम | --''-- | अद्दक्कारी |
| १९०) | खाली बैस | खाली बस | खाली बस | --''-- | बूड कुंड |
| १९१) | तो माझ्याकरीता पुस्तक आणतो | तो मह्यासाठी पुस्ताक आणितो | तो माझेसाठी पुस्तक आणितो | --''-- तरथे | अद नांदकरता पुस्तक |
| १९२) | मी पहिला आलो | मी पहिला आलो | मी पहिला आलू | --''-- | नमुंद बन्ना |
| १९३) | हे झाड आहे | ह्या झाड आहे | ह्या झाड आहे | --''-- | माइ अहिता |
| १९४) | मी झाडावर चढलो होतो | मी झाडाव बदलू होतू | मी झाडाव बदलू हातु | --''-- | मार मान्या बुंतीन |
| १९५) | मी फांदीला लोंबकळत आहे | मी फांदीला लोंबकळत आहे | मी फांदीला लोमकळत आहे | --''-- | मार मान्या कुंतीन |
| १९६) | मी झाडावरून पडलो | मी झाडावरून पडलू | मी झाडावरून पडलू | --''-- | मार मान्या मरीनां |
| १९७) | त्या झाडाचा उपयोग काय? | त्या झाडाचा उपयोग काय? | ते झाडाचा उपयोग काय? | --''-- | इमार उपयोगा तीनं? |
| १९८) | झाडात घरटे आहेत | झाडात किडं आह्यात | झाडात किडं आह्यात | --''-- | मरना हुळ हुइदो |
| १९९) | झाडावर घरटे आहे | झाडावर कोटा आहे | झाडावर कोटा आहे | --''-- | मरना क्काटी |
| २००) | मी झाडाखाली बसलो | मी झाडाखाली बसलू | मी झाडाखाली बसलू | --''-- | मारी वाळा कुंतन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०१) | कावळे झाडावरून उडतात | कावळ झाडावरून उडत्यात | कावळ झाडावून बुडत्यात | --''-- | कावळे मॅगीनो उडं खारनो |
| २०२) | झाडाच्या खाली घर आहे | झाडाच्या खाली घर आहे | झाडाच्या खाली घर आहे | --''-- | मारना बुडखो मान्याइत |
| २०३) | मी घराच्या बाजूला उभा राहिलो | म घराच्या बाजुला उभा राहिलो | मी घरापाशी उभा राहिलो | --''-- | मना हत्यारा नितीना |
| २०४) | तो मोठ्या झाडावरून खाली पडला | तो मोठ्या झाडावरून खाली पडला | तो मठ्या झाडावून खाली पडला | --''-- | द्वाड मार नांदया |
| २०५) | त्या झाडापासून दूर जा | त्या झाडापासून लोंब जाय | त्ये झाडापुन लांब जाय | --''-- | मारन्या दूर ल्यांद बीत |
| २०६) | त्या झाडासाठी ये | ह्या झाडाखाली यी | ह्या झाडाखाली यी | --''-- | मारन केल्ग बा |
| २०७) | झाडाच्या मुळ्या जमिनीत आहेत | झाडाच्या मुळ्या मुइत आह्यात | झाडाच्या मुळ्या मुइत आह्यात | --''-- | मारन मूळीनें लद अईधो |
| २०८) | पक्षी झाडावर बसतात | पाखरा झाडाव बसत्यात | पाखरां झाडाव बसत्यात | --''-- | पक्षास माझ्या कुंतीओ |
| २०९) | तो झाडाभोवती फिरतो | तो झाडा भोवतीना फिरतो | तो झाडाभवती फिरतोय | --''-- | मारन मांगता तिथीये |
| २१०) | पान घेवून तो येथे आला | पान घेवून तो इक आला | पान घेवून तो यल आला | --''-- | याळा इल्लिग तथ |
| २११) | तो आमच्यात उंच आहे | तो आमच्यामं धडिंब आहे | तो आमचे मंधी उच आहे | --''-- | अद नम्राउद अइत |
| २१२) | तो आमच्या पेक्षा उंच आहे | तो आमचे पासून उंच आहे | तो आमचे पासून उंच आहे | --''-- | अद नमापसूम उधउ आइन |
| २१३) | त्या झाडाला पाणी घाल | त्या झाडाला पाणी घाल | त्या झाडाला पाणी घाल | --''-- | अमार निरसूस |
| २१४) | ते झाड भूतासारखे दिसते | त्या झाड भूतासारखे दिसताय | त्या झाड भूतासारखा | --''-- | अमार नाम भुतेना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिसाताय | | |
| २१५) | मी काही म्हटलो नाही | मी काही म्हंणालो नाही | मी काही मणलो नाय | --''-- | नांद हेडतेल |
| २१६) | मी कसा बोलतो | मी कसा बोलतूय | मी कसा बोलतु | --''-- | नांग मातडतंन |
| २१७) | तू असे म्हणावयास<br>इथे होते | त्या असा म्हणायला<br>लागत होता | त्या असा म्हणायची | --''-- | न्यू हिंग मर्तडोघ इरोध |
| २१८) | तो कोण आहे? | तो कोण आहे? | तो कोण आहे? | --''-- | अद येउध अइन |
| २१९) | तो पुरुष आहे | तो पुरुष आहे | तो कुवा आहे | --''-- | अद गन्स अइत |
| २२०) | त्याला तसे बोलू नकोस | त्याला तसा बोलू नकू | त्याला तसा बोलू नकू | --''-- | अद की मानू मताड अंडी |
| २२१) | ते शब्द चांगले नाहीत | ते शब्द चांगले नाहीत | ते शब्द चांगल नाहीत | --''-- | अद इल |
| २२२) | ते घर आहे | त्या घर आहे | त्या घर आहे | --''-- | अद माने अइत |
| २२३) | ते घर कोनाचे आहे | त्या घर कोनाचा आहे | त्या घर कोनाचा आहे | --''-- | अद माने आरद अइत |
| २२४) | ते माझे घर आहे | त्या मवा आहे | त्या माझा आहे | --''-- | अंद नांद अइत |
| २२६) | तू त्यासाठी काय दिले? | तू त्येल्यासाठी काय दिला | त्या त्येल्यासाठी काय दिला | --''--<br>अनियान कॉट | आर कतियान |
| २२५) | मा ते काम करू शकत<br>नाही | मा त्या काम करीत नही | मा त्या काम करू सकत<br>नही | --''-- | अद कॅल्सामा माडतोल |
| २२६) | ते मला निचारतीला | ते मला हवारतील | ते माल इवारतील | --''-- | अद मांग केळ हेव |
| २२७) | माझ्याजवळ काहीही नाही | मी तुला एकटा सोडणार नाही | मा तुल येकल सोडणार नही | --''-- | नींग यांदकी यीडगार इल |
| २२८) | हे कसे करायचे तू<br>शिकलास का? | हे कसा करायचा तू<br>शिकला का? | ह्या कसा कराया तू<br>शिकलाय का? | --''-- | नीहयांग बलूत कोंड |
| २२९) | मी ते करू शकत नाही | मी त्या करीत नाही | मी त्या करू शकत नही | --''--<br>काम मांडलील | अदु कॅलसाना |
| २३०) | सर्व तिकडे गेले | सगळ तिकडं गेलं | सगळं तिकडं गेल | --''-- | आस्वातला व्हादो |
| २३१) | मी सर्वांनंतर आलो | मी सगळ्याल्या मांगून आलो | मी सगळ्यांच्या मांगून आलू | --''--<br>बोलगोनन्स बांधी | आसू आँधोमला |
| २३२) | तो सर्वात मोठा मुलगा<br>आहे | तो सगळ्यात मोठा पोऱ्या<br>आहे | तो सगळ्यात मोठा पोऱ्या<br>आहे | --''-- | आस रागू मूंदीन माग |
| २३३) | ते गेले | त्या गेला | त्या गेला | --''-- | मी माइद |
| २३४) | ते शक्य नाही | त्या शक्य नाही | ते शक्य नही | --''-- | नीवान माइदी सऱ्याइल |
| २३५) | आ रात्र आहे | आता रात्र आहे | आथा रात्र आहे | --''-- | इनाल रात्री खोदे |
| २३६) | तू कोठे आहेस | तू कुठ आहे | तू कुठ आहे | --''-- | मियलिंग अइधा |
| २३७) | रात्री तू कोठे होतास | राती तू कुठ होता | राती तू कुठ होता | --''-- | इलींद मलींग इरा |
| २३८) | तुला जसे असाय माहीत<br>नाही तसे मला माहीत | तुला जा अजून माहीत<br>नही तसा मला माहीत | तुला जसा अजुक माहीत<br>नही तसा मला माहीत | --''-- | नींम येमू कु-हइल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नाही | नही | नही | | |
| २३९) | तुला घर मिळाले नाही का? | तुला घर मिळाला नही का? | तुलां घर मिळाला नही का? | --''-- | अइ नांग्यास कु-हुइल? |
| २४०) | तुमच्यापैकी कोणीतरी घेऊन जाउन त्याला घेवून यावे | तुमचे पायकी कोनी तरी घेवून जावून त्याला घेवून यावा | तुमचेपैकी कोनतरी येऊन जाऊन त्याला घेऊन येवा | --''-- | नींद माने सी बथलन |
| २४१) | ते कोणत्या प्रकारचे काय आहे? | त्या कंळ्या परकारचा काम आहे? | त्या कंजा परकारचा काम आहे? | --''-- तोंड भरी | नीम पाकी येउदु व्हयी |
| २४२) | तू तुझे काम मध्येच का सोडून दिलेस? | त्या तुहा काम मंदीच का सोडून दिला? | त्या तुजवाला काम मंदीच का सोडून दिला? | --''-- | नींम अमैंल मैंठू वीट कोंध |
| २४३) | तो कोणाच्याही उपयोगाचा नाही | तो कोणाचाही उपयुगाचा नही | तो कोणाचा उपेयाचा नाही | --''-- | मी यारधू उपयोगी इल |
| २४४) | चा नंतर ये | चार वाजलेवर यी | चार वाजल्याव यी | --''-- | भाकद मानी(मारकी अबा) |
| २४५) | तासाभरात ये | तासाभरात यी | तासाभरात यी | --''-- | बंद तासाना बा |
| २४६) | तुला काय आवडते? | तुला काय आवडताय? | तुलं काय आवडताय? | --''-- | |
| २४७) | आम्ही या रस्त्याने आलो | आम्ही या वाटाना आलो | आमी या वाटान आलूय | --''-- | नावी रस्त्यावन बरधुयो |
| २४८) | आम्ही गाडीत आलो | आमी गाडीत आलो | आमी गाडीत आलो | --''-- | नाउ माढीवाग बांधीव |
| २४९) | आम्ही पायी आलो | आमी पायी आलो | आमी पायी आलो | --''-- | माऊ कइकाल बांधीव |
| २५०) | आम्ही तोकडे गेलो | आम्ही तिकड गेलो | आमी तिकड गेलो | --''-- | माऊ आतला व्हादीब |
| २५१) | तो शाळेत गेला | तो साळात गेलाय | तो साळात गेलाय | --''-- | अद शाळेता व्हत |
| २५२) | मी माझ्या मित्राकडे गेलो | मी मया मित्राकडं गेला | मा म्या मिवाक गेलो | --''-- | नाम मित्राकडी होय थान |
| २५३) | तो त्याच्या आईकडे गेला | तो त्याच्या आईकड गेला | तो त्याच्यावाल्या आईर गेला | --''-- | अद ओर न्यानकडी होत |
| २५४) | मी कधीच हे गेले | मी मंधीन ह्या क्याला | मा कंधीन ह्या वयाला | --''-- | नामुंदच हची माइन |
| २५५) | मी वाचले | म्या वाचला | माया वाचला | --''-- | नाजू वाचन |
| २५६) | मी वाचत होते | मी वाचीत व्हते | मा वाचित व्हते | --''-- | ना वाछांन |
| २५७) | मी वाचीत आहे | मी वाचीत आहे | मा वाचित आहे | --''-- | ना वाछान |
| २५८) | मी वाचते | मी वाचिते | मा वाचित | --''-- | ना वाछान |
| २५९) | मला बसावयाची संवय नारी | मला बसावयाची सवय नाही | माल बसायची सवय नाही | --''-- | नाना कुंद्रो सवय इल |
| २६०) | मी पुस्तक वाचेपर्यन्त मला त्या विषयी सांगू नकोस | मी पुस्तक याचीतोय तवर मला त्याबाद्दाल सांगू नको | मा पुस्तुक वाचितुय तोवर माल ते बद्दल सांगू नको | --''-- इंगा इशान | ना पुस्तका वाचातान |
| २६१) | पक्षी माझ्या घरावरून | पाखरा मया घरावरून | पाखरा माजवाले घरावरून | --''-- | पक्षाना हॅल ठॅड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उडतात | उडत्यात | उडात्यात | | मानमनानी हार धो |
| २६२) | तो मोठा सिंह त्या मोठ्या झाडाखाली झोपला | तो मोठा सिव त्या मोठ्या झाडाखाली | तो मठ्ठा सिव त्या मठ्ठ्या झाडाखाली निजलाय | --''-- | अद ठहाड सिव व्हाड भारत कॅलम मुंबूथ |
| २६३) | रामा अतिशय जोरात बोलतो | रामा लइ जोरान बोलतोय | रामा लय जोशान बालतोय | --''-- | रामा नॉय जोरीना नडीयो |
| २६४) | झाडावरचे पक्षी गात आहेत | झाडावरची पाखरा म्हणत आह्यात | झाडावरची पाखरा म्हणत्यात | --''-- | मार नॉन पक्षा हाड अथो |
| २६५) | पक्षी झाडावर आहेत | पाखरा झाडावर आह्यात | पाखरा झाडाव आह्यात | --''-- | पक्षा मारऱ्या अइ धो |
| २६६) | त्यानी दिवसा काय पाहिले? | त्यांनी दिवसा काय पाहिला? | त्येनी दिवसा काय हेरला? | --''-- | अव हाउलींद? |
| २६७) | रामापेक्षा चांगला मुलगा कोणता? | रामापासून चांगला पोऱ्या कोंचा? | रामापासून चांगोल पोऱ्या कोंचा? | --''-- | रामानपासून यल्ली प्वार सरचा |
| २६८) | त्यानी तुला का पाठविले? | त्येनी तुला का लावला? | त्येनी तुला का लावला? | --''-- | निंग पाठ्येस्त्यो |
| २६९) | मी माझा मउ हरी याचा विचार करीत आहे | मी महा भाव हरी येवा इचार करीत आहे | मी मव्हा मान हरी येचा हचार करीत आहे | --''-- | मना व्वहो इचार माडसुथो |
| २७०) | दशरथाने रामास राजा बनविले | दशरथान रामाला राजा बनावला | दशरथानं रामाला राजा बनावला | --''-- | दशरथ रामान राजात बन सदो |
| २७१) | हरीने तिकडे जायचे | हरीन तिकडं जायचा ठरावला | हरीन तिकडं जायचा | --''-- | हरी आतला ठरसतम |
| | ठरविले | | ठरावला | | अभस्याला |
| २७२) | सोमनाथ मायनात हुशार आहे | सोमनाथ गाण्यामंदी हुषार आहे | सोमनाथ गाण्यामंदी हुषार आहे | --''-- | सोमनाथ मायना हुशारा अइता |
| २७३) | मी रात्री अभ्यास करते | मी रातीची अभ्यास करतेय | मी रातीची अभ्यास करतेय | --''-- | रात्री अभ्यास माडथुयो |
| २७४) | तो मनवत घरीच अभ्यास करते | तो निस्ता घरीव अभ्यास करतो | तो निसता घरीच अभ्येस करतोय | --''-- | अद फक्त मान्याभ्यास माडते |
| २७५) | त्याने जायचे ठरविले | त्येनी जायचा ठरावला | त्येनी जायाचा ठरवलाय | --''-- | अंद होगल्या ठरोसे |
| २७६) | तो दिवसा झोपत नाही | तो दिवसाची निजत न नाही | त दिवसाचा निजीत नाय | --''-- | अद अगले मूंगूद |
| २७७) | हत्ती सर्वात मोठा प्राणी आहे | हाथी सगळ्यात मोठा जनावार आहे | हाथी सगळ्यामंदी मठा जनावार आहे | --''-- | हाती इसरा द्वाड आहे |
| २७८) | काल्यापासून तो घरीच असतो | काल्यापासून तो घरीच असतोय | काल्यापासून तो घरीच बसतोय | --''-- | नन्डर लिंद मन्या ग कोंडरथी |
| २७९) | तू फारसे बावले नाही | त्वा लय वाचला नाही | त्वा लय वाचला नाय | --''-- | मी जास्त वाक्ये दिल |
| २८०) | टोपी घाल | टोपी घाल | टोपी घाल | --''-- | टोप्या अवन्वा |
| २८१) | एक रुपयास दहा आंबे | एक रुपयाला दाहा आंब | योद रुपायाला दाहा आंब | --''-- | वंद रुपयात हत मन काय |
| २८२) | रकमास कुत्रे चावले | रामाला कुत्रा चावला | रामाला कुत्रा चावला | --''-- | रामा न नाय वस्त |
| २८३) | आईने मला पुस्तक दिले | आईन मला पुस्ताक दिला | आमन माल पुस्तूक दिला | --''-- | माबीयाना पुस्तकान वन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | फोटत |
| २८४) तो तापाने वारला | तो तापान मरला | तो तापान मरला | --''-- | तापले सत |
| २८५) आम्ही आनंदाने काम करतो | आमी आनंदान काम करीतोय | आमी आनंदान काम करीतोय | --''-- | नाऊ आनंदाली कॅलस |
| २८६) एक तासानंतर ये | एक तास झालेय यी | वोक तास झालेव यी | --''-- | बंद तासी नंतर बा |
| २८७) मी चाकूने आंबा कापतो | मी चाकून आंबा कापितो | या चाकून आंबा कापीतो | --''-- | पावसमनी काय कोयथान |
| २८८) तो मला बोलावितो | तो मला बोलवितोय | तो माल गागतोय | --''-- | बदनांम करीथ |
| २८९) पाऊस पडत असतानाच ती बाहेर गेला | यानी घडत असलेअब तो दारी गेला | मानी घडत होता तव्हांच तो दारी गेला | --''-- | माळी बिड्चे तो व्हरी ओठोय |
| २९०) रामा, माझा भाऊ आहे | रामा मया भाय आहे | रामा नाजवाला माव आहे | --''-- | रामा नांद वाड इट अईत |
| २९१) हरी पत्र वाचतो | बरी कार्ड वाचीतो (कागद) | हरी कामुद (पत्र) वाचीतोय | --''-- | हरी पुस्ताका वाचयो |
| २९२) माझ्या हातून आरसा पडला | महे हातामंदून आरसा पडला | मह्या हातामंदून आरसा पडला | --''-- | नान क्यान आरशा बीत |
| २९३) तो घरातून बाहेर आला | तो घरातून दारी आला | तो घरामंदून दारी आला | --''-- | अदु मान्या घरीत बब |
| २९४) त्याचे घर माझ्या घरापेक्षा मोठे आहे | त्याचा घर मह्या घरा पासून मोठा आहे | त्याचा घर मह्या घरा पासून मठा आहे | --''-- | आर मान्यानान मनापासून द्वाडाअईत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९५) तो हॅट आणतो | तो टोपी आणीतो | तो टोपी अणीतो | --''-- | टोपी तरथे |
| २९६) तो त्याचा मुलगा आणतो | तो त्याचा पोऱ्या आणीतो | तो त्याच्यावाला पोऱ्या आणीतो | --''-- | अदार प्यार तरथे |
| २९७) रामा प्रयत्न करीत होता | रामा परियत्न करीत होता | रामा परियत्न करीत व्हता | --''-- | अद इट परयीस्नान माडघे |
| २९८) रामास काय मिळाले? | रामाला काय मिळाला? | रामाला काय मिळाला? | --''-- | रामालिंद कॅल्स् सीवथ? |
| २९९) रामा त्याच्या मित्रास बोलावतो | रामा त्योच्या मित्राला बोलावितो | रामा त्येच्यावाल्या दोस्ताला बोलवितो | --''-- | रामा आर तिती करीथे |
| ३००) रामा खेड्याकडे जातो | रामा खेड्याक जातो | रामा खेड्याक जातो | --''-- | रामा खेड्याउरगी होमीथे |
| ३०१) तो झाडास पाणी घालतो | तो झाडाला पाणी घालीतो | तो झाडाला पाणी घालीतो | --''-- | अदु मारीग नीर अनस्ते |
| ३०२) मी त्यास पुस्तक देतो | मी त्याला पुस्ताक देतो | मी त्याला पुस्तुक देतु | --''-- | नार कडी पुस्ताका कोडधान |
| ३०३) तो रामास पाहातो | तो रामाला पहेतो | तो रामाला हेरितो | --''-- | अद रामा हेरस्ती |
| ३०४) तो घोडा पकडतो | तो घोड्याला धरीतो | तो धोड्याल धरीतो | --''-- | अद कुदरा इडीथे |
| ३०५) माझे रहाते घर मोठे आहे | माझा राहता घर मोठा आहे | मथा रहाता घर मठा आहे | --''-- | नांद मुंढरी माना द्वाडद |
| ३०६) तो या रस्त्याने आला | तो या वाटान आला | तो या वाटान आला | --''-- | अदही अदीगोन कत |
| ३०७) त्याने कुऱ्हाडीने झाड तोडले | त्यान कुऱ्हाडीन झाड तोडला | त्यान कुऱ्हाडीनं झाड तोडला | --''-- | अद कुऱ्हाडेल मारन कडअईत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०८) त्यांनी कुऱ्हाडीने झाडे तोडली | त्येनी कुऱ्हाडीने झाड तोडली | त्येनी कुऱ्हाडीने झाडा तोडली | --''-- | अद कुराडे मारन कहिल |
| ३०९) फुलांना सुगंध नाही | फुलांली वास नही | फुलांली वास नाय | --''-- | उई पासिल |
| ३१०) मला यासारखे दुसरे हवे | मला याच्यासारखा दुसरा पाहिजे | माल येव्या सारखा दुसरा पाहिजे | --''-- | नांगपयान दुसऱ्या व्हगी |
| ३११) तू देशील तेवढे मी देतो | तू देसील तेवढा मी देतो | तू देशील तेवढा मी देतू | --''-- | मी आसका कोटा असना कोडता |
| ३१२) मी वाचले तर उत्तीर्ण होईल | म्या वाचला तर पास होईल | मा वाचला तर पास होईल | --''-- | ना वाचनार बास आंदान |
| ३१३) मी कापीत असतांना तो आला | मी कापीत व्हतो तवा तो आला | मा कापीत होवू तव्हा तो आला | --''-- | ना कोयान आवाग बत |
| ३१४) तो पळू लागला | तो पळाया लागला | तो पढाय लागला | --''-- | अधा आरात |
| ३१५) आज यात्रा आहे का? | आज यात्रा आहे का? | आज जत्रा आहे का? | --''-- | इद जत्रे इता? |
| ३१६) हे टेबल आहे का? | ह्या टेबल आहे का? | ह्या टेबल आहे का? | --''-- | इद टेबल अईधो |
| ३१७) तो दुसऱ्या माणसास भेटला | तो दुसरे माणसाला भेटला | तो दुसरे माणसाला भेटला | --''-- | न्यारीहोत बायी नांग न्यारा गौड |
| ३१८) हा माझा कागद आहे | हा महा कागद आहे | हा माजवला कागद आहे | --''-- | बोळी काग्द आरन्या बाहेद |
| ३१९) ही माझी बहीण आहे | ही मही बहीण आहे | ही माजवाली बहीण आहे | --''-- | अद नांत तंभी |
| ३२०) हे माझे घर आहे | ह्या महा घरा आहे | ह्या मव्हा घर आहे | --''-- | इद नान माने |
| ३२१) मी जमिनीस स्पर्श करील | मी जमिनीला शिवल | मा जमीनील शिवलं | --''-- | इद नान केय माद्यान |
| ३२२) कुत्र्याने झऱ्यावरून उडी मारली | कुत्र्यान झुरीवून उडी मारली | कुत्र्यानं झुरीवून उडी मारली | --''-- | इद नान केय माद्यान नाय झुऱ्याने हती |
| ३२३) आकाशात ढग आहेत | आभाळात ढग आहेत | आभाळामंदी ढग आह्यात | --''-- | आकाशात ढग अईत |
| ३२४) मी अंधारात जात नाही | मी आंधारावा जात नाही | मी आंधारात जात नाय | --''-- | कातल बोद्दीना अंधारात होगतील |
| ३२५) मी सकाळी येईन | मी सकाळला येईन | मा सकाळशी येईल | --''-- | नामुझाद बंधान |
| ३२६) या सापाला दोन जीभा आहेत | ह्या सापाला द्वान जीभा आह्यात | हे सापाल जीबा आह्यात आह्यात | --''-- | हौबत नीलबाड मतंडतायडु नालगी अईधो |
| ३२७) मी मनगटावर घड्याळ बांधले आहे | म्या हातात घड्याळ बांधला आहे | मा हातात घड्याळ बांधला आहे | --''-- | नान्द कयाईत |
| ३२८) तू माझ्या जातीचा आहेस | तू मह्या जातीचा आहे | तू माजवाल्या जातीचा आहे | --''-- | नी जाम जात्यंद अईत |
| ३२९) मला दोन लहान बहिणी आहेत | मला द्वान बारीक बहिणी आह्यात | माल दोन बाकीकल्या बहिणी आह्यात | --''-- | नाग यडु तंगी बारीक अईधो |
| ३३०) या खोलीस तीन भिंती | या खोलीला तीन भिंती | ह्या खोलीला तीन भिंती | --''-- | मुर बोत्यधो मूर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आहेत | आह्यात | आह्यात | | खोले धो |
| ३३१) | मी दोन्ही हातानी उचलतो | मी दोनी हातानी उचलितो | मी दोनी हातानी उचलितो | --''-- | ना यदुकईथ नेगीथान |
| ३३२) | एका दगडाचा रंग काळा आहे | एके दगडाचा रंग काळा आहे | एका दगडाचा रंग काळा आहे | --''-- | बंद केल करेद बंद भंडांऱ्या |
| ३३३) | तुला काय मिळाले? | तुला काय मिळाला? | तुला काय मिळला? | --''-- | नीन ॲनखीवय |
| ३३४) | लहान मूल रांगते | बारीक प्वार रिंगाताय | बारीक पोर रिंगात | --''-- | बारीक्यान धिग्द फरफटते |
| ३३५) | ते तमाशा पहातात | ते तमाशा पहेतेत | ते तमाशा हेरितात | --''-- | अदु तमाशान खांडल्या व्हादे |
| ३३६) | आम्ही भजन म्हणतो | आमी भजान म्हणतोय | आम्ही भजान म्हणतुय | --''-- | भाऊ भजन म्यो |
| ३३७) | मुले भारूड गातात | पोरा भारूड म्हणत्यात | पारा भारूड म्हणत्यात | --''-- | पोऱ्या भोळ भारूड म्यो |
| ३३८) | आम्ही भात लावतो | आमी भात लावितोय (आवणा) | आमी भात लावितोय (आवणा) | --''-- | माऊ भात हस्त्यो |
| ३३९) | भात लावणे चालू आहे | भात लावणा चालू आहे | भात लावणा चालू आहे | --''-- | आवनी चालू अईत |
| ३४०) | आम्ही दिवाळीची गाणी म्हणतो | आमी दिवाळीची गाणी म्हणतोय | आमी दिवाळीची गाणी म्हणतुय | --''-- | नाऊ दिवाळी हाट हत्यो |
| ३४१) | मुली शिमग्यातील खेळ खेळून गाणी म्हणतात | पोरी शिमग्यातला खेळ खेळून गाणी म्हणतात | पोरी शिमग्यामधील खेळ खेळून गाणी म्हणत्यात | --''-- | लेंडगोळ बांधो हाड आंधी होडीबाळग |
| ३४२) | आमचा देश डांगाण आहे | आमचे देश हा डांगाण आहे | आमचा देश हा डांगाण आहे | --''-- | नाम देश डांगानी अईत |
| ३४३) | आम्ही महादेव कोळ्यांच्या बायका | आम्ही महादेव कोळ्यांच्या बायका | आमी महादेव कोळेच्या बायका | --''-- | नाऊ महादेव गवळ्यान हेंगसदीर |
| ३४४) | आमच्या भागात ठाकर आहेत | आमच्या भागात ठाकर आहेत | आमच्या भागामंदी ठाकूर आहेती | --''-- | नाम भागीना ठाकर अई धो |

✻ ✻ ✻

**संस्कृती आणि भाषा –**

कोणत्याही भाषेचा भाषिक अभ्यास करताना संस्कृतीचा विचार केलाच पाहिजे. कारण संस्कृतीच्या जडणघडणीतून भाषेचा शब्दसंग्रह वृद्धिंगत होत जाणे व भाषेला अर्थ प्राप्त होत जाणे तसेच भाषेत निरनिराळे काल–परिस्थिती, विकास यानुसार नवीन शब्द येत असतात. 'मागणी तसा पुरवठा' हे सूत्र जसे आर्थिक व्यवहारात तसेच भाषेच्या क्षेत्रामध्येही अप्रत्यक्षपणे परिणामकारकठरलेले आढळून येते. गतकालाच्या ओघाबरोबर त्यामधील जीर्ण संकेत आणि तदर्शक जुने शब्दही स्वाभाविकरीत्या नामशेष होतात आणि बदलत्या परिस्थितीबरोबर निर्माण होणाऱ्या नवनवीन सुधारणे, शास्त्रीय शोध आणि अनेकविध प्रगतीपर गोष्टी या सर्वांचे वाचक असे नव्या दमाचे, ताजेतवाने शब्द आपल्या भाषेमधून निर्माण करण्याची गरज ही स्वाभाविकच ठरते. 'बदलत्या परिस्थितीबरोबर निर्माण होणाऱ्या नवनवीन गोष्टींसाठी वर्णनवाचक नवीन शब्द निर्माण करण्याची प्राथमिक गरज हे शब्दसंभावाच्या वाढीचे एक मूलभूत कारण ठरते ते असे. बदलती परिस्थिती आणि तिच्याबरोबर येणाऱ्या नवनवीन गोष्टी म्हणजेच सर्वांगीण विकसित होणाऱ्या आपल्या सांस्कृतिक प्रगतीची बाह्यात्कारी दृश्यमान होणारी प्रतीके होत.'

असा विचार करता डांगाण प्रदेशाचा विकास घडत असताना व दळणवळणाच्या दृष्टीने हा भाग जसजसा जवळ येतो तसतसे त्याच्या सांस्कृतिक जडणघडणीतही नव्या जाणिवा प्राप्त होत आहेत. त्यामुळे नवीन शब्द, ग्राम्यतापरिहाराचा प्रयत्न करणे अशा तऱ्हेचे स्तुत्य प्रयत्न चालू झाले आहेत. परंतु त्यामुळे एक धोका मात्र जरूर आहे. तो असा की या भाषेची जी विशिष्ट वेगळी अशी लकब आहे ती लकब हळूहळू नष्ट होईल. अर्थात ग्रामीण भाषेचे विकसित होत जाणे हे भाषाविकासाच्या दृष्टीने जरी योग्य असले तरी मराठीचे देशीपण त्यातून नष्ट होण्याचा धोकादेखील लक्षात घेतला पाहिजे. त्याचदृष्टीने येथे केलेला भाषिक अभ्यास महत्त्वाचा ठरतो. आणखी काही वर्षात कदाचित ही लकब, हे शब्द, ही भाषा कालौघात संपूनदेखील जाईल. काय सांगावे. नव्या सांस्कृतिक विकसनामुळे जरी भाषेची समृद्धी झाल्यासारखे वाटले तरी जुने विशिष्ट अर्थ स्पष्ट करणारे शब्द निघून जाणे हे देखील भाषेच्या मृत्यूस कारणीभूत होतात हे विसरून चालणार नाही.

**समारोप –**

चाळीसगाव डांगाण – भाषिक अभ्यास या प्रकरणामध्ये अगदी स्थूल स्वरूपात चाळीसगाव डांगाणच्या भाषेच्या ओळख करून घेण्याचे आपण ठरविले होते. त्याप्रमाणे भाषेची मोड कळण्याच्या दृष्टीने नामे, सर्वनामे, विशेषणे आणि क्रियापदे (धातु) तसेच अव्यये समजून घेऊन वाक्‌पचार, म्हणी, प्रत्यक्ष वाक्ये आणि त्याचबरोबर काही कथा व गाणी यांतून ही भाषा समजून घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. ही भाषा मध्यवर्ती मराठीपासून फारशी दूर गेली आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. तसेच जरी आदिवासी जमातीची लोकसंख्या जास्त असली तरी त्यात इतर तलवारकानडे, बारा बलुते क्वचित मराठा या जमातींची सरमिसळ झाल्याने ती भाषा मध्यवर्ती मराठीच्या बरीच जवळ आली हे ओघानेच आले.

या भाषेला असलेली वेगळी अशी लकब प्रत्यक्ष वाक्ये व कथा व गाणी यातून प्रत्ययास येते. तेच काही निष्कर्ष काढून त्यावरून स्पष्ट चित्र उभे करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

**काही ठळक निष्कर्ष –**

(१) महादेव कोळी आणि ठाकर या दोहींची भाषा एकमेकात पूर्ण मिसळली आहे तर ठाकर लोक त्यांची काही विशिष्ट लकब राखून आहेत. इठ, तीठ, आहात वगैरे त्यांची ठळक वैशिष्ट्ये

(२) येथील अभ्यास हा प्रचलित बोलीचा अभ्यास आहे.

(३) नामे – अकारान्त, आकारान्त, इकारान्त व उकारान्त सापडतात. यात अकारान्त नामांची संख्या सर्वाधिकआढळते. पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी नामांची अनेकवचने होताना जरी थोडाफार फरक होत असले तरी सर्वसाधारण लकबी पुढीलप्रमाणे आढळतात.

(अ) अकारान्त नामे अनेकवचनी होताना आकारान्त होतात.

(ब) विशेष नामांची अनेक वचने करण्याची पद्धत नाही.

(क) विशेष नामांची अनेकवचन करताना थोडेसे वैविध्यच आढळते व शेवटी अनुच्चारित अनुस्वार येतो. स्त्रीलिंगी आकारान्त नामांच्या अनेकवचनी स्वरूपात बदल होत नाही. फक्त शेवटी अनुच्चारित अनुस्वार येतो.

(इ) इकारान्त नामे अनेकवचनी होताना आकारान्त होताना आढळतात. परंतु इकारान्त पुल्लिंगी नामे रूप बदलीत नाहीत.

(फ) उकारान्त नामे अनेकवचन करताना रूप बदलीत नाहीत. केवळ अनुच्चारित अनुस्वार येतो. परंतु स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी नामे अनेकवचनी होताना आकारान्त होऊन अनुच्चारित अनुस्वार येतो.

(४) सर्वनामे – पुरुषवाचक, दर्शक, संबंधी व प्रश्नार्थक, सामान्य सर्वनामे वेगळी दाखविण्याइतकी त्यांची विपुलता नक्कीच आहे.

(५) विभवित – नामविभक्ति प्रत्यय मध्यवर्ती मराठीशी बऱ्याच अंशी जुळते मिळते असले तरी प्रथमा – उ., द्वितीया – यी, ली, तृतीया – नं, पंचमी– कून, पून, षष्ठी – वाला/लां/ली, सप्तमी – प, क, पशी, कड व संबोधन – नु अशी स्वतःची वेगळी लकब दाखविणारे विभक्ति प्रत्यय यात आहे. विभक्ति प्रत्ययांपासून होणारी रूपे मध्यवर्ती मराठीप्रमाणेच पुल्लिंगी आकारान्त, स्त्रीलिंगी इकारान्त व नपुसकलिंगी अकारान्त होतात.

(६) सामान्यरूप – मध्यवर्ती मराठीप्रमाणेच सामान्यरूप होण्याची पद्धत या प्रादेशिक बोलीमध्ये आहे.

(७) विशेषणे – नामसाधित, धातुसाधित, सार्वनामिक, दर्शक असे प्रकार या भाषेतील विशेषणांचेदेखील करण्यास हरकत नाही. शिवाय गुण, संख्या, अव्ययसाधित हे प्रकार देखील होतील. अधिविशेषण व विधिविशेषण वापरण्याची पद्धती मध्यवर्ती मराठीप्रमाणेच.

(८) संख्या – एक ते वीस व शंभर, हजार व त्यांच्या पटीत एवढ्याच संख्या वापरण्याची पद्धती दिसून येते. पट व अनियमित संख्यांची रेलचेल आहे.

(९) क्रियापदे – धातूंची संख्या विपूल असून अकर्मक व सकर्मक असा भेद त्यांच्यात करता येत असला तरी ते सर्व वेळी तसेच चालतील असे नाही. भाषाच्योगानुसार तो वेगवेगळ्या प्रकारे वापरला जातो.

(१०) संयुक्त क्रियापदांचा वापर बऱ्याच प्रमाणात या भाषेत होतो असे दिसते.

(११) सहाय्य धातूंचा वेगळा विचार केलाच पाहिजे. कर, टाक, सोड, लाव अशा धातूंचा देखील सहाय्यय धातू म्हणून उपयोग केला जातो.

(१२) काळांचे प्रत्यय – मराठीच्या मध्यवर्ती भाषेला पुष्कळच जवळचे आहेत. काळाचे प्रत्यय स्वतंत्रपणे मांडून दाखविले आहेत. त्यावरून ते लक्षात येईल.

(१३) धातूसाधिते तयार करण्याची लकब फार मोठ्या प्रमाणावर आढळते.

(१४) अव्ययांचे व्याकरणदृष्ट्या वर्गीकरण करणे शक्य आहे. हे यात निर्दिष्ट केलेल्या यादीवरून लक्षात येऊ शकेल.

(१५) पालुपदे हा प्रकारदेखील या भाषेत बराच आढळतो.

(१६) वाक्प्रचारांच्या बाबतीत भाषा मध्यवर्ती मराठीइतकी समृद्ध आहे असे म्हणता येणार नाही. कदाचित अनुभव व क्षेत्र मर्यादित असणे हे त्याचे कारण असू शकेल.

(१७) म्हणी, बोलीभाषेत जरी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात असल्या तरी कथा सांगताना त्यांचा फारसा उपयोग होत नाही. तमाशातून वा भांडणे होताना त्यांचा उपयोग केला जातो. लोकवाङ्मयात देखील त्यांचा वापर न करणे हे लक्षणीय वाटते.

(१८) भाषेची मांडलेली वैशिष्ट्ये ही विशेषतः वाक्ये व कथा यांमधून स्पष्ट दिसतात. गाण्यांमध्ये मात्र काही पारंपरिक शब्दरचना आल्याने त्यांचा क्रम लावणे तितकेसे सुलभ जात नाही.

(१९) कथा, गाणी आणि वाक्ये देण्याचा उद्देश केलेल्या अभ्यासाला प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र उदाहरणे वा स्पष्टीकरणे द्यावी लागू नयेत हा असल्याने त्या दृष्टिकोनातून पाहता नियोजित कथा, गाणी व वाक्ये भाषेची लकब व्यवस्थितपणे समोर स्पष्ट करतात.

(२०) आधुनिक भाषाशास्त्रदृष्ट्या हा अभ्यास नसला तरी एक प्रादेशिक लकब स्पष्ट होण्याचे दृष्टीनेच केवळ हा प्रपंच असल्याने ते उद्दिष्ट पूर्ण झाले आहे असे म्हणणेच योग्य.

**संदर्भ –**

१. इरावती कर्वे, 'मराठी लोकांची संस्कृती', पृ. २९, प्रकाशन रा. ज. देशमुख, देशमुख आणि कंपनी, दुसरी आवृत्ती १९६२.

२. 'लोकसाहित्य साजशिणगार', संपादकसरोजिनी बाबर, 'लोकसाहित्याची भाषा', ग. मो. पाटील, पृ. ८८ ते ९१.

३. ग. ह. केळकर, 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे', संपादक शं. गो. तुळपुळे, सिटी बुक स्टॉल, पुणे.

४. ग. ह. केळकर, 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे', संपादक शं. गो. तुळपुळे, सिटी बुक स्टॉल, पुणे.

५. ग. ह. केळकर, 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे', संपादक शं. गो. तुळपुळे, सिटी बुक स्टॉल, पुणे.

६. ग. ह. केळकर, 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे', संपादक शं. गो. तुळपुळे, सिटी बुक स्टॉल, पुणे.

७. अनुराधा पोतदार, 'मराठीचा अर्थविचार', पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६९, प्रथमावृत्ती.

# ९.

**संदर्भ सूची क्र. १**

(१) कर्वे इरावती, **मराठी लोकांची संस्कृति,** जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे १९५१.

(२) केळकर ग. ह., **मराठी व्याकरणाची मुलतत्त्वे,** संपा. तुळपुळे शं. गो., सिटी बुक स्टॉल, पुणे.

(३) खैरे विश्वनाथ, **द्रविड महाराष्ट्र,** साधना प्रकाशन. पुणे.

(४) गारे गोविंद, **महाराष्ट्रातील आदिवासी, महादेव कोळी,** सहाध्यायन प्रकाशन, मुंबई.

(५) जोशी ना. गो., **मराठी छंदोरचनेचा विकास,** मौज प्रकाशन, मुंबई ४, प्र.आ. १९६४.

(६) जोशी प्रल्हाद नरहर, **आदर्श मराठी शब्दकोश,** विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे २, प्र.आ. १९७०.

(७) ढेरे रा. चिं., **मराठी लोकसंस्कृतीचे उपासक,** ज्ञानराज प्रकाशन, पुणे, आ.प. इ.स. १९६४.

(८) पाटणकर रा. वि. (प्रका.) – **राजुरच्या परिसरातील पंधरा वर्षाचा साधना,** सत्यनिकेतन राजूर येथे उपलब्ध.

(९) पेंडसे शं. दा., **महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास,** सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, आ. ४.

(१०) पोतदार अनुराधा, **मराठीचा अर्थविचार,** पुणे विद्यापीठ प्रकाशन, प्र.आ. १९६९.

(११) फडके सुधीर, **महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न,** जोशी–लोखंडे प्रकाशन, पुणे.

(१२) बाबर सरोजिनी, मराठी लोककथा, पुणे १९६०.

(१३) बाबर सरोजिनी (संपा.)– **लोकसाहित्य साज शिणगार,** महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प ११ वे, १९६५.

(१४) भागवत दुर्गा, **लोकसाहित्याची रुपरेखा,** मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २, प्रथम आवृत्ती १९७५.

(१५) मांडे प्रभाकर, **लोकसाहित्याचे अंतःप्रवाह,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, प्र.आ. १९७५.

(१६) **लोकसाहित्याचे स्वरूप,** परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९७८.

(१७) मोरजे गंगाधर नारायण, **मराठी लावणी वाङ्मय,** मोघे प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७४.

(१८) सरदार गं. बा. (संपा.) – **महाराष्ट्र जीवन भाग १ व २,** जोशी–लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.

(१९) GHURYE G. S., The Mahaev Kolis A Scheduled Tribe, Popular Book Depot, Poona.

(२०) GAZETTEERS OF INDIA, MAHARASHTRA-STATE, AHMEDNAGAR DISTRIC., Second Edition (Revised).

(२१) LIST OF THE VILLAGES IN AKOLA TALUKA obtainable in Akola Tahashil.

**संदर्भ सूची क्र. २**

(१) आपटे बा. गो., **मराठी शब्द रत्नाकर,** आनंद कार्यालय, पुणे २.

(२) कालेलकर ना. गो., **भाषा : इतिहास आणि भूगोल,** मौज प्रकाशन, मुंबई ४, १९६४.

(३) ----, **भाषा आणि संस्कृती,** १९६२.

(४) कुलकर्णी कृ. पां., **लोकसाहित्याची शब्दसंपदा व सादपडसाद.**

(५) केळकर य. न., **होळकरांची कैफियत,** हनुमान प्रकाशन, पुणे २.

(६) जोशी वि. कृ., **लोकनाट्याची परंपरा,** श्री लेखन वाचन भांडार, लक्ष्मी रोड, पुणे, प्र.आ.

(७) **तालुका सेन्सस हॅण्ड बुक –** अकोले तालुका तहसीलदार कचेरी, अकोले.

(८) देशमुख मा. गो., **मराठीचे साहित्यशास्त्र,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २, दु.आ. १९५९.

(९) देव शा. भा., **महाराष्ट्राची उत्खनने,** लाड स्मारक व्याख्यानमाला, आकाशवाणी – पब्लिकेशन्स डिव्हीजन.

(१०) नांदापुरकर नां. गो., (संपा.) **मराठीचा मोहर,** प्रका.– ''आशिर्वाद'' इम्लीन कुतबीगुडा हैद्राबाद, आंध्रप्रदेश.

(११) बाबर सरोजिनी (संपा.) **लोकसाहित्य : भाषा आणि संस्कृती** – अध्यक्ष लोकसाहित्य समिती महाराष्ट्र, प्र.आ. १९६३.

(१२) -----, **जनलोकांचा सामवेद.**

(१३) -----, **एकहोता राजा.**

(१४) -----, **सांगीवांगी.**

(१५) -----, **जा माझ्या माहेरा.**

(१६) -----, **तीर्थाचे सागर.**

(१७) भागवत दुर्गा, **लोकसाहित्याची रुपरेखा,** ''वरदा बुक्स'', सेनापती बापट मार्ग, पुणे, दु.आ. १९७७.

(१८) मांडवकर भाऊ, **कोलाम,** साधना प्रेस, ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे ३०.

(१९) साने गुरुजी, **भारतीय संस्कृती,** सुलभ ग्रंथमाला, व्यवस्थापक मंडळ, पुणे २, आ. ८.

(२०) Bopurdikar M. N., **Agastya - Legends - A Historical and Cultural Study,** Deccan College, Poona, 1978.

(२१) Mrs. Chitnis Vijaya Shridhar, **The Khandeshi Dialet,** Poona University.

(२२) Ghatage A. M., **A Survey of Marathi Dislects II, Kudali,** Deccan College, Poona, 1965 - The State Board of Literature and Culture, Bombay.

(२३) Mrs. Laddu Suhasini. S. - **Linguistic Analysis of Koli** -A Dialect of Marathi.

(२४) Stephen Fuchs Tales of Gondavana, Dhawale Popular Lamington Road, Bombay-7.

✻ ✻ ✻